,उ्ल्भ+उऋ वक'उश्रउ्उ वर्कटत्हउं ऋणंउणवकण ऋौइपउइउ ख्ध वर्ग्उ्भ+ २६७१२७०१ ।फ्रकृक्ष झझुलेलाल मंदिर ते रेड क्रॉस हॉस्पीटल्क्षक्ष ऋणंउणवकण ऋौइपउडक्षख्उक्षइ व रोहित्रे्उक्षे वत्तइभ+उन्त ीइवकएॅउहउत्त्इत ग्क्षएॅउट ।उइक्षण सदर कार्याचे कर्ज उपलब्ध आहे.

र्ि ख्धउ्उ ्रश्रिर्उक्ष ऋु्ः ।व्'टउ ऋणंउणवकण ऋौ प र्उत ख्ध भ।+ऋउ्भ+ ५९२७ वर्ग्उ्भ+ २९७११७०२ ।फ्रकृक्ष झुलेलाल मंदिर ते रेड कॉस हॉस्पीटल्क्षक्ष ऋणंउणवकण ऋौइपउडक्ष ख्उक्षइ ीइवकएॅउ भ+तटउ ञख्क्ष ११ए७५ए५००६. ्उ ह्०टउकउह १५: ह्ख्वकर्च्छ डउवै .टौश्रट ऋुं्त वग्इतण

..२७..

र्ि ऋणंउणवकण ऋौइपउभ+ल्र्इ ऋुं् ह्उभ+ईउऋक्ष्क्ष हउचीर्ि . ऋुं्त . कउीटूभ+ प्दौ . फइतण म्नण ख्तण डउव्इह . र्ि हउवीर्ि भ+उज्झएॅउडक्ष डउव्इह ज्ञक्षकर्ल र्ववकग्उ ंऽभ+ऋ ञख्क्ष १०ए८०ए४११ए८१ र्वल्उंतट भ+र्श्र ंकम्ऽटत ;ऋंउत्त्इतद्दुए ?।।+ ह्क्षह ;त्रश्रा्वद्द व नावभारत हिन्दी्उ तीन कटौऋर्उ ख्धउट ह्र्उ ग्क्षर्ह र्ववकग्उ ऋउश्रवकएॅउट ।उद्दुउण

र्ि्उ ह्वटहउग्उट १द्द ऋक्षण व्उल्क ीएँइ हफ्रहर्ि भ+द्दुउन २द्द ऋक्षण एस. एम. ठइक्षफेंइतभ+ वर्क्स, भ+द्दुउन ३द्द मे. दास आणि बंधु, पुणे व ४द्द मे. एस. एस. इलेक्ट्रीकलस, कल्याण्र्उत भ+उक्षक्ष र्ववकग्उडक्ष ह्रख्ध पंक्षग्त भक्ष+इक्षण

प्उइतइ र्ववकग्उ ल्उंभ+र्उत कक्षपक्षकं द्रीन्क्ष वर्ग्उ्भ+ २७६१६०३ ंउक्षत्त ग्र्ख्उंत ३ कउव्क्ष ख्ट ठहउंउ ंऽभ+ऋक्षही वहइ,ग र्ववकग्उ हउगं भक्ष+द्दुउ क टक्ष र्िड वग्कमत वर्ग्उ्भ+ २७६१६०३ ंउक्षत्त हउ्भ+उपत ४ए०० कउव्टउ व्हैइएॅउट ।उइक्ष र्िडउ टूईउीत्रिःभ+ टऽटउ ख्ज्इतइ ह्ऋउन्क्ष ।उीक्षण

१ए ऋक्षण एस. एम. ठइक्षफेंइतभ+ वॉर्क्स भ+द्दुउन र्ववकग्उ ंऽभ+ऋ ञण १०ए८०ए४११ए८१ ख्क्षरउ १९ए३८ फइऽभक्ष+ व्उ०ट ए

२ए मे. दास आणि बंधु, पुणे, र्ववकग्उ ंऽभ+ऋ ञण १०ए८०ए४११ए८१ ख्क्षउउ ४ए८७ फइऽभक्ष+ भ+ऋतण

३ए मे. एस. एस. इलेक्ट्रीकलस, कल्याण र्ववकग्उ ंऽभ+ऋ ञण १०ए८०ए४११ए८१ ख्क्षउउ १२ फइऽभक्ष+ व्उ०टण

कंतइ तीन र्ववकग्उडउ टूईउीत्रिःभ+ टर्ऽिहउं मे. दास आणि बंधु, पुणे, र्उत वग्इक्षइक्ष गं र्ववकग्उ ंऽभ+ऋ ञण १०ए८०ए४११ए८१ ख्क्षरउ ४ए८७ फइऽभक्ष+ भ+ऋत ।उन्त कउव्कत ।र्हू्उ्उ र्वदकग्क्षह ऋुं्त ग्क्षर्ह इउश्रन्उ्उ प्दौउह ऋु,ठौ

ह्रुवटभ+ ऋीर्उश्रंख्उवइभ+उ ।वर्ल्युत्र्ञ १९४९ ,ु३ भ+इत्र्ञ ७३ ।फ्रकुक्ष ऋ्उफ्रुटे साठी स्थायी समिती पुढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १०४ <u>दिनांकः- १.२.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. किरण माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार झुलेलाल मंदिर ते रेड क्रॉस हॉस्पीटल येथे म. रा. वि. मंडळाचे पोल हलविणेकामी प्रशासनास मे. दास आणि बंधु पुणे या लघुत्त्तम दराच्या निविदाकाराक्षी संविदेस मान्यता देत आहे व अंतर्भुत खर्चास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १४ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> नेहरू चौक ते प्रेमरामचंदानी चौक, इ.एस.आय.एस. हॉस्पीटल येथे
म.रा.वि.मंडळाचे पोल हलविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची
माहिती नोंद करणे बाबत.

.२८ ..

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> नेहरू चौक ते प्रेमरामचंदानी चौक, इ.एस.आय.एस. हॉस्पीटल येथे
म.रा.वि.मंडळाचे पोल हलविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची
माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

ऋीर्उश्रंस्व्उवइभक्ष्ंक्ष म्भ+उीत्रिऋतभ+ ं०टक्ष वकभ+उह भ+ज़ौभ।+ऋ ॑।टौश्रट॒उ ऋएंउणवकण ऋ्र्हैज्ञपउडक्ष ं०र्ीउट ॒क्ष्न्उंक्ष फॅज्ञउफ्रह?+उऋौ क स्व्उक्षइ म्भ+उ ,उ़्ूइउ इउकपॅ्उडक्ष भ+ज़ौ र्वक्षि्ल ह्व्ऽट भ+र्श्न १००: प्डौ क १५: ह्ूस्व्ंकर्च्ं डउवै॒उ ॑।टौश्रट ीउटत ज्ञक्ष्टइक्ष्इक्ष ।उीक्ष्ण

,ज़्ल्भ+उऋ वक'उश्रउ॒उ वर्क्टत॒ूहउं ऋएंउणवकण ऋ्र्हैज्ञपउइउ स्व्ध वर्ग्ज़भ+ २१६९६०२ ।फ्रकृक्ष नेहरु चौक ते प्रेम रामचंदानी चौक इ. एस. आय. एस. हॉस्पीटल ॒र्क्षक्ष ऋएंउणवकण ऋ्र्हैज्ञपउडक्षस्व्उक्षइ॒उक्ष् वत्त्ज्ञभ+उन्त ीइवकपॅ्उहउत्त्ज्ञत ग्क्षपॅ्उट ।उइक्षण सदर कार्याचे कर्ज उपलब्ध नाही परंतु आति अविद्दयक असल्याने हे कार्य हाती घेतलेले आहे.

र्ीउ स्व्धउ॒उ ूश्रिर्उक्ष ऋ्ू॒ं ।व॒'टउ ऋएंउणवकण ऋ्र्है प ॒र्उत स्व्ध भ।+ऋज़भ+ ०००६९ वर्ग्ज़भ+ ६६१६०३ ।फ्रकृक्ष नेहरु चौक ते प्रेम रामचंदानी चौक इ. एस. आय. एस. हॉस्पीटल ॒र्क्षक्ष ऋएंउणवकण ऋ्र्हैज्ञपउडक्ष स्व्उक्षइ ीइवकपॅ्उ भ+ंतटउ ज्ञस्व्क्ष ७एं८०एं५००६. . १५: ह्ूस्व्ंकर्च्ं डउवै रु. १एं०२एं८५०६. यास तांत्रिक ऋ्ू्ंत वग्इतण तसेच कार्यकारी अभियंता म.रा.वि. मंडळ यांनी सुपरविझन चार्जेस रुप्ये १,०२,८५०/- साठी डिमांड नोट कं. ८३२२दिनांक १७/१/०३ रोजी पाठविली आहे.

र्ीर्उटं ऋएंउणवकण ऋ्र्हैज्ञपउभ"+लर्इ ऋ्ूटं ह्वउभ+ईउऋट्क्ष हउचीर्ी . ऋ्ूंत . कउीटूभ+ प्डौ . फज्ञतण म्नण स्व्तण डउव्द्वह . र्ूक्ष हउवीर्ी भ+उज्ज्ञपॅ्उडक्ष डउव्द्वह ज्ञक्षकर्ल र्ववक०उ ंऽभ+ऋ ज्ञस्व्क्ष ७एं६६एं६९३ण३९६. र्वल्उंतट भ+र्श्न ंकमऽटत ;ऋंउत्त्ज्ञतद्धुए ?।।+ ह्वक्षह ;ठ्श्रा।व्तद्धु व नावभारत हिन्दी॒उ तीन कटौऋर्उ स्व्धउट ह्ूर्इउ ग्क्षर्ं र्ववक०उ ऋउश्रवकपॅ्उट ।उद्बुउण

र्ीउ॒उ ह्ववटहउ०उट १द्धु ऋक्षण व्उल्क ीएंज्ञ हफ्रहर्ीएं भ+द्बुउन २द्धु ऋक्षण म्ऽह भक्ष+ ठ्वर्व्ा।जश्र हइ्ीतहक्षहए भ+द्बुउन क ३द्धु ऋक्षण ।उंणफज्ञतण ठइक्षफॅंज्ञतभ+इह क ठ्वर्व्ा।दौश्र॒र्उत भ+उक्षंक्ष र्ववक०उडक्ष ह्वस्व्ध पंक्ष्गत भक्ष+ईीण
मे. आर.टी. इलेक्ट्रीकल्स व ठ्वर्व्ा।दौश्र, कल्याण यांनी फक्त कक्षपक्षकं द्रीन्व्क्ष वर्ग्ज़भ+ २४६१६०३ ंउक्ष्व्त ग्ूस्व्उंत ३ कउव्क्ष स्ट्ट ठहउंउ ंऽभ+ऋक्षही वहइ॒ग र्ववक०उ हउगं भक्ष+ली क टी र्ीउड वग्कमत वर्ग्ज़भ+ २४६१६०३ ंउक्ष्व्त हज़भ+उपत ४ण०० कउव्टउ व्झौज्ञपॅ्उट ।उइी व ऋक्षण ।उंणफज्ञतण ठइक्षफॅंज्ञतभ+इह क ठ्वर्व्ा।दौश्रए भ+द्बुउन याची निविदा, र्ववक०उ ंऽभ+ऋ ज्ञण ७६६६९३ण३९ स्व्क्षरउ ०ण१ फज्ञऽभक्ष+ कमी आहेत.

मे. आर.टी. इलेक्ट्रीकल्स व ठ्वर्व्ा।दौश्र, कल्याण॒र्उत वग्इक्षइक्ष गं र्ववक०उ ंऽभ+ऋ ज्ञण ७६६६९३ण३९ स्व्क्षरउ ०ण१ फज्ञऽभक्ष+ भ+ऋत ।उन्त कउव्कत ।र्हू ॒ज़॒उ र्वदक०क्षह ऋ्ूंत ग्क्षर्ं इउश्रन्उ॒उ प्डौउह ऋ्ू,ठौ ह्वज़वटभ+ ऋीर्उश्रंस्व्उवइभ+उ ।विर्ल्ुत्रऋ १९४९ ॒उ भ+इऋ ७३ ";ज्ञद्धु ।फ्रकृक्ष २४/१/०३ रोजी मान्य करुन त्यांच्याद्दाी दिनांक २९/१/०३ रोजी करार करण्यात आला. ही माहिती स्थायी समिती पुढे अवलोकना अर्थ सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १०५ दिनांक:- १.२.२००३

सुचकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. निता आहुजा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार नेहरू चौक ते रामचंदानी चौक इ. एस.आय.एस. हॉस्पीटल येथे म.रा.वि. मंडळाचे पोल हलविणे कामी उपरोक्त ठेकेदाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १५ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> कोर्ट ते गोल मैदान लिंक ते अमन चौक येथे म.रा.वि.मंडळाचे पोल हलविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणेबाबत.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> कोर्ट ते गोल मैदान लिंक ते अमन चौक येथे म.रा.वि.मंडळाचे पोल हलविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

ऋीर्उश्रंख्उवइभ्क्ष्‍क्ष म्भ+उीत्रिटतभ+ ं०टक्ष वकभ+उह भ+ज्ञैभ।+ऋ ़।टौश्रट़्उ ं र्ंउहउत्त्ज्ञत म्ऋणम्ऋण ।उंण`ज्ञतण ।क्षण डक्ष भ+वै ब्ख्इह्मल ।उीक्ष टर्क्षतइ ऋणंउणवकण ऋौैज्ञपउडक्ष ंर्ंउट ़क्ष्न्उंक्ष फंज्ञउफ्रह?+उऋौं क ख्उक्षइ म्भ+उ ,उूइउ इउकएॅउडक्ष भ+ज्ञौ र्वक्षिल ह्ुऽट भ+र्ब्र १००: प्डौ क १५: हूर्ख्वकर्च्छ डउवै़्उ ़।टौश्रट ।उटत ज्ञक्षटइक्षइक्ष ।उीक्षण

,उल्भ+उऋ वक'उश्रउ़्उ वर्कूटत ूहउं ऋणंउणवकण ऋौैज्ञपउइउ ख्ध वर्ग्उभ+ २६६१२६०१ ।फ्रकृक्ष कोर्ट ते गोल मैदान लिंक ते अमन चौक ़र्क्षक्ष ऋणंउणवकण ऋौैज्ञपउडक्षख्उक्षइ व रोहित्रे ़उक्षृ) वत्त्ज्ञभ+उन्त ।इवकएॅउहउत्त्ज्ञत ग्क्षएॅउट ।उइक्षण सदर कार्याचे कर्ज उपलब्ध आहे.

र्ंउ ख्धउ़्उ ृश्रिर्उक्ष ऋू÷ ।व़्'टउ ऋणंउणवकण ऋौै प ़र्उत ख्ध भ।+ऋउभ+ ०००६७ वर्ग्उभ+ ६६१६०३ ।फ्रकृक्ष कोर्ट ते गोल मैदान लिंक ते अमन चौक ़र्क्षक्ष ऋणंउणवकण ऋौैज्ञपउडक्ष ख्उक्षइ व रोहित्रे ।इवकएॅउ भ+तटउ ब्र्ख्क्ष ९ए९२ए७५०६. ़्उ ह्‌०टउकउह १५: हूर्ख्वकर्च्छ डउवै ़।टौश्रट ऋूंत वग्इतण

र्टेउटं त्र्प्रणंउणवकण त्र्प्रैझपउभ्ैलईर्ज त्र्प्रूटं ह्वउभ+ईउत्र्प्रट्क्ष हउचीर्प्र . त्र्प्रटूंत . कउीटूभ+ ण्डौ . फइतण म्नण स्वतण डउव्द्वह . र्ढ्क्ष हउवीर्प्र भ+उज्झपॅउडक्ष डउव्द्वह झक्षकर्ल र्वेवक्ग्उ ंऽभ+त्र्प्रट ञ्चस्क्ष ९एं७४ए४११ण८७ र्वेल्ंउतट भ+र्ज ंकम्ऽटत ;त्र्प्रंउत्त्झतद्वए ?।।+ ह्वक्षह ;द्वश्रोक्तद्व व नावभारत हिन्दी ृउ तीन कटौत्र्प्रर्उ स्वधउट हूईउ ग्क्षर्ं र्वेवक्ग्उ त्र्प्रउश्रवकएॅउट ।उद्वउण

र्टेउ ृउ ह्वटहउग्उट १द्व त्र्प्रक्षण व्उल्क ीर्ऍंझ हफ्रहीर्ए भ+द्वउन्‍ २द्व त्र्प्रक्षण एस. एम. ठइक्षफेंझतभ+ वॉक्सए भ+द्वउन्‍ ३द्व मे. दास आणि बंधु, पुणे व ४द्व मे. एस. एस. इलेक्ट्रीकलस, कल्याण ृर्उत भ+उक्षं र्वेवक्ग्उडक्ष ह्वस्ध पक्ग्त भ्क्ष+इक्षण

.३० ..

प्उइतइ र्वेवक्ग्उ ल्उंभ+र्उत कक्षपक्षकं द्रीन्क्ष वर्ग्रउभ+ २७६१६०३ ंउक्ष्त गूस्व्ंत ३ कउव्क्ष स्ट्ट ठहउंउ ंऽभ+त्र्प्रक्षही वहइ„ग र्वेवक्ग्उ हउगं भ्क्ष+द्वउ क टक्ष र्टेउ व्ग्कमत वर्ग्रउभ+ २७६१६०३ ंउक्ष्त हउ्भ+उपत ४ण०० कउव्टउ व्झैझएॅउट ।उइक्ष र्टेउडउ टूईउीर्त्र्प्रटभ+ टऽटउ स्रूज्झतइ ह्वत्र्प्रउन्क्ष ।उीक्षण

१ण त्र्प्रक्षण एस. एम. ठइक्षफेंझतभ+ वॉक्स, कल्याण, निविदा रक्कम ञ्चण ९एं७४ए४११ण८७ स्क्षउउ १९ण३८ फझऽभ्क्ष+ व्उ॰टण

२. मे. दास आणि बंधु, पुणे र्वेवक्ग्उ ंऽभ+त्र्प्रट ञ्चण ९एं७४ए४११ण८७ स्क्षउउ ३ण६९ फझऽभ्क्ष+ कमी.

3- मे. एस. एस. इलेक्ट्रीकलस, कल्याण र्वेवक्ग्उ ंऽभ+त्र्प्रट ञ्चण ९एं७४ए४११ण८७ स्क्षउउ 12 फझऽभ्क्ष+ व्उ॰ट.

कंतइ तीन र्वेवक्ग्उडउ टूईउीर्त्र्प्रटभ+ टऽर्टूहउं मे. दास आणि बंधु, पुणे ृर्उत व्ग्इक्षइक्ष गं र्वेवक्ग्उ ंऽभ+त्र्प्रट ञ्चण ९एं७४ए४११ण८७ स्क्षरउ ३ण६९ फझऽभ्क्ष+ भ+त्र्प्रत ।उन्त कउव्कत ।र्हू ृउ ृउ र्वेदकग्क्षह त्र्प्रटूंत ग्क्षर्ं इउश्रन्उ ृउ ण्डौउह त्र्प्रट ,ठौ ह्वउवटभ+ त्र्प्रीर्उश्रंस्वउवइभ+उ ।वर्ल्यूत्र्प्रट १९४९ ृउ भ+इत्र्प्रट ७३ ड ।फ्रक्ष २८/१/०३ रोजी मान्य करुन त्यांच्याशी दिनांक २९/१/०३ रोजी करार करण्यात आला. ही माहिती स्थायी समिती पुढे अवलोकना अर्थ सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १०६</u> <u>दिनांकः- १.२.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. नरेंदकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिलीप गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार कोर्ट ते गोल मैदान लिंक ते अमन चौक येथे म.रा.वि. मंडळाचे पोल हलविणे कामी उपरोक्त ठेकेदाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ४. ४० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं.कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दि:-२८.२.
२००३.

इतिवृत्त

दि. २८.२.२००३ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २८.२.२००३ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्त्या.

१. मा. सभापती :-श्रीमती. ज्योती कालानी.

२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. गायकवाड दिलीप दशरथ
४. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
५. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
६. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
७. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
८. श्री. मुलचंदानी महेंद्र
९. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाछोमल
१० श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
११ श्री. लिंगे सुर्यकांत
१२ श्री. शर्मा कमला गंगाधर
१३ श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल

तर

मा. सदस्य /सदस्या १. श्रीमती. मोकल सीमा , २. श्री. रामरख्यानी मोहनदास, ३ श्री. वलेचा पृथ्वीया सभेस अनुपस्थितीत होत्त्या.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासिन अधिकारी स्थानी आसनस्थ होत्त्या.

सायंकाळी ४. ५५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-सभा सुरू होण्यापुर्वी मा. अतिरिक्त आयुक्त श्री. सोनवणे साहेब यांना आयुक्तांचा चार्ज मिळाला आहे. त्यामुळे स्थायी समिती तर्फे त्यांचे अभिनंदन करतो, सोनवणे साहेब आल्यापासुन २ महिनेपासुन महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे, अजुन त्यात प्रगती होईल आता भाभी पुष्पगुच्छ देवून यांचे स्वागत करतील.

इकडे मा. सभपती यांनी श्री. सोनवणे साहेबांना पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १ वाचनु दाखवितात.

--१--

विषय :- मागील सभांचे दिनांक १२.२.२००३ रोजीचे सायंकाळी ४.०० वाजताचे व ४.३० वाजताचे इतिवृत्त कायम करणे बाबत. (त्यात दि. ७.२.२००३ चे इतिवृत्त समाविष्ट आहे)

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-मागच्या सभेत काही मुददयांवर तुम्ही प्रॉमिस केले श्री. विनोद तलरेजा यांनी आमच्या मुददयांवर हे म्हंटले म्हणुन आम्ही सर्व संमतीने अंदाजपत्रक मंजुर केले. परंतु महासभेत आमच्यावर श्री. किशोर वनवारी यांनी आमच्यावर आरोप केले की आम्ही सर्व संमतीने बजेट मान्य केले याठिकाणी आवर्जुन सांगतो तुम्ही त्यावेळी आमचे मुददे ऐकले मान्य केले विशेष समिती रदद करू असे मान्य केले त्याचे काय झाले? आणखी महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आम्ही तुम्हाला सांगितले होते की, जर व्यापा-यांना पाणी बिल माफ करत असाल तर झोपडपटटी धारकांकडे पण नळ कनेक्शन नाही त्यांना पण बिल माफ करावे ते पण ऐकले नाही तसेच टॅकरव्दारे ६० टक्के पाणी बंगले व इमारतीना पाणी जाते, ३० टक्के फक्त झोपडपटटीधारकांना पाणी मिळते. पुर्ण भारतात कुठल्याही महापालिकेत टॅकरचे पाणी मोफत दिले जात नाही. ना नफा ना तोटा या तत्त्वावर देतात, दिड कोटीचा तोटा भरून निघेल जर तुम्ही टॅकरवर चार्ज आकारले तर ते मान्य केले की नाही. तसेच मा. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती यांच्या निधीतून तुम्ही महापौर व आयुक्तांचा बंगला बांधण्याचे ठरविले आता तो निर्णय महासभेत रदद केला या सर्वांचा खुलासा करा, अशी माझी स्थायी समिती सभेला विनंती आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-सर्वात आधी तुम्ही बोललात, स्थायी समितीत तुम्ही अंदाजपत्रकातील काही मुददे मांडले होते. झोपडपटटीधारकांना जर बिल नाही आकारले तर कसे होईल पुर्ण शहराला बिल माफ केले तर कसे होणार?

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-तुमचा गैरसमज झाला आहे मी असे म्हटले की, ज्यांच्याकडे नळ कनेक्शन नाही त्या झोपडपटटीधारकांना बिल माफ करावे पुर्ण शहराचे नाही, त्यासाठी मी तुम्हाला उदाहरण दिले की, शहाडगाव येथील लोक सेंच्युरी कंपनीकडून पाणी भरतात, पण त्यांना महानगरपालिकेचे बिल जाते, महानगरपालिकेचे नळकनेक्शन त्यांचेकडे नाही तरी त्यांना बिल भरावे लागते. जर व्यापा-यांना बील माफ करता तर त्यांना पण माफ करावे असे मी म्हंटलो होतो.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-मी असे म्हंटलो होतो की, स्थायी समिती मध्ये काही मुददे मांडले, त्याचा महासभेत विचार केला जाईल.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-असे कसे महापौर, उपमहापौर, निधी विषयी तुम्हीच बदल करण्याचा सुझाव दिला आम्ही नव्हता दिला. त्याचे काय केले, त्याचा खुलासा नाही केला.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-महासभेत निर्णय झाला आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-तुम्ही आमचे मुददे मान्य केले म्हणुन सर्व संमतीने पास केले, या आश्वासनावर आता मा. सभापतींनी खुलासा करावा. सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांनी आरोप ठेवला महासभेत आम्ही सर्व संमतीने मान्य केले. आम्ही का पास केले? तुम्ही आश्वासन दिले म्हणुन.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-सर्वात वरीष्ठ महासभा आहे तिने बहुमताने निर्णय घेतला आहे.

--३--

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-तुम्ही स्थायी समितीत आश्वासन दिले त्याचे काय?

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-तुम्ही महासभेत मंजुर नाही केले आम्ही बहुमताने बजेट पास केले आमचे काही चर्चा झाली म्हणुन असे झाले.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-पुर्ण झोपडपट्टीत नळ कनेक्शन नाही माझ्या प्रभागात व्यापा-यांना नळ कनेक्शन नाही म्हणुन तुम्ही बिल माफ कले तसे त्यांना पण माफ करा. दोघांना समान न्याय द्या ते दोन्हीकडे बिल भरतात.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-आयुक्त साहेब यावर उत्तर देतील.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-महानगरपालिका क्षेत्रात कुठेही पाणीपुरवठा होतो. म्हणजे कोणता तरी सोर्स मधुन त्यांना पाणी मिळते. त्यांना वॉटर टॅक्स लेवी घेते. बी.पी. एम.सी. ॲक्ट १९४९ मधील सेक्शन १३० अन्वये कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंदाशी पाणी वाहुन नेणा-या नळांच्या साहाय्याने जोडल्या असतील त्यांचेवर पाणी पुरवठा लाभकर आकारण्यात येईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-त्यांना सेंच्युरी कपंनीस पण पाण्याचे बिल द्यावे लागते.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-त्यांना बिल देण्याची गरज नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-सेंच्युरी रेयॉनचे कामगार आहेत त्यांना ६० ते ८० टक्के लोकांना कंपनी मोफत पाणी देते. २५ वर्षापासुन ते त्या कंपनीचे कामगार आहे. काही वर्षापासुन त्यांना पाणी कनेक्शन नाही, तरी करावयाची बिलात ५० ते १०० रू. त्यांना बिल जोडून आले आहे ते दुस-यांकडुन पाणी भरतात व त्यांना देखिल ५० ते १०० रू. देतात. तिकडे अशी समस्या आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-एखाद्या इमारतीत ४ कनेक्शन असते ३५ फ्लॅट १०० रू. भरते मग त्याचे काय? ते सर्वजण बिल भरतात.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-झोपडपटटीत तर कनेक्शनच नाही मग ते कसे भरणार?

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-पाणी कुणाचे आहे? महानगरपालिकेचे ना.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-घरात नळ जोडणी नाही तरी घर पावती बरोबर त्यांना बिलआले आहे. पुर्वी कर पावती व पाण्याचे बिल वेगवेगळे यायचे. पुर्वी जिथे

पाणी मीटर होते. तिकडे बील यायचे आता घर पावतीत नळ कनेक्शन नसले तरी बीज जोडुन येते.

<u>मा. सदस्य श्री. महेंद्र मुलचंदानीः-</u> ........ मध्ये पण काही ठिकाणी असेच आहे.



<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>झोपडपट्टीमध्ये कॉमन स्टेंड पोस्ट टॅप लावणार होते त्याचे काय झाले मागे श्री. नरेंद्र ठाकुर यांनी मान्य केले की कॉमन स्टेंड टॅप आम्ही लावून देवू. काय केले?

<u>श्री. जवांदे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग):-</u>आयुक्तांचे आदेश घ्यावे लागतील.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>स्थायी समितीने निर्णय घेतला आहे सर्व संमतीने.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>स्थायी समितीत सर्व संमतीने निर्णय घेतला आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>तुम्ही कॉमन स्टेंड टॅप म्हणजेच स्टेंड पोस्ट साठी बोलत आहात ना? तर राज्य शासनाचे याबाबत आदेश आहेत की कॉमन टॅप न देता ग्रुप कनेक्शन देण्यात यावे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मग बिल का देता.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>ग्रुप कनेक्शन देवू. समजा एका ठिकाणी ३० ,४० झोपडपट्टया आहे. त्यांनी एकत्र येवून तसा अर्ज दिला व ३००० रू भरले नंतर ग्रुप कनमेनशन देवू शकतो.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>झोपडपट्टीवाल्यांना पाणी कनेक्शन देत नाही. ३००० रू. ते कसे देणार? पैसे वसुल करता? पाणी देत नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>राज्य शासनाची पॉलीसी आहे त्याची गाईड लाईन आहेत त्यानुसार पालन करावे लागेल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>ते केव्हा होते आम्हाला पण माहित आहे. नगरपालिका असताना पुर्वी पाण्याचे बिले वेगळे जायचे आता मात्र घरपावतीतच पाण्याचे बिल जाते.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>कॉमन स्टेंड पोस्ट नाही देणार ग्रुप कनेक्शन देवू. टॅक्स तर त्यांना भरायचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>इकडे किंवा तिकडे काहीतरी एक आले पाहिजे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-प्रॉपर्टी असेसमेंट केली त्याप्रमाणे कर पावती दिली.



मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-झोपडपट्टी आज नाही ९७ पासुन आहे. एकीकडुन तुम्ही झोपडपट्टीकडुन टॅक्स घेता.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-तिकडे बोरवेल तर असेल ना.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-पाणी पुरवठासाठी १.१.१९९७ पासून आदेश आहे राज्य शासनाचे स्पष्ट आदेश आहे अवैध बांधकाम असेल तर बिल घेतले जाते. अवैध नळ कनेक्शन दिले नाही पाहिजे. लिगल पोझिशन आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-मग तुम्ही पाण्याचे बिल कसे वसुल करतात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-स्टॅंड पोस्ट नाही देणार. ग्रुप कनेक्शन देऊ. महानगरपालिका व्यवस्थाने ते देऊ. बोरवेलचा आहे, सार्वजनिक विहिर आहे तेथुन ते पाणी घेतात.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-सर्व ठिकाणी......

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-तो पॉलिटीकल डिसिझन आहे. पण राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचने विरूध्द निर्णय घेवू शकत नाही.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-आपण यापुर्वी देखिल यावर विस्तृत चर्चा केली आहे. आयुक्तांचे म्हणणे आहे पाणी कुठून ना कुठून तरी ते महानगरपालिका क्षेत्रातुन घेतात. वापर करतात.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचदांनी:-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर म्हणाले होते कॉमन टॅप लावून देवू म्हणुन असे मान्य केले होते.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मा. आयुक्तांचे म्हणणे आहे. ५० -६० झोपडपट्टीधारकांना एकत्र असे ग्रुप कनेक्शन करून घ्यायचे. पुर्वी मीटर प्रमाणे बिल द्यायचे परंतु सरकाने आता पॉलिसी बदलली आहे. कॉमन टॅप बंद केले आहे कर पावती तर अनाधिकृत बांधकामांना देखिल दिली जाते, जसे फायर ब्रीगेड चा वापर आग लागल्याशिवाय कुणी करीत नाही, तरी पण फायर टेक्स भरतात. ५-६ लोकांना मिळुन ग्रुप कनेक्शन देता येईल, कॉमन स्टॅंड पोस्ट नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-मागच्या सभेतच हे का नाही सांगितले आता का सांगता?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-आता मा. सभापतींनी मला सांगायला सांगितले म्हणुन.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-बजेटच्या सभेच्या वेळी हे सर्व सांगायला पाहिजे होते ना.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-मीच त्यांना सांगायला सांगितले.



मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मागच्या वेळीच सांगायला पाहिजे होते ना. श्री. नरेंद्र ठाकुर यांनी मान्य केले कॉमन टॅप देऊ.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-मान्य नव्हते केले सुचविले होते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-पैसा वसुल ९७ पासुन करता ना.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-त्यांना ग्रुप कनेक्शन देवू. महानगरपालिका राज्य शासनाचे निर्णयाविरूध्द करता येणार नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-एका स्थायी समितीत काहीतरी बोलतात. दुस-या स्थायी समितीत निर्णय बदलतात. यापुढे जे बोलायचे ते बरोबर बोला. दिशाभुल करू नका, सचिवांनी महासभेत देखिल तसे काही सांगितले नाही. त्यावेळी तरी सांगायला पाहिजे होते.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-स्टॅंड पोस्ट बोलले होते मागच्या सभेत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-मागच्या वेळेस श्री. पोखरकर साहेब होते हे नव्हते.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पास.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरचे इतिवृत्त सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषयः- सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत उल्हासनगर शहरातील ६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

काही सदस्यः-पास.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे समंत करण्यांत येत आहे.

विषय :- सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत उल्हासनगर शहरातील ६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. महापौर/नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

--७--

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | दिनांक | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | प्र.क्र.२५ मध्ये गणेशनगर प्रवेशद्वार ते शंकर मदिर व आजूबाजूच्या परिसरात सी सी पायवाटा व नाली बांधणेबाबत. (नगरसेवक निधी १२५) | १,९९,९६०/- | १७/१/२००३ | मे जनसेवा म.का.सासो |
| २ | आदर्शनगर आणि बॅ नं १३५२,१३६३, ३५५,१३५६,१३५८, आणि १३२३ येथे सी सी पायवाटा व नाली बांधणे. (नगरसेवक निधी १२८) | १,९९,८२९/- | १७/१/२००३ | मे स्टॅंडर्ड म.का.सोसा. |
| ३ | प्र. क्र. १३ मध्ये ब्लॉक अे-७१४ ते अे-७१९ पर्यंत नाली बांधणे. (नगरसेवक निधी १६०) | १,००,०५०/- | १७/१/२००३ | मे स्टॅंडर्ड म.का.सोसा. |
| ४ | उल्हासनगर-४ येथील प्र क्र.१६ मध्ये बॅ नं १६८३, १६८६, १६९५ येथे सी सी पायवाटा आणि नाली बांधणे. (नगरसेवक निधी १७७) | १,९९,९४६/- | १७/१/२००३ | मे स्टॅंडर्ड म.का.सोसा |
| ५ | प्र क्र. ६ अ मधील सर्व शौचालय दुरूस्ती करणे १) रमाबाई आं. नगर २) आझादनगर ३) वडार कॉलनी, ४)बौध्दनगर, ५) गोळी कारखान्याजवळ, ६) लादी कारखान्याजवळ व स्टेजजवळ (महानगरपालिका निधी) (१८९) | १,५०,०००/- | १७/१/२००३ | मे अरती म.का. सोसा. |
| ६ | उल्हासनगर-३ येथील गौतम बुध्द नगर झोपडपट्टी येथील नाला दुर्बल घटक निधीतून बांधणेबाबत. (२३७) | १,९९,०००/- | १७/१/२००३ | मे गुरूदेव म.का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १०८</u> <u>दिनांक:- २८.२.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. किरण माने.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत उल्हासनगर शहरातील ६ विविध कामी प्रशासनाने वरील उल्लेख केलेल्या ठेकेदारांशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-
<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय:- सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत उल्हासनगर शहरातील ७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>काही सदस्य:-</u>पास.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे समंत करण्यांत येत आहे.

**विषय :-** सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत उल्हासनगर शहरातील ७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. महापौर/नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-५ येथील प्रेमनगर टेकडी ते स्वामी शांतीप्रकाश योगा सेंटर पर्यत नाला दुरूस्ती करणे. (महानगरपालिका निधी)(७५) | ७९ ,७००/- | ११/२/२००३ | स्टॅंडर्ड म. का.सोसा. |
| २ | उल्हासनगर-१ येथील रमाबाई आंबेडकर नगर हिरा सेलून ते जोंधळे कृष्णा मंदिर, दादाराव लहाने घराजवळ, परमहंस तिवारी ते हवाटे घर, कुंडीलील ते सुनिल कस्बेच्या घराजवळ प्रभाग क्र ५ .(नगरसेवक निधि (१००) | ९९ ,०५०/- | ३/२/२००३ | ओम म.का. सोसा. |
| ३ | उल्हासनगर-३ येथील संगिता प्लास्टि क ते रमेश रीजवानी घर बॅ नं ७६२ , सी सी रोड एम-२५० व नाली , टप्पा जयहिंद स्कुल जवळ व विविध ठिकाणी सी सी व नाली बांधणे. प्रभाग २० .(नगरसेवक निधि (११६) | १ ,९९ ,४७५ /- | ४/२/२००३ | स्टॅंडर्ड म. का.सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | उल्हासनगर-२ येथील जी के बी आय केअर ते साकाव पर्यत नाली बांधणे आणि वूडलॅंड हॉटेल मोनिका मॅरेज हॉल जवळ साकाव बांधणे .(नगरसेवक निधि (११७) | १ ,०२ ,१२५ /- | ४/२/२०० ३ | स्टॅंडर्न्ड म. का.सोसा |
| ५ | उल्हासनगर-४ येथील सेक्शन १७ आणि १८ बॅ ८१३ , ८२५ येथे सी सी पायवाटा आणि नाली आणि शौचालय दुरूस्ती करणे .(नगरसेवक निधि . (नगरसेवक निधि (१२४) | १ ,९९ ,८४८ /- | ४/२/२०० ३ | स्टॅंडर्न्ड म. का.सोसा |
| | उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र. १६ मध्ये बॅ नं १४०५ , १४०२ , १४११ , १३९५ येथे सी सी पायवाटा आणि नाली बांधणे आणि शौचालय दुरूस्ती करणे.(नगरसेवक निधि १३८) | १ ,९९ ,८०७ /- | ४/२/२०० ३ | स्टॅंडर्न्ड म. का.सोसा |
| ७ | उल्हासनगर-२ येथील प्र क्र. २३ बरखा अपार्टमेंट ते विशाल पॅलेस आणि बॅ नं ६५९ , ६३१ , ७४१ आणि विविध ठिकाणी एम-२५० ने रस्ता बांधणे (नगरसेवक निधी १६४) | १ ,९९ ,९६० /- | ४/२/२०० ३ | स्टॅंडर्न्ड म. का.सोसा |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप कस्न दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १०९</u> <u>दिनांकः- २८.२.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. रोहडा श्यामसुंदर

अनुमोदकाचे नाव :- श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत उल्हासनगर शहरातील ७ विविध कामी प्रशासनाने वरील उल्लेख केलेल्या ठेकेदारांशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>
सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१०--

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषयः- सौर उर्जा व पवन चक्की व्दारे निर्माण होणा-या उर्जेचे महापालिका मुख्यालयाच्या इमारतीतील एका विंगमध्ये वापरणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>काय आहे?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>सौर उर्जेचा आहे.

<u>काही सदस्यः-</u>पास.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे समंत करण्यांत येत आहे.

विषय :-सौर उर्जा व पवन चक्की व्दारे निर्माण होणा-या उर्जेचे महापालिका मुख्यालयाच्या इमारतीतील एका विंगमध्ये वापरणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

माननीय स्थायी समिती यांच्या ठराव कमांक ६३ दिनांक ११/११/०२ अन्वये सौर उर्जा व पवन चक्की द्वारे निर्माण होणा-या उर्जेचे महापालिकेच्या मुख्यालयाच्या इमारतीतील एका विंगमध्ये वापराकामी आवश्यक अंदाजित रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली असून आयुक्तांना त्यांच्या मतानुसार पुढील कार्यवाहीनिर्णय आणि निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करण्यात आले आहे.

सदर ठराव पारीत झाल्या नंतर महानगरपालिकेने पत्र कं. उमप्रा/आ. का/ ४३० दिनांक १३/११/२००२ अन्वये 10 KW Wind Solar Hybrid System बसवण्यासाठी महाउर्जा कडे प्रस्ताव पाठवून दिला.

त्याच्या उ-तरा दाखल महाउर्जा पुणे यांनी पत्र कं. SAG-002/02-03/420 dated 30/1/03 अन्वये असे कळविले की

"We have received a sanction order of Ministry of Non Conventional Energy Sources (MNES) New Delhi regarding installation of 10 KW Wind Solar Hybrid system at Ulhasnagar Municipal Corporation. The proposal is sanctioned by MNES and a details are as follows:-

| | |
|---|---|
| Ex- works cost<br>(Ex-works cost is the total cost Excluding transport, insurance, testing, erection and commissioning) | Rs. 27,16,763/- |
| Subsidy Amount<br>(Subsidy is 75% of the ex-works cost subject to maximum of Rs. 2 lakhs per KW) | Rs. 20,00,000/- |

We would request you to send us the copy of the work order for your share which is required to get the funds from the Ministry of Non Conventional Energy Sources."

सदर अनुदान मंजुरीचे पत्र प्राप्त होतानाच फि प्रेस, नवशक्ती व नवभारत या तीन वर्तमान पत्रात सुचना देउन निविदा मागविण्यात आल्या.

खालील दर्शविलेल्या निविदा धारकानी वेळेवर म्हणजे दिनांक १०/२/०३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत इसारा रक्कमेसह सादर केल्या व ते त्याच दिवशी उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्त्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

१. मे. भारत हेवी इलेक्ट्रोनिकस लि. अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २८,३६,७८३.०० पेक्षा १६ टक्के कमी.
२. मे. टाटा. बि. पी. सोलार इंडिया लि. अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २८,३६,७८३.०० पेक्षा ७.२ टक्के कमी.

सदर तुलनात्त्मक तक्तयानुसार मे. टाटा. बि. पी. सोलार इंडिया लि., यांचे दर सर्वात कमी व वाजवी असुन यांची निविदा दिनांक १०/२/०३ रोजी मान्य करुन त्यांच्याशी दिनांक ११/२/०३ रोजी करार करण्यात आला. ही माहिती स्थायी समिती पुढे अवलोकना अर्थ सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ११०
दिनांक:- २८.२.२००३

सुचकाचे नाव :- श्री. सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. जयश्री सुर्वे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार सौर उर्जा व पवन चक्कीव्दारे निर्माण होणा-या उर्जेचे महापालिकेच्या मुख्यालयाचे इमारतीतील एका विंगमध्ये वापरासाठी केंन्द्रशासनाच्या अनुदानातुन प्रशासनाने मे. टाटा बी.पी. सोलार इंडीया लि. या सर्वात लघुत्त्तम दराच्या निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषयः-मा. अतिरिक्त आयुक्त कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना
रूपये ५०० विशेष भत्ता देणे बाबत.

<u>काही सदस्यः-</u>पास.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे समंत करण्यांत येत आहे.

..१२ ..

विषय :- मा. अतिरिक्त आयुक्त कार्यालयातील चतुर्थश्रेणी
कर्मचा-यांना रूपये ५०० विशेष भत्ता देणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

अतिरिक्त आयुक्त यांना काही वेळा महत्त्वाच्या कायालयीन कामानिमित्त बैठकानिमित्त कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतरही कार्यालयात थांबावे लागते. अशावेळी या कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री. बाबुराव रंगनाथ पाचपिंडे व श्री. सुनिल लक्ष्मण केणे तसेच श्री. रमेश वामन रणदिवे, सुरक्षा रक्षक यांना कार्यालयीन वेळेनंतरही जादा वेळ थांबावे लागते. करिता संबंधित चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना आयुक्त कार्यालयातील कर्मचा-यांप्रमाणे रूपये <u>५००/-</u> अतिकालीन भत्ता / विशेष भत्ता देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिति ठराव क्र. १११</u> <u>दिनांकः- २८.२.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. नरेंदकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री. महेंद मुलचंदानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार अतिरिक्त आयुक्त कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना विशेष भत्ता रू. <u>५००/-</u> प्रतीमहा देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर-५ येथे कैलास कॉलनी येथे हायमास्ट लाईट बसविणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>काही सदस्यः-</u>पास.

--१३--

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे समंत करण्यांत येत आहे.

**fo"k; %&** mYgkluxj&5 ;sFks dSykl dkWyuh ;sFks gk;ekLV ykbZV clfo.ks dkeh iz'kklukus dsysY;k lafonsph ekfgrh uksan dj.ks ckcr-

**<u>izLrkouk</u>**

CëhmgZJa –5 _Yrb dSyk'k dkWyksuh ;sFks hm`_gQ> bmB©Q> ]godU{ gmR>r foRrh; o"kZ 02&03 P;k lHkkirh LFkk;h fu/khrwu #i;s [kpZ H$aU{ ]m]V, odËVr` df© • 2002 – 2003 À`m lHkkirh LFkk;h oZYrVyZ H$m_H$aU{ gmR>r AmamIS>m ]ZodÊ`mV Ambm. Ë`m AmamIS>`mZwgma é[`{. 5,99,368/- BV·`m oH$_§VrM{ A§XmO [ÌH$ V`ma H$aÊ`mV Amb{ d Ë`m A§XmO[ÌH$mbm _w»` b{Im AoYH$mar AmoU _w»` b{Im [najH$ `m§Zr [U _§Owar gmR>r og\$mnae H{$br AgyZ oZodXm _JdÊ`mMr [admZJr X{Ê`mV Ambr.

**oXb{ë`m oZodX{ gwMZ{À`m àoVgmXmV VrZ E{oOÝgr Z{ H$m{a{ oZdrXmM{ AO© Ia{Xr H{$b{. Ë`m[iH$s 2 oZdrXm YmaH$m§Zr Bemam a·H$_{gh d{i{da åhUO{ oXZm§H$ 20/2/03 am{Or Xw[mar VrZ dmO{ [`ªV ogb]§X oZdrXm gmXa H{$ë`m. V{ oZndXm** fnukad 21@2@03 jksth ldkGh **11 dmOVm CKS>Ê`mV Ambr Ë`mMm VwbZmË_H$ V·Vm Imbrb à_mU{ Amh{.**

1. _{. ]OmO Bë·Q->rH$bg ob. A§XmO[ÌH$s` a·H$_ é[`{5,99,368/- [{jm 31.2% H$_r åhUO{ EHy$U H$m`m©M{ é[`{ **412365.1** Ag{ oXb{ Amh{.
2. es- ;qukbZVsM ,stulh ;kauh vankt i=dh; jDde #i;s 5,99,368@& is{kk 21% deh åhUO{ EHy$U H$m`m©gmR>r é[`{ 4,73,500.72/- Ag{ oXb{b{ Amh{.

darb VwbZmË_H$ V·Ë`mZwgma _{. ]OmO Bbr·Q->rH$bg ob_rQ>{S> _w§]B© h{ hm`_mñQ>Mr CË[mXH$ H§$[Zr Amh{ Vg{M Ë`m§Zr _hmZJa[mobH{$À`m hXrV lgk hm`_mñQ> [wdu [U bmdb{b{ AgyZ V{ ì`dñWrV H$m`© H$aV Amh{.

darb gd© ]m]r bjmV K{Vm _w§]B© à§oVH$ _hmZJa[mobH$m AoYoZ`_ 1949 M{ H$b_ 73 (S>) Zwgma _{. ]OmO Bb{·Q->rH$bg ob_rQ>{S> `m§Mr oZdrXm oñdH¥$Vr H$éZ gXa H$m_mg bmJUmam IM© é[`{ 4,73,500.72 `mg àemgH$s` d odËVr` _mÝ`Vm X{CZ _{. ]OmO Bb{·Q->r·bg ob_rQ>{S> ;kauk oXZm§H$ 21/2/03 am{Or Lohd`rh i= ns.;kr Amb{bm Amh{ oh _ohVr ñWm`r go_VrÀ`m Adbm{H$Zm gmR>r gmXa H$aÊ`mV `{V Amh{.

**<u>LFkk;h lferh Bjko Ø-</u> 112** **<u>fnukad%& 28-2-2003</u>**

lqpdkps uko %& Jh- fouksn ryjstk

vuqeksndkps uko %& Jh- ujsanzdqekj Bkdqj-

gh LFkk;h lferh ojhy izLrkous vuqlkj mYgkluxj&5 e/khy dSykl dkWyuh pkSd ;sFks gk;ekLV ykbZV clfo.ks dkeh iz'kklukus es- ctkt bysDVªhdy fy- ;k lokZr y?kqRre njkP;k fufonkdkjk'kh dsysY;k lafonsph ekfgrh uksan dfjr vkgs-

lqpdkph lgh@&

vuqeksndkph lgh@&

**,derkus**

lHkkirh @ fiBklhu vf/kdkjh
LFkk;h lferh lHkk
mYgkluxj egkuxjikfydk

--१४--

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

विषयः- नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत ५ कामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>डिफर करा.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>कारण काय? शासनाचे पैसे आहेत येऊ द्या.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>हा येणारा पैसा आहे डिफर का करता?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>माहितीसाठी आहे ना?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>माहितीसाठी नाही प्रशासनास निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>३१ मार्चपर्यंत करायचे आहे. का मंजुर करत नाही?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>३१ मार्चला अजुन वेळ आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>५(२)(२)मध्ये नाही करायचे आहे का?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>३१ मार्चपर्यंत करायचे आहे. यांनतर ५ (२)(२)मध्ये प्रस्ताव करायचे नाही तर आमचा विरोध आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>हे काम करण्यासाठी विरोध आहे की, ५ (२)(२) अन्वये काम करण्यास विरोध आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>५(२)(२)मध्ये करण्यास विरोध आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>ते तर समितीचे अधिकार आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>आमचा विरोध आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-निविदा मागविण्यात याव्या आणि निविदा प्रक्रिया संपवुन संविदेच्या मान्यतेसाठी दि.२०.३.२००३ पुर्वी स्थायी समिती पुढे सादर करण्यात यावा. मी प्रस्ताव मतास टाकतो.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे निविदाशिवाय थेट संविदा करण्याच्या बाजुने आहेत त्या सदस्यांनी आपले हात वर करावेत.

१. श्री. दिलीप गायकवाड
२. श्री. बच्चाराम रूपचंदानी
३. श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे



मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे निविदाशिवाय थेट संविदा करण्याच्या विरोधात आहेत त्या सदस्यांनी आपले हात वर करावेत.

१. सभापती श्रीमती. ज्योती कालानी
२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
४. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
५. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
६. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
७. श्री. मुलचंदानी महेंद्र
८. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
९ श्री. लिंगे सुर्यकांत
१० श्री. शर्मा कमला गंगाधर

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा ठराव बहुमताने पुढीलप्रमाणे समंत करण्यात येत आहे.

विषय :- नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत ५ कामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना

नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेचे विविध कामे करणेसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत आली होती. त्यानुसार उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार खालील ५ कामांना रूपये २५,६६,५५०/- एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून सदर कामास २० लक्ष निधी उपलब्ध होणार आहे. उपरोक्त आदेशानुसार उर्वरित रक्कम रूपये ५,६६,५५०/- एवढा जादा खर्च महानगरपालिकेला आपल्या निधीतुन करावयाचा आहे. तसेच सदरची कामे ३१ मार्च २००३ पर्यंत तातडीने पुर्ण करावयाची असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे ५ कामांना खालील प्रमाणे नेमुन दिलेल्या ठेकेदारांकडुन करून घेणेसाठी प्रस्ताव तयार केले आहे.

| अ.क्र. | प्राकलनांचे नाव | प्रशासकीय मंजुरीची रक्कम (लाखात) | एजेन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| १. | उल्हासनगर-२ येथील बालकनजी बारी येथे रस्ता एम-२५० ने बनविणे आणि चंद्रशेखर आझाद शाळेजवळ साकव आणि रस्ता एम-३५० ने बांधणे (प्रभाग क्र. ९) | ४,५९,२५०/- | मे. सिध्दनाथ मजुर कामबार सोसा. |
| २. | उल्हासनगर-३ येथील सेंट जोसेफ शाळा वडोल गांव येथे १० बैठकीचे शौचालय बांधणे. | ४,४१,८००/- | मे. कपिलेश्वर मजुर कामगार सोसा. |
| ३. | उल्हासनगर-४ येथील ब्लॉक ओ-१३३ ते ब्लॉक ओ-१३० येथे नाली बनविणे व डांबरीकरण करणे (प्र.क्र.१६) | ४,३९,९००/- | मे. स्टॅंडर्ड मजुर कामगार सोसा. |
| ४. | उल्हासनगर-५ येथील गॅस | ३,५०,१००/- | मे. श्री. विनायक |

| | | | |
|---|---|---|---|
| | गोडावून ते बॅरेक क्र. २०८६ मागे नाला बनविणे (प्र. क्र.२०) | | मजुर कामगार सोसा. |
| ५. | उल्हासनगर-५येथे साईबाबा नगर येथे रस्ता एम-२५० ने बनविणे (प्र. क्र३०) | ८ ,७५ ,५००/- | मे. संध्या कंन्स्ट्रक्शन |
| | एकुण | २५ ,६६ ,५५०/- | |

तरी उपरोक्त कामे करून घेणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरणे ५ (२)(२) अन्वये स्थायी समिती सभेपुढे मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

--१६--

स्थायी समिती ठराव क्र. ११३ दिनांक:- २८.२.२००३

सुचकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. महेंद्र मुलचंदानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वर्षे २००२-२००३ मधील वर नमुद केलेल्या ६ कामांसमोर दर्शविलेल्या ठेकेदारांशी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित नाही. तसेच प्रशासनास निविदा मागविणेस आणि निविदा प्रक्रिया संपवुन संविदेच्या मान्यतेसाठी दि. २०.३.२००३ पुर्वी स्थायी समिती पुढे सादर करण्याचे निर्देश देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर ५ येथील बसंत बहार ते बॅरेक नं. १९६९ या रस्त्याचे सिमेंटीकरण करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-माहिती द्या असे कसे आणले?

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय घेतला का कोण सांगणार?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. सभापती महोदया, हा विषय शहर अभियंता यांच्या विभागातर्फे आला आहे. एम.सी.ए. व मुख्य लेखा अधिकारी दोघांचे अभिप्राय घेतले आहे. तुमच्या माहितीसाठी म्हणुन सांगतो इथे जे प्रस्ताव येतात ते लेखा विभागाकडुन क्लीअर होवनू येतात.



मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-पैसे आहेत का? याची काय आवश्यकता आहे. जे आमचे जरूरी काम आहे ते घ्या. आमचे २५०, ३०० चे काम होत नाही. आता पैसे कुठून आले. नगरसेवकांचा निधी मिळत नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-हे काम करण्यापेक्षा अत्यावश्यक सेवा आहे त्या करा पाण्याची समस्या आहे.

मा. सदस्या श्रीमती. किरण मानेः-महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब असताना काय गरज आहे. ४-५ नंबर क्षेत्रात पाणी येत नाही ते आधी करा. इतक्या गंभीर समस्या आहेत.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-मा. आयुक्त साहेब, सभापती महोदयांना मी वांरवार सांगितले पण त्यांनी विजीट दिली नाही. तुम्ही आमच्या येथील आय.डी.आय चार्ली वेल्फर येथील रस्ता येवून बघा. इतका नादुरूस्त रस्ता आहे. केमिकलचे टॅकर तिथुन जातात. जर एखादा ट्रक वगैरे घसरून पडला तर हजारो लोक मरतील. ८-१० महिने झाले मी स्थायी समितीत वारंवार ओरडतो पण या विषयावर कुणी लक्ष देत नाही. हे आणण्याची गरज काय? एवढी गरज होती का?

मा. सदस्या श्रीमती. किरण मानेः-दर सभेत श्री. दिलीप गायकवाड हे सांगत असतात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. सदस्य म्हणाले की, एवढी गरज आहे का? जेव्हा एखादे काम जरूरी असते तेव्हाच हाती घेतले जाते. यासाठी निधी आहे. शहाड रस्त्याचे जे हे बोलत आहे ते आय.आर.डी.पी. मध्ये रोड आहे. महानगरपालिका निधीतुन तो मी केव्हाच सुरू करायला सांगितले आहे.

मा. सदस्य श्री.बच्चाराम रूपचंदानीः-हा रोड कोणत्त्या निधीतून आहे. आमचे रोडकरायला तरतुद नाही. मग यासाठी तरतुद कशी? दुर्बल घटक वसाहती मध्ये तरतुद असुन तिकडे काम होत नाही, दलित वस्तीचे काम होत नाही. तरतुद शासनाची असून सुध्दा मग हे कसे होते? हा व्याप ऐवढा महत्त्वाचा रोड नाही, झोपडपट्टीत होत नाही मग हे आणण्याची गरज काय?

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-तुम्हाला आनंद झाला पाहिजे. तुमचे सदस्य महासभेत ओरडत होते. रोड डेव्हलपमेंट होत नाही. मग आता होत आहेत. तुम्हाला आनंद झाला पाहिजे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-नगरसेवक निधी मिळत नाही. झोपडपट्टी दुर्बल घटकाची कामे होत नाही. गरीबांचे काम होत नाही.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-शहराच्या हितासाठी आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आम्ही सुचित करतो ते रोड देखिल शहराच्या हितासाठी आहेत ते तुम्हाला हिताचे करत नाही का आणि तुम्ही करता ते हिताचे, महानगरपालिका पैसा नाही आर्थिक परिस्थिती दुर्बल आहे. इतके ४० लाख रू. चे काम ३ लाखाचे काम होत नाही.

--१८--

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-स्थायी समिती मध्ये मंजुर होवून अजुन निविदा मागवायच्या आहेत. ठेकेदार काम करतात की नाही माहित नाही. आमचे निवेदन आहे हे रोड मंजुर करा शहराच्या हितासाठी आहेत.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-दोन रोड कोणते आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-२५० चे रोड नाही. ३५० दुर्बल घटकात तरतुद असुन काम करीत नाही.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-होतील ती कामे होतील.

मा. सदस्य श्री. बच्यारामं रूपचंदानीः-तुम्ही कशाला उत्त्तर देता आयुक्तांना देवू द्या.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-आपण विरोध करा आम्ही पास करू.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-हे चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-हे रोड महत्त्वाचे होते म्हणुन घेतले.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-महानगरपालिकेची स्थिती कमकुवत आहे. छोटे छोटे काम होत नाही.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-आता सोनवणे साहेबांनी ३-४ करोड ठेकेदारांना पेमेंट दिले आहे. ते काम करायला तयार आहेत हे काम शहराच्या हितासाठी आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-आय.डी.आय कंपनी येथील रोड देखील महत्त्वाचा आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-तो आधीच करायला सांगितले आहे.

श्री. मोहन चिजवानी (शहर अभियंता):-त्या रस्त्त्यावरील अतिक्रमण हटवायला सांगितले आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-मी चार्ली वेल्फर याचा येथल रोड म्हणाले तो नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-पुर्ण वर्ष ते ओरडत आहेत तुम्हाला अजुन हे माहित नाही कोणता रोड ते?

श्री. मोहन चिजवानी (शहर अभियंता):-:-आय.डी. आय येथील बोल आहात ना.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-मी दहादा लोकेशन सांगितले आहे. लिखित अर्ज दिला आहे. तो चार्ली वेल्फरचा पुढील रोड आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आम्ही ओरडतो आमचे सदस्य ओरडतात ते गंभीरतेने घेतले जात नाही.

--१९--

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-आयुक्तांनी जो सांगितला तो हा रोड नाही पुढचा रस्ता आहे. भिवापुरकर साहेब तुम्ही सांगा.

श्री. भिवापुरकर यांनी लोकेशन सांगितले.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-मा. आयुक्त पोखरकर साहेब तेथे येऊन गेले आहेत. त्यांना याची कल्पना आहे तुम्ही साहेब हा रस्ता स्वत: येऊन बघा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-ठिक आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदर प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर ५ येथील बसंत बहार ते बॅरेक नं. १९६९ या रस्त्याचे सिमेंटीकरण करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

काही सदस्य:-पास.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-१ मिनिट बोलु तर द्या मग पास करा कुणी खुलासा करा. आमचे वरीष्ठ ओरडतात तुम्ही स्थायी समितीमध्ये बोलत नाही का? तुम्हाला निवडले आहे स्थायी समितीत. तुम्ही बोलत नाही, आम्हाला तुम्ही नोटीस देऊन तरी कशाला बोलावता, फायदा काय स्थायी समिती सभेत येऊन आम्हाला जर चर्चा करायची नसेल आमचे ऐकायचे नसेल तर रस्त्याची रूंदी किती ते सांगा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-सदर रोड ३५ फुट करण्यात येत आहे. डी. पी. चा रोड आहे. लोक स्वत:हुन तेथे बांधकाम ५ फुटापर्यंत कमी करायला तयार आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-डी.पी. चा रोड असा आपण महासभा मंजुरीशिवाय कमी रूंद करू शकतो का? असे कसे करू शकता.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-डी. पी. प्लान रोड मध्ये जर बदल करायचा असेल तर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २१० अन्वये आयुक्तांस तसे अधिकार आहेत तसे स्थायी समितीच्या पुर्व मान्यता घेवून अशा रितिनी विहीत केलेल्या रेषेच्या किंवा तिच्या कोणत्त्याही भागाच्या बदली नवीन रूंदी विहीत करता येईल. नागरिक जर स्वत: बांधकाम तोडुन देण्यास असेल तर काय हरकत आहे?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-तुम्ही म्हणता विदाऊट महासभा मंजुरीचे तुम्ही डी.पी. रोड मध्ये बदल करू शकता, मग समजा मला आमच्या येथील रोड ५० फुटाचा २५ फुट करायचा आम्ही करू शकतो का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-डी. पी. रोडमध्ये जर रूंदीकरण मिळत नसेल तर आणि जर रूंदी कमी करणे शक्य असेल तर....

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-महासभेच्या मंजुरी विना? आम्ही पण केले तर चालेले ना.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-हो. लोक स्वतःहुन तोडुन द्यायला तयार आहे. जनहितासाठी करत आहे. जर नागरिक तयार आहे. तरच करू शकतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-पुढे काय? डी.पी मध्ये इतर रोड नाहीत का? झोपडपट्टीमध्ये सी.सी. पॅसेज आहेत ते का करत नाही.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-आय.आर.डी.पी. रोड माजी आयुक्त मा. श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी ते घेतले होते.

मा. सदस्या श्रीमती. किरण माने:-डी.पी. प्रमाणेच घ्या ना.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-जर आपणास ते तोडायचे असेल तर आधी तेथील जनतेला पुर्नवसनासाठी जागा द्यावी लागेल. त्यासाठी महानगरपालिकेकडे जागा पाहिजे. पुर्नवसन करणे शक्य नसेल तर पर्याय आहे. हे महत्त्वाचे रोड नाही. ३५ फुटाचे फक्त ३० फुट करू शकतो.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-किती फुट कमी करत आहात, किती फुट आहे?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-३५ रोड आहे. ५ फुट कमी करत आहोत.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:-तो रोड डी.पी. रोड नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आयुक्त साहेब म्हणत आहे. डी.पी. रोड आहे तुम्ही म्हणत नाही आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-डी.पी. रोड नाही पॅसेज आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-शहर अभियंता चांगल्या त-हेने सांगु शकतील. त्यांना रस्त्याची स्थिती सांगा.

श्री. मोहन चिजवानी (शहर अभियंता):-तिथे ४ + ३ व ग्राऊंड+ ४ असे बांधकाम आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-किती माळयाची इमारत आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-सगळे महत्त्वाचे रस्ते सोडुन ते काम करण्याची गरज काय?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-१० महिने झाले त्यांना अजुन कोणता रोड ते समजले नाही.

मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-फायदा काय? स्थायी समितीत सांगुन वर्ष झाले अजुन रोड समजले नाही. दर सभेत आमचे सदस्य ओरडतात.

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा. वि):-उजव्या बाजुला ३८ फुट आहे. डाव्या बाजुला ३० फुट आहे. = ६३ फुट आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-विरोध आहे. जो रोड अपघाती आहे तो होत नाही तो रोड आधी घ्या.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-गणपतीच्या वेळी पण केला नाही. पावसाळयात पण केला नाही असे का करतात, आमचा सभेत येवून फायदा काय? आमचे ऐकले जात नाही.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-आयुक्त साहेब भेट देतील.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-साहेब, आपण यातील रोड पहा कधीही अपघात होवू शकेल. रोडचे फायनल करा. स्थायी समितीत काम करत नाही तर कशाला निवडुन दिले. आमचे म्हणणे ऐकले जात नाही.

मा. सदस्य श्री. माने किरण:-ते स्वतः एवढे सांगत आहे ऐका ना.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-७ नंबरचा विषय डिफर केला त्या ऐवजी हे आणा, श्री. दिलीप गायकवाड यांचा रोड त्यासोबत आणा.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-तिथे कोणती रहदारी आहे ते सांगा, कोण मरणार आहे? आमच्या इथे टॅकर उलटला तर लोक मरतील, प्रत्येक सभेत टाळाटाळ करतात ऐकत नाही.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:-प्रस्ताव आणला की ते पण करू.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-जे रोड आधी डिफर केले त्याबरोबर यांचा रोड देखिल आणा.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-तिथे अपघात घडेल. इथे काही तसे होणार नाही. आमचा रोड आणत असाल तर मान्य करू नाहीतर नाही.

मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-४-५ नंबरला पाण्याची बिकट समस्या आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-पास. पास.



मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-सभेनंतर बोलु.

__मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-__आमचा विरोध आहे. आयडीआय. कंपनीकडे जाणा-या रस्त्याचे प्राकलन आणा मग संमत करू.

__मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-__पुढच्या सभेत आणु समंत करा.

__मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-__सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर २ येथील सिरू चौक ते गुरूव्दारा या टिलुमल सोसायटी मार्गेच्या रस्त्याचे सिमेंटीकरण करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

__प्रस्तावना__

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २००२-२००३ च्या अर्थ संकलसपामध्ये ''अ अंदाजपत्रकीय तरतूद भाग-२ (भांडवली खर्च) सार्वजनिक बांधकाम खाते क ४(ii) मध्ये केलेल्या ६ कामांकरिता ठेवलेली असल्याचे अर्थसंकल्पामध्ये नमुद करण्यात आले होते. त्यानंतर आता वर्ष २००३-२००४ च्या अर्थसंकल्पामध्ये उपरोक्त ६ रस्त्यांसह रू. १०.५१ कोटी खर्चाच्या १४ रस्त्यांकरिता ५ कोटी पर्यत तरतूद ठेवलेली आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पहाता मा. आयुक्त यांनी या रस्त्यांपैकी उल्हासनगर-२ येथील एक रस्ता सिरू चौक ते गुरूद्वारा टिलुमल सोसायटी मार्गेचा हा विकास आराखडयात ३५ फुट रूंद असलेला रस्ता रूंदीकरण करून सिमेंट कॉक्रिटीकरण करण्याकरिता प्रथम प्राधान्याने हाती घेण्याकरिता प्रस्ताव सादर करण्याकरिता सुचना दिल्याप्रमाणे या रस्त्याचे यापूर्वी केलेले प्राकलन सुधारित करून सादर केले होते. परंतू जागेवर बाधित बांधकामांची सद्यास्थिती पाहता मा. आयुक्त यांनी सद्या सदर रस्ता ३० फुट प्रमाणे रूंद करण्याकरिता मार्किंग देणेस सूचना दिल्यानंतर नगररचनाकार यांनी त्याप्रमाणे बाधित बांधकामांना ३० फुट रूंदीप्रमाणे मार्किंग दिल्यानंतर सदर मुळ प्राकलन सुधारित करून ३० फुट रूंदीकरीता तयार करण्यात आलेले आहे. ३० फुट रूंदीच्या प्राकलनात सिमेंट कॉक्रिटीकरणाने रस्त्याचा उर्वरित भाग, दुतर्फा नाल्या, साइड पटटी, दिवाबत्ती , एम एस इ बी पोल हलविणे, चौक विकास इत्त्यादी कामे समाविष्ट करून एकूण प्राकलनीय किंमत रू. ५५,७६,८७०/- इतकी काढलेली आहे. त्यास मा. आयुक्तांनी मान्यता प्रदान केली असून स्थायी समितीपुढे प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी ठेवण्यास मंजुरी दिली आहे. त्याप्रमाणे सदर कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी तसेच सदर कामाची मे उत्तम इंजिनिअरींग कन्सल्टन्सी प्रा.लि. कल्याण यांच्याकडून देखरेख या महानगरपालिकेशी असलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीवर करून घेण्याकरिता स्थायी समितीकडून मान्यता मिळण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

__स्थायी समिती ठराव क्र. ११४__ __दिनांक:- २८.२.२००३__

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. महेद्र मुलचंदानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार सिरू चौक ते गुरूव्दारा या टिलुमल सोसायटी मार्गेच्या एकुण रक्कम रू. ५५७६,८७०/- रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

परंतु



सदर काम मे. उत्तम इंजिनियरींग कन्सल्टंन्सी प्रा. लि. कल्याण यांच्या देखरेखीखाली करण्यात येईल आणि त्याअर्थी त्यांना प्राकलनिय रक्कमेच्या ३ टक्के दराने सल्लागार फी देता येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५. ५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं.कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

दि:-31.3.2003.

<u>इतिवृत्त</u>

<u>दि. ३१.३.२००३ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक ३१.३.२००३ रोजी दुपारी १२. ०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्त्या.

<u>१. मा. सभापती :- श्रीमती. ज्योती कालानी.</u>

२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. गायकवाड दिलीप दशरथ
४. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
५. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
६. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
७. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
८. श्री. महेंद्र मुलचदांनी
९ श्री. रूपचंदानी बच्चाराम बाछोमल
१० श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
११ श्री. लिंगे सुर्यकांत
१२ श्री. शर्मा कमला गंगाधर
१३. श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल

तर

मा. सदस्य/ सदस्या श्रीमती. मोकल सिमा, श्री. रामरख्यानी मोहनदास, श्री. वलेचा पृथ्वी हे सभेस अनुपस्थितीत होते/ होत्त्या.

दुपारी १. ३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. २८.२.२००३ आणि ७.३.२००३ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-मागील सभांचे दि. २८.२.२००३ आणि ७.३.२००३ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषयः- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-हा प्रस्ताव मंजुर केला जावा.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--२--

विषय :-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. महापौर/नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | प्राकलनीय किंमत | दिनांक | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर -४ येथील प्रभाग क्र. ९ येथील साईनाथ कॉलनी , यादव चाळ शिन्देच्या घराच्या मागील संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे (नगरसेवक निधी १०२) | ९९,७००/- | ७.२.२००३ | मे. स्टॅन्डर्ड म. का. सोसा. |
| २ | उल्हासनगर -४ येथील पॅनल ९ साईनाथ कॉलनी येथील संरक्षण भिंतीचे पुन्हा बांधणीबाबत (नगरसेवक निधी १४६) | ९९,७००/- | ७/२/२००३ | मे. स्टॅन्डर्ड म. का. सोसा. |
| ३ | उल्हासनगर -४ येथील पॅनल ९ येथील ब्लॉक नं अे-३८० ते साईबाबा फ्लोअर मिल येथील विविध ठिकाणी सी सी पायवाटा बांधणे (नगरसेवक निधी १४७) | ९९,३००/- | ७/२/२००३ | मे. स्टॅन्डर्ड म. का. सोसा. |
| ४ | प्रभाग क्र. १३ मध्ये मथुरा अपार्टमेंट, गणेश मंदिर जवळ आणि विविध ठिकाणी सी सी पायवाटा बांधणे(नगरसेवक निधी १५०) | ९९,९००/- | ७/२/२००३ | मे. स्टॅन्डर्ड म. का. सोसा. |
| ५ | उल्हासनगर-५ येथील गुरूद्वाराच्या मागे सरदार पाडा विर तानाजी नगर येथील नाला दुरूस्ती करणेबाबत (उमपा निधी २११) | ७५,०००/- | ७/२/२००३ | मे सिध्दनाथ म. का. सोसा. |
| ६ | उल्हासनगर -५ येथील प्रभाग १३ ब मध्ये सहयाद्रीनगर मध्ये नाली | १,९९,९००/- | ७/२/२००३ | मे सिध्दनाथ म. का. |

| | बांधणेबाबत (उमपा निधी २२६) | | | सोसा. |
|---|---|---|---|---|

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ११६</u> <u>दिनांकः- ३१.३.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. ठाकुर नरेंदकुमार

--३--

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील ६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>विषयः-</u> उल्हासनगर शहरात पाणी टंचाई असलेल्या विविध ठिकाणी भाडेतत्त्वावर खाजगी टॅकरने पाणी पुरवठा करणे कामी सद्या कार्यरत असलेल्या ठेकेदारास मुदतवाढ देऊन संविदेस मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>सांगा, काय आहे? या ठेकेदारास मुदत वाढ का देत आहात?
<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>पाणी टंचाईग्रस्त भागात टॅकरने पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे. याकामी नविन ठेकेदारांची नेमणुक होईपर्यंत जून्या ठेकेदारास मुदत वाढ देण्यांत आलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>७००० लिटर पाणी क्षमतेच्या टॅकरने पाणी पुरवठा करण्याचे करारामध्ये आहे. करारा प्रमाणे ते ७००० लिटर क्षमतेच्या टॅकरने पाणी पुरवठा न करता ५५०० लि. क्षमतेच्या टॅकरने पाणी पुरवठा करतात. पाण्याचे टॅकर पोहचत नाहीत. जनता ओरड करत असते.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>अशा प्रकारची तक्रार अदयाप आमच्याकडे आलेली नाही, टॅकरने पाणी पुरवठा करण्या बाबतचे जे वेळापत्रक आहे त्याबाबत आपली काही हरकत किंवा सूचना आहे का? तसेच ७००० लिटर

क्षमतेच्या ठिकाणी जर ५५०० लिटर क्षमतेच्या टॅंकरने पाणी पुरवठा केला जात आहे. याबाबत आपण पुरावा दिला तर...
<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>त्याबाबतचे पुरावे आमच्या कडे आहेत आम्ही ते आपणास देतो .

<u>श्री. जवांदे (कार्यकारी अभियंता):-</u> असे काहीही नाही त्यांचेकडे जे टॅंकर आहेत ते कमीत कमी ७००० लिटर क्षमतेचे आहेत त्या व्यतिरिक्त १० हजार लिटर क्षमतेचेही दोन टॅंकर त्यांचेकडे आहेत.
<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> असे पुरावे असतील तर ते दया. करारातील अटीचे उल्लंघन केले म्हणुन त्यांचा करार रदद करता येईल.

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:-</u>पाणी टंचाईग्रस्त भागात पाण्याचे जे टॅंकर पाठविले जात होते ते बंद केले आहेत का? निवडणुकीच्या वेळी टॅंकरव्दारे पाण्याची

--४--

जी मागणी केली जात होती. तेथे पाण्याचे टॅंकर देण्याचे बंद केले आहे काय? पाण्याचे टॅंकर कुठे जातात ते माहित पडत नाही.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>पाणी टंचाईग्रस्त भागात टॅंकरव्दारे पाणी पुरवठा केला आहे. याची खात्री म्हणुन तेथील स्थानिक नगरसेवकांची त्याबाबत स्वाक्षरी घेतली जात होती. त्यानुसार माहित पडायचे कुठे कुठे टॅंकरने पाणी पुरवठा केला ते... तसेच पाणी पुरवठयावर नियंत्रण ठेवले जात होते. तसेच टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करणा-या ठेक्याची मुदत संपण्या अगोदर याबाबतचा प्रस्ताव तयार करून स्थायी समितीपुढे मंजुरीस आणावयास हवा होता. तो प्रस्ताव तयार करण्यास उशीर का झाला? त्यास उशिर कुणी केला? उशिर करण्यावर कारवाई झाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>आमचे विरोधी पक्ष नेते श्री. रमेश चव्हाण यांच्या प्रभागात कॅम्प ४ येथील संभाजी चौक विभागात नळाव्दारे अजिबात पाणी येत नाही श्री. रमेश चव्हाण यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानंतर एक आठवडयात पाणी सुरळीत होईल असे श्री. जवांदे साहेब व श्री. पोखरकर साहेब यांनी त्यांना आश्वासन दिले होते तरीही त्यांच्या प्रभागात नळाव्दारे अजिबात पाणी येत नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती. किरण माने:-</u>याबाबत श्री. सोनवणे साहेबांना सुध्दा आम्ही भेटलो, ५०० महिलांचा आम्ही मोर्चा घेवून आलो होतो, तेथे अगोदर पाणी येत होते आताच पाणी का येत नाही? अशी लोक विचारणा करत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>याबाबत सविस्तर चौकशी करून कार्यवाही झाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. लिंगे सुर्यकांत:-</u>पूर्वी जेथे नळाव्दारे पाणी येत होते तेथे आता अजिबात पाणी येत नसल्याने नगरसेवक त्याबाबत विचारणा करतात. काही ठिकाणी नियमितपणे पुरेश्या दाबाने पाणी पुरवठा होतो त्यामुळे नगरसेवकांमध्ये भांडणे होतात.

<u>मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-</u>पाण्यासाठी लोक भटकत आहेत. माझ्या प्रभागात नळाव्दारे पाणी येत नाही. माझ्या प्रभागातील सर्वांनी सांगितले आम्हाला टॅंकरने पाणी नको. आम्हाला नळाव्दारे पाणी पाहिजे. गेल्या २० वर्षापासुन नळाव्दारे पाणी येत होते. आताच नळाव्दारे पाणी येत नाही, महिलांचे म्हणणे आहे आम्ही आंदोलन पुढे चालु ठेवू.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>माझ्या प्रभागात सुध्दा पाणी येत नाही. बॅरेक १४७ च्या विभागात ८ दिवसापासुन पाणी येत नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>८ दिवसापुर्वी तक्रार दिली आहे. परंतु त्याबाबत अदयाप काही सुधारणा झालेली नाही.

*<u>मा. सदस्य श्री. श्यामसुंदर रोहडा:-</u>पाण्याची पातळी येण्यासाठी वेळ लागतो असे सांगण्यात येते....*

*<u>मा. सदस्य श्री. लिंगे सुर्यकांत:-</u>शुक्रवारी शट डाऊन असतो त्यामुळे पाणी पुरवठा बंद राहतो. गुरूवार पासुन पाणी पुरवठा बंद राहतो. रविवारी कार्यालयास सुट्टी असते कार्यकारी अभियंता हे भेटत नाहीत म्हणुन श्री. सोनवणे साहेबांना फोन करून त्रास दयावा लागतो.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>त्यात त्रास वगैरे काही नाही.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-</u>कालच ५०० महिला मोर्चा घेवून आल्या होत्त्या, जी १० टक्के पाणी कपात सांगितली जाते. ती प्रत्यक्षात ४० टक्के पर्यंत जात आहे.*



*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>टॅकरव्दारे पाणी पुरवठा करण्याचे आम्ही हे जे वेळापत्रक तयार केले आहे. त्यात एखादया विभागाचा समावेश नसेल तर आपण सांगा ते समाविष्ट केले जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>टॅकरव्दारे पाणी पुरवठा करण्याचे विभाग निहाय आपण जे वेळापत्रक तयार केले आहे ते आम्हा नगरसेवकास कसे कळेल?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. सभापती महोदया, प्रत्येक सदस्यास जर योग्य असे उत्तर पाहिजे असेल तर त्यांनी माझे बोलणे पुर्ण झाल्यानंतरच बोलावे, मी बोलत असताना मध्ये मध्ये बोलु नये. ते बोलत असताना मी त्यांच्यामध्ये बोललो नाही. पाण्याचा टॅकर पाठविल्यानंतर, तो मिळाल्याबाबत स्थानिक नगरसेवकाची स्वाक्षरी घेतली जात होती. हे मला माहित नाही परंतु नगरसेवकांच्या स्वाक्ष-या घ्या किंवा घेवू नका असे काही निर्देश मी दिलेले नाहीत.*

*जेथे पाण्याची टंचाई आहे अशा ठिकाणी टॅकरने केलेल्या पाणी पुरवठयाची खात्री म्हणुन तेथील नागरिकांची सही किंवा एखादया सोसायटीस टॅकरव्दारे पाणी पुरवठा केला असेल तर तेथील सेक्रेटरी किंवा चेअरमनची स्वाक्षरी घेतली तरी आमची काही हरकत असणार नाही. त्या विभागात पाणी पुरवठा झाला आहे किंवा नाही याची आम्हास खात्री करायची आहे. भले ही त्यासाठी नगरसेवकांच्या स्वाक्ष-या घ्यायच्या असतील तर त्यास ही आमची काही हरकत नाही.*

*दुसरी गोष्ट टॅकरच्या क्षमतेची टॅकरव्दारे पाणी पुरवठा केला जात असलेल्या टॅकरमध्ये ७००० लिटर पेक्षा कमी क्षमतेचे टॅकर्स असतील तर त्यांचे आपण आम्हास नंबर दया. ठेकेदाराने करारातील अटीचे उल्लंघन केले असे म्हणुन आम्ही त्यांचा ठेका रद्द करू.*

*तिसरी गोष्ट, मा. विरोधी पक्ष नेता श्री. रमेश चव्हाण यांच्या प्रभागात नळाव्दारे पाणी येत नाही याबाबत आमचे कार्यकारी अभियंता ३ दिवसापासुन त्यांना भेटुन येतात. तेथील पाण्याची समस्या लवकरच सुटेल तसेच येथे आपणास सांगण्यास आम्हास आनंद होतो की, सेक्शन २० ,२१ ,२२ येथे सुध्दा अशीच स्थिती होती. ४ दिवस काम केल्यानंतर तेथील पाणी पुरवठयाच्या स्थितीत बरीच सुधारणा झालेली आहे. एकदम १०० टक्के समस्या सुटली असे मी म्हणणार नाही. आमचे कार्यकारी अभियंता तेथे जावुन समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करतात. आपल्या तक्रारीचे सुध्दा २-४ दिवसात निवारण केले जाईल. दशहरा मैदान येथे जलकुंभाची चाचणी घेतली होती, पाणी पुरवठा स्थिती सुधारण्यासाठी त्याचा फायदा होईल.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>टॅकरव्दारे करावयाच्या पाणी पुरवठयाचे जे वेळापत्रक आपण तयार केले आहे ते कसे तयार केले? नगरसेवकांना माहित नाही?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>त्याची प्रत सर्व नगरसेवकांना देवू.*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>कॅम्प नं. ४ संभाजी चौक तसेच २२ सेक्शन मधील पाण्याची समस्या २-४ दिवसात सोडविली जाईल असे आपण सांगितले गोल मैदान परिसरातील पाण्याची जी समस्या आहे ती केव्हा सोडवणार?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>गोल मैदान विभागास २-३ ठिकाणाहुन थेट पाणी येते. एक मधुबन हॉटेल परिसर येथुन तर दुसरे बिर्ला गार्डन येथुन जलवाहिनीव्दारे पाणी येते. या विभागातील पाणी समस्या सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. मधुबन हॉटेल येथुन येणा-या जलवाहिनीवर बुस्टर पंप बसवून पाणी पुरवठयाची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात अपेक्षित यश मिळाले नाही. बिर्ला गार्डन येथे पाण्याची एक मोठी टाकी तयार करण्यांत आली आहे त्यातुन एक जवाहिनी टाकुन पाणी पुरवठा स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला त्यामध्ये ब-याच प्रमाणात आम्हास यश मिळाले आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>या कामी जी निविदा आली आहे ती खुपच जास्त दराची निविदा आहे असे आम्हास वाटते.त्यासाठी आम्ही दुस-या संस्थेचे नाव सुचवू*



*इच्छितो, मे.संध्या कंन्स्ट्रक्शन या संस्थेला हे काम देण्यात यावे. ही संस्था निविदेच्या सर्व अटी शर्ती पुर्ण करत आहे. भले ही हे काम आपण ५ (२)(२) अन्वये दिले तरी चालेल.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>ज्या ठेकेदाराला हे काम देण्यांत आले आहे त्यास वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आले आहे. वाटाघाटी अंती तो जर दर कमी करून काम करण्यास तयार असेल तर आम्ही त्यास हे काम देवू अन्यथा पुन्हा निविदा करण्याची आवश्यकता पडली तरी आम्ही पुन्हा निविदा मागवु. पहिले ज्या ऐजन्सीने आमच्याकडे प्रस्ताव दिले आहेत ते आम्ही पडताळुन पाहु. ते जर निविदेच्या अटी शर्ती पुर्ण करत आहेत किंवा नाही हे प्रथम पहावे लागेल त्यानंतरच त्यांचेबाबत विचार करता येईल.*

*<u>मा. सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे:-</u>झोपडपटटीमध्ये जे पाण्याचे टॅकर जातात ते खाली करण्यासाठी बराच वेळ लागतो. गर्दी वाढते त्यासाठी तेथे दोन-तीन पंपाची व्यवस्था केली तर सर्वांना पाणी मिळु शकेल.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>झोपडपटटयामध्ये पाण्याचे जे टॅकर पाठविले जातात.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा :-</u>अधिकृत झोपडपटटीत पाणी पुरवठा केला जातो की.......*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>जेथे पण जरूरत असेल तेथे (अधिकृत- अनाधिकृत झोपडपटटीमध्ये) पाणी पुरवठा केला जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>वेळेपुर्वीच निविदा काढली नाही. याकामी ज्याने कसुर कली त्यांच्यावर कारवाई केली जावी.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>निविदा वेळेपुर्वीच काढलेल्या आहेत. तरीही याबाबत आम्ही चौकशी करू कुणी या कामी दिरंगाई केली असेल तर त्यास ताकीद देवू.*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>शहरामध्ये पाण्याची समस्या वाढत आहे. आम्हाला आपणाकडुन फार मोठ्या अपेक्षा आहेत. कारण शहरातील पाणी पुरवठ्याबाबत आपण अनेकवेळा निवेदने दिली आहेत की शहरासाठी पुरविण्यात येणारे पाणी आवश्यकते पेक्षा जास्त आहे परंतु फक्त वितरण व्यवस्था बरोबर नाही त्याबाबत उपाय योजना केली पाहिजे. असे आपण वारंवार निवेदन केले आहे. आपण येथील कार्यभार स्विकारल्यानंतर येथील पाणी पुरवठ्याची समस्या सुटेल असे आम्हास वाटले होते. परंतु ती समस्या का सुटली नाही. मला वाटते*

की उल्हासनगरची समस्या आपणांस समजलेली नाही. वाल्वमेलमुळे अडचण असेल तर त्यांची बदली केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. लिंगे सुर्यकांत:-</u>जनता नाराज आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>पाणी पुरवठयाबाबत मी प्रत्येक वेळी हे सांगितले आहे की, येथील पाणी वितरण व्यवस्था बरोबर नाही, या व्यवसीसाठी ४ दशलक्ष लिटर पाणी साठवुन ठेवण्याची जलकुंभाची क्षमता असली पाहिजे. ३ जलकुंभ आठवडाभरात चालु होतील. विद्युत जोडणीचे काम बाकी आहे.



जलकुंभ कार्यान्वीत झाल्यानंतर आम्ही पाणी पुरवठया कामी झोनींग करू. तसेच जलवाहिन्यावर क्रॉस कनेक्शन बरीच झाली आहेत. अशी कनेक्शन्स हटवून तेथे एकच मोठी नळजोडणी टाकल्यास पाणी पुरवठयाचा दाब वाढु शकेल. तसेच मुख्य जलवाहिनीवर ही काही लोकांनी नळजोडण्या घेतल्या आहेत त्या हटवाव्या लागतील. तसेच कुण्या वालव्हमेनमुळे एखादया विभागातील पाणी पुरवठयाची समस्या निर्माण झाली असेल तर आम्ही त्यांच्यावर कारवाई करू.

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:-</u>आजच एका वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी आली आहे की, घाटकोपरमध्ये पाणी पुरवठ्यात कपात होणार आहे आपणाकडे तर असे होणार नाही ना? शहरामध्ये पाणी पुरवठा बरोबर होत नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>५ फेब्रुवारी पासुन आपल्या शहरामध्ये १० टक्के पाणी कपात करण्यात आलेली आहे. प्रत्येक दिवशी १० टक्के पाणी कपाती ऐवजी शुक्रवारी पुर्ण दिवस पाणी पुरवठा बंद केला जात आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>पाण्याची किती कपात होते?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>काही ठिकाणी लोड शेडींग असते. पाणी पुरवठ्याकामी बुस्टर चालविले जातात. लोड शेडींग असल्याने त्यांचा काही ठिकाणच्या पाणी पुरवठ्यावर परीणाम होतो. लोड शेडींगच्या वेळेत बदल करण्यासाठी आम्ही वीज मंडळाला कळविले आहे व ते याकामी मान्यता देतील अशी खात्री आहे. त्यामुळे पाणी पुरवठ्यात सुधारणा होईल असे आम्हास वाटते. म्हणुनच एक महिन्याच्या मुदत वाढीसाठी हा प्रस्ताव प्रस्तावित केला आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>३० एप्रिल पर्यंत मुदतवाढ देत आहे....

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>या प्रस्तावाबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरात पाणी टंचाई असलेल्या विविध ठिकाणी भाडेतत्त्वावर खाजगी टॅकरने पाणी पुरवठा करणे कामी सद्या कार्यरत असलेल्या ठेकेदारास मुदतवाढ देऊन संविदेस मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहराची भौगोलिक रचना ही उंच व सखल अशी आहे. उल्हासनगर शहरातील वितरण व्यवसी ही जुनी असल्याने शहरातील ब-याच भागात असमान व अपु-या दाबाने पाणी पुरवठा होत असतो. त्यामुळे उंच भागावरील जनतेस नेहमी पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. अशा ठिकाणी महापालिकेतर्फे टॅकरने पाणी पुरवठा करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे पर्यायी व तात्पुरती उपाययोजना म्हणुन वित्तिय वर्ष २००२-२००३मध्ये टॅकरने पाणी पुरवठा करणेसाठी वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेला प्रतिसाद मिळुन चार ठेकेदारांनी मोहोरबंद निविदा सादर केल्या होत्त्या. त्यापैकी मे. श्वेता ट्रान्सपोर्ट यांची निविदा न्युनतम दराची म्हणजेच रू. १७८.६४ प्रति ७०००

लिटर्स क्षमतेच्या टॅकर्सची प्रती खेप ऐवढी असल्याने दि. ४.७.२००२ च्या स्थायी समितीच्या विषयसुचीवर ठेवण्यात आला होता. परंतु सदरच्या विषयास स्थायी समितीने १५ दिवसांच्या आत मजुरी न दिल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ड च्या परंतुकान्वये आयुक्त यांनी निविदाधारकाशी संविदा करण्यात येवून कार्यादेश देण्यात आले.

सदर ठेक्याची मुदत आता दिनांक २.१.२००३ रोजी संपुष्ठात आलेली आहे. टंचाईग्रस्त भागात टॅकरने पाणी पुरवठा करणे आवश्यक असल्याने सदर ठेक्यास दि. ३१.३.२००३ पर्यंत अथवा नवीन ठेकेदाराशी नेमणुक होईपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

--८--

सध्याच्या १४० टॅकर प्रतिदिन गरज लक्षात घेता वित्तिय वर्ष २००३-२००४ करिता सदर टॅकर संख्या गृहित धरून या कामाचे ढोबळ प्राकलन रू. १७८.६४ x १४० टॅकर x ३६५ दिवस म्हणजेच एकुण रू. ९१,२८,५०४ या रक्कमेचे तयार केलेले आहे. त्यानुसार मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी प्रस्तावास सहमती दर्शविलेली आहे.

सन २००२-२००३ च्या सुधारित अंदाजपत्रकात या कामी रू. ९५ लाखांची तरतुद करण्यात आलेली आहे तसेच २००३-२००४ च्या अंदाजपत्रकात या कामी P-1B(iii) या लेखाशीर्षाखाली रू. ५० लाख एवढी तरतुद प्रस्तावित करण्याची आलेली आहे.

सबब प्रस्तावास मा. स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ११७ <u>दिनांकः- ३१.३.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. महेंद्र मुलचंदानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. रोहडा श्यामसुंदर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरात पाणी टंचाई असलेल्या विविध ठिकाणी भाडे तत्त्वावर खाजगी टॅकरने पाणी पुरविणे कामी नविन कंत्राटदाराची नेमणुक होईपर्यंत सद्या कार्यरत असलेले ठेकेदार मे. श्वेता ट्रान्सपोर्ट हे दि. २.१.२००३ पासून पुर्वीच्या संविदेतील अटी व शर्तीवर जुन्याच दराने प्रशासनाच्या आदेशान्वये स्थायी समितीच्या पूर्वसंमती वाचून पाणी पुरवठा करत असल्याने त्या संविदेस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**'परंतु' —**

जुन्या कंत्राटदाराची मुदत वाढ जास्तीत जास्त ३० एप्रिल पर्यंतच असेल.

तसेच प्रशासनाने स्थायी समितीची पूर्वसंमती न घेता जुन्या ठेकेदाराची मुदतवाढ वाढविली व नविन निविदा न मागवता परस्पर कार्यवाही केलेल्या संबंधित कसुरदार पाणी पुरवठा अधिकारी यांचे विरुध्द गैरवर्तवणूकीबाबत शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे निर्देश देत आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--९--

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय :- किटकनाशक / जंतुनाकशक औषधे व सफाई कामासाठी लागणारे साहित्त्य पुरविणे कामी सर्वात लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-मागच्यावेळी आमच्या असे निर्दशनास आले आहे की, जी डी.डी.टी. पावडर पुरविली जाते ती आतिशय जुनी असते. तिला काही वास येत नाही. तिच्यामुळे उंदीर , किटर मरण्या ऐवजी त्यांच्या संख्येत वाढ होताना दिसते. ती डी.डी.टी. पावडर नसुन सफेद चुन्याची पावडर आहे असे वाटते.

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-अशी काही घटना घडलेली नाही. डी.डी. टी. च्याठिकाणी बी.एस.सी पावडर आपण पाहिली असेल.

मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-त्या पावडरला वास सुध्दा येत नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-माल आल्यानंतर त्याचे नमुने घेवुन आपणास दाखविले जातात.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-त्याची तपासणी कुठे कराल?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-कोकण भवन येथील सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रयोग शाळेत त्यांची तपासणी केली जाईल.

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-डी.डी.टी. पावडर ऐवजी काही वेळा चुन्याची पावडर पाहिली असेल.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-असेही होवू शकते.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-या प्रस्तावाबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

विषय :- किटकनाशक / जंतुनाकशक औषधे व सफाई कामासाठी लागणारे साहित्त्य पुरविणे कामी सर्वात लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

शहरातील स्वच्छता व साफसफाईच्या कामासाठी किटक नाशकां/जंतूनाशक औषधे तसेच इतर सफाई कामसाठी साहित्त्यांची आवश्यकता

असल्यामुळे १) १८ किटक नाशकां/जंतूनाशके व २) आवश्यक ३३ सफाई कामासाठी लागणारे साहित्य खरेदीची निविदा नोटीस लोकमत, नवभारत, व महाराष्ट्र टाईम्स दैनिक वृत्तमान पत्रात दि.१४/१२/२००२ रोजी प्रसिध्द करण्यात येऊन दिनांक २४/१२/२००२ रोजी दोन वेगवेगळया निविदा मागविण्यात आल्या होत्त्या. सदर प्राप्त झालेल्या निविदा त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता उप-आयुक्त (आरोग्य), वैद्यकीय आरोग्य अधिकारी, उप-लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांचे समितीने निविदादाराचे प्रतिनिधी समोर उघडण्यात आल्या होत्त्या. प्रचलित बाजार भावापेक्षा अधिक दराचा निविदा दराबाबत दिनांक २८/२/२००३ रोजी मा.आयुक्त यांचेसमवेत वाटाघाटी करून खालील निविदा दरास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. वाटाघाटी करून आलेल्या अंतिम निविदा दरपत्रकांचा तुलनात्त्मक तक्ता खालील प्रमाणे.

--१०--

निविदा क्र.१ किटकां/जंतूनाशक औषधे निविदेचा तक्ता

| अ. क्र. | किटकां/जंतूनाषक औषधाचे नाव | एकूण परिमाण | प्रचलित बाजार दर रुपये | मे.रमेश ॲग्रो केम. कार्पोरेशन रुपये | मे. श्रीराम ॲग्रो एजन्सी रुपये | मे.डॉलफीन सेल्स कार्पोरेशन रुपये | मे. युवराज कार्पोरेशन रुपये | वाटाघाटी करुन आलेले अंतिम दर रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जर्मिक्लिन २००० (युव.केमि | ५०० लि. | २०० प्रतिलिटर | -- | -- | -- | २००/- प्रतिलिटर | २००/- प्रतिलिटर | दर मान्य |
| २ | व्हेपोना ७६: डिडिव्हीपी (डि. नोसिल) | ५०० लि. | ४६० | ४३०/- प्रतिलिटर | ४५७/- प्रतिलिटर | ४४७/- प्रतिलिटर` | -- | ४३०/- प्रतिलिटर | दर मान्य |
| ३ | डर्सबान २० टिसी (डि.नोसिल) | ५०० लि. | ३५० | ३२५/- प्रतिलिटर | ३३३/- प्रतिलिटर | ३३६/- प्रतिलिटर | -- | ३२५/- प्रतिलिटर | दर मान्य |
| ४ | इंडोकार्ब कार्बोलिक पावडर इडिक्ले कंपनी | १०००० कि. | २५ प्रतिकिलो | २५.६० प्रतिकिलो | २६/- प्रतिकिलो | २४.९०/- प्रतिकिलो | -- | २४.९०/- प्रतिलिटर | दर मान्य |
| ५ | ब्लॅकबेल्ट गोल्ड प्रिमियम डिओडरंट (विभावा लॅबोरेटरीज) | ३००० लि. | १६५ प्रतिलिटर | १६४/- प्रतिलिटर | १७०/- प्रतिलिटर | १६५/- प्रतिलिटर | -- | १६४/- प्रतिलिटर | दर मान्य |
| ६ | ब्लॅकबेल्ट काळे फीनाईल (विभावा लॅबोरेटरीज ग्रेड-१) | ३६०० लि. | ६५ प्रतिलिटर | ६२/- प्रतिलिटर | ६१/- प्रतिलिटर | ६०/- प्रतिलिटर | -- | ६०/- प्रतिलिटर | दर मान्य |
| ७ | ब्रोमिडिलान एन्अीरॅट बेटस (पी.पी.आय.) | १००० पॉकेट | २० प्रतिपाकिट | १९/- प्रतिपाकीट | १८/- प्रतिपाकिट | १८.५० प्रतिपाकीट | -- | १८/- प्रतिपाकीट | दर मान्य |
| ८ | ॲबेट ५०: इ.सी. (बीएएसएफ कंपनी) | २००लि. | १४५० प्रतिलिटर | १३८८/- प्रतिलिटर | १४४९/ प्रतिलिटर | १४१४/- प्रतिलिटर` | -- | १३८८/- प्रतिलिटर | दर मान्य |
| ९ | साईथीऑन ५०: ईसी (साय.कंपनी) | १५००लि. | २२५ | २०३/- प्रतिलिटर | २१६/- प्रतिलिटर | २११/- प्रतिलिटर | -- | २०३/- प्रतिलिटर | दर मान्य |
| १० | के ओथीन फलो २५ (अवतीज कंपनी) | २००लि. | १६८० प्रतिलिटर | १५८०/- प्रतिलिटर | १६७९/ प्रतिलिटर | १६३१/- प्रतिलिटर | -- | १५८०/- प्रतिलिटर | दर मान्य |
| ११ | किंग फॉग यु.एल.व्ही. १.२५ (अवतीज कंपनी) | ३००लि. | १६१० प्रतिलिटर | १६००/- प्रतिलिटर | १६३५/ प्रतिलिटर | १६४१/- प्रतिलिटर | -- | १६००/- प्रतिलिटर | दर मान्य |
| १२ | निमटेक्स हर्बल लारव्ही.साईड (नॅशनल पेस्पीसाईडस ॲड केमि | १५०० लि. | ४८० प्रतिलिटर | ४८०/- प्रतिलिटर | ४८०/- प्रतिलिटर | ४७९/- प्रतिलिटर | -- | ४७९/- प्रतिलिटर | दर मान्य |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | फेडोना ५: डब्ल्युपी (बीएएसएफ कंपनी) | २०० किलो. | २१०० प्रतिकिलो | २००१/- प्रतिकिलो | २०९९/ प्रतिकिलो | २०५०/- प्रतिकिलो | -- | २००१/- प्रतिकिलो | दर मान्य |
| १४ | मलेरीय लारव्ही. साईड ऑईल (नॅशनल पेस्पीसाईडस ॲड केमि.) | ३०००लि. | ४० | ४२/- प्रतिलिटर | ३९ .९० | ४१ .२० | -- | ३९ .९० प्रतिलिटर | दर मान्य |
| १५ | डिबग (अतुल लिमिटेंड कं.) | १००लि. | १५०० | १५०५/- प्रतिलिटर | १४९०/ प्रतिलिटर | १५००/- | -- | १४९०/- प्रतिलिटर | दर मान्य |
| १६ | ब्लिचिंग पावडर ३३: क्लोरीन (ग्रासिम मेक) | ५००० कि | २२ | २३/- प्रतिकिलो | २१/- प्रतिकिलो | २१ ६० | -- | २१/- प्रतिकिलो | दर मान्य |
| १७ | मॅला ऑल ऑलटॉक्स मॅलेथिऑन ५: (इंडीक्ले कं.) डब्ल्यु एच ओ स्पॅस्फीकेशनप्रमाणे | १२५०० कि | २५ | २४ .९० प्रतिकिलो | २५/- प्रतिकिलो | २४ ५० | -- | २४ ५० प्रतिकिलो | दर मान्य |

## निविदा क्र.२ सफाई कामाचे साहित्याचे निविदेचा तक्ता

| अ. क्र. | साहित्याचे नाव | एकूण परिमाण | प्रचलित बाजार दर रुपये | मे.शॉर्प सेल्स रुपये | मे. डॉलफीन सेल्स कार्पोरेशन रुपये | मे.रमेशा ॲग्रो केम. कार्पोरेशन रुपये | वाटाघाटी करुन आलेले अंतिम दर रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | झाडू (७५० ग्रॅम) | १०००० नग | ११ | १५.६० प्रतिनग | ११ प्रतिनग | १३ प्रतिनग | ११ प्रतिनग | दर मान्य |
| २) | बांबू दांडयाचे (पंखा) झाडू | ७०० नग | ५५ | ६२ प्रतिनग | ५४ .९० प्रतिनग | ५६ प्रतिनग | ५४ .९० प्रतिनग | दर मान्य |
| ३) | चुना | २००० x२० किलो | ३ | ४ .२० प्रतिनग | ३ .२० प्रतिनग | २ .९० प्रतिनग | २ .९० प्रतिनग | दर मान्य |
| ४) | घमेला (गॅल्वनाईज) काटवाला | ४०० नग | ७५ | ८६ प्रतिनग | ७८ प्रतिनग | ७४ प्रतिनग | ७४ प्रतिनग | दर मान्य |
| ५) | बादल्या (गॅल्वनाईज) २२ गेज (१०लिटर) | ३०० नग | ९० | १३९ प्रतिनग | ९० प्रतिनग | ११० प्रतिनग | ९० प्रतिनग | दर मान्य |

.११

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६) | फावडे ४" टाटा | १०० नग | ८५ | ११० प्रतिनग | ८४ प्रतिनग | ८५ प्रतिनग | ८४ प्रतिनग | दर मान्य |
| ७) | फावडे ६" टाटा | २०० नग | ९५ | १२० प्रतिनग | ९४ प्रतिनग | ९७ प्रतिनग | ९४ प्रतिनग | दर मान्य |
| ८) | फावडे ८" टाटा | २०० नग | ११० | १४५ प्रतिनग | ११० प्रतिनग | १२० प्रतिनग | ११० प्रतिनग | दर मान्य |
| ९) | दातारी २ दातवाली | १५० नग | ९० | ११० प्रतिनग | ८९ प्रतिनग | ८६ प्रतिनग | ८६ प्रतिनग | दर मान्य |
| १०) | दातारी दांडे | ३०० नग | १५ | १९ ५० प्रतिनग | १५ प्रतिनग | १७ प्रतिनग | १५ प्रतिनग | दर मान्य |
| ११) | पहार १ " | १५ नग | २७५ | २९५ प्रतिनग | २७९ प्रतिनग | २६५ प्रतिनग | २६५ प्रतिनग | दर मान्य |
| १२) | टिकाव टाटा | १०० नग | १७५ | २२५ प्रतिनग | १९० प्रतिनग | १६५ प्रतिनग | १६५/- रु | दर मान्य |
| १३) | पंजा | ६० नग | ९० | ११० प्रतिनग | ८४ ५० प्रतिनग | ८७ प्रतिनग | ८४ ५० प्रतिनग | दर मान्य |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४) | चॅपर | ३० नग | २०० | २४५ प्रतिनग | २०० प्रतिनग | २१० प्रतिनग | २०० प्रतिनग | दर मान्य |
| १५) | फावड्याचे दांडे | ६०० नग | १३ | १६.५० प्रतिनग | १३ प्रतिनग | १४ प्रतिनग | १३ प्रतिनग | दर मान्य |
| १६) | बांबू १८ ते २० फूट लांब २ '' | ७५० नग | ५५ | ६५ प्रतिनग | ५५ प्रतिनग | ५६ प्रतिनग | ५५ प्रतिनग | दर मान्य |
| १७) | काथ्या ब्रश ३ फुट | ६०० नग | ११० | १८९ प्रतिनग | १२० प्रतिनग | ११० प्रतिनग | ११० प्रतिनग | दर मान्य |
| १८) | रबर स्कुझर दांड्यासह | ३० नग | १२० | १४९ प्रतिनग | ११० प्रतिनग | १२० प्रतिनग | ११० प्रतिनग | दर मान्य |
| १९) | रबर स्कुझर ३ फुट | ५० नग | १५० | १९५ प्रतिनग | १४५ प्रतिनग | १५५ प्रतिनग | १४५ प्रतिनग | दर मान्य |
| २०) | ॲसिड बॉटल ६५० एम.एल | १५०० नग | ११ | १५ प्रतिनग | ११.६० प्रतिनग | ११ प्रतिनग | ११ प्रतिनग | दर मान्य |
| २१) | गमबुट | ५०० जोडी | ५५० | ६३५ प्रतिनग | ५३७ प्रतिनग | ५४० प्रतिनग | ५३७ प्रतिनग | दर मान्य |
| २२) | हातमोजे | १२०० जोडी | ३० | ३९ प्रतिनग | ३० प्रतिनग | ३० प्रतिनग | ३० प्रतिनग | दर मान्य |
| २३) | गॅसमास्क सेट (स्प्रे कामगारांसाठी) | १२०० नग | २५० | २९० प्रतिनग | २७१ प्रतिनग | २५० प्रतिनग | २५० प्रतिनग | दर मान्य |
| २४) | स्प्रे पंप ९ लिटर | २५ नग | २४०० | २७५० प्रतिनग | २६०१ प्रतिनग | २४०० प्रतिनग | २४०० प्रतिनग | दर मान्य |
| २५) | दातारी १२ दातवाली | ८० नग | १९० | २२५ प्रतिनग | १८६ प्रतिनग | १९० प्रतिनग | १८६ प्रतिनग | दर मान्य |
| २६) | विळे | १०० नग | १५० | १६५ प्रतिनग | १४४ प्रतिनग | १४५ प्रतिनग | १४४ प्रतिनग | दर मान्य |
| २७) | फीनायल गोळया | २०० किलो | ७० | १७३ प्रतिनग | १०० प्रतिनग | १६० प्रतिनग | १०० प्रतिनग | दर मान्य |
| २८) | लाईफबॉय साबण | ३० डझन | १२ | १६.५० प्रतिनग | १२ प्रतिनग | १४ प्रतिनग | १२ प्रतिनग | दर मान्य |
| २९) | नॅपकिन १२x१८ '' | १२ डझन | १६ प्रतिनग | २२ प्रतिनग | १६ प्रतिनग | १६ प्रतिनग | १६ प्रतिनग | दर मान्य |
| ३०) | रस्सी सुती १'' जाड | १०० किलो | ५० | १३९ प्रतिनग | ९५ प्रतिनग | १२० प्रतिनग | ९५ प्रतिनग | दर मान्य |
| ३१) | विम पावडर | २०० किलो | १८ | २३ प्रतिनग | १८ प्रतिनग | १७ प्रतिनग | १७ प्रतिनग | दर मान्य |

वर नमुद दिलेल्या निविदा क्र. १ व २ मधील गोषवारा तपासला असता कमी दर नमुद असणारे व प्रचलित बाजार भावाशी सुसंगत असणारे पुरवठा दारांचे दर व त्यासाठी येणारा खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे :-



निविदा क्र.१ किटकजंतूनाशक औषधे निविदेचा तक्ता

| अ. क्र. | किटकजंतूनाशक औषधाचे नाव | एकूण आवश्यक परिमाण | किमान दर प्राप्त झालेले पुरवठादार व दराचा तपशिल | | | | एकूण येणारा खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे.रमेश ॲग्रो केम. कार्पोरेशन रुपये | मे. श्रीराम ॲग्रो एजन्सी रुपये | मे.डॉलफीन सेल्स कार्पोरेशन रुपये | मे. युवराज कार्पोरेशन रुपये | |
| १ | जर्मिक्लिन २००० (युव.केमि | ५०० लि. | -- | -- | -- | २००/- प्रतिलिटर | १०० ,०००/- |
| २ | व्हेपोना ७६: डिडिव्हीपी (डि. नोसिल) | ५०० लि. | ४३०/- प्रतिलिटर | - | - | -- | २१५ ,०००/- |
| ३ | डर्सबान २० टिसी | ५०० | ३२५/- | - | - | -- | १६२ ,५००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | (डिनोसिल) | लि. | प्रतिलिटर | | | | |
| ४ | इंडोकार्व कार्बोलिक पावडर इडिक्ले कंपनी | १०००० कि. | -- | - | २४.९०/- प्रतिकिलो | -- | २४९,०००/- |
| ५ | ब्लॅकबेल्ट गोल्ड प्रिमियम डिओडरंट (विभावा लॅबोरेटरीज) | ३००० लि. | १६४/- प्रतिलिटर | - | - | -- | ४९२,०००/- |
| ६ | ब्लॅकबेल्ट काळे फीनाईल (विभावा लॅबोरेटरीज ग्रेड-१) | ३६०० लि. | - | - | ६०/- प्रतिलिटर | -- | २१६,०००/- |
| ७ | ब्रोमिडिलान एन्‌ईरॅट बेटस (पी.पी.आय.) | १००० पॉकेट | - | १८/- प्रतिपाकिट | -- | -- | १८,०००/- |
| ८ | ॲबेट ५०: इ.सी. (बीएएसएफ कंपनी) | २००लि. | १३८८/- प्रतिलिटर | -- | - | -- | २७७,६००/- |
| ९ | साईथीऑन ५०: ईसी (साय.कंपनी) | १५००लि. | २०३/- प्रतिलिटर | - | - | -- | ३०४,५००/- |
| १० | के ओथीन फलो २५ (अवतीज कंपनी) | २००लि. | १५८०/- प्रतिलिटर | - | - | -- | ३१६,०००/- |
| ११ | किंग फॉग यु.एल.व्ही. १२५ (अवतीज कंपनी) | ३००लि. | १६००/- प्रतिलिटर | - | - | -- | ४८०,०००/- |
| १२ | निमटेक्स हर्बल लारव्ही.साईड (नॅशनल पेस्पीसाईडस ॲंड केमि | १५०० लि. | - | - | ४७९/- प्रतिलिटर | -- | ७१८,५००/- |
| १३ | फेडोना ५: डब्ल्युपी (बीएएसएफ कंपनी) | २०० किलो. | २००१/- प्रतिकिलो | - | -- | -- | ४००,२००/- |
| १४ | मलेरीय लारव्ही. साईड ऑईल (नॅशनल पेस्पीसाईडस ॲंड केमि.) | ३०००लि. | - | ३९.९० | - | -- | ११९,७००/- |
| १५ | डिबग (अतुल लिमिटेड कं.) | १००लि. | - | १४९०/ प्रतिलिटर | - | -- | १४९,०००/- |
| १६ | ब्लिचिंग पावडर ३३: क्लोरीन (ग्रासिम मेक) | ५००० कि | - | २१ प्रतिकिलो | - | -- | १०५,०००/- |
| १७ | मॅला ऑल ऑलटॉक्स मॅलेथिऑन ५: (इंडीक्ले कं.) डब्ल्यु एच ओ स्पॅस्फीकेशनप्रमाणे | १२५०० कि | - | - | २४.५० | -- | ३०६,२५०/- |
| | | | | | | | ४६,२९,२५०/- |

निविदा क्र.२ <u>सफाई कामाचे साहित्याचे निविदेचा तक्ता</u>

| | | | किमान दर प्राप्त झालेले पुरवठादार व दराचा तपशिल | | | एकूण येणारा खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | साहित्याचे नाव | एकूण आवश्यक परिमाण | मे.शॉर्प सेल्स रुपये | मे. डॉलफीन सेल्स कार्पोरेशन रुपये | मे.रमेश ॲग्रो केम. कार्पोरेशन रुपये | |
| १) | झाडू (७५० ग्रॅम) | १०००० | -- | ११ प्रतिनग | - | ११०,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नग | | | | |



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २) | बांबू दांड्याचे (पंखा) झाडू | ७०० नग | -- | ५४.९० प्रतिनग | - | ३८४,०३०/- |
| ३) | चुना | २००० x२० किलो | -- | - | २.९० प्रतिनग | ११६,०००/- |
| ४) | घमेला (गॅल्वनाईज) काटवाला | ४०० नग | -- | - | ७४ प्रतिनग | २९,६००/- |
| ५) | बादल्या (गॅल्वनाईज) २२ गेज (१०लिटर) | ३०० नग | -- | ९० प्रतिनग | - | २७,०००/- |
| ६) | फावडे ४" टाटा | १०० नग | -- | ८४ प्रतिनग | - | ८,४००/- |
| ७) | फावडे ६" टाटा | २०० नग | -- | ९४ प्रतिनग | - | १८,८००/- |
| ८) | फावडे ८" टाटा | २०० नग | -- | ११० प्रतिनग | - | २२,०००/- |
| ९) | दातारी २ दातवाली | १५० नग | -- | - | ८६ प्रतिनग | १२,९००/- |
| १०) | दातारी दांडे | ३०० नग | -- | १५ प्रतिनग | - | ४,५००/- |
| ११) | पहार १ " | १५ नग | -- | - | २६५ प्रतिनग | ३,९७५/- |
| १२) | टिकाव टाटा | १०० नग | -- | - | १६५ प्रतिनग | १६,५००/- |
| १३) | पंजा | ६० नग | -- | ८४.५० प्रतिनग | - | ५,०७०/- |
| १४) | चॅपर | ३० नग | -- | २०० प्रतिनग | - | ६,०००/- |
| १५) | फावड्याचे दांडे | ६०० नग | -- | १३ प्रतिनग | - | ७,८००/- |
| १६) | बांबू १८ ते २० फूट लांब २ " | ७५० नग | -- | ५५ प्रतिनग | - | ४१,२५०/- |
| १७) | काथ्या ब्रश ३ फुट | ६०० नग | -- | - | ११० प्रतिनग | ६६,०००/- |
| १८) | रबर स्कुझर दांड्यासह | ३० नग | -- | ११० प्रतिनग | - | ३,३००/- |
| १९) | रबर स्कुझर ३ फुट | ५० नग | -- | १४५ प्रतिनग | - | ७,२५०/- |
| २०) | ॲसिड बॉटल ६५० एम.एल | १५०० नग | -- | - | ११ प्रतिनग | १६,५००/- |
| २१) | गमबुट | ५०० जोडी | -- | ५३७ प्रतिनग | - | २,६८,५००/- |
| २२) | हातमोजे | १२०० जोडी | -- | ३० प्रतिनग | - | ३६,०००/- |
| २३) | गॅसमास्क सेट (स्प्रे कामगारांसाठी) | १२०० नग | -- | - | २५० प्रतिनग | ३००,०००/- |
| २४) | स्प्रे पंप ९ लिटर | २५ नग | -- | - | २४०० प्रतिनग | ६०,०००/- |
| २५) | दातारी १२ दातवाली | ८० नग | -- | १८६ प्रतिनग | - | १४,८८०/- |
| २६) | विळे | १०० नग | -- | १४४ प्रतिनग | - | १४,४००/- |
| २७) | फीनायल गोळया | २०० | -- | १०० | - | २०,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | किलो | | प्रतिनग | | |
| २८) | लाईफबॉय साबण | ३० डझन | -- | १२ प्रतिनग | - | ४,३२०/- |
| २९) | नॅपकिन १२×१८ '' | १२ डझन | -- | १६ प्रतिनग | - | २,३०४/- |
| ३०) | रस्सी सुती १'' जाड | १०० किलो | -- | ९५ प्रतिनग | - | ९,५००/- |
| ३१) | विम पावडर | २०० किलो | -- | - | १७ प्रतिनग | ३,४००/- |
| | | | | | | १२,९४,५७९/- |

निविदा क्र.१ मधील औषधे खरेदीसाठी होणारा एकूण खर्च :-
४६,२९,२५०/-

निविदा क्र.२ मधील साहित्य खरेदीसाठी होणारा एकूण खर्च :-
१२,९४,५७९/-

----------

निविदा क्र.१ व २ मधील वर होणारा एकूण खर्च :-
५९,२३,८२९/-

वरील औषधे / साहित्य खरेदीसाठी सन् २००२-०३ व सन् २००३-०४ करीता महानगरपालिकेने अंदाज पत्रकात खालील प्रमाणे रक्कमेची तरतूद केलेली आहे.



## सन् २००२-०३ अंदाज पत्रकातील तरतूद

| अ.क्र. | लेखा शिर्ष | अंदाजपत्रकातील शिर्षक | तरतूद रक्कम | झालेला खर्च | प्रलंबित बिले | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जंतूनाशक खरेदी | भाग १ क क-१(२) | ४०,००,००० | २६,७२,१२२ | १,८३,८५५ | ११,४४,०२३ |
| २ | हिवताप (मलेरीया)निवारण खर्च | भाग १ क क-२(४) | ३०,००,००० | १५,८९,२७२ | ७८,००० | १३,३२,७२८ |
| ३ | साफसफाई साहित्य खरेदी व निगा | भाग २ क क-१ (१) | १७,००,००० | ४,१६,६२८ | ६,०५,४४९ | ६,७७,९२३ |
| | | | ८७,००,००० | ४६,७८,०२२ | ८,६७,३०४ | ३१,५४,६७४ |

सन् २००२-०३ मधील अंदाजपत्रकातील ३१,५४,६७४/- रक्कम शिल्लक आहे.

सन् २००३-०४ मध्ये साफसफाई कामाचे औषधे / साहित्य खरेदीसाठी अंदाजपत्रकात खालील प्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

## सन् २००३-०४ अंदाज पत्रकातील तरतूद

| अ.क्र. | लेखा शिर्ष | अंदाजपत्रकातील शिर्षक | तरतूद रक्कम |
|---|---|---|---|
| १ | जंतूनाशक खरेदी | भाग १ क क-१(२) | १,०६,००,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | हिवताप (मलेरीया)निवारण खर्च | भाग १ क क-२(४) | ४४,००,००० |
| ३ | साफसफाई साहित्य खरेदी व निगा | भाग २ क क-१ (१) | ५६,००,००० |
| एकूण तरतूद | | | २,०६,००,००० |

तरी वरील निविदा क. १ व २ मध्ये प्राप्त झालेले दर वाजवी असल्याने स्विकृत करण्यात आले आहेत. सबब संबंधित निविदादारकाशी संविदा करण्यास प्राधिकृत करण्यासाठी मा. स्थायी समितीची मंजूरी मिळण्याकामी प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११८ दिनांक :-३१.३.२००३

सुचकाचे नाव :-श्री. लिंगे सुर्यकांत

अनुमोदकाचे नावः- श्री. दिलीप गायकवाड

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार किटकनाशक / जंतुनाशके औषधे व सफाई कामासाठी लागणारे साहित्य पुरविणेकामी प्रशासनास वर प्रस्तावित केलेल्या संबंधित निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१५--

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १२ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-या प्रस्तावाबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १२ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. उप-महापौर/नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-४ येथील पॅनेल ९ मधील साईनाथ कॉलनी यादव चाळ शिंदेच्या घरा मागील भिंतीची पुन्हा बांधणीकरणेबाबत (नगरसेवक निधी ०३) | ९९ ,७००/- | २७/२/०३ | स्टॅन्डर्ड म.का. सोसा. |
| २ | उल्हासनगर-२ येथील हिरा मॅरेज हॉल आणि मोनिका मॅरेज हॉल समोर नाली दुरूस्ती करणे. (महापालिका निधी १६८) | ९९ ,२३०/- | २०७/२/०३ | स्टॅंडर्ड म.का. सोसा. |
| ३ | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र. १३ मध्ये खालील कामे करणेबाबत<br>१) पटेलनगर ते प्रेमनगर येथे मोठा नाला दुरूस्ती करणे.<br>२) महात्मा फुलेनगर टेलिफोन एक्सचेंज मागे सी सी पायवाटा बनविणे.<br>३) महात्मा फुलेनगर येथे नविन गटार बनविणे. (महापालिका निधी २३८) | ८० ,०००/- | २७/२/०३ | मे गंगा म. का. सोसा. |
| ४ | उल्हासनगर-५ येथील प्र क्र. १३ मध्ये बॅ नं २१२५ अेम आर सेक्शन येथे सी सी पायवाटा व नाली बनविणे. (उप-महापौर निधी २३९) | १ ,०० ,००० /- | २७/२/३ | मे गंगा म. का. सोसा. |

.१६

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | उल्हासनगर-५ येथील स्वामी शांतीप्रकाश शाळा जवळ, बॅ नं १९९३, बसंत बहार अपार्टमेंट ते विठ्ठलवाडी इंदिरानगर मार्गे नाल्या दुरूस्ती करणे.(नगरसेवक निधी २४६) | ९९ ,०००/- | २७/२/०३ | मे. शिवम. का. सोसा |
| ६ | उल्हासनगर-५ येथील प्र क्र १३ मध्ये शिवाजी कांबळे यांचे घर ते शौकत अली यांचे घरापर्यंत नाली बांधणे (नगरसेवक निधी २६१) | ६० ,०००/- | २७/२/०३ | स्वामी समर्थ म.का. सोसा |
| ७ | उल्हासनगर-५ येथील प्र क्र. १३ मध्ये पवन कम्युनिकेशन सेंटर ते गेस्ट हाऊस कडे जाणा-या रस्त्यावरील नगरपालिकच्या गेट | ७५ ,०००/- | २७/२/०३ | स्वामी समर्थ म.का. सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पर्यंत नाली बांधणे. (नगरसेवक निधी २६२) | | | |
| ८ | उल्हासनगर-५ येथे महापालिका निधितून प्रभाग क्र. ११ मध्ये खालील कामांची दुरूस्ती करणे<br>१) नेहरूनगर गार्डन जवळची २ सीटची मुतारी दुरूस्ती करणे.<br>२) गायकवाडपाडा मध्ये ३ सीटची नवीन मुतारी बांधणे<br>३) महालक्ष्मी इलेक्ट्रीकल दुकानासमोर ओ टी सेक्शन उल्हासनगर-५ येथे २ सीटची मुतारी बांधणे<br>४) वसंत शहा दरबार समोर ५ सीटची मुतारी बांधणे (महापालिका निधी २६५) | १,६०,०००/- | २७/२/०३ | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| ९ | प्रभाग क्र. २३ मधील सखी पॅलेस जवळील नाल्यावर मुतारी बांधणेबाबत (महापालिका निधी २८८) | ९९,५००/- | २७/२/०३ | मे शिवम. का.सोसा. |
| १० | गोतम बुध्दनगर मध्ये धामेजा प्रोडक्ट मागील या घाषित झोपडपट्टी मधील जून्या पायवाटेचे एम-२५० सिमेंट कॉक्रीकरणे करणे (महापालिका निधी २९१) | १९९५००/- | २७/२/०३ | मे गुरूदेव म. का. सोसा. |
| ११ | ना फेरीवाला क्षेत्राला फलक लावणेबाबत (महापालिका निधी ३०५) | ४,००,१००/- | २७/२/०३ | मे ज्योती म. का. सोसा. |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | संत गाडगे महाराज सफाई अभियान अंतर्गत तपासणी फेरीस-१ मध्ये प्रभाग क्र २३ ला प्रथम बक्षिस मिळालेल्या रू. २.०० रक्कमेतून त्या प्रभागामध्ये एम-२५० रोड फान्स जसविंदर सिंग हाऊस ॲट गौतम बुध्द नगर गुरूतेग बहादूर कॉलनी वॉ नं २३ (संत गाडगे महाराज महापालिका निधी ३०७) | ९९,८००/- | २७/२/०३ | मे रवि किरण म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ११९ दिनांकः- ३१.३.२००३

सुचकाचे नाव :- श्री. महेंद्र मुलचंदानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. ठाकुर नरेंद्रकुमार

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील १२ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

विषय :- कचरा वाहतुक कामी सद्या कार्यरत असलेल्या ठेकेदारास मुदतवाढ देऊन संविदेस मान्यता देणे बाबत.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-मागच्या वेळी हा प्रस्ताव जेव्हा स्थायी समिती पुढे आला होता त्यावेळी कचरा वाहतुकीकामी ज्या जुन्या व फालके तुटलेल्या

--१८--

गाडया वापरल्या जातात. त्याबाबत तक्रार केली होती त्यानुसार त्या गाडया बदली केल्या नाहीत. त्या बदली केल्या जाव्यात.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-मागच्या वेळी असे सांगण्यांत आले होते की, कचरा खत्त्यांवरील कचरा कोणत्त्या क्रमांकाच्या गाडीने उचलला जाईल त्याचा क्रमांक त्या खात्त्यावर लिहिला जाईल अशा खत्त्यावरील कचरा उचलला नाही. तर ठेकेदारास ५००रू दंड केला जाईल. अशी काही तरतुद यामध्ये ठेवली आहे का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-असे मी कधी म्हंटलेले नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आपण म्हंटलेले नाही, आपल्या अगोदरच्या आयुक्तांनी श्री. पोखरकर साहेबांनी म्हंटले होते. जेव्हा पनवेलकर यांना कचरा वाहतुक कामी मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव स्थायी समिती पुढे चर्चेस आला होता त्यावेळी आयुक्त श्री. पोखरकर साहेबांनी असे म्हंटले हाते.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):- घनकचरा कृती आराखडयाकामी निविदा प्राप्त झाली आहे, त्यामध्ये गैर वाजवी दर लिहिले गेले आहेत, म्हणुन सद्या जी संस्था कार्यरत आहे त्या संस्थेस मुदतवाढ देणे जरूरीचे आहे.

*__मा. सदस्य श्री. लिंगे सुर्यकांतः__-१९९५ च्या नंतरच्या गाड्या कचरा वाहतुकी कामी वापरात आणल्या पाहिजेत प्रत्यक्षात त्या पुर्वीच्या जुन्या गाड्या सुध्दा कचरा वाहतुकी कामी वापरल्या जातात त्या बंद केल्या पाहिजेत.*

*__मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः__-सदरच्या प्रस्तावाबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.*

*विषय :- कचरा वाहतुक कामी सद्या कार्यरत असलेल्या ठेकेदारास मुदतवाढ देऊन संविदेस मान्यता देणे बाबत.*

*__प्रस्तावना__*

*स्थायी समिती ठराव क्र. १५, दिनांक २४.५.२००२ चे मान्यतानुसार, मे. व्ही. आर. पनवेलकर, अंबरनाथ यांना सन २००२-२००३ सालात, शहरातील कचरा वाहतुकीचे काम, ६४,०००/- रु. प्रतिदिन दराने, वाटप करण्यात आले आहे. त्याची मुदत दि. ३१.३.२००३ रोजी पुर्ण होत आहे.*

*उल्हासनगर महानगरपालिकेने, सन २००३-२००४ सालात घनकचरा व्यवस्थापन कचरा वाहतुक अभिकर्ता नेमणुक करण्यपासाठी, नविन निविदा मागविलेल्या आहेत. सदर निविदा मागवुन त्यास मंजुरी देणे व अभिकर्त्याची नेमणुक करणे याकरिता चार ते सहा महिने कालावधी लागण्याची शक्यता आहे. सदर कालावधीत शहरातील दैनंदिन गोळा होणारा कचरा उचलण्याच्या कामास मे. व्ही.आर. पनवेलकर, अंबरनाथ यांना सन २००२-२००३ सालातील ६४,०००/- रु. प्रतिदिन दराने तसेच पूर्वीचे शर्ती व अटीचे अधिन राहून दिनांक १.४.२००३ पासून पूढील सहा महिने किंवा नविन अभिकर्त्याची नेमणुक करुन, त्यांचे प्रारुप कामास सुरुवात होईपर्यंत, जे अगोदर असेल तोपर्यंत , मुदत वाढ देणेसाठी मा. स्थायी समितीपुढे प्रस्ताव प्रस्तावित आहे.*

*--१९--*

*__स्थायी समिती ठराव क्र.__ १२०* *__दिनांक :-३१.३.२००३__*

*सुचकाचे नाव :-श्री. पमनानी ईश्वर*

*अनुमोदकाचे नावः-श्री. बच्चाराम रूपचंदानी.*

*हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मे. व्ही. आर. पनवेलकर, अंबरनाथ यांना कचरा वाहतुक कामी १.४.२००३ पासुन पुढील सहा महिने किंवा नवीन कंत्राटदारांची नेमणुक होईपर्यंत जे अगोदर असेल तोपर्यंत पुर्वीच्या संविदेतील अटी व शर्तीवर मुदतवाढ देऊन प्रशासनास त्यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्चास मंजुरी देत आहे.*

*तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.*

*सुचकाची __सही-__*

*अनुमोदकाची __सही-__*

*__एकमताने__*

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

विषय :- मा. महापौर चषक २००२-२००३ क्रिकेट सामनेसाठी साहित्त्य पुरविणे कामी प्रशासनाने निविदाशिवाय थेट केलेल्या संविदेस व खर्चास कार्योत्त्तर मंजुरी देणे बाबत.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरच्या प्रस्तावाबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय :- मा. महापौर चषक २००२-२००३ क्रिकेट सामनेसाठी साहित्त्य पुरविणे कामी प्रशासनाने निविदाशिवाय थेट केलेल्या संविदेस व खर्चास कार्योत्त्तर मंजुरी देणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक समिती सभापती यांनी प्रशासनास सादर केलेल्या दिनांक १९.११.२००२ व २.१.२००३ रोजीच्या प्रस्तावास अनुलक्षून दिनांक १२.१.२००३ ते २६.१.२००३ या कालावधीत गोल मैदान येथे मर्यादित षटकांचे दिवस रात्रीचे सामने आयोजित करण्यात आले होते.



वेळेचे अभावी एकुण साहित्त्य खरेदी रक्कम ५० ,००० हजार पेक्षा जास्त असूनही निविदा न मागविता सर्व साहित्त्य खरेदीसाठी दरपत्रक मागवुन बाजार भावाशी सुसंगत प्रस्ताव तयार करून प्रक्रिया पार पाडण्याबाबत मा. आयुक्त यांनी दिनांक २.१२.२००२ व ६.१.२००३ च्या सादरीकरणास मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर साहित्त्य पुरवणा-या पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात आली. भांडार विभागास प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी कमीत कमी दर असलेल्या पुरवठादारांकडुन सदर साहित्त्य खरेदी करण्यात आलेले आहे.

खरेदी करण्यात आलेले साहित्त्य त्याचा दर व संबंधित पुरवठादार याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. विद्युत जनरेटर, मंडप, विद्युत साहित्त्य, ध्वनी क्षेपण आणि इतर

| अ.क्र | साहित्त्याचा तपशिल | संख्या | पुरवठादारांचे नाव | | | एकुण रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मोहन ॲन्ड कं. | अमर डेकोरेटरर्स | लक्ष्मी डेकोरेटर्स | |
| १. | विद्युत जनरेटर | १५ दिवस | ६,००० | ६,९०० | ६,५०० | ९०,००० |
| २. | खुर्ची (१५ दिवस) | २५० | ७ रू. | ६रू | ५रू | १,२५० |
| ३. | मंडप ३०'x२०' | १५ दिवस | ६७५ | ६४० | ६०० | ९,००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. | मंडप १०'x१०' | १५दिवस | १२५ | ११५ | १०० | १,५०० |
| ५. | फोकस लाईट (१५ दिवस) | ८० | ४२ | ३८ | ३५ | ४२,००० |
| ६. | ट्युब लाईट (१५ दिवस) | २० | १५ | १२ | १० | ३,००० |
| ७. | ध्वनी क्षेपण | १५ दिवस | ११५० | ११५० | १००० | १५,००० |
| | | | | एकुण रूपये | | १,६१,७५० |

२) <u>क्रिकेटचे साहित्य व इतर</u>

| अ.क्र. | साहित्याचा तपशिल | संख्या | पुरवठारांचे नाव | | | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुनम स्पोटींग | केळकर स्पोर्टस | आनंद स्पोर्टस | |
| १. | बॉल (सुपर रखन्ना) | २५० | ३५ | ३३ | ३१.२५ | ७,८१२.५० |
| २. | स्टंपस | ६ | ५५ | ३५ | ३० | १८० |
| ३. | स्कोर बुक | ४० | १५ | १५ | १० | ४०० |
| ४. | चुन्याची गोणी | २० | ५० | ३८ | ३५ | ७०० |
| ५. | रस्सी बंडल | ६ | १५० | १५० | १३५ | ८१० |
| ६. | पंच करीता टोपी | ४ | १०० | ८० | ६० | २४० |
| ७. | सीटी | १० | १५ | १५ | १० | १०० |
| ८. | बॅट | २१० | १६० | २०० | १५० | ३१,५०० |
| ९. | मॅटल कप ८" | ९५ | २०५ | २५० | १९५ | १८,५२५ |
| १०. | मॅटल कप १०" | ५२ | २५० | ३०० | २४५ | १२,७४० |
| ११. | मॅटल कप १२" | २६ | ३०० | ३५० | २९० | ७,५४० |
| १२. | ढाल सिल्वर १२" | १४ | ३५० | ३५० | ३४० | ४,७६० |
| १३. | ढाल सिल्वर १४" | ७ | ४०० | ४२५ | ३९० | २,७३० |



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १४. | ढाल सिल्वर १६" | २ | ५०० | ५५० | ४८५ | ९७० |
| १५. | सिल्वर कप ३०" | १ | ५००० | ५,५०० | ४,९०० | ४,९०० |
| १६. | सिल्वर कप २४" | १ | २५०० | ३५०० | २४५० | २४५० |
| १७. | स्पोर्टस कप २४" | ४ | ५२५ | ५५० | ४९५ | १९८० |
| | | | एकुण रुपये....... | | | ९८३३७.५० |

३) <u>छपाई, पिच बनविणे फोटोग्राफरचा खर्च व इतर</u>

| अ. क्र. | साहित्याचा तपशिल | संख्या | पुरवठादारांचे नाव | | | एकुण रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | एम.पी. इन्टरप्रायसेस | उर्वसी इन्टरप्रायसेस | तुषार इन्टरप्रायसेस | |
| १ | सर्टीफिकेट छपाई | ६५० | १५ | १० | १२ | ६५०० |
| २ | ओळखपत्र छपाई | ४० | ५५ | ५० | ६८ | २००० |
| ३ | शाल | ५० | १९० | १५० | १७५ | ७५०० |
| ४ | फुलाचा हार | ५० | ४० | २५ | ३५ | १२५० |
| ५ | नारळ | ५० | १५ | १० | १२ | ५०० |
| ६ | क्रिकेट पीच बनविणे | १ | ५००० | ४००० | ४६५० | ४००० |
| ७ | फोटो ४"x६" | ६०० | - | २३ | २६ | १३८०० |
| | | | | एकुण रूपये | | ३५५५० |

४) पंच, स्कोरर, समालोचक व स्वयंसेवक यांचे मानधन

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | पंच | ४ | १५ दिवस | २०० रू | <u>१२०००/-</u> |
| २ | स्कोरर | २ | १५ दिवस | १५०रू | <u>४५००/-</u> |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | समालोचक | २ | १५ दिवस | १५० रू. | ४५००/- |
| ४ | स्वयंसेवक | १० | १५ दिवस | १००रू. | १५०००/- |
| एकुण रूपये | | | | | ३६ ,०००/- |

महापौर चषक स्पर्धेच्या आयोजनासाठी एकुण रू. ३३१६३८.०० एवढा खर्च करण्यात आलेला आहे. सदरहू खर्चासाठी अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष अ मधील उपशिर्ष 'इ' संकीर्ण 'IX' अन्वये क्रिडा खर्चासाठी रू. १५ लाख एवढी तरतुद करण्यात आली आहे. म्हणजेच सदर बाबीस प्रशासकीय व वित्तिय मान्यता आहे.

उक्त मान्यतेस अनुलक्षुन विद्युत जनरेटर, मंडप, विद्युत साहित्य, ध्वनी क्षेपण आदी बाबींसाठी विविध पुरवठादारांकडुन दरपत्रके मागविण्यात आली. त्यापैकी कमीत कमी दर असलेल्या मोहन ॲन्ड कंपनी आणि लक्ष्मी डेकोरेटस या पुरवठादाराचे दर स्विकृत करण्यात आलेले आहेत.

क्रिकेटचे साहित्य व इतर बाबींसाठी विविध पुरवठादारांकडुन प्राप्त दरपत्रकेपैकी कमीत कमी दर असलेल्या आनंद स्पोर्टस या पुरवठादाराचे दर स्विकृत करण्यात आलेले आहेत.

छपाई, पिच बनविणे, फोटोग्राफरचा खर्च व इतर बाबींसाठी प्राप्त दरपत्रके मागविण्यात आली. त्यापैकी कमीत कमी दर असलेल्या उर्वसी इन्टरप्रायसेस या पुरवठादाराचे दर स्विकृत करण्यात आलेले आहेत.

अशा रितीने कमीत कमी दर असलेल्या पुरवठादराचे दरपत्रक स्विकारून या प्रकरणी रू.३३१६३८/- एवढा खर्च करण्यात आला आहे.

--२२--

तातडीने कमी वेळात निर्णय घ्यावा लागल्याने मा. स्थायी समितीची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ५ (२)(२)नुसार मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेता आलेली नाही, ही बाब क्षमापित करून सदर झालेल्या खर्चास मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ५ (२)(२) नुसार मा. स्थायी समितीच्या कार्योत्तर मंजुरीची आवश्यक आहे. तदनुषंगाने सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. १२१** **दिनांक :-३१ ३ २००३**

सुचकाचे नाव :-श्री. रोहडा श्यामसुंदर

अनुमोदकाचे नावः-श्री. सुर्यकांत लिंगे

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मा. महापौर चषक २००२-२००३ क्रिकेट सामनेसाठी लागलेल्या साहित्या कामी प्रशासनाने निविदाशिवाय संबंधित कंत्राटदाराशी केलेल्या थेट संविदेस व अंतर्भुत खर्चास कार्योत्तर मंजुरी देत आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

विषय :-उल्हासनगर-४ मधील पवई चौक येथे हायमास्ट व इतर दिवाबत्ती बसविणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरच्या प्रस्तावाबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय :-उल्हासनगर-४ मधील पवई चौक येथे हायमास्ट व इतर दिवाबत्ती बसविणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर-४ मधील पवई चौक येथे हायमास्ट लाईट व इतर दिवाबत्ती बसविणे साठी वित्तीय वर्ष २००२-२००३ च्या सभापती स्थायी समिती निधीतून काम करणेसाठी रुपये ५,४९,७५०/- इतक्या किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले व त्या अंदाजपत्रकाला मुख्य लेखा अधिकारी आणि मुख्य लेखा



परिक्षक यांनी मंजुरीसाठी शिफारिस केली असून निविदा मागवण्याची परवानगी देण्यात आली व फ्री प्रेस (इंग्रजी) आणि नवशक्ती (मराठी)या दोन वर्तमान पत्रात निविदा सूचना देण्यात आली.

दिलेल्या निविदा सूचनेच्या प्रतिसादात एक ऐजिन्सीने कोरे निविदाचे अर्ज खरेदी केले व त्यांनी इशारा रक्कमेसह वेळेवर म्हणजे दिनांक १९.३.२००३ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत सिलबंद निविदा सादर केल्या. ते निविदा त्याच रोजी उघडण्यात आली.

१. मे. बजाज इलेक्ट्रीकल्स लि. अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ५,४९,७५०/- पेक्षा २५.२ टक्के कमी व आठ टक्के अंदाजपत्रकीय रक्कमेवर अतिरिक्त सुट जर ४५ दिवसाच्या आत बिलाची रक्कम अदा करण्यात आली म्हणजे एकुण कार्याचे रुपये ३,६७,२३३.०० असे दिले आहे.

मे. बजाज इलेक्ट्रीकल्स लिमिटेड मुंबई हे हायमास्टची उत्त्पादक कंपनी आहे तसेच त्यांनी महानगरपालिकेच्या हददीत सात हायमास्ट पूर्वी पण लावलेले असून ते व्यवस्थीत कार्य करत आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड)नुसार मे. बजाज इलेक्ट्रीकल्स लिमिटेड यांची निविदा ४५ दिवसाच्या आत बिल अदा करण्याच्या अटीवर स्विकृती करून सदर कामास लागणारा खर्च रुपये ३,६७,२३३/- यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देऊन मे. बजाज इलेक्ट्रीकल्स लिमिटेड यांना दिनांक २४.३.२००३ रोजी स्विकृती पत्र देण्यात आलेला आहे. हि माहिती स्थायी समितीच्या अवलोकनासाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२२ दिनांक :-३१.३.२००३

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव:-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-४ मधील पवई चौक येथे हायमास्ट व इतर दिवाबत्ती बसविणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--२४--

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरच्या प्रस्तावाबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपाती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर कॅम्प नं ४ मधील पॅनेल नं १४ मध्ये ब्लॉक न अे-४६३ जवळ विविध ठिकाणी सी.सी. पाऊलवाटा | १,९९,९००/- | ५/३/०३ | मे. कपलेश्वर म. का. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | तसेच नाल्या बांधणेबाबत (नगरसेवक निधी १५२) | | | सासो. |
| २ | उल्हासनगर-५ येथे दसेहरा मादान मध्ये नवीन मुतारी बांधणेबाबत.(महापालिका निधी २५१) | ८० ,०००/- | ५/३/०३ | मे. जयहिंद म. का. सोसा. |
| ३ | उल्हासनगर-१ येथील एसई एस स्कूल ते शहाड ब्रिजमार्गे भारत संचार निगम लि. विभागाने टेलिफोन साठी खोदलेले खडडें भरणेबाबत. (महापालिका निधी २६७) | १ ,७८ ,६२५/- | ५/३/०३ | मे स्टॅन्डर्ड म. का. सोसा. |
| ४ | उल्हासनगर-३ येथील युएमसी(मुख्यालय) ते स्टेट बँक ऑफ इंडिया पर्यत भारत संचार निगम लि. टेलिफोन विभागाने खोदलेले खडडे भरणे. (महापालिका निधी २७४) | १ ,०१ ,६७५/- | ५/३/०३ | मे स्टॅन्डर्ड म. का. सोसा. |
| ५ | उल्हासनगर- येथे बँक ऑफ बडोदा ते गजानंद मार्केट व कॅम्ब्रीज शॉप ते संत चेलाराम मार्केट पर्यत भारत संचार निगम लि. टेलिफोन विभागाने रस्त्यात खोदलेले खडडे भरणेबाबत(महापालिका निधी २७६) | १ ,९८ ,४००/- | ५/३/०३ | मे स्टॅन्डर्ड म. का. सोसा. |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | उल्हासनगर-५ येथील प्र.क्र.११ मध्ये गायकवाड पाडा मुख्य रस्त्यापासून ते उमपा चा शौचालयापर्यत एम-२५० ने रस्ता , पॅसेज बांधणे.(महापालिका निधी २८१) | ९३ ,५००/- | ५/३/०३ | मे. जय हिंद म. का. सोसा. |
| ७ | उल्हासनगर-५ येथील प्र. क्र. ११ मध्ये विजय पाटील चाळ ते शिवसेना कार्यालया पर्यत आणि विठ्ठलनगर मध्ये एम-२५० ने रस्ता, पॅसेज बांधणे. (महापालिका निधी २८७) | १ ,७५ ,०००/- | ५/३/०३ | मे. धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| ८ | उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयामागील विद्युत विभागाचे गोदाम दुरूस्ती करणेबाबत(महापालिका निधी २९९) | १ ,८३ ,४६०/- | ५/३/०३ | मे. ओम म. का. सोसा |
| ९ | उल्हासनगर-५ येथील पॅनल नं ११ मध्ये बॅ नं १८८९च्या मागे ओपन प्लॉटला संरक्षक भिंत बांधणे( महापालिका निधी ३००) | १ ,२५ ,०००/- | ५/३/०३ | मे. आनिश म. का. सोसा. |
| १० | संत गाडगे महाराज सफाई अभियान अंतर्गत तपासणी फेरी-१ मध्ये प्रभाग क्र. २३ ला प्रथम बक्षिस मिळालेल्या रूपये २.०० लक्ष रक्कमेतून त्या प्रभागामध्ये गुरूतेग बहादूर झोपडपटटीमध्ये सिमेंट कॉक्रीट एम-२५० रस्ता बांधणे व बॅ नं ५०६ जवळ समाजमंदिर बांधणे.अ) विष्णू | ९९ ,९८०/- | ५/३/०३ | मे भोलेनाथ म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | दर्शन सोसायटी जवळ नाली बांधणे. (महापालिका निधी ३०६) | | | |
| ११ | उल्हासनगर- ५ येथील प्र. क्र. ११ मध्ये शिव कॉलनी येथे गणपती मंदिर ते बॅ नं १९३६ पर्यत सी सी एम-२५० ने रस्ता व नाली बांधणे ( नगरसेवक निधी ३२१) | १,९९,९००/- | ५/३/०३ | मे. गुरूदेव म. का. सोसा. |
| १२ | उल्हासनगर-५ येथील प्र. क्र.११ मध्ये शेरावाली अपार्टमेंट ते बॅ नं १९९२, बॅ नं २००९ च्या समोर बॅ नं २०११ ते २०२८ पर्यत एम-२५० ने रस्ता आणि नाली बांधणे ( नगरसेवक निधी ३२२) | १,९९,९००/- | ५/३/०३ | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| १३ | उल्हासनगर-५ येथील प्र. क्र. ११ मध्ये मनिला अपार्टमेंट ते बॅ नं १९५७ व बॅ नं १९३७ जवळ सी सी एम-२५० रस्ता व नाली बांधणे. (नगरसेवक निधी ३२३. | १,९९,९००/- | ५/३/०३ | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| १४ | उल्हासनगर-३ येथील प्र क्र. २३ मध्ये विष्णू दर्शन अपार्टमेंट जवळ सी सी एम-३५० ने रस्ता आणि नाली बांधणे. (स्थायी समिती,सभापती निधी ३२९) | १,९९,८३०/- | ५/३/०३ | मे श्री माँ म. का. सोसा. |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | २) उल्हासनगर-३ येथील अमन चौक जवळ सी सी एम-३५० ने बांधणे ( स्थायी समिती सभापती निधी ३२०) | १,९९,८००/- | ५/३/०३ | श्री माँ म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> १२३ <u>दिनांक :-३१ ३ २००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. मुलचंदानी महेंद्र

अनुमोदकाचे नावः-श्री. रोहडा श्यामसुंदर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील १५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

विषय :- महानगरपालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा-यांना गणवेश वाटप करणे कामी सर्वात लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस <u>मान्यता देणे बाबत.</u>

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरच्या प्रस्तावाबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय :- महानगरपालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा-यांना गणवेश वाटप करणे कामी सर्वात लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस <u>मान्यता देणे बाबत.</u>

--२७--

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध विभागातील सेवेत असलेले लाभार्थी कर्मचा-यांना आवश्यक त्या रंगाचे गणवेश जसे स्त्री कर्मचारी यांना साडी, पेटीकोट, ब्लाऊजपिस व पुरूष कर्मचारी यांना शर्ट, पॅन्टपिस इत्यादी वाटप करण्यासाठी महाराष्ट्र शासन संचलित संस्था / महामंडळाकडून खरेदीकरणे प्रस्तावित असून त्यासाठी खालील महामंडळाकडून दरपत्रके मागविण्यात आलेली होती.
१. महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ २. महाटेक्स ३. टैक्सकॉम
४. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, मुंबई ५. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपुर.

उपरोक्त सर्व निर्देशित महामंडळाने निर्देशित केलेले गणवेष कापडाचे दर हे शासनाचे मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, महाराष्ट्र शासन त्यांचे परिपत्रक क्रमांक भाखस/हातमाग कापडाशिवाय/दर निश्चिती/१०/सी-१३८१/२००२-०३ दिनांक १३ नोव्हेंबर, २००२ यांनी निश्चित केलेले असून, त्या दरामध्ये तडजोडीने वाटाघाटी करून दर कमी करणेचा प्रश्न उदभवत नाही. तसेच शासनाचे निर्देशानुसार सदर गणवेषाची खरेदी ही त्यांचे महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मुंबई यांचेकडे परस्पर नोंदवून त्यांचेव्दारे पत्र क्र. /भाखस/ हातमाग कापडाशिवाय/दर निश्चिती/४/२००१-२००२ दिनांक ६.१०.२००१ अन्वये खरेदी करण्यात यावी असे सुचित केले आहे.

त्या कारणास्तव गणवेषा करिता लागणारे कापड खरेदी ही महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मुंबई यांचेकडुन खरेदी करावयाची असून खरेदी खर्च रूपये १५.३२ लाख एवढा अपेक्षित असून महानगरपालिका अंदाजपत्रक सन २००२-२००३ या वित्तिय वर्षाकरिता लेखाशिर्ष अ आणि ब-२(८)/ अन्वये रूपये ३७.५ लाखाची तरतुद आहे. अर्थसंकल्पात सदर रक्कमेस मान्यता असलेने त्यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्राप्त आहे. गणवेश खरेदीसाठी आवश्यक संविदेचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | पदनाम | संख्या | लागणारे कपडे | रंग | दर प्रति मीटर | एकुण रूपये |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | हेल्पर, माळी, मजूर, गवंडी | ४३० | २७९५ मीटर | खाकी | रू. ६९/- | |
| २. | सफाई कामगार | ६२० | ६०४५ मीटर | खाकी | रू. ६९/- | |
| ३. | फायर स्टॅाफ, इलेक्ट्रीशन मीटर रिपेयरर, मिस्त्री फिटर | २०२ | १५१५मीटर | खाकी | रू. ६९/- | |
| | | | १०३५५ मी. | | रू. ६९/- | ७१४४९५/- |

| अ. क्र. | पदनाम | संख्या | लागणारे कपडे | रंग | दर प्रति मीटर | एकुण रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. | विद्युत कर्मचारी | ६९ | ४४८ ५ मी. | चॅाकलेटी | रू. ७२/- | ३२२९२/- |
| ५. | शिपाई, नाका शिपाई | ११५ | ८६२ ५ मी. | सफेद | रू. ६५/- | |
| ६. | वाहन चालक | २९ | २१७ ५ मी. | सफेद | रू. ६५/- | |
| ७. | स्वच्छता निरिक्षक मुकादम | ५६ | ६३०.०मी. | सफेद | रू. ६५/- | |
| | | | १७१०.० मी. | | रू. ६५/- | १११९५०/- |



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८. | स्त्री सफाई कामगार/माळी लेबर | ९३ | १०२३मी. (साडी)<br>१६७४ मी. (ब्लाऊज)<br>३७२.० मी. (परकर) | निळा | रू. ४३/-<br>रू. ३२/-<br>रू. २४/- | ४३९८९/-<br>५३५६ ८<br>८९२८ |
| ९. | स्त्री विल सरवर शिपाई ड्रेसर नाका शिपाई | १६ | १७६.०मी. (साडी)<br>२८ ८ मी. (ब्लाऊज)<br>६४.० मी. (परकर) | सफेद | रू. ४३/-<br>रू. २९/-<br>रू. २२/- | ७५६८<br>८३५.२०<br>१४०८ |
| १०. | सफाई कामगार (स्त्री) | ३७८ | ६२३७मी. (साडी)<br>१०२० ६ मी. (ब्लाऊज)<br>२२६८.० मी.(परकर) | निळा | रू. ४३/-<br>रू. ३२/-<br>रू. २४/- | २६८१९१<br>३२६५९.२०<br>५४४३२.०० |
| ११. | सफाई कामगार (स्त्री) (नऊवारी) | २११ | ५१९०.६मी. (साडी)<br>५६९.७मी. (ब्लाऊज) | निळा | रू. ४३/-<br>रू. ३२/- | २२३१९५.८०<br>१८२३०.४० |
| | | एकुण रूपये | | | | १५३१६४८ |

कापड खरेदी नंतर गणवेष शिलाईसाठी निविदा मागविण्यात आलेल्या होत्त्या. तथापि एकही निविदा प्राप्त झाली नाही. आता नव्याने फेरनिविदा मागविण्याची प्रक्रिया केल्यास गणवेष उपलब्ध करून देण्यात आणखी विलंब होईल. ही बाब टाळण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार शिलाईचा खर्च रोखीने संबंधितांस देणे योग्य होईल. सामान्य प्रशासन निर्णय क्र. सीएमओ१०८३/२५१४, दि. १९.९.९० अन्वये शासनाचे गणवेष शिलाईचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| पॅन्ट आणि शर्ट | एकत्रित | रू. १००/- |
| ब्लॅाऊज आणि परकर एकत्रित | | रू. २०/- |

उपरोक्त शासनमान्य दरानुसार शिलाई खर्च संबंधित लाभार्थीस देण्यास हरकत नसावी. त्याचा अपेक्षित खर्च अंदाजे ४. १२ लाख होणार आहे.

तरी सदर कामाचे गणवेष खर्च रू. १५. ३२ लाख एवढा तसेच गणवेष शिलाई खर्च रू. ४. १२ लाख असा एकुण रू. १९. ४४ लाख यांस स्विकृती मिळणेस्तव स्थायी समिती सभेपुढे प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १२४** **दिनांक :-३१.३.२००३**

सुचकाचे नाव :-श्री. पमनानी ईश्वर

अनुमोदकाचे नावः-श्रीमती. जयश्री सुर्वे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उक्त सर्व महामंडळाने निर्देशित केलेल्या गणवेष कापडाचे दर व उक्त शासन मान्य दरानुसार कपडे व शिलाई कामी एकुण खर्च १९. ४४ लाख यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे



व प्रशासनास संबंधित कंत्राटदारास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर येथिल सिरुचौक ते गुरुद्वार टिलुमल सोसायटी मार्गेचा रस्ता सिमेंट कॉक्रिटने बनविणे कामी प्रशासनास सर्वात लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरच्या प्रस्तावाबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर येथिल सिरुचौक ते गुरुद्वार टिलुमल सोसायटी मार्गेचा रस्ता सिमेंट कॉक्रिटने बनविणे कामी प्रशासनास सर्वात लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | उल्हासनगर- येथील शिरू चौक ते गुरूद्वारा टिलूमल सोसायटी मार्गेचा रस्ता सिमेंट कॉक्रिटने बनविणे. |
| २ | प्राकलनाची किंमत | ५५,७६,८७०/- |

| | | |
|---|---|---|
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | शहर अभियंता |
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. ३८५ दि. १८.०१.२००३ |
| ५ | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | क्र. ११४ दिनांक २८/०२/२००३ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. ४४३ दिनांक ०६/०३/२००३ |
| ७ | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केली त्याचे नांव | १. नवभारत २. उल्हास विकास |
| ८ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | ७ |

--30--

| | | |
|---|---|---|
| ९ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ६ |
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक १३/३/२००३ |

| | |
|---|---|
| ११ | निविदा दरांचा तुलनात्त्मक तक्ता |

| अनु | निविदाधारकाचे नांव | |
|---|---|---|
| १ | मे. इगल कन्स्ट्रक्शन | अनुभव दाखली लखोटा क्र.१ मध्ये जोडलेला नसल्यामुळे निविदा उघडण्यात आलेली नाही . |
| २ | मे. शैलेश कन्स्ट्रक्शन | अनुभव दाखली लखोटा क्र.१ मध्ये जोडलेला नसल्यामुळे निविदा उघडण्यात आलेली नाही |
| ३ | मे. संध्या कन्स्ट्रक्शन | अनुभव दाखली लखोटा क्र.१ मध्ये जोडलेला नसल्यामुळे निविदा उघडण्यात आलेली नाही |
| ४ | मे. डी. एस. कन्स्ट्रक्शन | ४.७५ टक्के जास्त |
| ५ | मे. साईबाबा कन्स्ट्रक्शन कं. | ४.५० टक्के जास्त |
| ६ | मे. माधव कन्स्ट्रक्शन | ५.५६ टक्के जास्त |
| १२ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. २५/३/०३ रोजी दुपारी ३.०० वाजता शहर अभियंता यांचेकडे मे. साईबाबा कस्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे. साईबाबा कस्ट्रक्शन यांनी त्यांचे १ टक्का कमी करण्याकरिता मान्य केले होते. तरी सुध्दा त्यांचे निविदा दर वाजवीपेक्षा जास्त वाटत होते. त्यामुळे सर्व निविदाकारांना यांना दिनांक २६/३/२००३ सकाळी ११.३० वाजता मा. आयुक्तांनी त्यांचे दालनात मोहरबंद देयकारसाठी बोलविले होते. सर्व मोहरबंद देयक उघड्यात आल्यानंतर मे. साईबाबा कस्ट्रक्शन यांनी पुर्वी भरलेले दर ४.५० टक्के जास्त दरापेक्षा ५ टक्के कमी दर दिलेला असून वाटाघाटीनंतर |

| | | |
|---|---|---|
| | | अंतिम दर ०.५० टक्के प्राकलनापेक्षा कमी दर दिलेले आहे. |
| १३ | वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर | ०.५० टक्के कमी दर निविदेपेक्षा |
| १४ | लेखा शिर्षाचे नांव | सी-४(ii) पी-२ रस्तें पवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |
| १५ | लेखा शिर्षाखालील तरतुद | रू. १४.०० कोटी |

उक्त दर वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मेसर्स साईबाबा कन्स्ट्रक्शन कं. यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम



75(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १२५ दिनांक :-३१.३.२००३

सुचकाचे नाव :-श्रीमती. शर्मा कमला

अनुमोदकाचे नावः-श्रीमती. आहुजा निता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर २ येथील सिरुचौक ते गुरुद्वार टिलुमल सोसायटी मार्गेचा रस्ता सिमेंट कॉंक्रिटने बनविणे कामी प्रशासनास मे. साईबाबा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या सर्वात वाजवी दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर -३ येथिल साईबाबा मंदिर जवळ जुन्या प्रवेशद्वाराच्या ठिकाणी नविन प्रवेशद्वार बांधण्याकामी प्रशासनास सर्वात लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरच्या प्रस्तावाबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर -३ येथिल साईबाबा मंदिर जवळ जुन्या प्रवेशद्वाराच्या ठिकाणी नविन प्रवेशद्वार बांधण्याकामी प्रशासनास सर्वात लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | उल्हासनगर-३ येथील साईबाबा मंदिर जवळ जुन्या प्रवेशद्वाराच्या ठिकाणी नवीन प्रवेशद्वार बांधणे |
| २ | प्राकलनाची किंमत | रू. २० ,५२ ,८७१/- |
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | शहर अभियंता |



| | | |
|---|---|---|
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. ३६२६ , दि. १२/१०/२००१ |
| ५ | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | स्थायी समिती ठराव क्र. ३५ , दि. १/८/२००२ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. २ , दि. ६/३/२००३ |
| ७ | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केली त्याचे नांव | १. फ्री प्रेस, २. दुपहर |
| ८ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | ६ |
| ९ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | दि. १३/३/२००३ |

| | |
|---|---|
| ११ | निविदा दरांचा तुलनात्त्मक तक्ता |

| अ. क्र. | निविदाधारकाचे नांव | प्राप्त दर |
|---|---|---|
| १ | मे. डी. एस. कन्स्ट्रक्शन | ९.०९ चे वर / जास्तचे |
| २ | मे. माधव कन्स्ट्रक्शन | अनामत रक्कम भरलेली नसल्यामुळे, निविदा उघडण्यात आलेली नाही. |
| ३ | मे. शैलेस कन्स्ट्रक्शन | अनुभव दाखला लखोटा क्र.१ मध्ये जोडलेला नसल्यामुळे निविदा उघडण्यात आलेली नाही. |

| | | |
|---|---|---|
| १२ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. १९/३/०३ रोजी मे. डि एस कन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. वाटाघाटीत सविस्तर चर्चा केल्यानंतर मे डी एस कन्स्ट्रक्शन यांनी पुर्वी भरलेले दर ९.०९ टक्के जास्त दरापेक्षा ६ टक्के कमी दर दिलेला असून वाटाघाटीनंतर अंतिम दर ३.०९ टक्के प्राकलनापेक्षा जास्त दर दिलेले आहे. |
| १३ | वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर | ३.०९ टक्के प्राकलन रक्कमेपेक्षा जास्त दर |
| १४ | लेखा शिर्षाचे नांव | सी-४(II) पी-२ रस्ते, प्रवास व पुल इत्त्यादी सुधारणे व नविन बांधणे. |
| १५ | लेखा शिर्षाखालील तरतुद | रूपये १४.०० कोटी. |

उक्त दर वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मेसर्स डी. एस. कन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

--३३--

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १२६ <u>दिनांक :-३१ ३ २००३</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. किरण माने

अनुमोदकाचे नाव:-श्री. दिलीप गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर -३ येथिल साईबाबा मंदिर जवळ जुन्या प्रवेशद्वारच्या ठिकाणी नविन प्रवेशद्वार बांधण्याकामी प्रशासनास मेसर्स डी. एस. कन्स्ट्रक्शन या सर्वात वाजवी दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर-३ येथिल साईबाबा मंदिर ते सम्राट अशोक नगरचा रस्ता सिमेंट कॉंक्रिटने बनविणे कामी प्रशासनास सर्वात लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे <u>बाबत.</u>

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरच्या प्रस्तावाबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर-३ येथिल साईबाबा मंदिर ते सम्राट अशोक नगरचा रस्ता सिमेंट कॉंक्रिटने बनविणे कामी प्रशासनास सर्वात लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे <u>बाबत.</u>

प्रस्तावना

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | उल्हासनगर-३ येथील साईबाबा मंदिर ते सम्राट अशोकनगर पर्यतचा रस्ता सिमेंट कॉंक्रिटने बनविणे. |
| २ | प्राकलनाची किंमत | २५ ,३२ ,०००/- |
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | शहर अभियंता |



| | | |
|---|---|---|
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. ३२१० दि. २९ ५.२००१ |
| ५ | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | क्र. ५० दिनांक ११/१०/२००१ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. ४३४  दिनांक २५/२/२००३ |
| ७ | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केली त्याचे नांव | १ . फ्रि. प्रेस  २ . दोपहर |
| ८ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | १४ |
| ९ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ८ |
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक १३/३/२००३ |

| | |
|---|---|
| ११ | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता |

| अनु | निविदाधारकाचे नांव | |
|---|---|---|
| १ | मे. अर्जून कन्स्ट्रक्शन | अनामत रक्कमेची पावती लखोटा क्र. १ मध्ये जोडलेली नसल्यामुळे निविदा उघडण्यात आली नाही. |
| २ | मे. दिपक कन्स्ट्रक्शन | ५ ४०टक्के कमी |
| ३ | मे. इगल कन्स्ट्रक्शन | १३ ५०टक्के कमी |
| ४ | मे. माधव कन्स्ट्रक्शन | १० ६९ टक्के कमी |
| ५ | मे. संध्या कन्स्ट्रक्शन | १७.१० टक्के कमी |
| ६ | मे. शैलेश कन्स्ट्रक्शन | १२.०५ टक्के कमी |
| ७ | मे. टेक्शन इंजिनिअरींग | १६.१० टक्के कमी |
| ८ | मे. व्ही. एम. हरजानी | १२.२४ टक्के कमी |

| | | |
|---|---|---|
| १२ | लेखा शिर्षाचे नांव | सी-४(Xअ) पी-२ दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्य |
| १३ | लेखा शिर्षाखालील तरतुद | २००२-२००३ च्या अर्थसंकल्पात देय दायित्त्वात सदर लेखा शिर्ष खली रू. ३ ४३ कोटी एवढी एकूण तरतूद करण्यात आली आहे. |

उक्त दर वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मेसर्स संध्या कन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये संविदा करणेस आयक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १२७ <u>दिनांक :-३१.३.२००३</u>

सुचकाचे नाव :-श्री. पमनानी ईश्वर

अनुमोदकाचे नाव:-श्री. लिंगे सुर्यकांत

--३५--

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-३ येथिल साईबाबा मंदिर ते सम्राट अशोक नगरचा रस्ता सिमेंट कॉंक्रिटने बनविणे कामी प्रशासनास मेसर्स संध्या कन्स्ट्रक्शन या सर्वात वाजवी दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर ५ येथील बसंत बहार ते बॅरेक नं. १९६९ या रस्त्याचे सिमेंटीकरण करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>मागच्या वेळी हा प्रस्ताव पूढे ढकलण्यांत आला होता. त्यावेळी प्रस्ताव पुढे ढकलण्याची जी कारणे होती त्याची पुर्तता केली आहे का?

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>पूर्तता करून घेण्यासाठी प्रस्ताव पूढे ढकलला नव्हता. आपण या प्रस्तावा कामी सहकार्य दिले नव्हते. म्हणुन प्रस्ताव पुढे ढकलावा लागला होता. श्री. बच्चाराम रूपचदांनी यांच्या प्रभागातील काम आहे. सहज मंजुरी मिळेल असे आम्हास वाटले म्हणुन मंजुरी आणला आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>मागील काही दिवसापुर्वीच्या स्थायी समिती सभेमध्ये श्री. गायकवाड यांनी शहाड येथील रस्त्याचे काम सुचविले होते. त्याचे काय झाले?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>त्या रस्त्याचे काम पूढील सभेत मंजुरीस आणले जाईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आयुक्त साहेब आपण याबाबत आश्वासन दयावे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-शहर अभियंता यांनी आश्वासन दिले आहे त्यास मी सहमत आहे.

--३६--

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरच्या प्रस्तावाबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर ५ येथील बसंत बहार ते बॅरेक नं. १९६९ या रस्त्याचे सिमेंटीकरण करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २००२-२००३ च्या अर्थ संकलसपामध्ये ''अ अंदाजपत्रकीय तरतूद भाग-२ (भांडवली खर्च) सार्वजनिक बांधकाम खाते क ४;पपद्ध मध्ये केलेल्या ६ कामांकरिता ठेवलेली असल्याचे अर्थसंकल्पामध्ये नमुद करण्यात आले होते. त्यानंतर आता वर्ष २००३-२००४ च्या अर्थसंकल्पामध्ये उपरोक्त ६ रस्त्यांसह रू. १०.५१ कोटी खर्चाच्या १४ रस्त्यांकरिता ५ कोटी पर्यंत तरतूद ठेवलेली आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पहाता मा. आयुक्त यांनी या रस्त्यांपैकी एक रस्ता सिरू चौक ते गुरूद्वारा हा रस्ता रूंदीकरण करून सिमेंट कॉक्रिटीकरण करण्याकरिता प्रथम प्राधान्याने हाती घेण्याकरिता प्रस्ताव करण्यात आला होता. त्यानंतर मा. सभागृह नेता श्री किशोर वनवारी यांनी त्यांच्या दिनांक २१/८/२००२ व दिनांक १०/१०/२००२ च्या पत्रानुसार या तरतूदीमधील बसंत बहार ते बॅ नं १९६९ या रस्त्याची मागणी केल्यानंतर सदर रस्त्याचे प्राकलन व नकाशे सादर करण्यात आलेले आहेत. त्याची एकंदर किंमत सिमेंट कॉक्रिटीकरणानी रस्त्याचा उर्वरित भाग, दुतर्फा नाल्या, साइड पटटी, दिवाबत्ती, चौक विकास इत्त्यादी कामे समाविष्ट करून एकूण प्राकलनीय किंमत रू. ४३,३३,९८९/- इतकी आहे. त्यास मा. आयुक्तांनी मान्यता प्रदान केली असुन स्थायी समितीपुढे प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरिता ठेवण्यास मंजुरी दिली आहे. त्याप्रमाणे सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेकरिता तसेच सदर काम मे उतम इंजिनिअरींग कन्स्ल्टन्सी प्रा. लि. कल्याण यांचे देखरेखीखाली त्यांच्या या महानगरपालिकेशी असलेलेल्या करारनाम्याप्रमाणे करून घेण्याकरिता स्थायी समितीकडून मान्यता मिळण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२८ दिनांक:- ३१.३.२००३

सुचकाचे नाव :- श्री. मुलचंदानी महेंद्र
अनुमोदकाचे नाव :- श्री. रोहडा श्यामसुंदर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार बसंत बहार ते बॅरेक नं. १९६९ या रस्त्याचे सिमेंटीकरण करण्याकामी रू. ४३,३३,९८९/- या रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रशासनाचे वतिने आयत्त्यावेळच्या विषयान्वये दोन प्रस्ताव चर्चेस आणले आहेत. आपणा सर्वांची संमती असेल तर ते विषय चर्चेस घेता येतील. त्यातील पहिला विषय आहे.

१. श्री. प्रमोद टाले यांना प्रभाग समिती सभापती कालावधीचा वाहन भत्ता अदा करणे बाबतचा.
२. प्रशासकीय कामकाजासाठी जीप, ॲम्बेसेडर, मारूती व्हॅन इत्त्यादी वाहने भाडे तत्त्वावर कंत्राटपध्दतीने पुरविणे कामी कंत्राटदारास मुदत वाढ देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>कंत्राटपध्दतीने वाहने भाडयाने घेणे कामी निविदा का काढली नाही?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>निविदा काढली होती परंतु ती Materilised / सफल झाली नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>श्री. प्रमोद टाले यांच्या वाहन भत्त्याचा प्रस्ताव काय आहे? तो वाचुन दाखविला जावा.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u> यांनी याबाबतचा गोषवारा वाचुन दाखविला.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>कायदेशिररित्त्या देवू शकतो का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>नगरसवेक श्री. टाले यांनी सांगितले की वाहन माझे नावावर नाही परंतु प्रभाग समिती सभापती पदाचे कालावधीत मी वाहन वापरले आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>परंतु कायदयानुसार त्यांना वाहन भत्ता देवू शकतो का? आपण अडचणीत तर येणार नाहीत ना?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>स्थायी समितीच्या त्या ठरावातील अटी शर्तीनुसार आजच्या तारखेला आपण त्यांना वाहनभत्त्ता देवू शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>श्री. टाले यांच्या बाबतीत हा जो ठराव पारीत होईल त्याचा फायदा यानंतर इतरांना होईल ना?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>स्थायी समितीच्या त्या ठरावातील अटी शर्तीमध्ये बदल केला तरच सर्वांना त्याचा फायदा मिळेल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>परंतु श्री. टाले यांचे बाबतीत हा प्रस्ताव ही विशेष बाब आहे. ती सर्वांना लागु होणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>आपण म्हंटले की स्थायी समितीच्या त्या ठरावामध्ये बदल करावा लागेल?

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-स्थायी समितीच्या त्या ठरावामध्ये बदल केल्याशिवाय वाहन भत्ता देता येणार नाही.



मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-स्थायी समितीच्या त्या ठरावामध्ये बदल करू शकत नाही. विशेष बाब म्हणुन श्री. टाले यांच्या बाबतीत ह्या प्रस्तावास मंजुरी दयावी असा प्रस्ताव आहे.

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-श्री. टाले यांच्या सारखे आणखी दोन प्रस्ताव आहेत. १. श्री. बनवारीलाल ढेनवाल, २. श्री. महेंद्र मुलचंदानी यांचा.....

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-फक्त श्री. टाले यांच्या प्रस्तावास आम्ही मंजुरी देत आहोत.

तसेच ही स्थायी समितीची ही शेवटची सभा आहे. या सभेचे इतिवृत्त कायम होणार नाही. म्हणुन या सभेचा ठराव आजच कायम झाल्याचे समजुन त्यांची कार्यवाही केली जाईल.

मा. सदस्या श्रीमती. कमला शर्माः-आजची शेवटची सभा आहे. मी सूचविलेले माझ्या प्रभागातील काम झालेले नाही.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-मा. आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेले दोन्ही प्रस्ताव आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करून त्याबाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहेत.

आयत्त्यावेळचा विषयः-

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २९(अ) मधील तरतुदी नुसार उल्हासनगर महानगरपालिका महासभेने, महासभा ठराव क्रमांक ३ दिनांक २१/४/२००१ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेकरीता एकुण ४ प्रभाग समित्त्यांची स्थापना करणेस मान्यता दिलेली होती.

तदनंतर प्रभाग समिती क्रमांक ३ ची दिनांक १३.८.२००१ रोजी सभा होवून त्यामध्ये प्रभाग समिती क्रमांक ३ ठराव क्रमांक १ दिनांक १३.८.२००१ अन्वये श्री. प्रमोद टाले यांची सभापती म्हणून निवड झालेली होती.

उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ३०.४.१९९७ अन्वये विशेष समिती सभापती यांना त्यांचे कार्यकालावधी मध्ये चार चाक वाहन देण्याऐवजी प्रति माह रू. १५०००/- वाहन भत्ता देणे बाबत मान्यता दिलेली आहे.

महासभा ठराव क्रमांक २१ दिनांक १२.१२.२००१ अन्वये प्रभाग समिती सभापती यांना प्रतिमाह रू. १५०००/- वाहन भत्ता स्थायी समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ३०.४.१९९७ मधील मंजूर अटी व शर्ती नुसार अदा करणेस मान्यता दिलेली आहे.

स्थायी समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ३०.४.१९९७ मधील अटी व शर्तीनुसार संबंधितांकडे स्वतःचे वाहन असेल तर वाहन भत्ता देय आहे. तसेच



आजमितीस संबंधितांकडे वाहन नसेल तर असे वाहन ज्या दिवशी खरेदी केले जाईल त्या दिवसापासून वाहन भत्ता मिळणेस संबंधित पात्र राहतील.

उपलब्ध कागदपत्रानुसार श्री. प्रमोद टाले यांचे वापरात असलेले वाहन क्रमांक एम एच १४ एच ६६४७ हे वाहन दिनांक ३ जानेवारी, २००२ रोजी त्यांचे नावांवर झाल्याची नोंद आहे.

श्री. प्रमोद टाले यांचे पत्रानुसार वाहन नावावर नसलेने वाहन भत्ता न मिळणे अन्यायकारक आहे व त्यामुळे सदर ठरावातील अटीतील तांत्रिक चुकीमुळे वाहन भत्ता अदा न करणे अन्यायकारक आहे. त्यामुळे स्थायी समिती ठरावा मधील चुकीची दुरूस्ती करून भत्ता अदा करणेत यावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

श्री. टाले यांनी मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ३०.४.१९९७ मध्ये फेरबदल करून त्यांचे सभापती पदावरील कालावधीचा वाहन भत्ता मागणी केलेला आहे. सबब मा. स्थायी समितीच्या पटलावर श्री. प्रमोद टाले यांचे मागणीसंबधी उचित निर्णय घेण्यासाठी विषय प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १२९ <u>दिनांकः- ३१.३.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. बच्चाराम रूपचंदानी.

ही स्थायी समिती वरील कारणास्तव स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांक ३०.४.१९९७ च्या धर्तीवर अटी व शर्ती मध्ये काहीही अंर्तभुत असले तरी श्री. प्रमोद टाले यांना विशेष बाब म्हणुन त्यांच्या कार्यकालात प्रभाग समिती सभापती पद धारण केलेल्या कालावधीचा वाहन भत्ता अदा करणेस मान्यता देत आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर ठरावा अंतर्गतचा निर्णय महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन अंतिम असेल.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका



<u>आयत्यावेळचा विषयः-</u>

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी जीप, ॲबेसेडर, मारूती व्हॅन भाडे तत्त्वावर कंत्राटपध्दतीने उपलब्ध केली जातात. मेसर्स. अनमोल ट्रॅान्सपोर्ट कंपनी यांची वर्ष २००२-२००३ या वर्षासाठी कार्यरत असलेल्या निविदेची मुदत दिनांक ३१.३.२००३ रोजी संपत आहे. करिता वर्ष २००३-२००४ या वर्षासाठी भाडेतत्त्वावर कंत्राटपध्दतीने वाहन पुरवठा करणे कामी वृतपत्रात जाहिर सुचना देवुन मोहोर बंद निविदा मागविण्यात आल्या होत्त्या सदर निविदा २५.३. २००३ रोजी उघडण्यात आल्या आलेल्या आहेत त्यामध्ये मे. अनमोल ट्रॅान्सपोर्ट यांचे निविदेतील दर व पुर्वीचे निविदा दर पहाता सध्याचे निविदा दर जादा असल्याचे स्पष्ट होते त्यासाठी मे. अनमोल ट्रॅान्सपोर्ट यांना वाटाघाटी करीता बोलविण्यात येत आहे. सदर प्रक्रीयेस काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे सन २००३-२००४ या वर्षासाठी नवीन ठेकेदार नियुक्त करे पर्यंतच्या कालावधीकरीता पुर्वीच्या ठेकेदार मे. अनमोल ट्रा. यांना पुर्वीच्या दराने व पुर्वीच्या अटी व शर्तीनुसार मुदत वाढ दिल्यास प्रशासकीय अडचण निर्माण होणार नाही.

सबब पुढील कालावधीसाठी ठेकेदार नियुक्त होईपर्यंत मे. अनमोल ट्रा. यांना पुर्वीच्या दराने व पुर्वीच्या अटी शर्तीनुसार वाहने पुरविण्यासाठी मुदत वाढीस मान्यता देणे कामी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १३०</u> <u>दिनांकः- ३१.३.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिलीप गायकवाड.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनसुार नवीन कंत्राटदाराची नेमणुक होईपर्यंत मेसर्स. अनमोल ट्रान्सपोर्ट यांना भाडे तत्त्वावर कंत्राट पध्दतीने प्रशासकीय कामकाजासाठी जीप, ॲबेसेडर, मारूती व्हॅन पुरविणे कामी दि. १.४.२००३ पासुन जुन्याच दराने एक महिना मुदतवाढ देवून प्रशासनास त्यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे आणि अंर्तभुत खर्चास मंजुरी देत आहे.

तसेच कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावा अंर्तगतचा निर्णय अंतिम असेल.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका



<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>मा. आयुक्त, सर्व सन्माननिय सदस्य, अधिकारी सन २००२-२००३ च्या पूर्ण वित्तिय वर्षात आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बहुमत होते. तरीही सर्व पक्षाच्या सदस्यांनी आम्हास सहकार्य दिले, अधिका-यांनी ही आम्हास सहकार्य दिले.

सर्व पक्षाच्या सदस्यांनी आम्हास जे सहकार्य दिले त्यामुळे सभा कशी झाली कधी समाप्त झाली हे माहित सुध्दा पडले नाही.

दि. १ एप्रिल पासुन स्थायी समितीचे आठ सदस्य निवृत्त होत आहेत त्यांना निरोप देवू या व त्यांच्या जागी ८ नविन सदस्य निवडुन आले आहेत त्यांचे स्वागत करू या.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी स्थायी समितीतुन निवृत्त होत असल्याने आता ते महासभेत जास्त वेळ बोलतील.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>अभिनंदन प्रस्तावाबाबत मी सुध्दा बोलु इच्छितो. सर्वांनी आम्हास सहकार्य दिले. त्यामुळे आमचे ठराव सर्वानुमते पारीत झाले, सर्व अधिका-यांनी आम्हास सहकार्य दिले, सचिव व सचिव कार्यालयाने आम्हास विशेष सहकार्य दिले. इतिवृत्त वेळेवर पुरविले. त्याचप्रमाणे विद्युत विभागाने ही अतिशय कार्यक्षमतेने शहरासाठी अधिक चांगल्या प्रकारे काम केले त्याचप्रमाणे इतर सर्व अधिका-यांनी आम्हास अतिशय चांगल्या प्रकारे सहकार्य केले. आमच्या श्री. भडकवाड साहेबांकडे १४-१४ कार्यभार आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>श्री. भडकवाड यांच्याकडे आणखी ही काही कार्यभार सोपविण्यांत येतील.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>आम्हास दुःख होत आहे की, ८ सन्माननिय सदस्य स्थायी समितीतुन निवृत्त होत असल्याने त्या सदस्यांना निरोप दयावा लागत आहे, पुष्पगुच्छ देवून त्यांचा सन्मान करू या व त्यांचे आभार प्रकट करू या.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>निवृत्त होणा-या सर्व सदस्यांना माझ्या हस्ते पुष्पगुच्छ देवून त्यांचा सन्मान करण्यांत येईल परंतु माझा सत्त्कार कोण करणार?

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा यांनी मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांना पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्त्कार केला तर मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांच्या हस्ते खालील सन्माननिय सदस्यांना पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्त्कार करण्यात आला.

१. श्री. बच्चाराम रूपचंदानी
२. श्री. श्यामसुंदर रोहडा
३. श्री. महेंद्र मुलचदांनी
४. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
५. श्रीमती. कमला शर्मा
६. श्री. दिलीप गायकवाड

7- तसेच ज्या अधिका-यांनी आम्हास सहकार्य दिले त्या सर्वांना पुष्पगुच्छ देवून त्यांनाही सन्मानित करण्यात येत आहे.



१. मा. प्रभारी आयुक्त (श्री. सोनवणे साहेब)
२. श्री. जवांदे, (कार्यकारी अभियंता पा.पु.वि.)आपणाकडुन फार मोठया अपेक्षा आहेत.
३. श्री. गुरव रविंद्र(सहाय्यक आयुक्त)
४. श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता विद्युत)
५. श्री. गोपाल जेसवानी (भांडार अधिकारी)
६. श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख)
७. श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय) आपणाकडे १४-१४ कार्यभार आहेत.

८. श्री. म्हात्रे के. एन. (मुख्य स्वच्छता निरीक्षक)
९. श्री. मोहन चिजवानी (शहर अभियंता)
१०. श्री. एस. के. घोलप (प्रभारी मुख्य लेखा परीक्षक)
११. श्री. पाटील (मुख्य लेखा अधिकारीग)
१२. सा. प्राजक्ता कुलकर्णी (लिपिक सचिव कार्यालय)
१३. श्री. टी.एन. पतंगराव (लिपिक सचिव कार्यालय)

सर्व अधिकारी / कर्मचा-यांना मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार करण्यांत आला.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा)</u>:-आपणा सर्वांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यांत आली आहे. कृपया आपण सर्वांनी भोजनाचा लाभ घ्यावा ही विनंती.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी दुपारी २.१५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

दि:–7.4.2003.

<u>इतिवृत्त</u>

### <u>दि. ७.४.२००३ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक ७.४.२००३ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

१. श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु)कालानी
२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. उमाप रामदास
४. श्री. ठाकुर नरेंद केवलराम
५. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
६. श्रीमती छाब्रिया भारती
७. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
८. श्री. जेसवानी सतरामदास
९. श्रीमती मोकल सिमा
१०. श्री. पंजाबी नारायण
११. श्रीमती बामणकर नंदीनी
१२. श्री. मोहन बेहरानी
१३. श्री. लिंगे सुर्यकांत
१४. श्री. पृथ्वी वलेचा

तर

मा. सदस्य श्री. ईश्वर पमनानी, व श्रीमती जयश्री सुर्वे हे सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होतो होत्त्या.

सांयकाळी ४. ३५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> स्थायी समिती सदस्य पदावर ८ नविन सदस्य निवडून आल्याने स्थायी समितीची रचना पूर्ण झाली आहे. या स्थायी समितीची ही पहिली सभा आहे. हया सभेमध्ये श्रीमती ज्योती कालानी हया स्थायी समिती सभापती पदाच्या उमेदवार असल्याने हया सभेचे कामकाज चालविण्यासाठी आपणामधील एका सदस्याची आपण पिठासीन अधिकारी म्हणून नेमणूक करावी.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u> श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांची पिठसीन अधिकारी म्हणून निवड करण्यात यावी.

मा सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांची सर्वानुमते पिठासीन अधिकारी म्हणून निवड केल्यानंतर ते पिठासीन अधिकारी स्थानी आसनस्थ झाले.

<u>मा. सचिव श्री. प्रकाश कुकरेजाः-</u>सभा-सूचनेवरील विषयाकडे येण्यापूर्वी आपले प्रभारी आयुक्त श्री. सोनावणे साहेब स्थायी समितीवर निवडून आलेल्या आठ सदस्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करतील. त्या सदस्यांची नावे येणेप्रमाणे.... .

--२--

१. श्रीमती ज्योती कालानी
२. श्री. मोहन बेहरानी
३. श्री. नारायण पंजाबी
४. श्री. सतरामदास जेसवानी
५. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
६. श्रीमती नंदिनी बामणकर
७. श्री. उमाप रामदास
८. श्रीमती भारती छाब्रिया

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर के. सोनावणे) यांनी आठ नवनिर्वाचित स्थायी समिती सदस्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> आता आपण सभा-सूचनेकडे वळू या.

विषय क्र. १ स्थायी समितीच्या सभापतींची नेमणूक करणे बाबत.

स्थायी समितीच्या सभापती पदाच्या निवडणूक कार्यक्रमात दिनांक १ एप्रिल, २००३ हा नामांकन पत्र भरण्याचा दिवस होता. या दिवशी एकच उमेदवार श्रीमती ज्योती सुरेश कालानी यांनी आपले नामनिर्देशन पत्र सादर केले. त्यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्त्याही उमेदवाराने नामनिर्देशन पत्र सादर केले नाही. दिनांक ३.४.२००३ ही नामनिर्देशन पत्र छाननीची तारीख होती, यादिवशी छाननी अंती त्यांचे नामनिर्देशन पत्र विधीग्राहय असल्याचे घोषित करण्यात आले. त्यांच्यासमोर अन्य दूसरा कोणताही उमेदवार नसल्याने त्या सभापती पदी बिनविरोध निवडून आल्याची जाहिर करणे आवश्यक आहे.

विषयः- <u>स्थायी समितीच्या सभापतीची नेमणुक करणे बाबत</u>

प्रस्तावना

सन २००३-२००४ करिता स्थायी समितीच्या सभापतीची नेमणुक करणे कामी आयुक्तांनी दिनांक ७.४.२००३ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता स्थायी समितीची सभा बोलावली आहे. स्थायी समिती सभा सूचने सह प्रत्येक स्थायी समिती सदस्याला निवडणुक कार्यक्रम पुरविण्यात आला होता त्या कार्यक्रमानुसार स्थायी समिती सभापती पदाच्या नेमणुकीसाठी दिनांक १.४.२००३ रोजी दुपारी ३ ते ५ या दरम्यान नामनिर्देशनपत्र स्विकारण्यासाठी निश्चित करण्यांत आलेल्या मुदती अंतर्गत केवळ एकच उमेदवार श्रीमती. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी यांनी आपले नामनिर्देशन पत्र महापालिका सचिवांकडे दाखल केले. दिनांक ३.४.२००३ रोजी त्यांचे नामनिर्देशनपत्र विधीग्राहय असल्याचे जाहीर करण्यांत आले.

निवडणूक कार्यक्रमा अनुसार विहित मुदतीत मिळालेल्या नामनिर्देशन पत्राची संख्या एक, हि भरावयाच्या रिक्त जागांच्या संख्ये इतकीच असून हया सभेत नामनिर्देशित उमेदवार श्रीमती. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी यांना यथोचितरित्या बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करण्यासाठी प्रस्तावित.



स्थायी समिती ठराव क्र. १ दिनांक:- ७.४.२००३

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनसुार श्रीमती. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी या नामनिर्देशित उमेदवारास स्थायी समिती सभापती पदी बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करित आहे.

सर्वानुमते

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. पिठासीन अधिकारी (श्री. नरेंद्रकुमार ठाकुर):- सभापती पदाच्या उमेदवार श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु) कालानी यांच्या समोर दुसरा अन्य कोणताही उमेदवार नसल्याने त्या स्थायी समिती सभापतीपदी बिनविरोध निवडून आल्याचे मी जाहिर करीत आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे) यांनी नवनिर्वाचित सभापती श्रीमती ज्योती कालानी यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा , श्री. मोहन बेहरानी, श्री. नारायण पंजाबी, श्री. सतराम जेसवानी, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्रीमती नंदिनी बामणकर, श्रीमती सिमा मोकल, श्री. रामदास उमाप, श्रीमती किरण माने, श्रीमती भारती छाब्रिया इत्त्यादी सन्मानानिय सदस्यांनी व महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांनी नवनिर्वाचित सभापती श्रीमती ज्योती कालानी यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

यानंतर मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी आपले आसनग्रहन केले.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :- स्थायी समिती सभापती पदासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस, आरपीआय, अपक्ष या सर्वांच्या वतीने श्रीमती ज्योती कालानी यांनी आपले नामनिर्देशन पत्र भरले. शिवसेना, भाजपाच्या सदस्यांनी त्यांच्या विरोधात आपले नामनिर्देशन न भरल्याने आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी आम्हांस सहकार्य दिले. त्यानुसार आम्ही सुध्दा त्यांना सहकार्य देऊ. तसेच ते यापुढे सुध्दा आम्हांस असे सहकार्य देतील, धन्यवाद.

मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी :- आजच्या सभासूचनेवर अन्य दुसरे काही कामकाज नसल्याने या सभेचे कामकाज संपल्याचे मी जाहिर करते.

सांयकाळी ४. ४५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दि:-12.5.2003.

इतिवृत्त

दि. १२.५.२००३ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक १२.५.२००३ रोजी सांयकाळी ४. ०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

१. श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु)कालानी :- सभापती

२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. उमाप रामदास
४. श्री. ठाकुर नरेंद केवलराम
५. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
१४. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
१५. श्री. जेसवानी सतरामदास
१६. श्रीमती मोकल सिमा
१७. श्री. पंजाबी नारायण
१८. श्रीमती बामणकर नंदीनी
१९. श्री. मोहन बेहरानी
२०. श्री. लिंगे सुर्यकांत
२१. श्री. ईश्वर पमनानी
१४. श्री. पृथ्वी वलेचा

तर

मा. सदस्य श्रीमती छाब्रिया भारती व श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे हया सभेस अनुपस्थितीत होत्त्या.

श्री. दत्ता भडकवाड उपआयुक्त मुख्यालय हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होते.

सांयकाळी ४. ४५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. १ वाचून दाखवितात.

विषयः- मागील सभेचे दिनांक २८.४.२००३ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>काही सदस्यः-</u>इतिवृत्त कायम.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>मला बोलायचे आहे. प्रभागातील मोठे नाले सफाई कामी १०-१० हंगामी रोजंदारी सफाई कामगार १० तारखेपासुन आपण नेमणार होतात त्याचे काय झाले? आज १२ तारीख आहे व हे जे रोजंदारी सफाई कामगार नेमले जात आहेत. ते अधिका-यांकडून निवडले जात आहेत. म्हणजे ज्या कामगारांनी मागील वर्षी काम केले आहे. अशा कामगारांमधुन या कामगरांची निवड केली जात आहे. त्यामध्ये नगरसेवकाच्या शिफारशीनुसार एक सुध्दा माणून नेमला जात नाही, या १० कामगारांवर पर्यवेक्षण करणारा, त्यांच्याकडून काम करून घेणारा नगरसेवकाचे विश्वासातील एक माणूस त्यात असावा कारण की, आरोग्य विभागाचे मुकादम त्यांच्या कामावर लक्ष देवू शकणार नाहीत. म्हणुन नगरसेवकांचे विश्वासातील एक माणुस सुरवायझर म्हणुन त्यामध्ये असला पाहिजे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>स्थायी समितीने जी मंजुरी दिलेली आहे ती १०-१० हंगामी रोजंदारी सफाई कामगार नाले सफाई कामी नेमण्यासाठी सुपरवायझरचा त्यामध्ये प्रश्नच नाही, सुपरवायझींग आम्ही करू.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>महापालिकेच्या आस्थापनेवरील ३० ते ४० टक्के कायम सफाई कामगार व मुकादम सुट्टीवर असतात म्हणून आम्ही असा ठराव करू इच्छितो की, या कामगारांमध्ये आमच्या विश्वासातील एक माणुस असावा जो त्यांच्याकडून काम करवून घेईल.

<u>श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>भलेही १० कामगारांमधील एक कामगार सुपरवायझर म्हणुन ठेवा.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>भले ही त्याचे नाव सुपरवायझर ठेवू नका परंतु तो कामगार सुपरवायझींग करेल काम करून घेईल.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>त्यांचे म्हणणे आहे १० कामगारांमधील एक कामगार सुपरवायझर म्हणुन ठेवावा. आपण म्हणता १० कामगारांवर एक सुपवायझर ठेवा.

<u>मा. सदस्या श्रीमती. माने किरणः</u>सुपरवायझर ठेवला तरच काम व्यवस्थित होईल, नाही तर काम होणार नाही. एक कामगार बसला आहे. एक कामगार काम करतो आहे. अशाने काम होणार नाही म्हणुन सुपरवायझर ठेवला जावा.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः</u>आम्ही लोक प्रतिनिधी आहेत, आपल्या शहरासाठी आमच्या मनामध्ये आस्था आहे, काम चांगल्या प्रकारे व्हावे अशी आमची इच्छा आहे म्हणुन आम्ही आपणास विनंती करतो की, एक सुपरवायझर नेमला जावा.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>विनंती करण्याची काय आवश्यकता आहे, आपणास अधिकार आहेत आपण आयत्यावेळच्या विषय म्हणुन ठराव पारीत करू या, प्रशासन त्याची अंमलबजावणी करेल.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-प्रत्येक स्वच्छता निरिक्षकाकडे काही अतिरिक्त नाले सफाई करणे कामी सोपविण्यांत आलेले आहेत. स्वच्छता निरिक्षक हे नाले कुणा कडून साफ करून घेतील?

आम्हा प्रत्येक नगरसेवकास जे १०-१० रोजंदारी सफाई कामगार पुरविले जातील. हे कामगार ते नाले सफाई कामी आम्ही देणार नाही. शहरातील नाले सफाई कामी मे. पनवेलकर यांना ही पैसे दयायचे व नाले सफाईसाठी रोजंदारीवर कामगार लावून त्यांच्यावर ही खर्च करायचा? हे नाले कोण कोणते व कुठे आहेत ते स्वच्छता निरिक्षक यांनाही माहित नाहीत. कामगार लावून नाले साफ करून घेण्याचे आपण मे. पनवेलकर यांना जे काम दिले आहे त्याचा खर्च रू. २ लाखापर्यंत दर्शविला आहे. अतिरिक्त नाल्यांचा त्यामध्ये समावेश आहे का? नाहीतर त्याकामी जेसीबी व प्रोक्लेन मशिन लावण्यासाठी अतिरिक्त खर्चाचे प्रावधान करणार का?

श्री. दत्ता भडकवाड ( आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी ):- जेथे पोक्लेन व जेसीबी मशीन जावु शकते असे नाले सफाईसाठी प्रती तास या दराने प्रोक्लेन व

जेसीबी मशिन लावून ते साफ करून घेवू. जेथे प्रोक्लेन व जेसीबी मशिन जावू शकणार नाही असे नाले कामगार लावुन साफ करवून घेवू. नाले कितीही असोत प्रती तासी किती घनकचरा निघतो त्याप्रमाणे आम्हास त्यास देयक रक्कम अदा करायची आहे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-जेथे मशिन जात नाहीत. तेथील नाला सफाईचे काम कामगारांकडुन करवून घेतले पाहिजे. परंतु स्वच्छता निरिक्षकांकडे जे अतिरिक्त नाले सफाईचे काम सोपविले आहे ते काम ते या १०-१० रोजंदारी सफाई कामगारांकडून करवून घेतील, हे नाले कोणते आहेत याची स्वत: स्वच्छता निरिक्षकांना सुध्दा माहिती नाही. शहरातील मोठे नाले सफाई करण्याचे काम मेसर्स व्ही. आर. पनवेलकर यांचेकडे सोपविण्यात आलेले आहे. त्या प्रस्तावामध्ये ज्या नाल्यांचा समावेश नव्हता. त्यानाल्यांची अतिरिक्त यादी ठरावात समाविष्ट केली परंतु त्या अतिरिक्त नाल्यांची यादी स्वच्छता निरिक्षकांकडे नाही. व त्यांना त्याची माहिती सुध्दा नाही. तर हे काम कोण करणार? स्वच्छता निरिक्षकांना यादी तर दिली पाहिजे ना?

श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-स्वच्छता निरिक्षकांना माहित आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-मागील सभेचे दि. २८.४.२००३ इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. २ वाचून दाखवितात.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत १४ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-गोषवा-यातील अनुक्रमांक तीन वरील काम पहावे, माझे म्हणणे काय आहे इतर उद्यानांमध्ये सुध्दा हया कामी महापालिका निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. सपना उद्यानामध्ये याकामी निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याप्रमाणे इतर उद्यानामध्ये याकामासाठी महापालिका निधी उपलब्ध करून दिला पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:-तर त्याबाबत आपण पत्र दया, आपण तसे पत्र दिले तर होईल.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-पॅनल क्रमांक ६ मध्ये एक सुध्दा उद्यान नाही. उद्यानाची आमचा निधी असाच व्यपगत (Lapse) होतो. प्रभाग समितीमधील या कामाचा निधी सुध्दा व्यपगत (Lapse) होतो. या निधीचा आम्हाला काही फायदा होत नाही. हा निधी आम्हास दुस-या कुठल्याही कामासाठी उपलब्ध करून दयावा जेणेकरून प्रभागात काम होईल.

श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-तर मग आपण चौकामध्ये उद्यान विकसित करा.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-त्या निधीतुन आम्ही आमच्या प्रभागामध्ये समाज मंदिर, हजेरीशेड तयार करू शकलो असतो.
मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-बजेटमध्येच अलग अलग कामासाठी अलग अलग शिर्ष ठेवलेले असतात ज्या कामासाठी जे शिर्ष आहे त्याच कामासाठी त्या शिर्षातून पैसा खर्च केला जावु शकतो.
मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-माझ्या प्रभागात सरकारी जमिनीवर उद्याने तयार केले आहे. तेथे सी.सी.सी. पॅसेज तयार करण्यास सांगितले तर म्हणतात ही शासकीय जमीन तर मग तेथे गार्डन का तयार केले नाही तर मला तो निधी दुस-या कामासाठी उपलब्ध करून दिला जावा.
मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-म्हणूनच तर आम्हास अडचणीचे होते.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी':-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत
१४ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-१ येथील प्र.क्र. ३ मध्ये तानाजी नगर, शिवनेरी नगर, कमला नेहरू नगरमध्ये सी.सी. व नाली बांधणे (नगरसेवक निधी १४२) | १,९९,६००/- | १०/४/०३ | मे. कप्लेश्वर म.का.सोसा. |
| २ | उल्हासनगर-१ येथील महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळा क्र. २३/२६ चे संरक्षक भिंत बांधणे काही ठिकाणी भिंत दुरूस्ती करणेबाबत (महापालिका निधी २२३) | १,७५,०००/- | १०/४/०३ | मे. ओम म.का. सोसा. |
| ३ | सपना उद्यानामध्ये लाल माती व झाडे लावणेबाबत (महापालिका निधी २९०) | २,००,०००/- | १०/४/०३ | मे. वर्षा म.का. सोसा. |
| ४ | उल्हासनगर-५ येथील शमशानभुमीत मुतारी बांधणेबाबत. (महापालिका निधी ३२७) | ६०,०००/- | १०/४/०३ | मे.आदर्श म.का. सोसा. |
| ५ | पॅनेल नं १० मध्ये १) साईनाथ कॉलनी येथे ट्रान्सफार्मरजवळ २) कालीमाता मंदिर, चौक जवळ रिक्षा स्टॅंड जवळ या दोन्ही ठिकाणी मुतारी बांधणेबाबत (महापालिका निधी ३२८) | ८०,००/- | १०/४/०३ | मे. श्री मॉ म.का.सोसा. |
| ६ | उल्हासनगर-५ येथील बॅ नं १९५२ समोर बगीच्यात चेकर्ड टाईल्स लावून विकास करणे (प्रभाग समिती निधी ३३२) | ९९,९००/- | १०/४/०३ | मे. धनलक्ष्मी म.का.सोसा. |
| ७ | उल्हासनगर-५ येथील प्र. क्र. १४ | १,९९,९००/- | १०/४/०३ | मे. भोलेनाथ म. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मध्ये शिवलीला आर्केडजवळ सी सी एम-२५० रोड व नाली बांधणे. (नगरसेवक निधी ३३८) | | | का.सोसा. |
| ८ | उल्हासनगर-५ येथील कुर्ला कॅम्प लाललाई गार्डनमध्ये स्टेज बांधणेबाबत. (महापालिका निधी ३३९) | १,००,०००/- | १०/४/०३ | मे. श्री मॉ म. का.सोसा. |
| ९ | उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र. ११ मध्ये शिव कॉलनी ते नेहरूनगर पर्यंत रस्ता एम-२५० ने बांधणेबाबत. ( महापौर निधी ३४९) | ९९,९००/- | ८/४/०३ | मे. धनलक्ष्मी म. का.सोसा. |
| १० | प्रभाग क्र. ११ मधील नेहरूनगर व शिव कॉलनी मध्ये एम-२५० ने रस्ता बांधणे(दुर्बल घटक निधी ३५१) | १,५०,०००/- | ८/४/०३ | मे. श्री जय शंकर म.का. सोसा. |

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| ११ | प्रभाग क्र. २३ गौतमबुध्द नगर येथे नाला बनविणे.(नगरसेवक निधी ३५४) | १,९९,७००/- | १०/४/०३ | मे.श्री स्वामी समर्थ म.का. सोसा. |
| १२ | प्रभाग क्र. २३ मधील साईबाबा कॉलनी गुरूनानिक जिरा दरबार जवळीलनाला बांधणे.(दुर्बलघटक निधी ३५६) | १,९९,१००/- | १०/४/०३ | मे. श्री गंगा म. का. सोसा. |
| १३ | उल्हासनगर-२ येथील प्रभाग क्र. २२ मध्ये वायले यांचे घर, शेरावाली अपार्ट. ४० खोली जवळ नाली बांधणे. (उप-महापौर निधी ३७१) | ६४,९६०/- | १०/४/०३ | मे. सुर्यज्योत म. का.सोसा. |
| १४ | महात्त्मा फुलेनगर, प्रेमनगर टेकडी येथील १० बैठकिचे शौचालय दुरूस्ती करणे. (महापालिका निधी ४१८) | १,००,०००/- | १०/४/०३ | मे. श्री मॉ म. का.सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १० दिनांकः-१२.५.२००३

.

सुचकाचे नाव :- श्री. पंजाबी नारायण.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. बामणकर नंदिनी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वरील १४ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगरच्या घोषित गलिच्छ वस्तीमध्ये राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रम अंतर्गत दिवाबत्ती बसविणे कामी प्रशासनास संविदेस मान्यता देणे बाबत.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-जेवढया काही घोषीत गलिच्छ वस्त्या आहेत त्यामध्ये या स्किम मधुन किती रक्कमेचे काम होईल?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता विद्युत विभाग):-शासनाचे नार्म नुसार तया त्या गलिच्छ वस्तीमधील........... मागासवर्गीयांचे लोकसंख्येच्या प्रमाणानुसार. जो निधी येईल त्यानुसार.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी ':-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

**विषय :- उल्हासनगरच्या घोषित गलिच्छ वस्तीमध्ये राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रम अंतर्गत दिवाबत्ती बसविणे कामी प्रशासनास संविदेस मान्यता देणे बाबत.**

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या हददीतील घोषित गलिच्छवस्ती मध्ये दिवाबत्ती लावण्यासंबंधी विद्युत अभियंत्रिकी विभागाने काही कामे राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रम अंतर्गत कोकण गृह निर्माण व क्षेत्रे विकास मंडळ यांच्या कडे पत्र क्र.उमपा /विद्युत /३४० , दिनांक २१.११.२००२ अन्वये पाठविले होते.

त्याच्या प्रतिसादात मख्य अधिकारी कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांनीउ पत्र क्र.को.नं/ मु.अ/ ६५१ /२००३ दिनांक २८.३.२००३ अन्वये एकुण रुपये ४० ,६५ ,२००/- इतकी प्रशासकिय मान्यता दिली.

तदनंतर मा. आयुक्तांची मान्यता घेऊन कॅम्प वाईज पाच विविध निविदा मागविण्यांत आली. त्याच्या तुलनात्त्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदा धारकांचे नावे | दर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अंदाजपत्रकीय | कॅम्प नं.१ | कॅम्प नं.२ | कॅम्प नं.३ | कॅम्प नं. ४ | कॅम्प नं. ५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रक्कम रुपये ----- | ८,२६,७३४ | ६,७२,४०८ | १०,३१,८२३ | ५,८४,३५९ | ९,४२,६४४.५० |
| १. | मे. एस.एस. इलेक्ट्रीक बॉक्स, कल्याण | १३.६ टक्के कमी | १२.५ टक्के कमी | १५.१ टक्के कमी | -- | -- |
| २. | मे.एस.एम. इलेक्ट्रीक बॉस, कल्याण | १५.२८ टक्के कमी | १५.१९ टक्के कमी | १५.२६ टक्के कमी | १५.३८ टक्के कमी | १५.१० टक्के कमी |
| ३. | मे. जाधव ॲण्ड सन्स, कल्याण | | | ---- | ----- | ----- |
| ४. | मे. वैभवी इलेक्ट्रीकल्स, बदलापूर | १५ टक्के कमी | १६ टक्के कमी | ---- | ११ टक्के कमी | १२.३ टक्के कमी |
| ५. | मे. परेश इलेक्ट्रीक बॉक्स , मुंबई | ----- | ११.६२ टक्के कमी | --- | --- | --- |
| ६. | मे. जे.डी. इलेक्ट्रीक बॉक्स कल्याण | ---- | ---- | | ----- | ----- |
| ७. | मे. वरदमान इलेक्ट्रीकल पनवेल | --- | ---- | --- | १४.८ टक्के कमी | --- |
| ८. | मे. प्रेम इन्टरप्रायजेस उल्हासनगर | ---- | --- | ---- | | |

सदर तुलनात्मक तक्त्या अनुसार कॅम्प नं. १ व कॅम्प नं. २ करिता मे. जाधव ॲण्ड सन्स यांनी दिलेले दर सर्वात कमी व वाजवी आहे, कॅम्प नं. ३ करीता मे. जे.डी. इलेक्ट्रीक बॉक्स यांनी दिलेले दर सर्वात कमी व वाजवी आहे. आणि कॅम्प नं. ४ व ५साठी मेसर्स प्रेम इन्टरप्रायझेस यांनी दिलेले दर सर्वात कमी व वाजवी आहे.

वरील बाबी लक्षात घेत ज्या निविदेत जे ऐजन्सी सर्वात कमी आहे त्यांच्या दराला मंजुरी दिलेली असून संविदा करण्याकरीता मंजुरीसाठी स्थायी समिती पुढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>   ११                    <u>दिनांकः-१२.५.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. मोहन वेहरानी.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. किरण माने.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील घोषित गलिच्छ वस्ती मध्ये राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत दिवाबत्ती बसविणेकामी अनुक्रमे कॅम्प नं. १ व २ करीता मेसर्स जाधव ॲण्ड सन्स , कॅम्प नं. ३ करीता मेसर्स जे.बी. इलेक्ट्रीक बॉक्स आणि कॅम्प नं. ४ व ५ करीता मेसर्स प्रेम इन्टरप्रायझेस या लघूत्तम दराच्या निविदाकारांशी प्रशासनास संविदा करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय :- श्रीराम टॉकीज पवई चौक येथे महाराष्ट्र विद्युत मंडळाचे पोल व रोहित्रे हलविणे कामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-पोल हटविण्याचा विषय आहे. माझ्या प्रभागात रस्त्यावरील लाईटचे कितीतरी पोल वाकले आहेत. ते कधी हटविले जातील. तेथे एखादा अपघात झाल्यानंतर ते हटविले जातील काय?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता विद्युत विभाग):-शहरामध्ये असे हजारो पोल वाकले आहेत. वाकलेले पोल हटविणे हे एम.एस.ई.बी चे काम आहे. आपल्या कार्यालयाचे हे काम नाही.

राज्य विद्युत मंडळ व राज्य शासन स्तरावर याबाबत आमचा पत्रव्यवहार चालु आहे. रस्त्यावरील विद्युत खांबाची देखभाल दुरूस्ती करणे हे त्यांचे काम आहे. आपण विद्युत बिल पहा. त्यांच्या मागे काही condition लिहिल्या आहेत.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-ते करत नसतील तर..

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता विद्युत विभाग):-तर आपण त्याबाबत न्यायालयात दाद मागा त्यांच्यावर न्यायालयात खटला दाखल करा.

मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-वाको जंक्शन येथिल ट्रान्सफार्मर यामध्ये आहे का?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता विद्युत विभाग):-नाही. ते काम झालेले आहे.

मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-काम होईल, ट्रान्सफार्मर शिफ्ट करायचा राहीला तर?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- श्रीराम टॉकीज पवई चौक येथे महाराष्ट्र विद्युत मंडळाचे पोल व रोहित्रे हलविणे कामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

महानगरपालिकेने एकात्मीक रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत मरावि मंडळाचे श्रीराम टॉकिज पवई चोक येथे रस्त्यात येणारे पोल व रोहित्रे हलविण्याकरीता मरावि मंडळाकडुन मंजुर प्राकलन मध्ये साहित्य + वाहतुक खर्च टी.एन.पी.जुने साहित्य काढण्याचे चार्जेस घेवून निविदा रक्कम रुपये ९,३८,६३१.६१ निर्धारित करुन निविदा मागविली व मेसर्स आर.टी. इंजिनिअरींग सर्व्हिस यांची निविदा रक्कम पेक्षा २५ टक्के कमी निविदा मंजुर करुन त्यांना दिनांक २७.१२.२००२ रोजी कार्यादेश पत्र देण्यात आले. व सदर कार्याची माहिती स्थायी समिती यांनी ठराव क्र. ८८ दिनांक १३.१.२००३ अन्वये नोंद घेतली. सदर करताना... side condition & MSEB letter dated 31-3-2003 नुसार काही ॲटमच्या परिमानात फेरबदल झाली व काही नविन ॲटम पण उभारणी करावी लागली. त्या सर्व ॲटमच्या परिमाण व नाव तसेच ॲटमच्या परिमाणात झालेल्या फेरबदल इत्यादी कारणे पुढीलप्रमाणे मरावि मंडळाच्या सदर पत्रानुसार आहे.

"With reference to the above subject] it is to inform thate while shifting the HT, line. Transformer. LT. line at Shriram Talkies, Ulhasnagar-4, some modifications /replacements have made. These modification / replacement are due to prevalling site condition. The details are as given below.

1)Replacement of 1 no- 400 A, AB Switch at tapping line of new location-
2)Replacement of L.T. cables of sizes 300 mm2, 240mm2, 185 mm2 at Shriram Transformer (2nos)due to shortage of length of existing cables.
3) Replacement of existiinbg to conductior due to change in crentation from end terminal to incominng side.
4) Exvacation of both Transformer plinths & D.P.'s by using compressor M/c due to rocky area, which is not considered in estimate. The approx. use of conpresso M/c is Rs. 14]196/- i.e. Rs. 338 x 6 hr. x 7 days.
5) Providing of HT strut poles as per site condition, increased due length of strut pole.

The above works have been disciussed before execution with your Dy. Engineer (Elec.) who had agreed to execute the works as per MSEB's spcificaton & new requirement.

वरील सर्व लक्षात घेता तसेच म.रा.वि. मंडळाकडुन आलेल्या पत्र दिनांक ३१.३.२००३ अन्वये सदर सुधारीत प्राकलन रक्कम रुपये ११,५४,००० यास मंजुरी साठी स्थायी समितीपुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १२ दिनांकः-१२.५.२००३

सुचकाचे नाव :- श्री. ठाकुर नरेंदकुमार

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. माने किरण

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्रीराम टॉकिज पवई चौक येथे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे पोल व रोहित्रे हलविणे कामी रुपये ११,५४,०००/- या सुधारित प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषय :- संगणकीकृत सिटीजन फॅसिलिटी सेंटर उभारण्यासाठी कन्सल्टंट / आर्किटेक्ट नेमणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- संगणकीकृत सिटीजन फॅसिलिटी सेंटर उभारण्यासाठी कन्सल्टंट / आर्किटेक्ट नेमणे बाबत.

प्रस्तावना

शासनाचे दिनांक २७/२/२००३ च्या निर्णयानुसार महानगरपालिकेने ठराव क्रमांक ४ दिनांक २५.४.०३ अन्वये महानगरपालिकेचे संगणकीकरण करण्याचे धोरणात्मक निर्णय घेतलेले आहे.

त्या धारेणात्मक निर्णयानुसार महानगरपालिकेच्या मुख्यालयात सिटीजन फॅसिलिटी सेंटर उभारणी करणे, तसेच मुख्यालयात सर्वीकडे संगणक बसविण्याकरिता फेरबदल करणे व विविध प्रभाग क्षेत्रात सी एफ सी उभारणी करणे इत्यादी कार्य करावे लागणार. यासाठी मुख्यालयात व विविध जागी काही फेरबदल करावे लागणार आहे.

हे फेरबदल करण्यांकरिता एका कन्स्ल्टंट / आर्किटेक्ट यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. याकामी अनुभवी आर्किटेक्ट / कन्स्ल्टंट यांची नेमणूक करणे योग्य राहील. त्यासाठी कल्याण-डोंबिवली येथे ज्या आर्किटेक्ट / कन्स्ल्टंट हे कार्य पार पाडले आहे. त्यांचीच नेमणूक सदर कार्यासाठी कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेने पारित केलेल्या दर अटी व शर्तीनुसार देण्यासाठी कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेकडून माहिती मागविण्यात आली. कल्याण-डोंबिवलीच्या कार्यकारी अभियंता यांनी कळवले की, सदर कार्यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने श्री सुरेश मानकर यांना कामाच्या प्राकलनाच्या एकूण 6% व्यवसायिक शुल्कावर नेमणूक केली होती.

वरील मिळालेल्या माहितीनुसार श्री सुरेश मानकर कन्स्ल्टंट / आर्किटेक्ट यांना पत्र जा.क्र. उमपा/साबां/शअ/ Even/14 दिनांक 25/4/2003 अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेचे कार्य कल्याण-डोंबिवलीच्या मंजुर दराने व मंजुर अटी व शर्तीनुसार करण्याबाबत सहमती विचारण्यात आली. त्यांच्या उत्तरादाखल त्यांनी पत्र क्र./24/SM/UMC/2003 दिनांक 26/4/2003 अन्वये सहमती दर्शवली (व सोबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या त्यांच्या नेमणूकीच्या पत्र क्र. कल्याण-डोंबिवली/काअ/बांध./425, दिनांक 7/3/2001 पाठवले.)

त्यानंतर श्री सुरेश मानकर यांच्याशी वाटाघाटी करण्यात आली व त्यानंतर त्यांनी एकूण रक्कमेपैकी 6% व्यवसाय फी देण्यास व जर कामाची प्राकलनीय रक्कम 30 लाखापेक्षा जास्त झाली तर एकूण रक्कमेपैकी 5% व्यावसायिक फी पुढील प्रमाणे सुधारित दर दिलेले आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता श्री सुरेश मानकर यांची संगणीकरण करण्याकरिता जे काही कार्य करावे लागतील. त्यासाठी त्यांना आर्किटेक्ट व कन्स्लटंट म्हणून नेमणूका करून कामांच्या 30 लाखापर्यतच्या प्राकलनाच्या एकूण रक्कमेपैकी 6% व्यवसाय फी देण्यास व जर कामाची प्राकलनीय रक्कम 30 लाखापेक्षा जास्त झाली तर एकूण रक्कमेपैकी 5% व्यावसायिक फी देण्यास मंजुरीसराठी स्थायी समिती पुढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १३</u> <u>दिनांकः-१२. ५. २००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. बामणकर नंदिनी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार नमुद केलेल्या मर्यादेत व्यवसाय फी वर श्री. सुरेश मानकर यांना उल्हासनगर महानगरपालिका संगणकीकरण योजने अंतर्गत सिटीजन फॅसेलिटी सेंटर उभारण्यासाठी आर्किटेक्ट / कंन्सल्टंट म्हणून अनुषंगीक अटी व शर्तीवर नेमणेस व संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>
सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

विषय :- घरातील गॅस गळती होऊन मृत्युमुखी पडलेल्या तसेच रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कुटूंबास महापालिके <u>मार्फत अर्थसहाख्य देणे बाबत.</u>

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>या मुदयावर मला बोलायचे आहे, गोषवा-यामध्ये याकामी एक लाख रूपयाची नगरसेवकाने शिफारस केली आहे. त्याकामी प्रशासनाने ५० हजाराची शिफारस केली आहे. ती अतिशय कमी आहे. आणखी दुसरे एखादे प्रकरण समोर आले तर काय करणार? या लोकांचे घरदार उध्दवस्त झाले आहे.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>सचिव साहेब कायदयात अशी काही तरतुद आहे का?
<u>मा. सचिवः-</u>ते आपणास आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत असलेल्या अधिका-यास विचारावे लागेल.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>बजेटमध्ये पुर्ण वर्षासाठी १ लाखाची तरतुद ठेवण्यांत आली आहे.
<u>श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>आपतकालीन परिस्थितीमुळे त्यास समर्थनिय असे अनुदान देता येईल.
<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>किती आहे? एक लाख?

<u>श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>जेव्हा बजेट तयार केला जातो त्यावेळी हे पाहिले जाते की,बजेट (हेड) शिर्षामध्ये मागील ३ वर्षामध्ये

किती रक्कमेची तरतुद ठेवण्यांत आली होती? त्यामधुन किती खर्च झाला? मागील काही वर्षामध्ये या बजेट हेड मधुन काहीच रक्कम खर्च केली नव्हती, मागील वेळी नैसर्गिक आपत्तीच्या वेळी जेव्हा आर्थिक मदत करण्यांत आली होती. मी महापौर निधीतून करण्यात आली होती. नैसर्गीक आपतकालीन मदतीसाठी चे शिर्षात याकामी निधीची तरतुद करण्यांत आली नव्हती. त्यामुळे यावर्षी याशिर्षामध्ये अधिक रक्कमेची तरतुद करण्यांत आलेली नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती. माने किरणः-</u>उपाय योजना करताना अंमलबजावणी होते का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिक म्हणुन मानवतेच्या दृष्टीकोनातुन आपण त्यांना ही मदत करत आहोत.

<u>मा. सदस्या श्रीमती. माने किरणः-</u>नाही तर असे व्हायला नको यापुढे दुसरे कुणाचे असे प्रकरण आले तर आपण त्यास आर्थिक मदत दयाल ना?

धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>याआधी माहिती नव्हती म्हणुन खर्च झाले नव्हते परंतु आता तर माहिती झालेली आहे. म्हणुन अशी मदत दिली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u> ही जी रक्कम त्यांना अदा कराल ती स्थायी समिती समोर अदा केली पाहिजे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>यापूढे अशा काही प्रकरणाचे अर्ज आले तर त्यास ही अशा प्रकारची आर्थिक मदत केली जाईल.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- घरातील गॅस गळती होऊन मृत्युमुखी पडलेल्या तसेच रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कुटूंबास महापालिके <u>मार्फत अर्थसहाय्य देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना</u>

प्रभाग क्र. ३ मधील बॅरेक नंबर ११६ जवळ हनुमान नगर येथे दिनांक १४.३.२००३ रोजी गॅस सिलेंडर मधून वायू गळती होऊन यामध्ये श्री. सिताराम गौड यांचे कुटूंबातील एक मुलगा, एक मुलगी व एक महिला यांचा भाजून मृत्यु झालेला आहे, तसेच कुटूंब प्रमुख श्री. सिताराम गौड व एक मुलगी सद्यस्थितीत मृत्युशी झुंज देत आहे. त्याची आर्थिक परिस्थिती हालाखीची असलेने त्यांच्या कुटुंबास रक्कम रुपये १,००,०००/- मदत मिळावी अशी विनंती सन्माननिय नगरसेवक श्री. दिलीप द. गायकवाड यांनी त्यांचे दिनांक १९.४.२००३च्या पत्रान्वये केलेली आहे.

वरील परिस्थिती विचारात घेता मानवतेच्या भावनेतून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम क्रमांक ६६ (३९)(४२) अन्वये श्री. सिताराम गौड यांना रक्कम रुपये ५०,०००/- एवडी मदत महापालिकेतर्फे देण्यात यावी असे प्रस्तावित आहे. महानगरपालिका २००३-०४ च्या अर्थसंकल्पात लेखाशिर्ष अ. अदांजपत्रक-ई येथे पूर किंवा अन्य आपत्तीच्या वेळी करावा लागणारा खर्च याबाबीसाठी रक्कम रुपये १,००,०००/- एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

वरील सर्व परस्थिती विचारात घेता श्री. सिताराम गौंड यांना रक्कम रुपये ५०,०००/- रुपयाची महापालिकेकडुन मदत देणे कामी मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १४</u>                    <u>दिनांकः-१२.५.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार घरातील गॅस गळती होवून मृत्युमुखी पडलेल्या तसेच रुग्णालयात उपचार घेत असलेल्या कुटुंबास अर्थसहाय्य देणे कामी श्री. सिताराम गौंड यांना रक्कम रुपये ५०,०००/-ची महापालिकेकडुन मदत देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

विषय :- महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे उल्हासनगर शहरा करिता पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल व उपाय योजना तयार करणे कामी मे. यशदा या शासकीय संस्थेस नेमणेकामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे <u>बाबत.</u>

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>त्यांनी हे काम केले आहे का? अनुभव आहे का? पुणे येथील ही संस्था आहे.

<u>मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>शासकीय संस्था आहे, या क्षेत्रातील तज्ञ आहे. पालिका सदस्यांना प्रशिक्षण देण्याचे काम ही तेथे चालते.

<u>मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकलः-</u>खुपच चांगली संस्था आहे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे उल्हासनगर शहरा करिता पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल व उपाय योजना तयार करणे कामी मे. यशदा या शासकीय संस्थेस नेमणेकामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे <u>बाबत.</u>

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त संदर्भाधिन पत्रानुसार उल्हासनगर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे उप-विभागीय अधिकारी कल्याण यांनी उल्हासनगर शहरामधील प्रदुषण नियंत्रणासाठी उपाय योजना करण्याकरिता योजना (Action Plan) पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर करणेकरिता कळविले आहे. या करिता पूणे महानगरपालिकेने या विषयाबाबत तयार केलेला अहवाल उपरोक्त पत्रासोबत जोडला आहे.

महाराष्ट्र प्रदुषण मंडळाच्या उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार कल्याण व पुणे महानगरपालिकेशी संपर्क करण्यात आला होता. त्यांचेकडून मिळालेल्या माहितीनुसार या कामाकरिता मागील वर्षी त्या महानगरपालिकेमध्ये पर्यावरण विषय स्वतंत्र विभाग अस्तित्त्वात नसल्यामुळे खाजगी एजन्सी नेमुन अहवाल तयार करून घेतले असल्याचे समजते.

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये पर्यावरण संबंधात स्वतंत्र विभाग नसल्याने या कामाकरिता पुणे महानगरपालिकेने ज्या पध्दतीने मागील वर्षी वर्ष (२०००-२००१) मध्ये या विषयाचा अहवाल निविदा मागवून एजेन्सी मार्फत मरून घेतला होता त्या पध्दतीने उल्हासनगर महानगरपालिकेमध्येही निविदा प्रक्रिया करून या क्षेत्रामध्ये नामवंत व्यक्तीसंस्था इत्त्यादिकडून अहवाल तयार करून घेणे करिता प्रस्तावित करण्यात आले होते.

घटनेतील कायदा १९९२ (सुधारित क्र. ७४ कलम २३४ परिशिष्ट १२ विषय ८ अन्वये महानगरपालिकांना पर्यावरण संवर्धन तेथील शहरातील वनीकरण तसेच त्यांच्या प्रशासकीय क्षेत्राला पर्यावरणाच्या विविध अंगाच्या अभ्यासाचा पुरस्कार करणे अशी जबाबदारी सोपविलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ 'अ' अन्वये पर्यावरण हा विषय अगदी अग्रभागी मानून मा. महानगरपालिका आयुक्त यांनी पर्यावरण स्थिती अहवाल तयार करून ३१ जूलै, पूर्वी महासभेकडून मान्य करून घेणे बंधनकारक आहे.

पर्यावरण प्रवाहांचे नियंत्रण कर्तव्य क्षेत्र कामाकाजांची पातळी याबाबत माहिती जमा करणे व त्यांचे मुद्रण करून त्यांच्या ५०० प्रती कारणे याकरिता कार्यवाही काढणे करिता दिनांक ३१/१२/२००२ प्राकलन तयार केले होते त्यानुसार एकंदर रूपये ३.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित होता.

उक्त रूपये ३.०० लक्ष खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळून निविदा प्रक्रिया करणेकरिता सादर करण्यात आले होते.

सदर खर्चाकरिता महानगरपालिकेच्या अर्थ संकल्पामध्ये तरतूद ठेवलेली नाही. परंतू अर्थ संकल्पामधील लेखा शिर्ष इ- संकीर्ण (XV) मधील रू. 5.00 लक्ष तरतूदीमधून करण्याकरिता लेखा विभागाकडून याबाबत शिफारस घेऊन प्रस्तावित करण्यात येत आहे.

याबाबत आणखी माहिती मे. स्काय लॅब अनॉलिटीकल लॅबोरेटरी , मे. खानदेश पोल्युशन कंट्रोल व मेमशाल यांचेशी संपर्क करून आधिक माहिती घेण्याकरिता मा. आयुक्तांनी सुचना दिल्याप्रमाणे त्यांचेशी संपर्क करून त्यांना उल्हासनगर महानगरपालिकेस उल्हासनगर शहराचा ''पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल व उपाय योजना'' (Envionmental Status Report & Action Plan) असा अहवाल तयार करणे कामी सविस्तर माहिती व या कामाकरिता येणारा अंदाजित खर्च व इतर अटी शर्ती यांची माहिती पाठविण्यास कळविले होते. त्यानुसार उपरोक्त एजन्सीनी ढोबळ मानाने खालील नमुद केलेल्या त्यांच्या अटी व शर्तीनुसार काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | कामाची कक्षा | दर | अटी व शर्ती |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | मे. खानदेश पोल्युशन कंट्रोल, कल्याण | पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल (E S R) फक्त | 1.75 लक्ष | 60% अग्रीम, 40% अहवाल सादर केल्यानंतर 5% सिव्हील चार्जेस वेगळे |
| 2 | मे. मशाल पुणे | पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल (E S R) फक्त | 2.70 लक्ष | 50% अग्रीम, 30% अंतरिम अहवाल सादर केल्यानंतर 20% अंतीम अहवाल सादर केल्यानंतर अहवाल तीन प्रति मध्ये देणार |
| 3 | यशदा पुणे | पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल उपाय योजना अहवालासह (E S R & Action Plan) | 3.20 लक्ष | 50% अग्रिम, 25% सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर 25% अंतिम अहवाल सादर केल्यानंतर अहवाल 100 प्रतिमध्ये |

महानगरपालिकेस 'पर्यावरण स्थिती दर्शक' अहवाल सोबत ' उपाय योजना अहवाल' (Envirnment Status Report along with Action Plan) तयार करून हवा आहे. उपरोक्त 4 ही एजन्सींना कळविल्यानंतर मे. खानदेश पोल्युशन कंट्रोल, कल्याण व मे. मशाल पुणे यांनी फक्त पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल तयार करण्याकरिता त्यांचे दर दिलेले आहेत.

मे. यशदा पुणे यांचा दर जरी जास्त असला तरी त्यांचेकडून उल्हासनगर महानगरपालिकेस अपेक्षित असलेला पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल व त्याबाबत उपाय योजना अहवाल तयार करून मिळणार असून सदर अहवाल एकंदर 100 प्रतिमध्ये देणार असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच मे. यशदा शासकीय संस्था आहे.

मे. यशदा या शासकीय संस्थेने महानगरपालिकेस आवश्यक असलेल्या पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल उपाययोजना अहवालसह'' 100 प्रति मध्ये सादर करण्यास दर दिलेले असल्याने यशदा पुणे यांना सदर काम त्यांनी दिलेल्या रू. 3,20,000/- या किंमतीने करण्यास देणेकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 चे कलम 2(2) नुसार स्थायी समिती कडून मान्यता मिळून यशदा पुणे यांचेशी या कामाकरिता संविदा करण्यास आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्याकरिता स्थायी समितीची मान्यता मिळण्याकरिता स्थायी समिती कडून निर्णय होणेकरिता सादर करण्यात येत आहे.

*स्थायी समिती ठराव क्र. १५* *दिनांकः-१२. ५. २००३*

*सुचकाचे नाव :- श्री. लिंगे सुर्यकांत*

*अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप*

*ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मेसर्स यशदा या शासकिय संस्थेस उल्हासनगर शहराचे पर्यावरण स्थिती दर्शक व उपाययोजना हा अहवाल १००प्रती मध्ये प्रस्तुत करणेकामी प्रशासनास त्यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदा करण्यास प्राधिकृत करीत आहे.*

*कारण ........*

*१) मेसर्स यशदा पुणे यांचा दर जरी जास्त असला तरी स्विकृती पात्र आहे. कारण ती शासकिय संस्था आहे आणि त्यांच्या अहवालावर विश्वास ठेवता येईल.*

*सुचकाची सही-*

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर ५ येथील वसंत बहार ते बॅरेक नं. १९६९ पर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रिट करणे कामी प्रशासनास मे. डी. एस. कंन्स्ट्रक्शन या लघुत्त्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर ५ येथील वसंत बहार ते बॅरेक नं. १९६९ पर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रिट करणे कामी प्रशासनास मे. डी. एस. कंन्स्ट्रक्शन या लघुत्त्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

| | | |
|---|---|---|
| 1) | कामाचे नांव | उल्हासनगर-५ येथील वसंत बहार ते बॅ नं १९६९ पर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणेबाबत. |
| 2) | प्राकलनाची किंमत | रू. 43,33,990/- |
| 3) | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | शहर अभियंता |
| 4) | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. 486, दि. 20.02.2003 |
| 5 | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | स्थायी समिती ठराव क्र. 128, दि. 31/03/2003 |
| 6 | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. 4, दि. 8/4/2003 |
| 7 | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केली त्याचे नांव | 1. धनुष्यधारी, 2. दुपहर दो बजे |
| 8 | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | 13 |
| 9 | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | 3 |
| 10 | निविदा उघडल्याचा दिनांक | दि. 29/4/2003 |

11 निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता

| अ. क्र. | निविदाधारकाचे नांव | प्राप्त दर |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | मे. डी. एस. कन्स्ट्रक्शन | 4.05 चे वर / जास्तचे |
| 2 | मे. ईगल कन्स्ट्रक्शन | 5.40 चे वर / जास्तचे |
| 3 | मे. माधव कन्स्ट्रक्शन | 6.00 चे वर / जास्तचे. |

| | | |
|---|---|---|
| 12 | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. 30/4/03 रोजी मे. डि एस कन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. वाटाघाटीत सविस्तर चर्चा केल्यानंतर मे डी एस कन्स्ट्रक्शन यांनी पुर्वी भरलेले दर 4.05 टक्के जास्त दरापेक्षा 5.05 टक्के कमी दर दिलेला असून वाटाघाटीनंतर अंतिम दर 1.00 टक्के प्राकलनापेक्षा कमी दर दिलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| 13 | वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर | 1.00 टक्का प्राकलन रक्कमेपेक्षा कमी दर |
| 14 | लेखा शिर्षाचे नांव | सी-4(II) पी-2 रस्ते, प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नविन बांधणे. |
| 15 | लेखा शिर्षाखालील तरतुद | रूपये 5.50 कोटी. |

उक्त दर वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मेसर्स डी. एस. कन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

***स्थायी समिती ठराव क्र. १६ दिनांकः-१२.५.२००३***

*सुचकाचे नाव :-श्री. जेसवानी सतरामदास*

*अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. सिमा मोकल*

*ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ येथिल बसंतबहार ते बॅरेक नं. १९६९ पर्यंत रस्ता सिमेंट कॉंक्रिट करणे कामी प्रशासनास मेसर्स डी. एस. कन्स्ट्रक्शन या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देत आहे.*

*सुचकाची सही-*

*अनुमोदकाची सही-*

***एकमताने***

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर १ येथील चार्ली वेफर्स ते सेंच्युरी मटेरियल गेट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी प्राकलनास <u>प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>

<u>मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-</u>आभारी आहे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर १ येथील चार्ली वेफर्स ते सेंच्युरी मटेरियल गेट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी प्राकलनास <u>प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर-१ येथील चार्ली वेफर्स ते सेंन्चुरी मटेरियल गेट पर्यत रस्ता डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर रस्त्याची रूंदी मंजुर विकास आराखडयानुसार ८० फुट प्रमाणे आहे. सर्वसाधारणपणे पुर्वी सदर रस्त्याची रूंदी ५५ फुट गृहीत धरून प्राकलन तयार केले होते. त्यानुसार सदर प्राकलनाची किंमत रू. १७,४०,२००/- इतकी होत होती. रस्त्याची रूंदी ८० फुट दर्शविल्यानुसार सदर कामाचे प्राकलन तयार करण्याच्या सुचना दिलेल्या होत्त्या त्यानुसार संबंधित कनिष्ठ अभियंता / उप-अभियंता यांनी सदर कामाचे प्राकलन तयार केले असून सदर कामाची प्राकलनीय किंमत रू. २८,२८,९००/- इतकी होत आहे. परंतु मागील वर्षातील म्हणजे सन् २००२-२००३ मधील लेखा शिर्षातील शिल्लक रू. १७,४०,२००/- घेतलेले आहे. उर्वरित रू. १०,८८,७००/- हि रक्कम सन २००३-२००४ मधून खर्च करण्याच प्रस्तावित आहे. संबंधित नगरसेवक श्री दिलीप गायकवाड आणि नगरसेविका श्रीमती सिमा मोकल यांनी सदर रस्ता बनविण्यासाठी स्थायी समिती सभेत मुद्दा उपस्थित केला होता. सदर रस्ता तयार करणेसाठी मा. आयुक्त यांनीही मान्य केले होते.

दिनांक २०/१२/२००२ च्या सभेत सदर रस्त्याचा प्रस्तावावर चर्चा झालेली आहे. सदर उर्वरित रस्तयाचा म्हणजे चार्ली वेफर्स ते सेंचुरी मटेरियल गेट पर्यतचे काम करणेसाठी रू. २८,२८,९००/- इतका खर्च अपेक्षित असून तरतूद उपलब्ध आहे. तरी सदर काम करणेसाठी सदर कामाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरिता स्थायी समिती पुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १७</u> <u>दिनांक:-१२.५.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्रीमती. सिमा मोकल

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. आहूजा निता

हो स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर-१ येथिल चार्ली वेफर्स ते सेंच्युरी मटेरियल गेट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणेकामी रुपये २८ ,२८ ,९००च्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर शहरात पाणी टंचाई असलेल्या विविध ठिकाणी भाडे तत्त्वावर खाजगी टॅकरने पाणी पुरवठा करणे कामी प्रशासनास निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-पाणी टॅकरचा हा जो मुददा आहे, शहरातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी टॅकरने पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु या ज्या दोन Agencies ला काम देत आहात. त्यानुसार मला नाही वाटत की हया दोन Agencies पुर्ण क्षमतेने बरोबर काम करतील म्हणुन? कारण की त्यांच्याकडे किती गाडया आहेत?

म्हणुन हे काम ४ वेगवेगळया Agencies ना वाटप करून दिले पाहिजे. १. मे. श्वेता ट्रान्सपोर्ट २. मे. जयराम वॉटर सप्लायर, ३. मे. गायत्री वॉटर सप्लाय. ४ विजय वॉटर सप्लाय या चारही Agencies ना हे काम वाटप करून दिले पाहिजे. शुल्क कमी वाटते, ४ संस्थाना काम दिले तर टॅकर लवकरात लवकर भरून येवु शकतील टॅकरने पाणी पुरवठयाचा ठराव पारीत केल्यानंतर टॅकर बाबत नगरसेवकांच्या तक्रारी याव्यात हे ठिक नाहीत, टॅकर भरण्यासाठी Spot वाढविले पाहिजेत, आमच्याकडे ४ प्रभाग समित्त्या आहेत त्यांचे क्षेत्रातील काम ४ संस्थाना दिले तर प्रत्येक प्रभाग क्षेत्रातील Agencies ला पाणी पुरवठा करता येईल आणि त्यासाठी नेमलेल्या ठेकेदाराने कसुर केल्यास त्यास जबाबदार धरता येईल कारण काय की, सद्या पालिका सदस्यांना तेथे जावून आपली वेळ घालवून पाण्याच्या टॅकरची मागणी करावी लागते त्यामुळे तेथे नगरसेवकांमध्ये आपआपसात भांडण होण्याची शक्यता निर्माण होते. नगरसेवकांसाठी विशेष पुस्तीका प्रत्त्येक प्रभाग समिती क्षेत्रासाठी ठेकेदाराने उपलब्ध ठेवावी आणि त्यात नगरसेवकांनी नोंदविलेल्या तक्रारींची ठेकेदाराने दखल घ्यावी आणि एकापेक्षा अधिक ठेकेदार नसल्याने कसुरदारास जबाबदार धरता येईल.

मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-टॅकरवर मागच्यावर्षी किती खर्च झाला होता?

श्री. जंवादे (कार्यकारी अभियंता पा.पु. विभाग):-१.१८ कोटी.

मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-१.१८ कोटी, मागच्या वर्षी एवढा जास्त व यावर्षी एवढा कमी का?

श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-यामध्ये महापालिकेचा फायदाच आहे. मागच्या वर्षी टॅकर भाड्याचे दर जास्त होते यावेळी ते कमी आहेत.

मा. सदस्या श्रीमती. सतराम जेसवानी:-टॅंकर ठेकेदाराचा एक माणुस तेथे नेहमी उपस्थित असला पाहिजे. टॅंकर ठेकेदार हे त्यांच्या कार्यालयात बसून असतात. पाणी टॅंकरची आवश्यकता भासल्यावर आम्ही त्यांना कुठे कुठे शोधत राहायचे?

मा. सदस्य श्री. नरेंदकुमार ठाकुर:-मागच्यावेळी हा मुददा चर्चेस आला होता.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-श्री. सतरामदास हे जे बोलत आहेत ते बरोबर आहे. ठेकेदाराचा एक माणूस त्याठिकाणी कायम उपस्थित असला पाहिजे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-तेथे नगरसेवकांसाठी एक सेन्टर असले पाहिजे. नगरसेवकांच्या तक्रारीची तावडतोब दखल घेतली गेली पाहिजे. नगरसेवकांची वेळ अतिशय महत्त्वाची असते.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरात पाणी टंचाई असलेल्या विविध ठिकाणी भाडे तत्त्वावर खाजगी टॅंकरने पाणी पुरवठा करणे कामी प्रशासनास निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहराची भौगोलिक रचना ही उंच सखल अशी आहे उल्हासनगर शहरातील वितरण व्यवस्था ही जूनी असल्याने शहरातील ब-याच भागात असमान व अपु-या दाबाने पाणी पुरवठा होत असतो . त्यामुळे उंच भागावरील जनतेस नेहमी पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते . अशा ठिकाणी महापालिकेतर्फे टॅंकरने पाणी पुरवठा

करणे कमप्राप्त ठरते . त्यामुळे पर्यायी व तात्पुरती उपाययोजना म्हणुन वित्तीय वर्ष २००३-२००४ मध्ये टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करणेसाठी निविदा मागविणेत आल्या असुन, निविदा स्विकृतीची प्रकिया चालु आहे . प्राप्त झालेल्या निविदेपैकी मे जयराम वॉटर सप्लायर्स यांचा न्युनतम दर ३३ ३ टक्के अंदाजित रकमेपेक्षा जास्त असा होता . दर कमी करुन घ्यावा या हेतुने आयुक्त यांनी न्युनतम दर असलेले ठेकेदार मे . जयराम वॉटर सप्लायर यांना वाटाघाटीसाठी बोलाविले . वाटाघाटी अंती मे जयराम वॉटर सप्लायर्स यांनी ३३ ३ टक्के जादा हा दर कमी करुन २३ ४ टक्के अंदाजित किमतीपेक्षा जादा दराने काम करणेची तयारी दर्शविली . मागील वर्षाच्या तुलनेत मे जयराम वॉटर सप्लायर कमी केलेला दर जास्त होता . सबब, या जाहिर निविदेतील दुसरे न्युनतम ठेकेदार मे . श्वेता ट्रान्सपोर्ट यांनी सुध्दा २३ ५ टक्के जास्त दराने काम करणेची तयारी दर्शविली . हा दर सुध्दा मागील वर्षाच्या दरापेक्षा जास्त होता . अशा परिस्थितीत फेरनिविदा मागविणेचा विचार होणे कमप्राप्त आहे .

परंतु शहरातील ज्या भागांना नळाद्वारे पाणी मिळत नाही अशा भागातील टॅंकरसेवा खंडित करणे शक्य नाही . यास्तव सध्या प्राप्त असलेल्या निविदा पुन्हा वाटाघाटी करुन स्विकारणे विचाराधीन होते या दरम्यान उल्हासनगर येथील टॅंकर ठेकेदार मे विजय वॉटर सप्लायर व गायत्री वॉटर सप्लायर यांनी रु १७७ प्रतिखेप दराने टॅंकर पुरविण्याविषयी दि १०/४/०३ रोजी लेखी पत्र दिले . यानंतर निविदा प्रकियेतील मे जयराम वॉटर सप्लायर या ठेकेदाराने रु १७५ प्रतिखेप दराने टॅंकर पुरविण्याबाबत पत्र दिले . तदनंतर मे विजय वॉटर सप्लायर व गायत्री वॉटर सप्लायर या ठेकेदारांनी दि ३०/४/०३ रोजी रु १७० प्रतिखेप या दराने टॅंकर पुरविण्याविषयी पत्र दिले . याचाच आधार घेवुन निविदा प्रकियेतील तीन स्पर्धक १) मे श्वेता ट्रान्सपोर्ट, २) मे एस टी तिवारी, ३) मे जयराम वॉटर सप्लायर यांनी सुध्दा रु १७० प्रतिखेप या दराने टॅंकर पुरवठा करण्यास तयार

असल्याबाबत लेखी कळविले आहे . मागील वर्षाचे तुलनेत रु १७० हा दर कमी असल्याने महापालिकेस आर्थिक दृष्टया फायदेशीर आहे . निविदेतील अट क्र १० नुसार लघुत्तम निविदा धारक न्युनतम दरात काम करण्यास तयार असेल तर दोन्ही निविदाधारकांमध्ये काम विभागुन देण्याची तरतुद आहे . त्यानुसार १) मे श्वेता ट्रान्सपोर्ट, २) मे एस टी तिवारी, ३) मे जयराम वॉटर सप्लायर यांना रु १७० प्रतिखेप या दराने टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे काम विभागुन देणेची शिफारस करण्यात येत आहे . तसेच मे विजय वॉटर सप्लायर व मे गायत्री वॉटर सप्लायर या ठेकेदारांनी निविदा भरलेली नसल्यामुळे त्यांची शिफारस करणे शक्य नाही .

सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराची मुदत दि ३०/४/०३ रोजी संपुष्टात आलेली आहे . टंचाईग्रस्त भागात टँकरने पाणी पुरवठा करणे आवश्यक असल्याने सदर
ठेक्यास दि ३१/७/२००३ पर्यंत अथवा नवीन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे .

सबब, प्रस्तावास मा . स्थायी समितीची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी सादर करण्यात येत आहे .

स्थायी समिती ठराव क्र. १८ दिनांकः-१२ . ५ . २००३

सुचकाचे नाव :- श्री. तलरेजा विनोद

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर शहरात पाणी टंचाईग्रस्त भागात टँकरने पाणी पुरवठा करणे कामी प्रशासनास मेसर्स श्वेता ट्रान्सपोर्ट, मेसर्स जयराम वॉटर सप्लाय यांच्याशी वाटाघाटी अंती रुपये १७० प्रती खेप या दराने संविदा करण्यास मान्यता देत आहे. आणि मेसर्स गायत्री वॉटर सप्लायर व मेसर्स विजय वॉटर सप्लायर्स तसेच नविन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत सद्या कार्यरत असलेल्या ठेकेदारास मुदतवाढ देणेकामी प्रशासनास त्याच्याशी त्या कालावधीसाठी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-प्रशासनाच्या वतीने आयत्यावेळच्या विषयान्वये एक प्रस्ताव आणु इच्छित आहे. आपली संमती असेल तर तो प्रस्ताव चर्चेस घ्यावा. तो प्रस्ताव आहे. सपना उद्यान येथे पाणपोई उभारणेस परवानगी देणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-प्रशासनाच्या वतीने आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करून तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

## आयत्त्यावेळचा विषय

विषय :- गोविंदराम धर्मराज आहूजा यांचे नावे सपना उद्यानमध्ये पानपोई उभारण्यास जागा देण्यास परवानगी देणे बाबत.

प्रस्तावना

महापालिकेच्या सपना उद्यानामध्ये श्री. गोविंदराम धर्मराज आहूजा यांचे नावे पानपोई उभारण्यासाठी श्री. आर.जी. आहूजा, उल्हासनगर-३ यांनी दिनांक २८.१२. २००३ रोजी अर्ज दाखल केला आहे. पाणपोई उभारणीसाठी १५x १५ जागा उपलब्ध होवून परवानगी मागितली होती.

सदरच्या उद्यानात पाणपोई उभारणेसाठी खालील अटी व शर्ती प्रस्तावित आहेत.

१) बांधकाम १५x १५ जागेत नकाशात दर्शविलेल्या ठिकाणी करणेचे आहे. बांधकामाचा संपुर्ण खर्च श्री. आहूजा यांनी करणेचा असुन बांधकामाचा दर्जा उत्तम प्रतीचा ठेवणेचा आहे. बांधकामांमुळे अपघात होणार नाही. याची दक्षता आहूजा यांनी घेणेची आहे.

२) बांधकाम शहर अभियंता यांचे समाधानकारकरित्त्या करणेचे आहे.

३) पाणपोईचवे देखभाल दुरुस्ती व सुस्थितीत ठेवण्याची सर्व जबाबदारी आहूजा यांची राहिल.

४) पाणपोईचे बांधकाम झालेस बांधकामासह महापालिकेकडे सुपूर्त करणेची आहे. जागा व पाणपोई याची मालकी महापालिकेची राहिल. त्यावर हक्क सांगणेचा अधिकार आहूजा यांना राहणार नाही.

५) कै. गोविंदराम धर्मदास आहूजा यांचे स्मरणार्थ आर.जी.आहूजा यांनी पाणपोई उपलब्ध करुन दिली अशा आशयाचा फलक आहूजा प्रदर्शित करु शकतील.

६) सर्व जाती धर्माच्या लोकांसाठी पाणपोई मुक्त राहील.

७) पाणपोईतील पाणी मोफत देणेचे आहे. कोणतीही फी आकारणेची नाही. पिण्यास योग्य पाणी पुरविण्याची जबाबदारी आहूजा यांची राहिल.

८) मा. आयुक्त वेळोवेळी ज्या अटी व शर्ती निर्देश करतील त्याप्रमाणे कार्यवाही करणेची आहे.

९) वरीलप्रमाणे करारपत्र करुन देणेची जबाबदारी आहूजा यांची राहिल.

सदर पाणपोई उभारणीसाठी अटी व शर्तीस मान्यता देणेस मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे स्थायी समितीची मान्यता मिळणेसाठी सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १९ दिनांक:-१२.५.२००३

सुचकाचे नाव :- श्री. ठाकुर नरेंद्रकुमार

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. सिमा मोकल

ही स्थायी समिती वरीलप्रस्तावनेनुसार श्री. राजु आहूजा यांना महापालिकेच्या सपना उद्यानामध्ये १५x १५च्या जागेवर श्री. गोविंदराम धर्मराज आहूजा यांचे नावे

वरील अटी व शर्तींवर पाणपोई उभारणेकामी एका वर्षाच्या कालावधीसाठी जागा वापर परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधान कारकतेस अधिन राहून सदरचा परवाना एका वर्षापेक्षा अधिक नसेल एवढया कालावधीसाठी वेळावेळी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-१० कामगारांवर एक सुपरवायझर नेमण्याचा प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस घ्यावा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-आयत्त्यावेळचा विषय केवळ मा. आयुक्त साहेबांकडूनच प्रस्तुत करता येईल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-तर मग प्रशासनाकडून तसा प्रस्ताव दया.

श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-मी तो विषय स्वअधिकाराने आणू शकत नाही. कारण मला त्याबाबत आयुक्त साहेबांना विचारावे लागेल त्यानंतरच पूढील कार्यवाही होईल.

सायंकाळी ५. २० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दि:-७.६.२००३.

इतिवृत्त

### दि. ७.६.२००३ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक ७.६.२००३ रोजी सांयकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शाविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्त्या.

१. मा. सभापती :- श्रीमती. ज्योती कालानी.

२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. उमाप रामदास
४. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
५. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
६. श्रीमती छाब्रिया भारती
७. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
८. श्री. जेसवानी सतरामदास
९. श्रीमती मोकल सिमा
१० श्री. पंजाबी नारायण
११ श्रीमती बामणकर नंदिनी
१२ श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
१३ श्री. ईश्वर पमनानी
१४ श्री. पृथ्वी वलेचा
१५ श्रीमती सुर्वे जयश्री

तर

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी हे सभेस अनुपस्थितीत होते.

सांयकाळी ४. ४५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- सभा सुरु होण्यापूर्वी नवीन उपायुक्त श्री. उत्तम लोणारे यांची ओळख करुन देतो.

मा. उपायुक्त (श्री. लोणारे):- यापुर्वी अवर सचिव म्हणुन गृहविभागात कार्यरत होतो. मी २० वर्षे सेवा केली विविध सरकारी खात्त्यामध्ये काम केले, आता इथे उपायुक्त म्हणून रुजु झालो.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:- राहणार कुठे? मा. सदस्य तुमचे स्वागत करतात व तुम्हाला शुभकामना देतात तुम्ही शहराला चांगली सेवा द्या.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय क्र.१ :-मागील सभेचे दि. १२.५.२००३ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- सदरचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २:-उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी भाडेतत्त्वावर वाहने पुरविणेकामी मे. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी यांच्याशी प्रशासनास संविदा करणेस मान्यता देणे बाबत.

मा. सदस्या श्रीमती किरण माने :- निविदा मागविल्या होत्त्या का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):- निविदेप्रमाणे आलेले आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. २:- उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी भाडेतत्त्वावर वाहने पुरविणेकामी मे. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी यांच्याशी प्रशासनास संविदा करणेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी भाडेतत्त्वावर कंत्राट पध्दतीने वाहन पूरविणेबाबत विविध वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना देवून मोहोरबंद निविदा मागविणेस आलेल्या होत्त्या.

मे. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी, डोंबिवली (पू)यांचे एकमात्र पात्र निविदेमधील दर हे पूर्वीचे निविदा दरापेक्षा जास्त असल्या कारणाने वाटाघाटीसाठी मे. अनमोल ट्रान्सपोर्ट यांना बालवण्याचे निश्चित करणेत आले त्याच प्रमाणे निविदा स्विकारणेची प्रक्रिया प्रलंबित असल्या कारणाने जून्या दराने ठेकेदारास मुदतवाढ देणे आवश्यक होते.

मा. स्थायी समिती ठराव क्र.१३० दि. ३१.३.२००३ चे ठरावानुसार मे. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी यांना भाडे तत्त्वावर महापालिकेस वाहन पूरविणे कामी दि. १.४.२००३ पासून जून्याच दराने एक महिना मुदतवाढ देवून नवीन दराबाबत वाटाघाटी करणेसाठी कार्यालयीन पत्र क्र. उमपा/वाहन/ /७ दि. १६.४.२००३ अन्वये ठेकेदारास वाटाघाटीसाठी दि. २९.४.२००३ दुपारी २.०० वाजता आयुक्त कार्यालयामध्ये बोलविणेत आले होते.

मे. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी यांचेकडील दि. २९.४.२००३ पत्रानुसार सन २००३-२००४ या वित्तिय वर्षामध्ये, वाटाघाटी व चर्चेअंती एकूण रू. ५७१/- या सुधारीत दराने वाहन पूरविणेबाबत देकार दिलेला आहे.

सन २००३-२००४ या वित्तिय वर्षामध्ये मे. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी यांचे ५७१/- प्रति वाहन या सुधारीत दराने महापालिकेस भाडेतत्त्वावर वाहन उपलब्ध करून देणेबाबत मा. स्थायी समितीच्या अंतिम निर्णय घेणेबाबत प्रस्तावित.

दि. ३०.४.२००३पूर्वी अंतिम निर्णय प्रलंबित असल्या कारणाने मे. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी यांना ३१ मे २००३ पर्यंत अथवा निविदा बाबत निर्णय घेणेपर्यंत, जो कालावधी आधी येईल तो पर्यंत, जून्याच दराने चालू शर्ती व अटीच्या अधिन राहून मा. स्थायी समितीपुढे प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. २० दिनांक:-७.६.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. सीमा मोकल.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी मे. अनमोल ट्रान्सपोर्ट कंपनी या निविदाकाराशी

वाटाघाटीअंती रू. ५७१/- प्रति वाहन या दराने भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे कामी प्रशासनास संविदा करणेस मान्यता देत आहे.

तसेच दि. १ मे. २००३ पासून नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत या कालावधीसाठी प्रशासनास सध्या कार्यरत असलेले ठेकेदाराशी पूर्वीच्या निविदेतील अटी व शर्तीवर वाहन पुरविणेकामी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:- हे पूर्ण शहराच्या हितासाठी आहे. मेन रोड साठी चांगली सुविधा झाली आहे, रहदारी नसते, आमचे म्हणणे आहे की, १ करोड करा, गल्ली बोळीतले छोटे-छोटे रस्ते पण झाले पाहिजे यामुळे रहदारीची चांगली सोय झाली. स्मुथली काम चालु आहे. खुप चांगले काम आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :- अमन टॉकिज येथिल रोड दयनीय स्थितीत आहे. शहर अभियंता यांना सांगितले तरी अजून हालत खराब आहे.

मा. सदस्य नरेंद्रकुमार ठाकुरः- माझ्या प्रभागात देखील साईड लाईन चे काम झाले नाही. शहर अभियंता यांना सांगितले होते.

मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल :- पावसाळयाआधी व्हायला पाहिजे.

मा.सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:- पावसाळयापूर्वी व पावसाळयानंतर करतात.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-भाभी म्हणत आहेत, ५० लाखाचे काम आता , ५० लाखाचे नंतर ऑक्टोंबर मध्ये करतील.

मा. सदस्या श्रीमती किरण माने:-बॅरेक नं. १३१७ ते १३२२ , वार्ड नं. १५ ,महाराष्ट्र बॅक युथ सर्कल ते रतनचक्की.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :- कोर्टाच्या बाहेर अमन टॉकिज येथे देखील हालत खराब आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-लिंक रोड येथे देखील सांगितले प्रभाग अधिकारी आले नाही.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः- दिसत नाहीत ते कुठे ? आम्ही त्यांना भेटायला जातो तेव्हा सुध्दा ते नसतात.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:- स्थायी समितीमध्ये त्यांनी आले पाहिजे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):- इथे ३ उपायुक्त आहे, मी स्वतः आहे उत्तर द्यायला.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :- आयुक्त साहेब, पावसाळयात अति आवश्यक म्हणुन सर्व डि.एम.सी.ना मोबाईल दया, ३ , ६ महिने तरी.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-आधी या विषयावर चर्चा करू.

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकल:-मुरबाड येथे जाणा-या मेन रोड वर केबल टाकणेसाठी खोदकाम केले आहे ते खड्डे त्वरीत बंद करावेत.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेस्वानी:-१९९७ पासुन काही रोड नादुरूस्त अवस्थेत आहेत तेथे स्कुटर सुध्दा जावू शकत नाही. एम.जे.पी. वाल्यांनी खड्डा खोदुन सत्यानाश केला आहे. १९९७ पासुन दशहरा मैदान जवळचा सत्यानाश केला आहे. तो रोड दुरूस्त होणे अतिआवश्यक आहे. शहर अभियंतांनी देखील तो रोड पाहिला आहे. वारंवार त्यांना विनंती करून देखिल त्यांनी ना खड्डे भरले ना नवीन रोड केला. कृपया असे रोड लवकरात लवकर बनविण्याचा प्रस्ताव पास करावा.

मा. सदस्य श्री. सीमा मोकल:-सेच्युरी रेयॉन पासून धोबीघाट, (सेंच्युरी रेयॉन, किर्ती पथ सेंच्युरी ते चार्ली वेफर्स) येथील रस्ता खोदलेला आहे. या रस्त्याचे दुरूस्तीचे काम लवकरात लवकर करण्यात यावे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-सेंच्युरी येथील तो रस्ता पी.डब्लु.डी. विभागाकडे आहे त्या रस्त्याचे काम पावसाळया आधी होईल.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-साहेब, इंटरनल रोडचे खड्डे भरण्याचे काम करायला सांगा ट्राफीक जाम होते. भारतमाता फॅक्टरीचा रस्ता खेमाणी कडुन जातो. औदयोगिक परीसर आहे. सुपर इंडस्ट्रीज येथे मोठे खड्डे आहेत त्वरीत बंद करायला सांगा. वाहने जावू शकत नाही.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-औदयोगिक परिसर या शहराचा जीव आहे. यांच्याकडून जकात उत्पन्न भरपुर मिळते त्यांना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा विषय सर्वानुमते पुढील प्रमाणे संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. ३:- उल्हासनगर कॅम्प १ ते ५ मधील रस्त्यात पडलेले खड्डे पावसाळयापूर्वी, पावसाळयात व पावसाळयानंतर भरणे कामी, मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन या निविदाकाराशी वाटाघाटीअंती न्युनत्तम दराने प्रशासनास त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव | उल्हासनगर कॅम्प १ ते ५ मधील रस्त्यात पडलेले खड्डे पावसाळयापुर्वी, पावसाळयात व पावसाळयानंतर भरणेबाबत. |
| २. | प्राकलनाची किंमत | रू. ४९ ,९० ,०००/- |
| ३. | तांत्रिक मंजुरी देणा-या | शहर अभियंता |

| | | |
|---|---|---|
| | अधिका-याचे पदनाम | |
| ४. | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक | वार्षिक निविदेप्रमाणे |
| ५. | प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक | वार्षिक निविदेप्रमाणे |
| ६. | निविदा सूचना क्रमांक व दिनांक | क्र.९ दि. ३०.४.२००३ |
| ७. | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केली त्याचे नाव | १. धनुष्यधारी २. नवभारत |
| ८. | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | ७ |
| ९. | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ५ |
| १०. | निविदा उघडल्याचा दिनांक | दि.१२.५.२००३ |
| ११. | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | प्राप्त दर |
| १ | मे. जय भारत कन्स्ट्रक्शन | ९.९० चे वर / जास्तचे |
| २ | मे. जयहिंद इन्फ्रास्ट्रक्चर | १०.५० चे वर /जास्तचे |
| ३ | मे. माधव कन्स्ट्रक्शन | ११.०० चे वर /जास्तचे. |
| | मे. एम सी चंदनानी कन्स्ट्रक्शन | २१ .२५ चे वर / जास्तचे |
| | मे. श्री. क्रिष्णा कन्स्ट्रक्शन | ३०.०० चे वर / जास्तचे |
| १२ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. १३. ४. २००३ रोजी मे. जयभारत कन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. वाटाघाटीत सविस्तर चर्चा केल्यानंतर मे जयभारत कन्स्ट्रक्शन यांनी पुर्वी भरलेले दर ९.९० टक्के जास्त दरापेक्षा ११.९० टक्के कमी दर दिलेला असून वाटाघाटीनंतर अंतिम दर २. ०० टक्के प्राकलनापेक्षा कमी दर दिलेले होते. परंतु हा दर सुध्दा वाजवी न वाटल्यामुळे मे जयभारत कन्स्ट्रक्शन व अन्य चार १. मे. जयहिंद इन्फ्रास्ट्रक्चर २. मे. माधव कन्स्ट्रक्शन ३. मे. एम.सी. चंदनानी कन्स्ट्रक्शन ४. मे. श्री. क्रिष्णा कन्स्ट्रक्शन यांना पत्र क्र. उमपा/साबां/काअ/३४ व ३५ दिनांक १३.५.२००३ नुसार वाटाघाटीकरिता त्यांना दर मोहरबंद लखोटयामध्ये भरून दिनांक १४.५.२००३ रोजी दुपारी १. ०० वाजता सादर करणेसाठी कळविले होते. पाच निविदाकारांपैकी ३ निविदाकारांनी आपले दर सीलबंद लखोटयामध्ये भरून सादर केले. सदर मोहरबंद लखोटे उघडले असतांना त्यांचे दर खालील प्रमाणे आलेले आहे. |
| १. | मे. जय भारत कन्स्ट्रक्शन | प्राकलनीय किंमतीपेक्षा २.५० टक्के कमी |
| २ | मे. जयहिंद इन्फ्रास्ट्रक्चर | निविदा दरावर (At per) |
| ३ | मे. माधव कन्स्ट्रक्चर | आले नाही |
| ४ | मे.एम सी चंदनानी कन्स्ट्रक्शन | १८.२५ जास्त (Above) |
| ५ | मे. श्री. क्रिष्णा कन्स्ट्रक्शन | आले नाही |
| १३ | वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर | २.५० टक्का प्राकलन रक्कमेपेक्षा कमी दर |
| १४ | लेखा शिर्षाचे नांव | सी-५(1) पी-२ रस्ते इत्त्यादी सुधारणे व नविन बांधणे |
| १५ | लेखा शिर्षाखालील तरतुद | रूपये १, ०० कोटी |

उक्त दर वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकांसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारशीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मेसर्स जयभारत कन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. २१ दिनांकः-७ ६ २००३.

सुचकाचे नाव :- श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-१ ते ५ मधील रस्त्यात पडलेले खड्डे पावसाळयापुर्वी, पावसाळयात व पावसाळयानंतर भरणेकामी प्रशासनास मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन या निविदाकाराशी वाटाघाटी अंती सुचविलेल्या लघुत्तम दराने संविदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

विषय क्र. ४:- उल्हासनगर ५ येथील प्र. क्र. १३ मध्ये प्रेमनगर टेकडी ते वॉटर टॅक महात्त्माफुले मार्गे रस्त्याचे विकास कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-मध्येच हा रोड कसा आणला?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-डिफर करा.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-रिजेक्ट करा.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेस्वानीः-रोड शेकडो पास करून घ्या जे जास्त खराब आहे ते आधी करा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-हा रोड यासाठी आणला महापालिकेचे ई.एस.आर तिकडे आहे रोड मंजुर झाला पाहिजे. डी.पी. मध्ये नाही तरी जलकुंभाचे वितरण व्यवस्था ठिक व्हावी म्हणुन रोड अर्जंट घेतला. मला वाटले ते जरूरी आहे.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-जर त्या रोडचा वापर होणार असेल डी.पी. मध्ये नाही परंतु जनतेच्या हिताचे असेल तर तो पास झाला पाहिजे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेस्वानी:-असाचा ई.एस.आर. दशहरा मैदान इथे आहे. १९८९पासून एम.जे.पी.ची लाईन टाकल्याने रस्ता खराब झाला आहे. वाहने तिथुन जावू शकत नाही. शहर अभियंताकडुन रिपोर्ट मागा. तिथले रोड जरूरी नाही का? त्यांनी स्वत: पहाणी केली आहे.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-मी तुमच्याबरोबर आलो होतो ना.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेस्वानी:-तुम्ही आयुक्तांना सांगा ना मी का बोलु? तुम्ही भाभींना सांगा रोडची काय अवस्था आहे. आम्ही शहराचा विकास करू इच्छितो.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-रोड पास करू या. जनतेच्या सुविधेसाठी, वापरासाठी आहे. चांगले काम आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- नाही. सिस्टेमेटीकली सिरीयलवाईज क्रमाने रोड झाले पाहिजे. हा विषय रदद करू या, सदरचा प्रस्ताव सर्वानुमते अमान्य करण्यांत येत आहे.

विषय क्र. ४:- उल्हासनगर ५ येथील प्र. क्र. १३ मध्ये प्रेमनगर टेकडी ते वॉटर टॅक महात्त्माफुले मार्गे रस्त्त्याचे विकास कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये रस्ते सुधारणा करणे सन २००३-२००३ मधील लेखा शिर्षामधुन स्थायी समितीने एकंदर १६ रस्त्त्यांच्या कामाकरिता तरतूद ठेवलेली होती. या महासभेने त्यामध्ये आणखी ४ कामे अंतर्भुत करण्यात आली. त्यापैकी प्रभाग क्र. १३ मधील प्रेमनगर टेकडी ते वॉटर टॅक महात्त्मा फुलेनगर मार्गे रस्त्त्याचे विकास करणे हे काम अंतर्भुत आहे. नविन रस्ता सिरू चौक ते गुरूव्दारा या कामाची किंमत रू. ५५,७६,८७०/- आणि बसंत बहार ते बॅ. नं. १९६९ पर्यंतचा रस्याचा विकासाच्या कामाची किंमत ४३,३३,९८९/- इतकी आहे. या दोन्ही कामांची एकूण ९९,१०,८५९/- इतकी किंमत होत आहे. त्यासाठी कामाच्या निविदा कार्यवाही सुरू आहे.

आता मा. नगरसेवक श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी त्यांच्या दिनांक ६.३.२००३ च्या पत्रानुसार सदर कामाची कार्यवाही करण्याकरिता विनंती केलेली आहे. त्यानुसार संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी पाहणी केलेली असून सदर ठिकाणी १५ ते २० रूंदीचा रस्ता आस्तित्त्वात आहे. सदर रस्ता डी.पी. प्लॅन मध्ये नाही. तरी सदर रस्त्त्यांच्या दोन्ही बाजुने नाली बनवून वाहतुकीसाठी २५ फुटाचा रस्ता बनविणे गरजेचे आहे. तसेच मा. आयुक्त यांचे दिनांक ८.५.२००३ च्या शे-यानुसार प्राकलन तयार करणेसाठी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर कामाचे प्राकलन तयार केले असून सदर प्राकलनाची किंमत रू. १४,००,०००/- इतकी होत आहे. तरी सदर कामास महासभेने तरतुद उपलब्ध करून दिल्याप्रमाणे महानगरपालिका अंदाजपत्रकातील लेखा शिर्ष c-4(ii)p-11 निधीतुन करण्याकरिता सदर कामाच्या रू. १४,००,०००/- खर्चाचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यासाठी सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २२ दिनांक:-७.६.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. सुर्यकांत लिंगे.
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. किरण माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र. १३ मध्ये प्रेमनगर टेकडी ते वॉटर टॅंक महात्मा फुले नगर मार्गे रस्त्याच्या विकासकामी रू. १४ लाख खर्चाचे प्राकलनास प्रशासकीय वित्तिय मान्यता देत नाही.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

विषय क्र. ५ :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ५ :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-४ येथील गडवी यांचे घरापासून ते पवार चाळ पर्यत जिजामाता कॉलनी मार्गे नाला दुरूस्ती करणेबाबत.(महापालिका निधि ३१८) | ९९,०००/- | २४.४.०३ | मे. भोलेनाथ म. का.सोसा. |
| २ | उल्हासनगर-४ येथील ज्ञानेश्वर अपार्टमेंट जवळ प्रभाग क्र. १८ येथे बगीचा / कारंजा विकास करणे. (प्रभाग समिती निधी ३४२) | १,००,०००/- | २५.४.०३ | मे. हरे रामा म. का. सोसा. |
| ३ | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. २४ मध्ये बॅ नं ९०२, ९०३ समोर बगीच्याचा विकास करणे. (प्रभाग समिती निधी ३४६) | १,९९,९५०/- | २५.४.०३ | मे सुर्य ज्योत म. का. सोसा. |
| ४ | उल्हासनगर-१ येथील तानाजी नगर | १,९९,७१०/- | २५.४.०३ | मे गुरूदेव म. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्र. क्र. ३ मध्ये येवले यांचे घराजवळ, मकासरे सदानंद शेट्टी, गणेश निवास ते डॉ रधारी यांच्या घराजवळ सी सी एम-२५० ने रस्ता व नाली बांधणे.(नगरसेवक निधी ३७९) | | | का.सोसा. |
| ५ | उल्हासनगर-४ येथील प्र. क्र. ९ मध्ये हनुमान मंदिर, कुर्ला कॅम्प येथे नाला दुरूस्ती करून त्यावर स्लॅब टाकणे (नगरसेवक निधी ३९३) | २,००,०००/- | २५.४.०३ | मे गुरूदेव म. का.सोसा. |
| ६ | उल्हासनगर-२ येथील प्र क्र २२ मध्ये रस्ता एम-२५० नें जयश्री क्रिष्णा मार्केट बॅ नं ५२१, ५५४ जवळ चेकर्ड टाईल्स लावणे (नगरसेवक निधी ४१४) | १,९९,९००/- | २५.४.०३ | मे. सुर्यज्योत म. का सोसा. |
| ७ | उल्हासनगर-३ येथील प्र क्र २३ मध्ये प्रेमदास यांचे घराजवळ ते बॅ नं ६८४ आणि बारकू जाधव यांचे घर ते आनंद यांचे घर आणि लवाना कुशनासिंग ते योगिंदर यांचे घर पर्यत सी सी पायवाटा आणि नाली बांधणे. (स्थायी समिती निधी ४२०) | १,७८,५००/- | २५.४.०३ | मे गुरूदेव म. का.सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २३</u> <u>दिनांकः-७.६.२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वरील ७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ६ वाचून दाखवितात.

विषय क्र. ६:-उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याकरिता पाईप पुरविणेकामी मे. तन्वी कार्पोरेशन व मे. दिशा इन्टरप्रायझेस या न्यूनत्तम दराच्या निविदाकाराशी प्रशासनास संविदेस मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>आम्हाला याबाबत तांत्रिक माहिती नाही. दर जास्त आहे हे श्री. जवांदे कार्यकारी अभियंता उपस्थित नाही म्हणुन हा विषय पुढे ढकला. पुढील सभेत घ्या.

मा. सदस्य श्री. ईश्वर पमनानी सायंकाळी ५. १० वाजता सभागृहात उपस्थित झाले.

<u>मा. सदस्या श्रीमती. किरण माने:-</u>पुढील सभेत घ्या.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u> सदरचा विषय सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय क्र. ६:-उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याकरिता पाईप पुरविणेकामी मे. तन्वी कार्पोरेशन व मे. दिशा इन्टरप्रायझेस या न्यूनत्तम दराच्या निविदाकाराशी प्रशासनास संविदेस मान्यता देणे बाबत.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

विषय क्र. ७:- उल्हासनगर ५ येथील बॅरेक नं. १८२४ व १८३२ जवळील महानगरपालिकेच्या शौचालयास विनियोग करणेकामी मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>शौचालय बांधुन दयायचे की तोडायचे?

<u>मा. सदस्या श्रीमती. किरण माने:-</u>चुकीचे आहे. नविन बांधुन दयायला पाहिजे की तोडायचे. बांधण्याचा प्रस्ताव आला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>विरोध आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती. किरण माने :-</u>तोडु नये.

<u>मा. सदस्या श्रीमती. बामणकर नंदिनी:-</u>नविन बांधा तोडु नका.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेस्वानी:-</u>पुज्य पंचायत शॉपकिपर असोसिएशनचा मी उपाध्यक्ष आहे. बरेच दुकानदार आणि तिथले लोक शौचालयाचा वापर करतात ते जर तोडले गेले तर ते लोक सुविधेपासुन वंचित होतील.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः- पूज्य पंचायत शॉपकिपर असोसिएशन व इतर शहरवासियांकडुन हरकती आल्या आहेत. शौचालय तोडण्यास आपत्ती घेतली आहे म्हणुन सदरचा प्रस्ताव सर्वानुमते अमान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. ७:- उल्हासनगर ५ येथील बॅरेक नं. १८२४ व १८३२ जवळील महानगरपालिकेच्या शौचालयास विनियोग करणेकामी मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

श्री. मोहन साधवानी व अन्य व्यापारी यांचेकडून बॅरेक नं. १८२४ व १८३२ जवळील शौचालय व मुतारी तोडणेबाबतची मागणी प्रशासनाकडे प्राप्त झाल्याने कॅम्प नं. ५ मधील संबंधीत स्वच्छता निरिक्षक व प्रमुख स्वच्छता निरिक्षक यांनी पंचनामा करून सदर शौचालय व मुतारी नादुरूस्त असल्याने तोडणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदरचे शौचालय व मुतारी ही नादुरूस्त असून वापरात नाही. त्तथापी सदर वास्तुंमुळे आजूबाजुच्या व्यापा-यांना दुर्गंधीचा त्रास होत असून सदर त्रास बंद करणेसाठी प्रस्तावित शौचालय व मुतारी निष्कासित करणे प्रस्तावित आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनीयोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. सबब सदर शौचालय व मुतारी निष्कासित करून सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनीयोग करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता देणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. २४ दिनांकः-७.६.२००३.

सुचकाचे नाव :- श्री. पमनानी ईश्वर

अनुमोदकाचे नाव :- श्री. उमाप रामदास.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ येथील बॅ. क्र. १८२४ व १८३२ जवळील महापालिकेच्या नादुरूस्त नावापर शौचालयास निष्काषित / विल्हेवाट करणेकामी मान्यता देत नाही.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ८ वाचून दाखवितात.

विषय क्र. ८:- अग्निशमन विभाग क्र. २ नेताजी चौक येथील अग्निशमन स्थानकाचे दुरूस्ती करणेकामी श्री. बुलचंद सोनेसर यांची स्थापत्य तज्ञ म्हणून

नेमणुकीस मान्यता देणे बाबत.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-पास.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ८:- अग्निशमन विभाग क्र. २ नेताजी चौक येथील अग्निशमन स्थानकाचे दुरूस्ती करणेकामी श्री. बुलचंद सोनेसर यांची स्थापत्त्य तज्ञ म्हणून नेमणुकीस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर ५ येथील नेताजी चौक जवळील अग्निशमन केंद्रामध्ये काही दुरूस्त्या असल्याने सदर अग्निशमन केंद्र उल्हासनगर-४ येथील व्ही.टी.सी. संकूल येथे स्थलांतरीत केलेले आहे. सदर दुरूस्त्या जसे की, वॉटरप्रुफींग, सिमेंट प्लास्टर, आर.सी.सी. मजबुती करणे, छतावरील टाकी दुरूस्त करणे, तळघर टाकी दुरूस्ती करणे, आवश्यक आहे.

त्याकरिता वास्तुविशारद श्री. बुलचंद सोनेसर यांना पत्र क्र. उमपा/साबां/शआ/६ दिनांक २२.४.२००३ नुसार त्यांची तयारी असल्यास त्यांनी उल्हासनगर-५ येथील अग्निशमन इमारतीची दुरूस्तीसाठी पाहणी करून सदर इमारतीची दुरूस्तीकरिता प्राकलन तयार करणे, काम पुर्ण होईपर्यंत कामाची देखरेख करणे इत्यादी कामासाठी त्यांनी त्यांचेकडुन व्यावसायिक शुल्क (Proffessional Fee) किती शुल्क आकारले जाईल हे महानगरपालिकेस कळवावे असे पत्र दिले होते.

त्यानुसार वास्तूविशारद श्री. बुलचंद सोनेसर यांनी त्यांचे पत्र क्र. डीइव्ही-११३/१३/०३ दिनांक ७ मे, २००३ नुसार सदर काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे. या कामाची अंदाजित प्राकलनिय किंमत रू. १० ते १५ लाख असण्याची शक्यता असल्यामुळे व प्राकलन तयार करणे, देखरेख ही कामे करणे इत्यादी कामाकरिता व्यावसायिक शुल्क (Proffessional Fee) १० टक्के दराने प्राकलनीय किंमतीवर करण्याची तयारी दर्शविलेली होती. त्याअनुषंगाने दिनांक १७ मे, २००३ रोजी मा. आयुक्त यांनी श्री. बुलचंद सोनेसर यांना यांच्याशी त्यांच्या दालनामध्ये प्रत्यक्ष चर्चा करणेसाठी बोलविले होते. चर्चेअंती वास्तुविशारद श्री. बुलचंद सोनेसर यांनी त्यांचे पत्र क्र. डीइव्ही-११३/१७/०३ बीएस दिनांक १७, मे २००३ नुसार सदर इमारत दुरूस्तीचे संदर्भात त्यांचेकडुन असलेले स्थापत्त्य तज्ञ म्हणुन इमारतीची पाहणी करून दुरूस्ती करिता त्यांची व्यावसायिक शुल्क (Proffessional Fee) १० टक्के ऐवजी कामासाठी ६ टक्के प्राकलनीय किंमतीवर करण्याचे मान्य केलेले आहे.

त्यानुसार मे. बुलचंद सोनेसर यांची उल्हासनगर-५ येथील अग्निशमन केंद्राच्या दुरूस्तीकरिता स्थापत्य तज्ञ म्हणुन प्राकलनीय किंमतीच्या ६ टक्के दरावर व्यावसायिक शुल्क (Proffessional Fee)देवून सदर कामाचे प्राकलन तयार करणे, कामावर देखरेख ठेवणे, काम पुर्ण करून घेणे इत्यादी कामे करण्यास नेमणुक करण्यास मान्यता मिळणेकरिता स्थायी समिती सभेपुढे ठेवण्याकरिता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. २५ दिनांक:-७.६.२००३.

.

सुचकाचे नाव :-श्रीमती. भारती छाब्रिया.
अनुमोदकाचे नाव :- श्री. उमाप रामदास.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अग्निशमन विभाग क्र. २ नेताजी चौक उल्हासनगर-५ येथील अग्निशमन स्थानकाचे दुरूस्ती करणे कामी श्री. बुलचंद सोनेसर यांची स्थापत्य तज्ञ म्हणुन नेमणुकीस मान्यता देत आहे. आणि त्यांना प्राकलनिय किंमतीच्या ६ टक्के दरावर व्यावसायिक शुल्क अनुज्ञेय असेल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने
सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ९ वाचून दाखवितात.

विषय क्र. ९:-महानगरपालिकेतर्फे उभे केलेले पथ दिवाबत्ती नियंत्रक चालू-बंद करणेकामी प्रशासनास मे. प्रेम इन्टरप्राईझेस उल्हासनगर-१ या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणेबाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ९:-महानगरपालिकेतर्फे उभे केलेले पथ दिवाबत्ती नियंत्रक चालू-बंद करणेकामी प्रशासनास मे. प्रेम इन्टरप्राईझेस उल्हासनगर-१ या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणेबाबत.

प्रस्तावना

महानगरपालिकेतर्फे पथ दिवाबत्ती नियंत्रक चालू-बंद करण्यासाठी उल्हासनगर कॅप १,२,३ आणि उल्हासनगर कॅम्प नं. ४ व ५ करिता तीन वर्षासाठी दोन वेगळया निविदा वर्तमान पत्रात सूचना देवून मागवल्या होत्या. त्याचा प्रतिसाद म्हणून तीन निविदा धारकांनी वेळेवर म्हणजे २५.२००३ रोजी तीन वाजे पर्यंत त्यांचा निविदा इसारा रक्कमे सह सादर केलेल्या आहे त्यांचा तुलनात्त्मक तक्ता खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

१. मे. जाधव ॲण्ड सन्स, कल्याण यांचे दर कॅ. नं. १,२, व ३ साठी रू. १२.० प्रति पथ दिवाबत्ती नियंत्रक प्रति दिवस असे आहे.
२. मे. प्रेम इन्टरप्राईसेस यांचे दर कॅ. नं. १,२ व ३ साठी रू. १०. प्रति पथ दिवाबत्ती नियंत्रक प्रति दिवस कॅ. नं. ४ व ५ साठी रू. १०. प्रति पथ दिवाबत्ती नियंत्रक प्रति दिवस असे आहे.
३. मे. जे. डी. इलेक्टीक वर्क्स, कल्याण यांचे दर १,२ व ३ साठी रू. १२.२५ प्रति पथ दिवाबत्ती नियंत्रक प्रति दिवस आणि कॅ. नं. ४ व ५ साठी रू. २.५ प्रति पथ दिवाबत्ती नियंत्रक प्रति दिवस असे आहे.

वरील तुलनात्त्मक तक्त्या अनसुार कॅ. नं. १,२ व ३ साठी व कॅ. ने. ४ व ५ साठी मे. प्रेम इन्टरप्राईसस उल्हासनगर-१ यांचे दर रू. १०.९८ प्रति पथ दिवाबत्ती नियंत्रक प्रति दिवस सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दर रूपये १५.९७ पेक्षा ३१.२५ टक्के कमी असून मे. प्रेम इन्टरप्राईसेस, उल्हासनगर-१ यांचे दराला मंजूरी देवून तसेच तीन वर्षा करिता करार करण्यासाठी व लागणारा खर्चास मान्यते साठी स्थायी समिती पुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २६ दिनांक:-७६.२००३.

सुचकाचे नाव :- श्रीमती. नीता आहुजा

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. सीमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर १ ते ५ मधील महानगरपालिकेतर्फे उभे केलेले पथ दिवाबत्ती वेळोवेळी चालु-बंद कर्तव्यासाठी प्रती दिवस, प्रती पथ दिवाबत्ती रू. १०. ९८ या दराने मे. प्रेम इंन्टरप्राइझेस उल्हासनगर-१ यांची निविदा स्विकृती योग्य असून प्रशासनास त्यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.आणि या ठरलेल्या दराने प्रशासनास सन २००३-२००४ या व्यतीरिक्त पुढील दोन वर्षासाठी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>आयत्त्यावेळचे दोन विषय आहेत. या सभेची जर संमती असेल तर दोन्ही विषयाचा या सभेच्या कार्यसूचीवर समावेश करता येईल. विषय पुढील प्रमाणे आहे. व दुसरा सिव्हिल वर्कससाठी आहे.

**विषय क्र. १०:-** उल्हासनगर महानगरपालिका येथे नागरीक सुविधा केंद्र उभारणी करण्या करिता संगणक हार्डवेअर, सर्व्हस, नेटवर्कींग, यु.पी.एस. इत्यादी खरेदी करणे बाबत.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदर दोन विषयांचा सर्वानुमते सभेच्या कामकाजाच्या सूचीवर आयत्त्यावेळचे विषय म्हणुन समावेश करण्यात येत आहे.

<u>श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता):-</u>यासाठी आधीच महासभेत ठराव मंजुर झाला आहे. शासनाने निर्णय घेतला असल्याने महानगरपालिकेत नागरिक सुविधा केंद्रात लागणारे साहित्त्य खरेदी करण्याकरिता भारत सरकारने डी.जी.एस ॲण्ड डी व महाराष्ट्र शासनाने पण सी.पी. एस. ओ. या कंपन्यांचे दर खरेदी साठी मान्य केले आहे त्यानुसार या कंपनीचे दर मागविले आहे व प्रस्ताव मांडला आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>याबरोबर सिव्हील वर्क देखिल आहे ते पण सांगा.

<u>श्री. सुखरामाणी (कार्यकारी अभियंता):-</u>पार्टीशन वगैरे टाकावे लागेल त्यासाठी टेंडर मागविले. २० लाखाचे काम आहे. ५ टक्के below केले. १८. ९९ रू. ते काम करायला तयार आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी ':-</u>ठेकेदार कोण आहे? वी. एम. हरजानी यांचे नाव तर काळया यादीत आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>काय त्यांचे नाव ब्लॅक लिस्टमध्ये आहे. मला माहित नाही चिजवानी काय आहे?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-नाही साहेब.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-साहेब, तो वेगवेगळया नावाने निविदा भरतो काम मात्र तोच करतो.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-जर तो ब्लॅक लिस्टेड असेल तर मी हे काम त्याला देणार नाही. परंतु चिजवानी सांगत आहेत त्यांचे नाव काळया यादीत नाही.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-साहेब तो काम बरोबर करत नाही. माझ्या प्रभागातील त्याने दोन कामे अर्धवट सोडुन बंद केली.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-नाकामयाब ठेकेदार आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-शहर अभियंता यांना माहित आहे तरी स्थायी समितीत आणतात.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:-त्यांनी माझ्या प्रभागात देखिल दोन वर्षे झाली काम पुर्ण केले नाही.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-तुम्ही दुस-याला हे काम दया.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-मला काही समस्या नाही. निविदा तीन जणांनी भरल्या त्यातला कुणी ब्लॅक लिस्टेड आहे हे माझ्यासमोर आणले गेले नाही.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-माझ्या प्रभागातील समाज मंदीरचे काम अपुर्ण सोडले आहे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-जो काम अपुर्ण करतो त्याचे नाव जर काळया यादीत असेल तर त्याला काम नका देवू.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-तुम्ही शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांना विचारा त्यांना तो ठेकेदार चांगला वाटतो का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-त्याच्याशी वाटाघाटी केल्यावर त्याने दर कमी केले. माझ्यासमोर तरी यांनी काही तसे आणले नाही.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-त्याच्या कामाचा रिपोर्ट ठिक नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-मला प्राधिकृत करावे लागेल. ५(२)(२) अन्वये काम करावे लागेल. तो ५ टक्के कमी दराने काम करायला तयार आहे. तुम्हाला जर त्याला काम दयायचे नसेल तर कारण नमुद करावे लागेल.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-आम्ही तुम्हाला प्राधिकृत करीत आहोत.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-ठेकेदाराचे काम चांगले नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-कारण सांगा ते नमुद करावे लागेल.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-कारण सांगावे लागेल. कुणाच्या प्रभागात त्याचे काम बंद असेल ते सांगावे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-माझ्या प्रभागात काम अर्धवट सोडले आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-एजेन्सी एकच आहे का?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-एजेन्सी वेगळी आहे. पण माणुस तोच आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):- ठोस कारण सांगा. जर मी दुस-याला सांगितले तर तो या दराने करणार नाही.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-दुसरा कोण आहे?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-हु इज विलिंग टु डू?

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-डी. एस. कंन्स्ट्रक्शन यांना द्या.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-आम्ही दोघांना बोलावले होते. वाटाघाटीसाठी सर्वांना संधी दिली होती त्यांनी मोहोरबंद करणेस द्यायचा होता तो पण दिला नाही. ते दोन्ही तयार नाही हा ठेकेदार देखील १ टक्के देखिल कमी दर करत नव्हते मी जेव्हा म्हंटले रि टेंडर करू तेव्हा ते ५ टक्के कमी दराने केले त्याला संधी देऊ काम लवकर झाले पाहिजे नाही द्यायचे असेल तर कारण द्या तसे रिजेक्ट करू शकत नाही.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-शहर अभियंता स्वतः म्हणतात समाधानी नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-मी त्यांना बोललो जर ते त्याच्या कामाने समाधानी नव्हते तर का त्याची शिफारस केली कार्यालयात वेगळे सांगतात इथे वेगळे सांगतात. वाटाघाटीसाठी सर्वांना संधी दिली होती त्यांना मोहरबंद लखोटा दयायचा होता तो पण त्यांनी दिला नाही.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-आम्ही तुम्हाला प्राधिकृत करतो.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-तुम्ही कारण दाखवा ५ टक्के बीलो ने जर नाही दिले तर कामाची किंमत वाढेल.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-कालावधी किती आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-२ महिने आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-तुम्ही त्यांचे ब्लॅक लिस्टमध्ये नाव टाका. दुस-या कुणाला द्या. दोन महिने कालावधी आहे ना?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-ब्लॅक लिस्ट करू वेगळे व ब्लॅक लिस्टेड आहे हे वेगळे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-आम्ही बोलते पण त्याचे नाव काळया यादीत टाकणे आयुक्तांचे काम आहे. आम्ही तुम्हाला अधिकार देतो तुम्ही तुमच्या अधिकारात करा. तयांना एक संधी द्या तुम्ही म्हणता म्हणुन त्यांना बोलावुन सांगा. पोखरकरांच्या कालावधीतले त्यांचे काम बरोबर नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-तुम्हाला जर काम द्यायचे नसेल रिजेक्ट करायचे असेल तर कारण नमुद करावेच लागेल दुस-याला कुणाला द्यायचे असेल तर ५ (२(२) मध्ये प्राधिकृत करा.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-आम्ही तुम्हाला प्राधिकृत करतो.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-साहेबांचे म्हणणे आहे कारण सांगा.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-कारण सांगितले ना.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-त्याचे काम अर्धवट असेल कामाचा दर्जा चांगला नसेल, तर ते सांगा त्याच्या विरोधात काही प्रमाण असेल तर ते आणा नाहीतर litigation होईल कोर्टात प्रकरण जाईल.

मा. सदस्या श्रीमती. किरण माने :-४ नंबर न्यु मार्केट येथे किती वर्षापासुन डाकघर बंद आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-तो विषय पत्रिकेवर विषय नाही. मा. सभापती महोदया, माझी विनंती आहे विषयावर चर्चा आधी केली जावी इतर चर्चा नंतर करावी.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-ठीक आहे. सदरचे दोन्ही प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे समंत करण्यात येत आहे.

विषय क्र. १०:- उल्हासनगर महानगरपालिका येथे नागरीक सुविधा केंद्र उभारणी करण्या करिता संगणक हार्डवेअर, सर्व्हस, नेटवर्कीग, यु.पी.एस. इत्यादी खरेदी करणे बाबत.

प्रस्तावना

सादर करण्यात येत आहे की, शासनाच्या दिनांक २७.२.२००३ च्या निर्णयानुसार महानगरपालिकेने ठराव क्र. ४ दिनांक २५.४.२००३ अन्वये महानगरपालिकेचे संगणकीकरण करण्याच्या धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

सदर धोरणात्मक निर्णयाच्या अंर्तगत महापालिकेत नागरिक सुविधा केंद्र उभारणीचे कार्य हाती घेतलेले आहे. त्या नागरीक सुविधा केंद्रात जे काही संगणक हार्डवेअर, सर्व्हस्, नेटवर्कींग, यु.पि.एस. इत्त्यादी त्वरीत खरेदी करणे आवश्यक आहे. हे खरेदी करण्याकरीता भारत सरकारने DGS & D व्दारा काही कंपन्या व त्यांचे दर मंजुर केलेले आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाने पण CPSO व्दारे काही कंपन्या व त्यांचे दर त्या खरेदी करता मंजुर केलेले आहेत.

महानगरपालिकेला ज्यावेळी जे साहित्त्य नागरिक सुविधा केंद्रात लागेल ते खरेदी करण्याकरिता सदर दोन्ही संस्था मार्फत मंजुर केलेल्या दरा नुसार त्यांच्याकडील मंजुर कंपन्याकडुन हे साहित्त्य खरेदी करणे योग्य राहील कारण DGS & D किंवा CPSO व्दारा करण्यात येतात व त्यांनी ठरविलेल्या कंपन्या नामवंत असतात. त्यामुळे त्यांच्या कडुन थेट खरेदी करण्यात वाजवी दर प्रमाणीकता ही नक्की होत आहे व महापालिकेने निविदा मागुन हार्डवेअर खरेदी करण्यात लागणा-या कालावधी व प्रशासकीय खर्च पण वाचेल. सदर खरेदी करीता अंदाजित खर्च रू. ३० लाख अपेक्षित आहे.

वरील बाबी लक्षात घेता प्रशासनाला DGS & D किंवा CPSO मंजुर दराला त्यांच्या मान्यता प्राप्त कंपन्याकडून थेट खरेदी करण्याकरिता प्राधिकृत करण्यासाठी व लागणा-या अंदाजे खर्च रू. ३० लाख यास मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती पुढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २७</u> <u>दिनांकः-७.६.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्री. पृथ्वी वलेचा.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. किरण माने.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार नागरीक सुविधा केंद्र उभारणेकामी लागणारे साहित्य पुरविणेसाठी प्रशासनास डी. जी. एस ॲण्ड डी किंवा सी.पी.एस.ओ. यांच्या वतीने ठरविलेल्या दराप्रमाणे ज्या कंपन्यांचे / कंत्राटदारांचे दर / दर्जा महानगरपालिकेला फायदेशिर असेल, प्रशासनास त्यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदा करणेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

*सभापती / पिठासीन अधिकारी*
*स्थायी समिती सभा*
*उल्हासनगर महानगरपालिका*

स्थायी समिती ठराव क्र. **२८** दनांकः-**७.६.२००३.**

सुचकाचे नाव :- श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार नागरिक सुविधा केंद्र उभारणे कामी प्रशासनास मे. व्ही. एम. हरजानी या निविदाकाराशी वाटाघाटी अंती वरील बाबी ठरविलेल्या दराप्रमाणे संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*सायंकाळी ५. ३५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.*

*(प्रकाश पं. कुकरेजा)*
*महापालिका सचिव*
*उल्हासनगर महानगरपालिका.*

# उल्हासनगर महानगरपालिका

दि:-४.७.२००३.

इतिवृत्त

## दि. ४.७.२००३ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ४.७.२००३ रोजी सांयकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्त्या.

१. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
२. श्री. उमाप रामदास
३. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
४. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
५. श्रीमती छाब्रिया भारती
६. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
७. श्रीमती बामणकर नंदिनी
८. श्री. मोहन बेहरानी
९. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
१० श्री. ईश्वर पमनानी
११ श्री. पृथ्वी वलेचा
१२ श्रीमती सुर्वे जयश्री

तर

मा. सभापती १. श्रीमती. ज्योती कालानी, मा. सदस्य २. श्री. जेसवानी सतरामदास,३. सदस्या श्रीमती मोकल सिमा, ४. सदस्य श्री. पंजाबी नारायण, हे सभेस अनुपस्थितीत होते.

सांयकाळी ५. ०५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- आजच्या या सभेत मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया उपस्थित नसल्याने सभेचे कामकाज चालविण्यासाठी आपल्यामधील एका सदस्याची सर्वानुमते किंवा बहूसंख्येने पिठासिन अधिकारी म्हणुन निवड करावी लागेल.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा यांची सर्वानुमते पिठासिन अधिकारी म्हणुन निवड केल्यानंतर ते पिठासिन अधिकारी स्थानी आसनस्थ झाले.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :-आमचे सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांच्या बंधुंना अपघात झाला आहे त्यांना पाहण्यासाठी जायचे असल्याने या सभचे कामकाज पुढे ढकलण्यांत यावे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-सभेचे कामकाज पुढे ढकलण्याअगोदर आपल्या महापालिकेत आरोग्य अधिकारी म्हणुन एका अधिका-याची नेमणुक झाली आहे. ते या सभागृहात उपस्थित आहेत. कृपया त्यांनी सभागृहास आपली ओळख करून दयावी.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-या अगोदर त्यांनी कोण कोणत्त्या ठिकाणी काम केले आहे?

श्री. खरात (आरोग्य अधिकारी):- मा. श्री. खरात (वैद्यकीय) आरोग्य अधिकारी म्हणुन माझी नेमणुक करण्यांत आली आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-आरोग्य अधिका-यांना विनंती करतो की, त्यांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष दयावे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-आपण त्यांच्या प्रकृतीवर जावू नका. त्यांच्या कामाकडे पहा.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-जर आपणास चालतात तर आम्हास काय हरकत आहे?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत करावयाच्या सार्वजनिक निकडीच्या व तातडीच्या १८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदांची माहिती नोंद करणे बाबतचा विषय आहे तो आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घ्यावा ही विनंती.

मा. पिठासिन अधिकारी (श्री.विनोद तलरेजा):- आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये आणलेला प्रस्ताव आजच्या सभेच्या कामकाजात सर्वानुमते समाविष्ट करण्यात येत आहे. या सभेचे कामकाज सर्वानुमते पुढे ढकलुन ते निर्णयीत काढण्यासाठीची सभा बुधवार दि. ९.७.२००३ रोजी सायं ४. ३० वा. घेण्यांत येईल.

सायंकाळी ५. ०७ मिनिटांनी सभेचे कामकाज पुढे ढकलल्याचे मा. पिठासिन अधिकारी श्री. विनोद तलरेजा यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिः-९.७.२००३.

इतिवृत्त

### दि. ९.७.२००३ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रावार दिनांक ४.७.२००३ रोजी सांयकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यांत आली होती. सदर सभेचे कामकाज पुढे ढकलून सदरची सभा बुधवार दिनांक ९ .७. २००३ रोजी सांयकाळी ४. ३० वाजता घेण्यात आली. सदर सभेत खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्त्या.

१. मा. सभापती :- श्रीमती. ज्योती कालानी.

२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. उमाप रमदास
४. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
५. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
६. श्रीमती छाब्रिया भारती
७. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
८. श्री. जेसवानी सतरामदास
९. श्री. पंजाबी नारायण
१० श्रीमती बामणकर नंदिनी
११ श्री. मोहन बेहरानी
१२ श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
१३ श्री. ईश्वर पमनानी
१४ श्री. पृथ्वी वलेचा
१५ श्रीमती सुर्वे जयश्री

तर

मा. सदस्या श्रीमती मोकल सिमा हया सभेस अनुपस्थितीत होत्या.

सांयकाळी ५. ०५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक ७/६/२००३ चे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा. सभापती. श्रीमती. ज्योती कालानी:-मागील सभेचे दि. ७/६/२००३ रोजीची रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

फक्त माहितीसाठी आहे- पास?

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या १८ कामांमध्ये काही कामे सर्वसाधारण निधीतील आहेत परंतु त्यामध्ये आमच्या प्रभागाचे एक सुध्दा काम नाही. आम्ही पत्र देतो त्यानुसार आम्ही सुचविलेले एकही काम होत नाही.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-ठाणे, कल्याण नंतर उल्हासनगर येते. त्याप्रमाणे या कामानंतर आमच्या प्रभागातील कामांचा पण नंबर आला पाहिजे ना?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-सर्वसाधारण निधी आहे का त्यात?

मा. सदस्या श्रीमती. किरण माने:-त्यांचे म्हणणे आहे आमच्याही प्रभागात जनरल निधीमधुन काम व्हावे.

मा.प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. सदस्य श्री. उमाप यांचा आरोप चुकीचा आहे, त्यांनी पुरव्यानिशी आरोप करावा, सर्वांच्या प्रभागातील कामे घेतली जातात. बजेटमध्ये दर्शविलेला पुर्ण निधी हा महापालिकेचा असतो व बजेटमध्ये कामासाठी शिर्ष ठेवलेले असते. प्रधान शिर्ष, उपशिर्ष असे शिर्ष असतात.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-सर्वसाधारण शिर्ष असे काही आहे का? सर्वसाधारण निधीतुन कामाची अशी काही तरतुद आहे का?

मा.प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-कोण कोणत्त्या कामासाठी हा खर्च करत आहोत. त्यावेळेस लेखाशिर्षाचा उल्लेख केला जातो. जसे की पाणी पुरवठा, सार्वजनिक दिवाबत्ती सार्वजनिक आरोग्य इत्यादी सर्वसाधारण निधी नावाचा बजेटमध्ये कोणताही शिर्ष नसतो.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-या बजेटमध्ये सर्वसाधारण निधी तुन काम करण्याची कुठेच तरतुद नाही.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सर्वसाधारण निधीचा बजेटमध्ये कुठेच उल्लेख नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-याबाबत नंतर बघु.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

विषय क्र. २:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १८ विविध कामी
प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-५ येथील सहयाद्री नगरमध्ये नाली बांधणे प्र.क्र.१२(ब) (महापालिका निधी २२४) | ९९,०००/- | ७.६.०३ | मे स्टॅन्डर्ड म. का. सोसा. |
| २ | उल्हासनगर-३ येथील बॅ नं १०५१, ५२ भाग्यश्री अपार्टमेंटच्या बाजुला चार बैठकिचे शौचालय बांधणे (महापौर निधी २२९) | १,९९,७२०/- | ७.६.०३ | मे जकनुश म. का.सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | उल्हासनगर-३ येथील बॅ नं ११२४ हरफुल घर ते तोतासिंग लबाणा यांचे घरापर्यंत तसेच शकुंतला राजपूत यांचे घर ते मटन शॉप पर्यत सी सी पॅसेज व गटार बनविणे (महापौर निधी २३०) | १,९९,९००/- | ७६.०३ | मे जकनुरा म. का.सोसा |
| ४ | महादेव स्टील ते गुरूदास अछरा यांच्या घरापर्यंत बॅ नं ९८१ सी सी पॅसेज व शौचालय दुरूस्त करणे (महापौर निधी २३४) | १,९९,४००/- | ७६.०३ | मे जय हिंद म. का.सोसा |
| ५ | उल्हासनगर-३ मधील अशोक चव्हाण यांचे घरापासुन भुरा राजपूत यांचे घरापर्यंत तसेच बॅ क्र. ११२५, ११२६, ११३७, ११३८ मध्ये सी सी पायवाटा व नाल्या बांधणें.(महापौर निधी २४६) | १,९९,७५०/- | ७६.०३ | मे गावदेवी म. का. सोसा. |
| ६ | उल्हासनगर-५ येथील स्वामी त्रिलोकदास गार्डनमधील स्टेज दुरूस्ती करणेबाबत. ( महापालिका निधी ३५७) | १,००,०००/- | ७६.०३ | मे आदर्श म. का. सोसा. |
| ७ | प्रभाग क्र.१३ मधील सहयादीनगर मध्ये एम-२५० ने रस्ता बांधणे. (महापालिका निधी ३६७) | १,००,०००/- | ७६.०३ | मे आदर्श म. का. सोसा. |
| ८ | उल्हासनगर-२ प्र क्र. ५ मध्ये बॅ नं ६१९, ६२७, ६२८ जवळ, माता मंदिर जवळ भिंत दुरूस्ती व सी सी एम-२५० ने रस्ता बांधणे. (नगरसेवक निधी ३८३) | १,९९,८२५/- | ७६.०३ | मे श्री विनायक म. का. सोसा. |
| ९ | उल्हासनगर-२ येथील प्र क्र. ५ मधील बॅ नं ५९४, ६१३, बॅ नं २७३, २७४, २७९, २९० पर्यत सी सी ढम-२५० रस्ता बांधणे आणि बॅ नं ५८७ जवळ शौचालयाची दुरूस्ती करणे (नगरसेवक निधी ३८४) | १,९९,८२५- | ७६.०३ | मे श्री विनायक म. का. सासा. |
| १० | सपना गार्डन बगिच्याची निगा राखणे व दुरूस्ती करणे पॅ नं ३ (प्रभाग समिती निधी ४०४) | २,९६,२३२/- | ७६.०३ | मे रवि किरण म. का. सोसा. |
| ११ | उल्हासनगर-३ येथील प्र क्र. २० मध्ये राधा निवास पासून राजमहल पर्यत रस्त्यालगतीची नाली आणि फुटपाथ बांधणे (नगरसेवक निधी ४०८) | १,९९,३००/- | ७६.०३ | मे श्री मॉ म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | उल्हासनगर-१ प्र क्र. २१ मध्ये बॅ नं ७१ ,७२ ,७३ ,७४ ,६१ सी सी एम-२५० ने रस्ता , नाली बांधणे (नगरसेवक निधी ४१२) | १ ,४९ ,९००/- | ७६ .०३ | मे श्री मॉ म. का. सोसा. |
| १३ | उल्हासनगर-१ येथील प्र क्र. २१ मध्ये बॅ नं ३३ पासून बॅ नं ३६ पर्यत सी सी एम- २५० ने रस्ता बांधणे.(नगरसेवक निधी४१३) | १ ,९९ ,७१०/- | ७६ .०३ | मे अल्का म. का. सोसा. |
| १४ | उल्हासनगर-४ येथील प्र क्र. ३ मध्ये ब्लॉक सी ६२० ते ६२९ पर्यत रस्ता सी सी एम-३५० ने बांधणे. (नगरसेवक निधी ४४०) | ३ ,९९ ,९००/- | ७६ .०३ | मे आदर्श म. का. सोसा. |
| १५ | उल्हासनगर-३ येथील प्र क्र. २३ मधील सपना उद्यानामध्ये लहान मुलांच्या सुविधासाठी सी सी एम-२५० ने रस्ता बांधणे (नगरसेवक निधि ४४६) | ३ ,६२ ,०५०/- | ७६ .०३ | मे रवि किरण म. का. सोसा. |
| १६ | उल्हासनगर-२ येथील प्र क्र. २२ मध्ये बॅ नं ५२३ , ५२८ तेज पॅलेस येथे सिमेंट रोड (एम-२५०)ने रस्ता बनविणे व बॅ नं ३५५ व ३५६ च्या मागची नाली बांधणे.(नगरसेवक निधी ४५२) | १ ,९९ ,५००/- | ७६ .०३ | मे वनी देव म. का. सोसा. |
| १७ | उल्हासनगर- येथील प्र क्र. १ मध्ये जसवानी अपार्टमेंट ब्लॉक नं अे-२५ जवळ बगीचा विकसित करणे.(प्रभाग समिती निधी ४६२) | ९९ ,९००/- | ७६ .०३ | मे भोलेनाथ म. का. सोसा. |
| १८ | उल्हासनगर-३ येथील साईबाबा कॉलनी येथे नाला बांधणे प्र.क्र २३ (स्थायी समिती ,सभापती निधी ४७०) | ९९ ,८५०/- | ७६ .०३ | मे श्री मॉ म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक ,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. 29 दिनांक:-9.7.2003.

सुचकाचे नाव :-श्री. पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वरील १८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ३:-खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल दुरूस्तीकरणे कामी मेसर्स वैभव इलेक्ट्रीकल वर्कस् कल्याण यांनी प्रशासनाचे थेट कार्यादेशाप्रमाणे दिनांक १.१०.२००२ ते ३१.१.२००३ पर्यंत या कालावधीसाठी केलेल्या कामी संविदेस खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे बाबत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-कार्योत्तर मंजुरी?

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-त्यांना किती वेळा मुदत वाढ दिली? याआधी पण दिली आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- एकचवेळ ४ महिन्याची मुदतवाढ दिली आहे. गोषवा-यामध्ये तीचा स्पष्टपणे उल्लेख आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-पास?

मा.प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-नविन ऐजन्सीची नेमणुक होईपर्यंत जुन्याच ऐजन्सीने काम पहायचे अशी करारनाम्यामध्ये अट असते. त्यानुसार जुन्या ऐजन्सीने काम केले आहे त्या खर्चास मान्यता दयायची आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ३:-खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल दुरूस्तीकरणे कामी मेसर्स वैभव इलेक्ट्रीकल वर्कस् कल्याण यांनी प्रशासनाचे थेट कार्यादेशाप्रमाणे दिनांक १.१०.२००२ ते ३१.१.२००३ पर्यंत या कालावधीसाठी केलेल्या कामी संविदेस खर्चास कार्योत्तर मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना

खडेगोलवली येथिल मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे हे काम वार्षिक कंत्राटी पध्दतीने मे. वैभव इलेक्ट्रीक वर्क्स, कल्याण यांना कार्यादेश क्र. युएमसी/ डब्लु एसएसडी/मेक/३८८१ दि. २६.१२.२००० नुसार देण्यात आले. सदर कामाची मुदत दि. ३१.१२.२००१ रोजी संपली मात्र तोपर्यंत नविन ठेकेदार नियुक्तीची प्रक्रिया सुरू होती. नविन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत पुर्वीच्याच ठेकेदाराने काम सुरू ठेवावे या निविदेतील अटीनुसार मे. वैभव इलेक्ट्रीक वर्क्स, कल्याण यांनी निविदा दराने पुढे काम सुरू ठेवले व त्यास दि. ३०.९.२००२ पर्यंतच्या मुदतवाढीस मंजुरी मिळाली आहे.

नविन ठेकेदार नियुक्ती साठी मा. स्थायी समिती समोर दि. ८.४.२००२ रोजी सादर केलेला गोषवारा दि. २.५.२००२ व दि. २४.५.२००२ च्या बैठकीत पुढे ढकलण्यात आला व दि. ४.७.२००२ रोजी ठराव क्र. २४ नुसार त्यास मंजुरी देण्यात आली. मात्र न्यूनतम निविदा दर ग्राहयतेचा ९० दिवसाचा कालावधी संपुष्ठात आल्यामुळे न्युनतम ठेकेदार मे. एस. एस. इलेक्ट्रीक कंपनी, डोंबिवली यांनी सदर काम करण्याची असमर्थता लेखी पत्राने कळवली. त्यानंतर सुधारीत प्राकलन तयार करण्यात आले व त्यास मा. आयुक्त यांनी दि. १४.८.२००२ रोजी मंजुरी दिली. त्यानसुार नविन निविदा मागविण्यात येवून नवीन ठेकेदार नियुक्तीची प्रक्रिया पुर्ण करण्यात आली असून पाणी पुरवठा विभागाचे पत्र क्र. युएमसी/डब्लु एस एसडी/मेक /२२० दि. २७.१.२००३ नूसार नविन ठेकेदार मे. ओम इंडस्ट्रीयल इंजि. सर्व्हि. डोंबिवली यांना नियुक्त करण्यात आले आहे व त्यांनी दि. १.२.२००३ पासुन कामांस सुरूवात केलेली आहे.

मे. वैभव इलेक्ट्रीक वर्क्स, कल्याण यांनी निविदा अटी व शर्तीनुसार दि. १.१०. २००२ ते ३१.१.२००३ या कालावधीत उपरोक्त काम सुरू ठेवलेले असल्यामुळे त्यांना वरील चार महिनेच्या कालावधीसाठी व त्यांच्या मंजुर निविदा दराने झालेला खर्च रू. <u>३६९४१२/-</u> मात्र च्या रक्कमेस कार्योत्तर मंजुरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. त्यास मंजुरी मिळावी हि विनंती.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> **३०** <u>दिनांक:-९.७.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. नीता आहुजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल दुरूस्तीकरणे कामी मेसर्स वैभव इलेक्ट्रीकल वर्कस कल्याण यांनी प्रशासनाचे थेट कार्यादेशाप्रमाणे दिनांक १.१०.२००२ ते ३१.१.२००३ पर्यंत या कालावधीसाठी केलेल्या कामाच्या संविदेस व अंतर्भुत खर्चास कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>
अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ४:-गॅस्टनर कंपनीचे कॉपी प्रिन्टर या यंत्राच्या देखभाल व दुरूस्तीकामी प्रशासनास संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>५ वर्षाची गॅरेन्टी दिली आहे. दिड वर्षानंतरच देखभाल दुरूस्ती करावी लागली. जो २० हजार रूपये खर्च केला आहे तो?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>हा प्रस्ताव वार्षिक देखभाल दुरूस्तीचा आहे.

<u>मा.प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>सुटया भागाची वारन्टी असते, गॅरंन्टी नसते. हा जो खर्च आहे तो सुटटया भागांवरील आहे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>गेस्टनर सध्या काम करत आहे ना?

सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ४:-गॅस्टनर कंपनीचे कॉपी प्रिन्टर या यंत्राच्या देखभाल व दुरूस्तीकामी प्रशासनास संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महापालिका प्रशासनामार्फत मे. गेस्टनर कंपनीचे कॉपी प्रिंटर मॉडेल क्रमांक ५३२७ हे यंत्र माहे ऑक्टोबर, २००० मध्ये खरेदी करण्यात आले होते. सदर यंत्राची खरेदी किंमत रूपये ५,९०,३७३/-(रूपये पाच लाख नव्वद हजार तिनशे त्रेहात्तर) एवढी होती. यंत्राच्या खरेदीपोटी झालेला खर्च सन २०००-०१च्या आर्थीक वर्षासाठी अब-अ-३ (I I I) अ- (I I I) शिर्षाखाली यंत्र खरेदीसाठी करण्यात आलेल्या रूपये ७,१०,०००/-एवढया वित्तिय तरतुदीतुन भागविण्यात आलेला आहे. सदर खरेदी प्रस्तावास आवश्यक ती प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.

यंत्र खरेदीनंतर दिनांक ३०.४.२००१ रोजी मे. गेस्टेटनर कंपनीचे प्रतिनिधी मे. कॉपीकॅट कार्पोरेशन यांचे बरोबर यंत्राच्या वार्षिक देखभाल व दुरूस्तीचा करार करण्यात आला होता. सदर कराराची मुदत दिनांक ३०.४.२००२ रोजी संपुष्ठात आली आहे. मात्र खरेदी करण्यात आलेल्या यंत्राचे सर्वसाधारण आयुष्यमान ५ वर्षे किंवा १५ लाख एवढया कॉपीज यापैकी जे पाहिले असेल ते ऐवढे असल्याने सद्य:स्थितीस सदर यंत्र भविष्यातही आणखी काही कालावधीसाठी वापरात ठेवणे शक्य आहे. मात्र हे यंत्र विना तक्रार वापरात ठेवण्यासाठी यंत्राच्या देखभाल व दुरूस्तीचा वार्षिक कराराचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. करार नुतनीकरणाचा प्रस्ताव संबंधित पुरवठादारांकडून दिनांक १८.९.२००१ रोजीच्याा पत्रान्वये भांडार विभागास प्राप्त झालेला आहे. प्राप्त प्रस्तावानुसार करार नुतनीकरणाची फी रूपये २०,०००/- (रूपये वीस हजार एवढी आहे. यात यंत्र दुरूस्तीसाठी आवश्यक असणा-या सुटया भागाच्या किंमतीचा समावेश नाही.

यंत्राच्या देखभाल व दरूस्तीसाठी आवश्यक असणा-या खर्चासाठी रू. २. लाख एवढी वित्तिय तरतुद सन २००२-२००३ च्या वार्षिक अंदाजपत्रकात अब-अ-३ (I I I) या शिर्षाखाली करण्यात आली आहे. सबब वार्षिक देखभाल व दुरूस्ती कराराच्या नुतनीकरणासाठी आवश्यक तो खर्च मंजुर वित्तिय तरतूदीतुन हा खर्च भागविण्यासाठी मान्यता मिळणेसाठी सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३१ दिनांकः-९.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार गॅस्टनर कंपनीचे कॉपी प्रिन्टर मॉडेल क्र. ५३२७ या यंत्राच्या देखभाल व दुरूस्तीकामी मेसर्स कॉपीकॅट कार्पोरेशन या कंत्राटदाराशी पुर्वीच्या निविदेतील अटी, शर्ती व दराने प्रशासनास त्यांच्याशी थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ५:- सन २००२-२००३ करिता श्री. गणेश दर्शन प्रतियोगितेसाठी पारितोषिक पुरविणेकामी प्रशासनास मेसर्स हरीओम इंटरप्रायझेस या निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-ही जी पारीतोषिके दिली आहेत त्यांच्या ट्रॉफीची किंमत बरोबर आहे का?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रशासनाने दिली असल्याने ती तोलुन मोजुन सर्व निकष लावुन दिली असेलच ना?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ५:- सन २००२-२००३ करिता श्री. गणेश दर्शन प्रतियोगितेसाठी पारितोषिक पुरविणेकामी प्रशासनास मेसर्स हरीओम इंटरप्रायझेस या निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती तर्फे सालाबादाप्रमाणे गणपती उत्त्सवाच्यावेळी गणेश दर्शन स्पर्धा सन २००२-२००३ या वर्षात आयोजीत केली होती. उल्हासनगर शहरातील सार्वजनिक गणेश मंडळाव्दारा सादर करण्यात आलेल्या उत्त्कृष्ठ मुर्ती, देखावा, विषय, राष्ट्रीय

एकात्मता देखावा, धार्मिक वातावरण, स्वच्छता, शिष्टाचार, चलचित्र देखावा आणि विशेष प्रदर्शन अशा बाबींसाठी एकूण नऊ पारितोषिके १ ते ४ क्रमांकाच्या गणेश मंडळांना देण्याचे प्रस्तावित होते. त्यासाठी क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती हयांच्या ठराव क्रमांक ९ दि. २७.८.२००२ अन्वये रू. ३,६३,३७८/- (तीन लाख त्रेसष्ठ हजार तीनशे अठ्ठयाहत्तर ) च्या खर्चास सर्वसाधारण महासभा ठराव क्रमांक २८, दि. १९.९.२००२ अन्वये प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात आलेली आहे.

विहित नमुन्यातील पारितोषिके खरेदीसाठी ३.१०.२००२ रोजी निविदा मागविलेल्या होत्त्या. मात्र कुठल्याही पुरवठादाराने निविदा न भरल्यामुळे परत फेरनिविदा २५.१०.२००२ रोजी मागविलेल्या होत्त्या, त्यामध्ये ए.एस.कंन्स्ट्रक्शन आणि ओमकार मजूर कामगार संस्था यांनी निविदा भरलेला होता. त्यामध्ये दोन्ही निविदाकारांचे विक्रीकराची नोंदणीकृत प्रमाणपत्र आणि थकबाकी प्रमाणपत्र नसल्यामुळे निविदा उघडण्यात आलेली नाही. निविदा शर्तीप्रमाणे २६.३.२००३ रोजी पुन्हा निविदा मागविण्यात आल्या तेव्हा हरी ओम एन्टरप्रायझेस आणि ज्योती एन्टरप्रायझेस यांनी निविदा भरलेल्या होत्त्या. तुलनात्मक तक्तामध्ये हरी ओम एन्टरप्रायझेसची निविदा कमी दराचा होता. वाटाघाटीच्या नंतर हरी ओम एन्टरप्रायझेसच्या निविदेला खालील दराने मान्यता देण्यात आली.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | १५'' x १५'' | पारितोषिक | ९ नग | रू. ५२६० प्रमाणे |
| २. | १२'' x १२'' | पारितोषिक | ९ नग | रू. ४३०१ प्रमाणे |
| ३. | १०'' x १०'' | पारितोषिक | ९ नग | रू. ३८७५ प्रमाणे |
| ४. | ८'' x ८'' | पारितोषिक | ९ नग | रू. ३३०१ प्रमाणे |
| ५. | ४'' x ४'' | पारितोषिक | २०० नग | रू. १७५ प्रमाणे |

एकुण खर्च १८५६३३

उपरोक्त कार्यक्रमाच्या खर्चासाठी महापालिका प्रशासनाने वार्षिक अंदाजपत्रकातील लेखाशीर्ष क्रमांक ४ (IV) अन्वये आवश्यक ती वित्तिय तरतुद केलेली आहे. सदर प्रस्तावास मु.ले.अ., मु.ले.प. व मा. आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर बाब स्थायी समितीपुढे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (७३ डी) अन्वये माहितीसाठी सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> **३२** <u>दिनांक:-९.७.२००३.</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. भारती छाब्रिया

अनुमोदकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २००२-२००३ करिता श्री. गणेश दर्शन प्रतियोगितेसाठी पारितोषिक पुरविणेकामी प्रशासनाने मेसर्स हरीओम इंटरप्रायझेस या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ६:-उल्हासनगर भुयारी गटार योजने करिता सिव्हर लाईन क्लीनींग मशिन
खरेदी करणे कामी प्रशासनास मेसर्स प्राचीरा मेन्युफॅक्चरीज या न्युनत्तम
दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता व टेल्को कंपनी यांचेकडुन
चेसीस पुरविणेकामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे
बाबत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-या प्रस्तावावर प्रकाश टाकला जावा. कोण स्पष्टीकरण करेल?

श्री. जवांदे (कार्यकारी अभियंता):-उल्हासनगर १ ते ५ मधील भुयारी गटार चेंबर्सची सिव्हरलाईन / मेनहोल चेंबरच्या चोकअप काढण्यासाठी काम एका गाडीने होत नाही, त्यामुळे शहराच्या ब-याचश्या भागातुन नगरसेवकांकडुन अनेक तक्रारी येतात. त्यासाठी कॅम्प १,२,३,साठी एक गाडी व कॅम्प ४,५ साठी १ गाडी असावी, म्हणुन सिव्हर लाईन क्लिनिंग मशिन खरेदी करण्यासाठी प्राकलन तयार करण्यांत आले होते. राज्यस्तरीय दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यांत आल्या होत्त्या. तीन निविदा प्राप्त झाल्या होत्त्या.

मे. कॉम आविडा इन्वाईरो. प्रो. लि. पुणे यांनी रू. १३४४२२१८.८० हा दर लिहिला होता तर मे. गेटरे इन्वाईरोनेक सिस्टम पुणे यांनी निविदेत भरलेले दर रू. १५२७०५३.०० असा असुन सर्वात लघुत्त्तम दराचे निविदाकार मे. प्राचिरा मॅन्युफेक्चरींग मुंबई यांनी भरलेले दर रू. ११,४८,७००/- हे लघुत्त्तम असल्याने त्यांच्याशी संविदा करण्यास प्रस्तावित केली आहे. तसेच टेल्को कंपनीची चेसीस थेट टाटा इंजिनिअरींग कडुन खरेदी करण्याचे प्रस्तावित केले आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-या अगोदरची जी गाडी आहे ती चालु आहे की नाही?

श्री. जवांदे (कार्यकारी अभियंता):-चालु आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-यामध्ये ठेकेदार कोण आहे?

श्री. जवांदे (कार्यकारी अभियंता):-प्राचीरा मॅन्युफॅक्चरींग कंपनी आहे. एअरटेक कंपनीचा सिस्टर कनसन आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-सारखीच कंपनी फक्त नावात बदल आहे. गाडी किती मध्ये घेतली?

*<u>श्री. जवांदे (कार्यकारी अभियंता):-</u>१९९७ मध्ये १० लाखाला घेतली आहे असे म्हणतात. १९९७ सालची फाईल मला मिळत नव्हती.*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>सविस्तर माहिती आपल्याकडे आहे का?स्थायी समितीची सभा आहे याबाबत सविस्तर माहिती आपण गोळा करावयास पाहिजे होती.*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>१९९७-९८ मध्ये मी आरोग्य समितीचा सभापती होतो, त्यावेळी महासभेमध्ये मी म्हंटले होते की, या प्रकारची आणखी एक मशिन खरेदी केली पाहिजे. त्यानुसार १० लाखाची अर्थसंकल्पात तरतुद केली होती. हया मशिनची किंमत १७-१८ लाखापर्यंत जाते तर मग १० लाखाची तरतुद कोणत्त्या हिशोबाने केली?*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>गाडी तर पाहिजेच....*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*विषय क्र. ६:-उल्हासनगर भुयारी गटार योजने करिता सिव्हर लाईन क्लीनींग मशिन खरेदी करणे कामी प्रशासनास मेसर्स प्राचीरा मेन्युफॅक्चरीज या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता व टेल्को कंपनी यांचेकडुन चेसीस पुरविणेकामी प्रशासनास <u>निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.</u>*

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर भुयारी गटार देखभाल व दुरूस्ती योजने अंतर्गत सिव्हरलाईन /मेनहोल चेबरच्या चोकअप काढण्यासाठी महापालिके मार्फत सिव्हरलाईन क्लिनिंग (सक्शन कम जेटिंग)मशिन खरेदी करण्याबाबत रू <u>२३२१००५/-</u> चे प्रकलन तयार करण्यात आले. सदर कामासाठी दि <u>२५/३/०३च्या</u> राज्य स्तरिय दैनिक वार्ताहार व दैनिक नवशक्ती या वृतपत्रात रितसर जाहिरात देउन निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार एकुण तीन पुरवठा दारांनी दि <u>७/४/०३</u> रोजी सिलबंद निविदा महानगरपालिकेस सादर केल्या. कार्यकारी अभियंता (पा.पु),लेखा अधिकारी,उप विभागीय अधिकारी व तीन पुरवठा दारांचें प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत दि <u>७/४/०३</u> रोजी निविदा उघडण्यात आल्या. तीन्ही ठेकेदारांनी सादर केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

तुलनात्मक तक्ता

कामाचे नाव :- ७००० लि क्षमतेचे (सक्शन कम जेटिंग) सिव्हरलाईन क्लिनिंग मशिन स्वत:च्या डिझाईन नुसार बांधणे व पुरवठा करणे बाबत.

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | मेसर्स .कॉम अविडा इन्वाईरो प्रा लि,पुणे | रू. १३४२२१८.८० |
| २ | मेसर्स . गेटरे इन्वाईरोटेक सिस्टम,पुणे | रू १५२७०५३.०० |
| ३ | मेसर्स .प्राचिरा मन्युफेकचरींग ,मुंबई | रू ११४८७००.०० |

उपरोक्त निविदेपैकी मेसर्स प्राचिरा मन्युफेकचरींग ,मुंबई यांची निविदा तुलनात्मकरित्या न्युनतम असुन वाजवी असल्याची शिफारस कार्यकारी अभियंता यांनी केली आहे व त्यास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी सहमती दर्शवली आहे. त्यांचे दर स्विकृत करण्यास आले आहे.

सदर सिव्हरलाईन क्लिनिंग मशिन करिता टेल्को कंपनीची चेसीस (LPT 1109/36 with cabin and P.T.O,497 TC Engine variable Ratio Steering and 120 Ltrs Tank) घेण्याचे प्रस्तावित आहे. या चेसीसची किंमत सरकारी मान्य दर रू ५८९८५०.०० इतकी आहे. वरिल प्रमाणे टाटा इंजिनिअरींग एंड लोकोमोटीव कंपनी लि.यांना कार्यादेश देण्याचे प्रस्तावित आहे.

TATA ENGINEERING AND LOCOMOTIVE COMPANY LTD;

| QTY | MODEL | Ex Rso Bhivandi at SPI Govt Price |
|---|---|---|
| 1 | LPT 1109/36 with cabin and PTO,497 TC Engine variable Ratio steering and 120 Ltr tank | **526652.00** |
| Add | Maharashtra Sales Tax @12% 63198.24 | |
| | **Total Rs. 589850.24** | |

***च्लउमदजरू. १००: चंलउमदज हंपदेज च्तववितउं प्दअवपबम***

उपरोक्त सिव्हरलाईन क्लिनिंग मशिन खरेदी करणे प्रस्तावित आहे.तसेच त्याकरिता लागणा-या टाटा चेसीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५(२) (२) अन्वये खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

सबब अ) मेसर्स प्राचिरा मन्युफेकचरींग ,मुंबई यांच्याशी संविदा करण्यास प्राधिकृत करण्यास व

ब) निविदा न मागविता मे टेल्को कं.लि यांचे कडुन चेसिस खरेदी करण्यासाठी मा.स्थायी समितीची मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव पटलावर ठेवण्यात यावा.

स्थायी समिती ठराव क्र. ३३ दिनांकः-९.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर.
अनुमोदकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

*ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर भुयारी गटार योजने करिता सिव्हर लाईन क्लीनींग मशिन खरेदी करणे कामी प्रशासनास मेसर्स प्राचीरा मेन्युफॅक्चरीज या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे आणि चेसीस पुरविणेकामी प्रशासनास मेसर्स टाटा इंजिनिअरींग ॲन्ड लोकोमोटीव्ह कंपनी या कंपनीशी किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीशी*

*सरकारी मान्य दराने निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे. व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.*

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.*

विषय क्र. ७:- उल्हासनगर ५ येथे जलवाहिनी टाकणे कामी प्रशासनास मेसर्स कल्पतरू इंजिनिअरींग या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे बाबत.

*मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-प्राकलनिय दरापेक्षा किती टक्के जास्त आहे?*

*श्री. जवांदे (कार्यकारी अभियंता):-प्राकलनिय दरापेक्षा १५ टक्के जास्त.*

*मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-तर आमचा त्यास विरोध आहे.*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-प्रथम तर प्राकलनिय दरापेक्षा ३९ टक्के जास्त दर होते.*

*मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-तो काहीही लिहील.*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):- प्रथम तर प्राकलनिय दरापेक्षा ३९ टक्के जास्त दर होते. म्हणुन ते मान्य करता आले नाही म्हणुन महापालिकेतर्फे पाईप खरेदी करून हे काम करून घेण्याचा आम्ही निर्णय घेतला त्यासाठी निविदा मागविण्यांत आल्या होत्त्या. प्राप्त झालेल्या निविदा मधील दर हे ७८ ते ८० टक्के जास्त आहेत, म्हणुन आम्हाला विचार करावा लागला की दोन्ही कडुन भाव जास्त आहेत. दोन्ही कडु न आम्ही प्रयत्न केले परंतु त्यात आम्हाला सफलता मिळाली नाही.*

*श्री. जवांदे (कार्यकारी अभियंता):-पाईपची क्वालिटी सांगा. या दर्जाच्या पाईपांचे दर ६८ टक्के जास्त आहेत.*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-यासाठीचे आम्ही कल्पतरू इंजिनिअर्स यांच्याशी वाटाघाटी करून प्राकलनिय दरापेक्षा १५टक्के जास्त दरास स्विकृती दिली. कारण आजच्या दराने कुणीही काम करणार नाही. या दराने काम दिले तरीही महापालिकेस फायदेशिर ठरेल कारण आजचे बाजारभाव पहा. दुसरी गोष्ट अशी की, आम्ही जे प्राकलन तयार केले होते ते डी.एस. आर. २००२-२००१च्या आधारावर प्राकलन तयार केले होते. प्रत्येक वर्षी १० टक्के वाढ देणे गृहीत धरले तरी ३० टक्केच्या वर जातात.*

*मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-कोणत्त्याही मंजुर सहकारी संस्थेस हे काम दिले जावे.*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-*शासन परिपत्रकानुसार मजुर सोसायटीस त्यांना ५ लाखा पर्यंतच्या मर्यादेतच काम करायचे आहे.

*मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-* १० लाखापर्यंतचे काम करण्यास आपणास अधिकार आहेत ना त्याचा आपण का वापर करत नाहीत.

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-*या कामाचे तुकडे करता येणार नाहीत. जर आपणास वाटत असेल की हे काम व्हावे तर आपण आयुक्तांना १० लाखा पुढील अधिकार मला दया, त्यामुळे स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता भासणार नाही. परंतु हया कामाचे मी दोन तुकडे करू शकत नाही. तसे केले तर मी चुक करेन, प्राकलनिय दराने काम करण्यास कुणीही तयार नाही, कुणी तयार असेल तर पहा, महापालिकेस फायदा होत असेल तर.....

*मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-*आम्हाला तांत्रिक ज्ञान नाही. यांचे दर वाजवी आहेत किंवा नाहीत ते आम्हाला माहित नाही. आपण जर खात्री देत असाल की ते दर वाजवी आहेत व स्विकारण्यामध्ये धोका नाही तर विचार करता येईल.
*मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-*या कामाची शहरास आवश्यकता आहे. सर्वांना आवश्यकता आहे. आपण बरेच प्रयत्न करीत आहात की महापालिकेला फायदयाचे व्हावे तरीही आपणासही खात्री नाही की, ठेकेदाराने दिलेले दर योग्य आहेत किंवा कसे?एकदा आम्ही जर अयोग्य दराला स्विकृती दिली तर खटल्याला किंवा न्यायालयाच्या कार्यवाहीला आम्हाला सामोरे जावे लागेल.

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-*दर स्विकृत करणे माझ्या मताप्रमाणे काही हरकत नाही मी प्रशासनातर्फे खात्री झाल्याशिवाय आपणांसमोर प्रस्ताव आणणार नाही. जेव्हा मला दर योग्य व वाजवी वाटतात तेव्हाच मी तो प्रस्ताव स्थायी समितीपुढे आणतो. आपण जर हे दर स्विकृत केले आणि याबाबत जर भविष्यात कोर्टात दावा किंवा खटला दाखल झाला तर ती माझी जबाबदारी राहील आणि मी योग्यत-हेने बाजु मांडु शकतो. परंतु जर पुढे कोर्टकेस झाली तर मला एकटयाला त्यास जबाबदार धरले जाईल मी काही माझ्या घरचे काम करत नाही पाहिले मला अशी खात्री वाटत होती की, महापालिकेने स्वत: पाईप खरेदी करून हे काम केले तर कमी खर्चात होईल त्यासाठी प्रयत्न केले परंतु ते यशस्वी झाले नाहीत. यासाठी ज्या निविदा मागविल्या त्या प्राकलनिय दरापेक्षा जवळ जवळ ७९टक्के जास्त दराच्या आल्या, ही जलवाहीनी टाकली नाहीतर शहरातील काही भाग पाण्यापासून वंचित राहील.

*मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-*आमचे म्हणणे आहे की, पुर्न निविदा मागविल्या पाहिजेत.

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-*मी माझे निवदेन इतिवृतांतात नोंदविले आहे. माझी प्राथमिक जबाबदारी असते. पाईप खरेदी करायचे झाले तरी त्यांचे दर प्राकलनिय दरापेक्षा ७० टक्के जास्त होतात.

*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-*आयुक्तांच्या निवेदनावर सदरचा० प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ७:- उल्हासनगर ५ येथे जलवाहिनी टाकणे कामी प्रशासनास मेसर्स कल्पतरू इंजिनिअरींग या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उपरोक्त विषयांकित ठिकाणी उंच जलकुंभ करिता उद्धरण वाहिनी पर्यायी वितरण व्यवस्था करणे करिता रू ९९४७००/- चे प्रकलन तयार करण्यात आले होते. सदर कामासाठी दि २२/१/०३ च्या दैनिक उल्हास विकास या वर्तमान पत्रात रितसर जाहिरात देऊन निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या .त्यानुसार एकुण दोन निविदा दि १०/२/०३ रोजी ठेकेदारांनी महानगरपालिकेस सादर केल्या

कार्यकारी अभियांता (पा.पु),सहाय्यक मुख्य लेखा परिक्षक , लेखा अधिकारी, शाखा अभियांता यांचे उपथितीत दि १७/२/०३ रोजी निविदा उघडण्यात आल्या .(१) मेसर्स संध्या कंस्ट्रक्शन या ठेकेदारोनी सादर केलेल्या निविदेतील लखोटा क्र १) मध्ये विक्रिकर प्रमाण पत्र उपलब्ध नसल्याने त्यांची निविदा उघडण्यात आली नाही.(२) मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स हे निविदा अटी व शर्ती नुसार पात्र ठरत असल्याने त्यांची निविदा उघडण्यात आली त्यात अदाजीत किंमती पेक्षा ३९ टकके जास्त (i.e. रू १३८२६३३/-) दर नमूद केलेले होते. सदरचे दर मान्य करण्यात आले नाही.

यावर उपाय म्हणुन महानगरपालिके तर्फे साहित्य पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला. व साहित्य पुरवठा करण्याबाबत निविदा प्रसिदध करण्यात आली. परंतु सदर निविदे प्रमाणे ४५० मी मी व ३५० मी मी व्यासाच्या पोलादी पाइपचे दर ७८ टक्के ते ६९ टक्के जास्त प्राप्त झाले. सदरचे दर ही मान्य करण्यात आले नाही .वरिल दोन्ही बाबींचा विचार करता निविदेतील अटी व शर्ती नुसार पात्र ठरत असलेल्या मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स यांना दि १७/५/०३ रोजी वाटाघाटी साठी बोलावले असता त्यांनी प्राकलनाच्या किंमती पेक्षा १५ टक्के जास्त या दराने काम करण्याची तयारी दर्शवली आहे.

प्रस्तावीत प्राकलन किमती पेक्षा १५ टक्के जास्त या प्रमाणे अंदाजीत किमत रू ११४३९०४/- इतकी होत आहे सदरचे दर योग्य वाटत असून प्रचलित बाजार भावानूसार वाजवी आहे त्यास मान्य करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे

तरी सदर प्रस्तावास मा. स्थायी समितिची मान्यता मिळणेसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३४
दिनांक:-९.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्रीमती. भारती छाब्रिया

अनुमोदकाचे नाव :- श्री. सुर्यकांत लिंगे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावात प्रशासनाने नमुद केलेल्या कारणामुळे उल्हासनगर ५, येथे उपविभागीय कार्यालय येथील उंच जलकुंभ करिता उद्धरण वाहिनी पर्यायी वितरण व्यवस्था करणे करिता ४५० मि.मि. ते ३५० मि.मि. व्यासाची जलवाहिनी टाकणे कामी प्रशासनास वाटाघाटी अंती मेसर्स कल्पतरू इंजिनिअरींग या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ८ वाचून दाखवितात.***

विषय क्र. ८:- उल्हासनगर ४ येथे जलवाहिनी टाकणे कामी प्रशासनास मेसर्स किरण बी. जाधव या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे बाबत.

***मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-विषय क्र. ७ वर आयुक्तांनी दिलेल्या निवेदनानुसार सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.***

विषय क्र. ८:- उल्हासनगर ४ येथे जलवाहिनी टाकणे कामी प्रशासनास मेसर्स किरण बी. जाधव या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उपरोक्त विषयांकित ठिकाणी ३५० मी.मी ते ८० मी मी व्यासाची पोलादी /बीडाची जलवाहिनी टाकणे करिता रू.९८६०००/- चे प्राकलन तयार करण्यात आले होते. सदर कामासाठी दि २२.१.०३ च्या दैनिक उल्हास विकास या वृतपत्रात रितसर जाहिरात देऊन निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार दि १०.२.०३ रोजी दोन ठेकेदारांनी निविदा सादर केल्या. कार्यकारी अभियाता (पा.पु),सहायक मुख्य लेखा परिक्षक ,लेखा अधिकारी यांचे उपस्थितीत दि १७.२.०३ रोजी निविदा उघडण्यात आल्या.

१) श्री धनंजय आर निकम या ठेकेदारांनी सादर केलेल्या निविदेच्या लखेटा क्र १) मध्ये विक्रीकर नोदणी प्रमाण पत्र ,आयकर निपटारा प्रमाण पत्र व अनुभवाचा दाखला उपलब्ध नसल्याने त्यांची निविदा उघडण्यात आली नाही.

२) मेसर्स. किरण बी जाधव यांनी सादर केलेली निविदा ,निविदेतील अटी व शर्ती नुसार पात्र ठरत असल्याने त्यांची निविदा उघडण्यात आली. त्यात अंदाजित किमतीपेक्षा ४८.५ टक्के जास्त (i.e.रू १४६४२१०/-) दर नमुद केलेले होते. सदरचे दर मान्य करण्यात आले नाही.

यावर उपाय म्हणुन महानगरपालिके तर्फे साहित्य पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला व साहित्य पुरवठा करण्याची निविदा प्रसिध्द करण्यात आली. परंतु सदर निविदे प्रमाणे ३५०मी मी व्यासाच्या एम.एस.पाईपचे दर ८७ टकें जास्त आहे. तरी सदरचे दर ही मान्य करण्यात आले नाही.

वरील दोन्ही बाबींचा विचार करता निविदेतील अटी व शर्ती नुसार पात्र ठरत असलेल्या मेसर्स. किरण बी जाधव यांच्याशी वाटाघाटी करून त्यांनी दिलेला दर प्राकलनाच्या किंमती पेक्षा १५ टक्के जास्त (i.e. रू ११३३९००/-) करण्याचे मान्य केले आहे. सदरचे दर योग्य वाटत असुन प्रचलित बाजारभावा नुसार वाजवी आहे. त्यास मान्य करण्या बाबत शिफारस करण्यात येत आहे.

तरि सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिति ठराव क्र. ३५ दिनांकः-९.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा
अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी

ही स्थायी समिती वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर ४ येथे पंचशिल नगर, आम्रपाली नगर, साईबाबा नगर करिता ३५० मि. मि. ते ८० मि. मि. व्यासाची जलवाहिनी टाकणे कामी प्रशासनास वाटाघाटी अंती मेसर्स किरण जाधव या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने
सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ९ वाचून दाखवितात.*

विषय क्र. ९:- उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागाअंतर्गत तीन विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

*माहिती नोंद करायची आहे.*

*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

विषय क्र. ९:- उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागाअंतर्गत तीन विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

**mYgkluxj 'kgjkr egkuxjikfydk v[kR;kfjrhy ifjljklkBh ik.kh iqjoBk foHkkxkarZxr fufonk ekxowu [kkyhy dkes eqacbZ izkafrd egkuxjikfydk vf/kfu;e 1949 ps dye 73¼M½ vUo;s eatqj dj.;kr vkysyh vkgsr-**

| अ. | कामाचे नाव | अंदाजित प्राकलन रक्कम | मा..आयुक्त यांची मंजुरी दिनांक | करारनामा दिनांक | कार्यादेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १) | आनंदनगर पंपिग स्टेशन येथे पंप व इतर मशिनरीचा पुरवठा उभारणी व कार्यान्वित करणे<br>मेसस सॅन इंजिनिअरींग कंपनी,औरंगाबाद | रू७९२१५०/- | २७.५.०३ | ७.६.०३ | १२.६.०३ |
| २) | आझादनगर येथे पंपिग मशिनरीचा पुरवठा,उभारणी व कार्यान्वये करणे(फेर निविदा)<br>मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स,मुंबई | रू८७७९७/- | ८.४.०३ | २९.५०३ | १२.६.०३ |
| ३) | सिवेज पंपिग स्टेशन क्र २ शांती नगर व क्र ३ नेहरूनगर चालविणे ,देखभाल व दुरूस्ती करणे.<br>मेसर्स ओम इंडस्ट्रीयल इंजि. सर्व्हि,डोंबिवली | रू८९९५२०/- | ४.६.०३ | २१.६.०३ | |

उपरोक्त कामासाठी रितसर निविदा मागवुन तुलनात्मक न्युनतम दर सादर करणा-या निविदाकारास मा.आयुक्त यांचे मंजुरीने व करारनाम्यानुसार काम सुरू करण्याचे कार्यालयीन आदेश देण्यात आलेले आहेत. तरी सदर बाब माहितीसाठी स्थायी समितीसमोर सविनय सादर करण्यात येत आहे

स्थायी समिती ठराव क्र. ३६ दिनांकः-९.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. सुर्यकांत लिंगे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागाअंतर्गत वरील ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १० वाचून दाखवितात.

विषय क्र. १०:- श्री. ढेणवाल बनवारी, आरोग्य समितीचे तत्त्कालिन सभापती यांना दिनांक २३.१.२००१ ते २२.१२.२००१ पर्यंत वाहनभत्त्ता अदा करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>अशा प्रकारचा श्री. प्रमोद टाले यांचा प्रस्ताव याआधी पारीत केला आहे ना?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>कित्त्येक दिवसापासुन हा प्रस्ताव आणला नाही आता हा प्रस्ताव आणण्यामध्ये औचित्त्य काय आहे? कारण काय आहे ते समजत नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>त्यांनी स्वतःची गाडी वापरली नसती तर महापालिकेने त्यांना गाडी दयावयास पाहिजे होती.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>त्यांची स्वतःची गाडी नव्हती.

<u>काही सदस्य :-</u>हा प्रस्ताव नाकारला जावा.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते नाकारण्यांत येत आहे.

विषय क्र. १०:- श्री. ढेणवाल बनवारी, आरोग्य समितीचे तत्त्कालिन सभापती यांना दिनांक २३.१.२००१ ते २२.१२.२००१ पर्यंत वाहनभत्त्ता अदा करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

महानगरपालिकेच्या सन-१९९७ ते २००३ या कालावधीमधील दिनांक २३.१.२००१ ते २८.२.२००२ या कालावधीमधील श्री. ढेणवाल बनवारी हे तत्त्कालीन आरोग्य समितीच्या सभापती पदावर कार्यरत होते.

उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ३०.४.१९९७ अन्वये विशेष समिती सभापती यांना त्यांचे कार्यकालावधीमध्ये चार चाकी वाहन देणे ऐवजी प्रति माह रूपये १५,०००/- वाहन भत्त्ता देय आहे. मात्र स्थायी समिती ठराव क्रमांक ६ मधील अटी व शर्तीनुसार संबंधिताकडे स्वतःचे वाहन असेल तरच वाहन भत्त्ता देय आहे. आजमितीस संबधिताकडे वाहन नसेल तर ज्या दिवशी वाहन खरेदी केले जाईल. त्या दिवसापासुन वाहन भत्त्ता मिळणेस संबंधित पात्र रहतील.

उपलब्ध कागदपत्रानुसार श्री. ढेणवाल बनवारी, यांचे नावावर सदरचे वाहन झाले नंतर २३.१२.२००१ पासून २२.२.२००२ पर्यंत वाहन भत्ता अदा करणेत आलेला आहे. श्री. ढेणवाल बनवारी, यांनी दिनांक २८.४.२००३ चे पत्रानुसार २३.१.२००१ ते २२.२.२००२ या संपुर्ण कार्यकालावधीसाठी वाहन भत्ता मिळणेत यावा असा विनंती अर्ज केलेला आहे. स्थायी समिती ठराव क्रमांक १२९ दिनांक ३१.३.२००३ अन्वये स्थायी समितीने तत्त्कालिन प्रभाग समिती सभापती श्री. प्रमोद टाले यांची याच स्थितीमधील मागणी विशेष बाब म्हणून संपुर्ण कार्यकालावधीचा वाहन भत्ता देणेस मान्यता दिलेली आहे. महासभा ठराव क्र. ८ दिनांक २५.४.२००२ अन्वये हा निर्णय कायम करणेत आलेला आहे.

श्री. प्रमोद टाले यांचे धर्तीवर आपली मागणी मान्य करणेची विनंती श्री. ढेणवाल बनवारी यांनी केलेली आहे.

श्री. ढेणवाल यांना पुढीलप्रमाणे वाहन भत्ता देय असेल

दिनांक २३.१.२००१ ते ३१.१.२००१--९ दिवस रूपये ०,०४,३५५/-
दिनांक १.२.२००१ ते ३०.११.२००१- १० महिने रूपये १,५०,०००/-
दिनांक १.१२.२००१ ते २२.१२.२००१- २२ दिवस रूपये ०,१०,६४५/-

श्री.ढेणवाल बनवारी, आरोग्य समितीचे तत्त्कालीन सभापती यांना दिनांक २३. १.२००१ ते २२.१२.२००१ पर्यंत एकुण वाहन भत्ता रूपये १,६५,०००/- अदा करणेस मंजुरी मिळणेस मा. स्थायी समितीसमोर प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ३७ दिनांक:-९.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील कारणास्तव स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांक ३०.४.१९९७ च्या धर्तीवर अटी व शर्ती मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी श्री. ढेणवाल बनवारी यांना विशेष बाब म्हणुन त्यांच्या कार्यकालात आरोग्य समिती सभापती पद धारण केलेल्या कालावधीचा वाहन भत्ता अदा करणेस मान्यता देत नाही.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ११ वाचून दाखवितात.

विषय क्र. ११:- उल्हासनगर ४ येथील वॉटर सप्लाय ऑफीस, लालचक्की ते मानेरा
जंक्शन पर्यंत खोदलेला रस्ता पुर्ववत करणेकामी प्रशासनास मेसर्स ज्योती
कंन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत
करणे बाबत.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-हया रस्त्याचे काम करताना हे लक्षात ठेवले नव्हते का की, पाण्याची लाईन टाकण्यासाठी हा रस्ता खोदला जाईल?

श्री. जवांदे (कार्यकारी अभियंता):-खोदलेला रस्ता पुर्ववत करणेकामीचा प्रस्ताव आहे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-दुसरे रस्ते घेणार आहात का?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-खोदलेल्या रस्त्यापोटी भरपाई मिळेल का?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ११:- उल्हासनगर ४ येथील वॉटर सप्लाय ऑफीस, लालचक्की ते मानेरा
जंक्शन पर्यंत खोदलेला रस्ता पुर्ववत करणेकामी प्रशासनास मेसर्स ज्योती
कंन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत
करणे बाबत.

प्रस्तावना

उपरोक्त विषयानुषंगाने उल्हासनगर-४ येथील वॉटर सप्लाय ऑफिस लाल चक्की ते मानेरा जंक्शन पर्यत पाणी पुरवठा विभागाने पाण्याची लाईन टाकणेकरिता खोदलेली रस्त्यातील पटटी पावसाळयापूर्वी आणि पावसाळयानंतर दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर रस्त्याचे काम आय आर डी पी योजनेतून करण्यात आले असून डांबरीकरणाचे काम पुर्ण झालेले आहे. सदर रस्त्याची मा. आयुक्तांनी प्रत्यक्ष पाहणी करून सदर रस्त्यात पाणी पुरवठा विभागाने खोदलेली पटटी डांबरीकरणाने भरण्याच्या सुचना दिलेली आहे. त्यामुळे सदर रस्त्याची पावसाळयापुर्वी दुरूस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यानुसार संबधित कनिष्ठ अभिंयता यांनी प्रत्यक्ष पाहणी करून त्याप्रमाणे सदर रस्ता दुरूस्तीच्या कामाचे प्राकलन तयार केले असून सदर प्राकलनाची किंमत रू. १,१८,०००/- इतकी होत आहे. सदर काम महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातील लेखा शिर्ष C-5(ii) P-I मधून करावयाचे आहे. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे वॉटर सप्लाय ऑफिस लालचक्की ते मानेरा जंक्शन या एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमामधील सदर रस्त्याचे काम पुर्णत्त्वास आलेले असून या कामाचे ठेकेदार मे ज्योती कन्स्ट्रक्शन यांचे कडून उक्त खोदलेल्या पटटीचे काम करून घेतल्यास त्यांच्या निविदा १८.२०% (डी एस आर १९९९-२०००) कमी दरामुळे या कामाच्या खर्चामध्ये बचत होऊ शकते. तरी सदर कामास करून घेणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम १९४९ कलम ५(२)(२) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळून मे. ज्योती

*कन्स्ट्रक्शन कं. यांचेकडून त्यांच्या उपरोक्त रस्त्याच्या निविदा अटी शर्ती व दराने करून घेण्याकरिता मंजुरी मिळणेस प्रस्तावित आहे.*

स्थायी समिती ठराव क्र. 38 दिनांकः-9.7.2003.

सुचकाचे नाव :-श्रीमती. भारती छाब्रिया

अनुमोदकाचे नाव :- श्री. सुर्यकांत लिंगे

*ही स्थायी समिती वरील प्रस्तावात प्रशासनाने नमुद केलेल्या कारणामुळे उल्हासनगर ४ येथील वॉटर सप्लाय ऑफीस लालचक्की ते मानेरा जंक्शन पर्यंत पाणी पुरवठा विभागाने पाण्याची लाईन टाकणे करिता खोदलेली रस्त्यातील पट्टी पावसाळयापुर्वी व पावसाळयानंतर पुर्ववत करणे कामी प्रशासनास मेसर्स ज्योती कंन्स्ट्रक्शन कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे व अंतर्भूत खर्चास मान्यता देत आहे.*

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १२ वाचून दाखवितात.*

*विषय क्र. १२:-उल्हासनगर १ येथील बाल्कनजी बारी ते मिलन दर्शन अपार्टमेंटच्या समोर सी.सी. पेवमेंट ब्लॉक व फुटपाथ बांधणेकामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.*

*श्री. चिजवानी (शहर अभियंता):-बाल्कनजी बारी येथील हे काम मे. शंकर महादेव कंपनी यांना दिले होते. प्राकलनिय दरापेक्षा ११.०९ टक्के कमी दराने त्यांना ते दिले आहे. शंकर महादेव कंपनीस पेमेंट अदा करायचे आहे. मुळ प्राकलनामध्ये हे काम नव्हते हे अतिरिक्त प्राकलन आहे.*

*मा. सदस्या श्रीमती. बामणकर नंदिनी:-ऐवढा खर्च ऐवढया लहान तुकडयासाठी अगोदरच त्यांनी लिहावयास पाहिजे होते.*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मुळ प्राकलनामध्ये हे काम नव्हते.*

*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*विषय क्र. १२:-उल्हासनगर १ येथील बाल्कनजी बारी ते मिलन दर्शन अपार्टमेंटच्या समोर सी.सी. पेवमेंट ब्लॉक व फुटपाथ बांधणेकामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.*

प्रस्तावना

उल्हासनगर-1 येथील बालकनजी बारी रोड मिलन दर्शन अपार्टमेंट च्या समोर सी सी पेव्हमेंट ब्लॉक आणि फुटपथ बांधणे आवश्यक आहे. कारण सदर जागेवर ट्रान्सफार्मर होते. ट्रान्समार्मर हलविल्यामुळे सदर जागा तसीच पडलेली आहे. सदर ट्रान्सफार्मर झुलेलाल मंदिर ते रेड क्रॉस सोसायटी दरम्यान होते. सदर रस्ता सिमेंटीकरण केलेला आहे. या जागेवरील ट्रान्सफार्मर हलविल्यामुळे त्या जागेवर सी सी पेव्हमेंट ब्लॉक बांधणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर रस्ताची त्याठिकाणी रूंदी वाढेल. तसेच रस्त्यालगत येण्यासाठी फुटपाथ बांधणेही आवश्यक आहे. त्यानुसार संबंधीत कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी सदर कामाचे प्राकलन तयार केले असून सदर प्राकलनाची अंदाजित किंमत रू. 1,10,700/- इतकी होत आहे.

*सदर काम महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातील लेखा* C-5(ii) P-I *मधुन करावयाचे आहे. सदर लेखा शिर्षात तरतूद उपलब्ध आहे. तसेच सदरचे काम झुलेलाल ते रेडक्रॉस सोसायटी कंत्राटदार मे शंकर महादेव कंपनी यांना दिले होते. सदर काम आता पूर्ण झालेले आहे. सदर काम करून घेणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५(२)(२) अंतर्गत मजुरी मिळणेकरिता स्थायी समिती सभेपूढे ठेवणेसाठी आदेशार्थ सविनय सादर.*

तरी हे काम मे शंकर महादेव कंपनी यांना त्यांनी याअगोदर केलेल्या दराने 11.07 कमी निविदाच्या किंमतीवर त्यांच्या अटी व शर्तीनुसार करून घेण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. 39 दिनांक:-9.7.2003.

सुचकाचे नाव :-श्रीमती. नीता आहुजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

*ही स्थायी समिती वरील प्रस्तावात प्रशासनाने नमुद केलेल्या कारणामुळे उल्हासनगर १ येथील बाल्कनजी बारी, मिलन दर्शन अपार्टमेंटच्या समोर सी.सी. पेवमेंट ब्लॉक व फुटपाथ बांधणेकामी प्रशासनास मेसर्स शंकर महादेव कंपनी या कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.*

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १३ वाचून दाखवितात.*

*विषय क्र. १३:- स्वामी शांतीप्रकाश प्राकृतिक चिकित्सा योगा केंद यांना उल्हासनगर-५ येथील महापालिकेच्या समाज मंदीराची जागा वापरणेकामी परवाना देणे बाबत.*

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-समाजमंदीर बांधण्याचा उददेश काय आहे हे सांगितले तर बरे होईल.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-सेवाभावी कार्यासाठी, याच प्रकारच्या कामासाठी असते.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-मलाही माहिती नव्हती.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-आपणास माहित नव्हते? घाबरू नका. आपणांस जास्त माहिती मिळाली.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-चांगल्या कामासाठी चांगली वास्तु देत आहोत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १३:- स्वामी शांतीप्रकाश प्राकृतिक चिकित्सा योगा केंद्र यांना उल्हासनगर-५ येथील महापालिकेच्या समाज मंदीराची जागा वापरणेकामी परवाना देणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील मुख्य विश्वस्त स्वामी शांती प्रकाश प्राकृतीक चिकीत्सा (योगकेंद्र) यांनी मोहीत अपार्टमेंट जवळील बॅरेक कं १९७१ ओ.टी सेक्शन उल्हासनगर-५ येथील महापालिकेची समाज मंदिराची जागा वापरात मिळणेसाठी मागणी केली आहे.

सदरचे न्यास(ट्रस्ट) नोंदणीकृत असुन त्यांचा नोंदणी कंमाक एमएचई/१३६४ ठाणे दि.२९/६/१९९३ असा आहे.

सदर संस्थेमार्फत मोफत औषध वितरण व निसर्ग उपचार इ. सुविधा नागरीकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या न्यासाचे हे सेवाभावी कार्य विचारात घेता सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी शर्तीस अधिन राहुन सदर न्यायास तीन वर्ष मुदतीने मोफत वापरासाठी (दुपारी २.०० वाजेपर्यंत) देणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ चे अन्वये स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पुढील अटी व शर्तीवर प्रस्तावित करीत आहे.

अटी व शर्ती

१. सदर संस्थेस तीन वर्षे मुदतीने मोफत वापरासाठी जागा देण्यात येत आहे.
२. सदर संस्थेचे शहरवासियांना औषधोपचार मार्गदर्शन निसर्ग, उपचार, योगसाधना या कार्यासाठीच वापर करण्याचा आहे.

३. रूग्णांकडुन अगर लाभार्थी कडुन प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष मुल्य आकारण्याची नाही. जागा सकाळी आठ ते दुपारी दोन या वेळेतच जागेचा वापर करता येईल.
४. ज्या कारणासाठी जागा दिली आहे त्याच कारणासाठी संस्थेने वापर करण्याचा आहे.

५. मुदतीनंतर जागा ताब्यात देणेची आहे. मुदत वाढवुन देणे अगर न देणे महापालिकेच्या मर्जीवर अवलंबुन राहील.
६. भाडेकरू म्हणुन या संस्थेस हक्क अगर वहिवाट सांगता येणार नाही.
७. प्रश्नाकिंत जागेमध्ये कोणत्त्याही राजकीय स्वरूपाचे अगर समाजात तेढ येईल असे कोणतेही काम करावयाचे नाही.
८. जात, धर्म, वंश, लिंग असा कोणताही भेदभाव न ठेवता सर्वांना समान वागणुक व उपचार करावयाचे आहेत.
९. इमारतीच्या परिसराची स्वच्छता राखणे ही जबाबदारी संस्थेची आहे.
१०. याशिवाय वेळोवेळी महापालिकेकडुन जे आदेश दिले जातील. त्याचे बिनशर्त पालन करण्याचे आहे.
११. मुदतीपुर्वी जागा काही कारणास्तव महापालिकेस आवश्यक असेल तर एक महिन्याची पुर्व सुचना देवून जागा महापालिका ताब्यात घेवू शकेल याबददल हर हरकत घेता येणार नाही. तसेच याबददल नुकसान भरपाई मागता येणार नाही.
१२. वरील बाबतीत संस्थेने स्वखर्चाने योग्य किंमतीचे मुद्रांक शुल्क कागदावर अधिनियमात तरतुद असल्याप्रमाणे करार पत्र पुरे करून देण्याचे आहे.
संस्थेची विनंती खालील अटी व शर्तीवर मान्य करावी अशी शिफारस आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४० दिनांकः-९.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील मुख्य विश्वस्त स्वामी शांतीप्रकाश प्राकृतिक चिकित्सा योगा केंद्र यांना मोहीत अपार्टमेंट जवळील बॅरेक क्र. १९७१, ओ.टी. सेक्शन, उल्हासनगर-५ येथील महापालिकेच्या समाज मंदीराची जागा वापरणेकामी आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्तीवर तीन वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १४ वाचून दाखवितात.

विषय क्र. १४:- चहा विक्रिसाठी श्री. सुरेश करमचंद शादीजा यांना महापालिकेची जागा भाडयाने देणे बाबत.

हा प्रस्ताव प्रशासनाकडुन मागे घेण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-प्रस्ताव मागे घेण्याचे कारण काय?

मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वे:-प्रस्ताव मागे घेण्याचे कारण काय ते सांगा ना?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते मागे घेण्यात येत आहे.

विषय क्र. १४:- चहा विक्रिसाठी श्री. सुरेश करमचंद शादीजा यांना
महापालिकेची जागा भाडयाने देणे बाबत.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १५ वाचून दाखवितात.

विषय क्र. १५:- महानगरपालिकेतर्फे टॅकरव्दारे पाणी पुरवठा
करणेसाठी दर आकारणे बाबत.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-इतके गरीब लोक आहेत की, टॅकर व्दारे केलेल्या पाण्याचा आकार देवू शकणार नाही. म्हणुन हा प्रस्ताव नाकारला जावा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, जेव्हा मी श्वेतपत्रिका सादर केली होती महासभेने तिला स्विकृती दिली आहे. त्यास आपण ना मंजुर करू शकत नाही.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-आपण पाणी पुरवठयामध्ये काही सुधारणा करून दयाल तरच, शहरामध्ये भाडयाच्या पाणी टॅकरची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. श्वेतपत्रिकेमध्ये तुम्ही लिहिले आहे की, पाणी पुरवठयामध्ये आम्ही सुधारणा करू परंतु अदयाप त्यामध्ये काही सुधारणा केली नाही. अजुनही प्रभागात २५-२५ टॅकर जातात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-आपण हा प्रस्ताव मंजुर केला नाही तर महासभेच्या निर्णयाच्या विरूध्द होईल.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-टॅकर भाडे वसुल केले नाही तर महापालिकेचे करोडो रूप्याचे नुकसान होईल. टॅकर भाडे वसुल केल्यानंतर ज्यांना पाण्याची खरोखरच आवश्यकता आहे तेच भाडयाने टॅकर घेतील, टॅकरभाडे आकारल्यास महापालिकेचे उत्पन्न वाढेल म्हणुन हा प्रस्ताव सर्व संमतीने पारीत केला पाहिजे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-नळाव्दारे पाणी दया नंतरच आपण टॅकरव्दारे केलेल्या पाण्यास दर आकारा, भलेही ३०० रू. दर आकारा.

मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-पहिले टॅकरव्दारे फुकट पाणी मिळत होते आता त्यास पैसे दयावे लागणार......

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-जलकुंभाव्दारे ५ मिनिटामध्ये टॅकर भरला जातो.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-झोपडपटटयामध्ये ५००० लिटर क्षमतेच्या पी.व्ही.सी टाक्या बसविल्या आहेत. त्यामध्ये टॅकरचे पाणी भरून पाणी पुरवठा केला तर त्यास शुल्क आकारणार तर नाही ना?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-कॅम्प नं. १ ,२ ,३ मध्ये जेवढे पाण्याचे टॅकर पुरविले जात होते. त्यांची संख्या कमी झाली आहे. व कॅम्प ४ व ५ मध्ये पाण्याच्या टॅकरची संख्या दुप्पट झाली आहे. माझ्या प्रभागात पहिले रोज ४० टॅकर

पुरविले जात होते आता त्यांची संख्या १० वर आली आहे म्हणुन हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा किंवा नाकारला जावा.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-टॅकरव्दारे केलेल्या पाणी पुरवठयापोटी टॅकर भाडे आकरले पाहिजे पाहिजे तर या प्रस्तावावर मतदान घेतले जावे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-सोसायटया, बंगले यांना टॅकरव्दारे दिलेले पाणी फुकट देता येणार नाही. झोपडपटटयांमध्ये निशुल्क पाणी पुरवठा केला जाईल.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-मी इमारतीमध्ये राहातो. टॅकरव्दारे घेतलेल्या पाण्यापोटी मला आकार भरावा लागणार व माझ्या बाजुला झोपडे आहे. त्यामध्ये राहणा-यास टॅकरव्दारे फुकट पाणी मिळावे हे बरोबर नाही. असे का? त्यांच्याकडे लाईट आले टेलिफोन आहे. पाण्याचा आकार भरण्यास पैसे नाहीत का?

मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वे:-झोपडपटटी धारकांची आर्थिक स्थिती कमकुवत असते त्यांच्याकडे पैसे नसतात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-झोपडपटटीमध्ये राहणा-यांची पाण्याची गरज कमी असते त्यामानाने फ्लॅटमध्ये राहणा-यांची पाण्याची गरज जास्त असते.

मा. सदस्या श्रीमती. किरण माने:-अजुनही पाण्याची समस्या आहे हा विषय पुढे ढकला.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-महासभेने मंजुर केलेआहे. स्थायी समिती नाकारू शकते का?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-महासभेचे इतिवृत्त लक्षपुर्वक वाचा. तसेच टॅकरची स्थिती पहा, टॅकरव्दारे पुरविण्यांत येणारे पाणी हे घाणेरडे व गढुळ व दुषीत असते. लाचारीच्या स्थितीत त्यांचा उपयोग करावा लागतो म्हणुन जोपर्यंत शहरातील पाणी पुरवठयाच्या स्थितीत सुधारणा होत नाही. तोपर्यंत टॅकरव्दारे केल्या जात असलेल्या पाणी पुरवठयावर काही शुल्क आकारले नाही तर बरे होईल. फ्लॅटवाले पण वर्षाला सरासरी १२०० रू. पाणी बिल भरतात. माझ्या बहिणीच्या इमारतीत मी सकाळीच गेले होते तेथे पाण्याचा टॅकर गेला होता. त्याचे पाणी ऐवढे घाणेरडे असते की त्याचा नाईलाजाने वापर करावा लागतो. पाणी बिल भरूनही त्यांना टॅकरचे बिल भरावे लागते.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-आता हा प्रस्ताव पुढे ढकलुन आयुक्त साहेबांशी विचार विमर्श करून पुन्हा कधी आणला जाईल. कारण की आपसामध्ये भांडण्यामध्ये काही फायदा नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-सर्व पक्षांच्या नेत्यांना बोलावुन चर्चा करा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-महासभेत तेच तर केले होते ना?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-साहेब, गोल मैदान परिसरातील २-३ इमारतीना आपण भेट देवून पहा. तेथे पाणी येत नाही. तुम्हाला महापालिका सांभाळायची आहे पण आम्हाला लोकांना सांभाळायचे आहे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-आयुक्त साहेबांचे मत घेतले जावे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-पाण्याचे टॅकर निशुल्क पुरविल्याने अशा टॅकर मागणीची संख्या वाढेल, त्यावरील खर्च वाढेल, या महापालिकेची आर्थीक स्थिती पहाता टॅकरव्दारे केल्या जाणा-या पाणी पुरवठ्यावर शुल्क आकारले पाहिजे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-जलवाहिन्या टाकल्यावर बरे होईल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-या प्रस्तावाचे काय करायचे आहे? प्रस्ताव पुढे ढकलायचा?

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-आयुक्त साहेबांना विचारा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):- निर्णय सभागृहाने घ्यायचा आहे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-जोपर्यंत पाणी पुरवठ्याच्या स्थितीत सुधारणा होत नाही. तोपर्यंत हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-सर्वानुमते?

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-सर्वानुमते का? सुधारणा करून आणता का? कधी पर्यंत आणाल?

हा प्रस्ताव पुढे ढकलण्यास आमचा विरोध आहे. आपण निर्णय घ्या.

काही सदस्य :-सदरचा प्रस्ताव नाकारण्यांत यावा.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-सदरचा प्रस्ताव मतदानास टाका.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-मी सदरचा प्रस्ताव मतास टाकते.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे सदस्य सदरचा प्रस्ताव मंजुर करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

१. श्री. रामदास उमाप
२. श्रीमती. माने किरण
३. श्रीमती. सुर्वे जयश्री
४. श्रीमती. बामणकर नंदीनी

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे सदस्य सदरच्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत. त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

१. श्रीमती. नीता आहुजा
२. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
३. श्री. तलरेजा विनोद
४. श्रीमती. छाबिया भारती
५. श्री. जेसवानी सतरामदास
६. श्री. पंजाबी नारायण
७. श्री. मोहन बेहरानी
८. श्री. लिंगे सुर्यकांत
९. श्री. ईश्वर पमनानी

१०. पृथ्वी वलेचा
११. श्रीमती. ज्योती कालानी

*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-या प्रस्तावाबाबत बहुमताने खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.*

## *विषय क्र. १५:- महानगरपालिकेतर्फे टॅकरव्दारे पाणी पुरवठा करणेसाठी दर आकारणे बाबत.*

प्रस्तावना

उल्हासनगर ५ाहरासाठी असलेली पाणी वितरण व्यवस्था अत्यंत जूनी,अपु-या क्षमतेची व मोडकळीस आलेली आहे. ५ाहराच्या पाणी पुरवठा योजनेसाठी स्वत:चा स्त्रोत नसल्यामुळे महारा८ट्र औधोगिक विकास महामंडळाकडुन पाणी विकत घेऊन वितरीत केले जाते.म.औ.वि.मं.कडून होणा -या पाणी पुरवठयात वारंवार व्यत्यय निर्माण होत असतो.५ाहरात पुरे६ाा क्षमतेच्या साठवण टाक्या नसल्यामुळे अनेक भागांना बूस्टर पंपाच्या मदतीने पाणी पुरवठा करावा लागतो. विद्युत पुरवठा खंडीत झाल्यानंतर पाणी पुरवठयावर परिणाम होतो. वरील कारणांमुळे निर्माण होण्या-या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी टॅकर द्वारे पाणी पुरवठा करणे अपरिहार्य आहे.महानगरपालिकेतर्फे मागील चार ते पाच व८ाीपासून टंचाई सदृ६य परिस्थिती हाताळण्यासाठी टॅकर द्वारे विना६ाुल्क पाणी पुरवठा केला जात आहे.सध्य परिस्थितीत टॅकरसाठी प्रतिखेप रू 170/- एवढा खर्च महापालिका करत आहे. विना६ाुल्क टॅकर पुरवल्यामुळे सतत मागणी वाढत आहे.

उल्हासनगर वगळता या परिसरातील महानगरपालिका/नगरपालिका टॅकर सेवा स६ाुल्क पुरवित आहेत.टॅकरने पाणी पुरवठा सेवा विना ५ाुल्क असल्याने महानगरपालिकेवर वाढणारा आर्थिक बोजा मोठा असुन या सेवेसाठी ५ोजारी असणा-या महानगरपालिका/नगरपालिका प्रमाणे येथेही वाहतुक खर्च आकारणी केल्यास हा मोठया प्रमाणत असलेला आर्थिक बोजा महानगरपालिकेवर पडणार नाही आणि वाहतुक खर्च आकारणी झाल्यास टॅकर संख्यापण कमी होईल.

महानगरपालिकेने या कामासाठी गेल्या ४/५ वर्षातीत केलेला खर्च पुढील प्रमाणे आहे.

| अ क्र | वर्ष | खर्च |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | १९९८-९९ | रू. ११ लाख |
| २ | १९९९-२००० | रू.५० लाख |
| ३ | २०००-२००१ | रू .५५ लाख |
| ४ | २००१-२००२ | रू. ८४ लाख |
| ५ | २००२-२००३ | रू.१२३ लाख |

उपरोक्त परिस्थिती पाहता या कामाचा खर्च दरवर्षी सारखा वाढत आहे.

शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशाप्रमाणे पाणी पुरवठा "ना नफा ना तोटा"या तत्वावर चालविणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने पाणी पुरवठा योजना क्र २ मंजुर करतांना ठराव क्र १५ दिनांक १९.७.२००२ अन्वये योजना "ना नफा ना तोटा" या तत्वावर चालविण्याची हमी दिलेली होती. शिवाय महानगरपालिकेने दिनांक २०.६.०३ रोजीच्या महासभेत पाणी पुरवठा सेवेवर श्वेतपत्रिका सादर केलेली होती त्यास मंजुरी मिळालेली असुन या श्वेत पत्रिकेत टॅकरने पाणी पुरवठा सेवेवर शुल्क आकारण्याचा प्रस्तावाचा समावेश केला आहे.

उपरोक्त परिस्थितीचा सारासार विचार करता टॅकरद्वारे केल्या जाण-या पाणी पुरवठयावर शुल्क लावणे क्रमप्राप्त ठरते. सदर बाबींसाठी स्थायी समितीचा सभा ठराव क्र २६ दि ४.७.०२ अन्वये अमान्य केलेला दर पुन्हा आकारणे ऐवजी खालील प्रमाणे सुधारीत दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| अ)७००० लिटर क्षमतेचा टॅकर,पाणी व वाहतुक खर्चासह (प्रति खेप) | रू२५०/- |
| ब)१०,००० लिटर क्षमतेचा टॅकर,पाणी व वाहतुक खर्चासह (प्रति खेप) | रू ३००/- |
| क)७००० लिटर क्षमतेचा टॅकर भरून देणे (वाहतुक खर्च वगळता) | रू ७०/- (प्रति टॅकर) |
| ड)१०,००० लिटर क्षमतेचा टॅकर भरून देणे (वाहतुक खर्च वगळता) | रू १००/- (प्रति टॅकर) |

वरील प्रमाणे दर आकारणेसाठी शिफारस करण्यात येत आहे. तरी सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पटलावर ठेवण्यात यावे.

**स्थायी समिती ठराव क्र.** 41 **दिनांकः-9.7.2003.**

सुचकाचे नाव :-श्री. बेहरानी मोहन

अनुमोदकाचे नाव :- श्री. सतरामदास जेसवानी

*ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिकेतर्फे टॅकरव्दारे पाणी पुरवठा करणे कामी वरील विर्निदिष्ट केलेले वाहतुक खर्च आकारणेस मंजुरी देत नाही.*

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**बहुमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १६ वाचून दाखवितात.*

*विषय क्र. १६:- श्री. कुमार चैनानी या संबंधित व्यक्तीशी टाऊन हॉल विकसित बाबत केलेल्या संविदेमध्ये संयुक्त भांडवल खाजगी कंपनी म्हणून रुपांतरास अनुमती देऊन पक्षकार म्हणुन समावेश करणे बाबत.*

*काही सदस्य :-हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-सदरचा प्रस्ताव प्रशासनाच्या वतीने मी मागे घेत आहे.*

*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजातुन वगळण्यांत येत आहे.*

*विषय क्र. १६:- श्री. कुमार चैनानी या संबंधित व्यक्तीशी टाऊन हॉल विकसित बाबत केलेल्या संविदेमध्ये संयुक्त भांडवल खाजगी कंपनी म्हणून रुपांतरास अनुमती देऊन पक्षकार म्हणुन समावेश करणे बाबत.*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १७ वाचून दाखवितात.*

*विषय क्र. १७:- उल्हासनगर येथील कल्याण अंबरनाथ रस्त्यात राधा स्वामी सतसंग हॉलजवळ*

कलवर्ट बांधणे कामी प्राकलनास
प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>पाहिले जो प्रस्ताव आला आहे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>श्री. प्रभुनाथ गुप्ता यांची ब-याच दिवसापासुनची मागणी आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती. बामणकर नंदिनीः-</u>निविदा मागविली आहे का?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>प्राकलनास प्रशासकीय मंजुरीसाठीचा प्रस्ताव आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>या प्रस्तावावरील कामाची अतिशय जरूरी आहे. ब-याच वर्षापासुन हे काम प्रलंबित आहे. हा प्रस्ताव पारीत केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>रस्ता रूंदीकरणकरून कलवर्ट तयार करू शकतो किंवा नाही.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>हे काम होणे जरूरीचे आहे खालील बाजूचे कलवर्ट अतिशय लहान आहे, तेथे पाईप पडलेला आहे. आम्ही अनेक वर्षापासुन त्यामध्ये सुधारणा करत आहोत. आम्हाला हे प्रॅक्टीकल माहित आहे. व शहराच्या हिताचे हे काम आहे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १७:- उल्हासनगर येथील कल्याण अंबरनाथ रस्त्यात राधा स्वामी सतसंग हॉलजवळ कलवर्ट बांधणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेने सन् २००३-०४ अर्थसंकल्प मंजुर करते वेळी ज्या २० कामांना प्रशासकीय मंजुरी दिली आहे. त्यामध्ये अनुक्रमांक ९ वर राधास्वामी सतसंग हॉल जवळील कल्व्हर्टचे काम आहे. सदर कल्व्हर्ट एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांमधील रस्ता क्र. २५ शांतीनगर ते नाका क्र. ८ साईबाबा मंदिर या कल्याण- अंबरनाथ रस्त्यामधील आहे. या रस्त्याचे त्यावेळी रूंदीकरण न झाल्यामुळे सदर काम रद्द केले होते. परंतू या रस्त्यामधील उक्त कल्व्हर्टची अत्यंत आवश्यकता असल्याचे सदर कामाचे प्राकलन त्यावेळेस मे उत्तम इंजिनिअरींग यांनी तयार करून त्यास मंजुरी करिता सादर केले होते. परंतु निधि अभावी व तरतुदी अभावी सदर काम प्रलंबित होते. आता उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे मा. महासभेने अर्थ संकल्पामध्ये सदर कामाकरिता तरतूद ठेवलेली असल्याने मे उत्तम इंजिनिअरींग यांनी तयार केलेल्या या प्राकलनानुसार सदर काम त्यांचे देखरेखी खाली करून घेणे करिता मान्यता मिळणेस तसेच या कामाचे तयार करण्यात आलेल्या रू. २१,७८,६५०/- खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस स्थायी समिती सभेपूढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> 42 <u>दिनांकः-9.7.2003.</u>

सुचकाचे नाव :-श्री. लिंगे सुर्यकांत
अनुमोदकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

*ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर येथील कल्याण अंबरनाथ रस्त्यात राधास्वामी सतसंग हॉलजवळ कलवर्ट बांधणेकामी रू. २१,७८,६५०/- या रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.*

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १८ वाचून दाखवितात.*

विषय क्र. १८:- उल्हासनगर शहरातील विद्युत विभागा अंतर्गत ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

*काही सदस्य :-पास.*

*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

विषय क्र. १८:- उल्हासनगर शहरातील विद्युत विभागा अंतर्गत ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

महानगरपालिकेने खालील दर्शविलेल्या कार्याची निविदा मांगवून किंवा डी.डी. आर, ठाणे यां सुचविलेल्या मजूर कामगार सह सं.लि. यांच्या दराला मंजुरी दिली होती. त्यांच्याशी मागील पंधरा वाडय मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (M) अन्वये करार केलेले आहे.

| अ. क्रं. | कार्याचे नांव | आंदाज पत्रकीय रक्कम रु. | सर्वात कमी दराचे निविदा धारकांच्या/ सोसायटीच्या नांव | दर | मंजुरीच्या दिनांक | कराराच्या दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | उल्हासनगर -३ मधील रामचंद भटीजा चौक येथे हायमास्ट लाईट बसविणे साठी वित्तीय वर्ष ०३-०४ च्या महापौर व उप महापौर निधीतून काम करणे व उल्हासनगर | ८,४१,८२९.७६ | मे. बजाज इ. लि. मुंबई | २८.५ टक्के कमी व ६ टक्के अंदाजपत्रकीय रक्कमेवर अतिरिक्त | २/६/०३ | ११/६/०३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | -५ मधील गांधी रोड चौक येथे हायमास्ट लाईट बसविणे साठी वित्तीय वर्ष ०३-०४ च्या उप महापौर निधीतून काम करणे | | | सूट जर ४५ दिवसाच्या आत बिलाची रक्क्म अदा करण्यात आली. | | |
| २. | उल्हासनगर -५ येथील एस.टी स्टैंड ते शांती प्रकाश भवन बसंत बहार सोसायटी प्रभाग कं. ११ मध्ये रस्त्यावर दिवाबत्ती चे काम करणे | ४,०३,८८४.५० | मे. जाधव एण्ड संस, कल्याण | १७.५६ टक्के कमी | ६/६/०३ | १८/६/०३ |
| ३. | उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालया मध्ये संगणकी करण करणे ठिकाणी विद्युत वायरिंग व उपकरण बसविणे | ५,००,०००/- | मे. जयहिंद मजूर कामगार सह सं.लि. उल्हासनगर | ।ज च्त | २७/५/०३ | २६/६/०३ |

सदर माहिती मा. स्थायी समिती च्या अवलोकनार्थ सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ४३ दिनांक:-९.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील विद्युत विभागाअंतर्गत वरील ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १९ वाचून दाखवितात.*

विषय क्र. १९:- उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर जलअभियंता व विकास अभियंता (विद्युत) पदे निर्माण करणे बाबत.

*काही सदस्य :-पास.*

*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

विषय क्र. १९:- उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर जलअभियंता व विकास अभियंता (विद्युत) पदे निर्माण करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहराची भौगोलिक रचना उंच सखल असल्यामुळे पाण्याचे वितरण समान तत्वावर होत नाही. याची सर्वाना जाणीव आहे. सदर समस्येच्या निवारणासाठी किर्लोसकर कन्सलंटसीच्या अहवालाच्या आधारावर पाणी पुरवठा योजना टप्पा क्रमांक १ महाराष्ट् जीवन प्राधिकरणा मार्फत हाती घेण्यात आलेले असुन सदर काम पुर्ण होण्याच्या मार्गावर आहे. टप्पा क्रमांक १ पुर्ण झाल्यानंतर टप्पा क्रमांक २ राबवण्यासाठी महासभेने मंजुरी दिलेली आहे. सदर पाणी पुरवठा योजना राबविल्यानंतर महापालिकेस सुपुर्द करण्यात येईल व त्या संबंधी दैनंदीन देखभाल महापालिकेस करावी लागेल. सदर योजना अंर्तगत वाहीन्या सुस्थितीत पणे चालविण्यासाठी तसेच सध्याच्या जलवाहीन्या व्यवस्थित करुन नविन योजने अंर्तगत टाकण्यात येणा-या जलवाहीन्या Synchronize करुन वितरण व्यवस्थेवर चांगल्या रितीने नियंत्रण करण्याकरीता एका सक्षम अधिका-याची आवश्यकता आहे. जवळपासंच्या इतर महानगरपालिकेत जल अभियंता हे पद अस्थापनेवर असुन पाणीपुरवठा व्यवस्था त्यांच्या अधिपत्याखाली दिलेल्या आहेत. त्याच धर्तिवर उल्हासनगर महापालिकेत सुध्दा एका जल अभियंताचे पद निर्माण करणे आवश्यक असुन प्रस्तावित आहे. या पदाची निर्मिती वेतन श्रेणी रु. १२०००- ३७५-१६५०० मध्ये करणे योग्य राहील.

त्यासाठी शैक्षणीक अर्हता पुढील प्रमाणे आसावी.

अ) सरळ सेवा प्रवेशाने

१. महापालिका सेवेत काम करित असलेल्या कर्मचा-यांव्यतिरिक्त अन्य उमेदवारांचे वय ४० वर्षा पेक्षा जास्त असू नये.
२. मान्यता प्राप्त विद्यापिठांची बी.ई. सिव्हील पदवी व कार्यकारी अभियंता अथवा तत्सम पदावरील काम काजाचा प्रत्यक्ष ५ वर्ष अनुभव आवश्यक, अथवा डी. सी. ई. पदविका, परिक्षा उत्तीर्ण, पदविका धारकांच्या बाबतीत कार्यकारी अभियंता अथवा तत्सम पदावरील ७ वर्षे अनुभव आवश्यक.

ब). पदोन्नतीने

1. कार्यकारी अभियंता, सिव्हील पदावरील अधिका-यांमधून, ज्यांनी मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.ई. सिव्हील पदवी अथवा डी. सी. ई. पदविका धारण केलेली आहे. बी.ई. सिव्हील पदवीधारकांच्या बाबतीत कार्यकारी अभियंता पदावरील कामकाजाचा किमान 4 वर्ष अनुभव आवश्यक व पदविकाधारकांच्या बाबतीत कार्यकारी अभियंता पदावरील किमान 6 वर्षे अनुभव आवश्यक.

**क) प्रतिनियुक्ती**

1. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण येथे अधिक्षक अभियंता या पदावर कार्यरत अधिकारी.

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील रोशनाई करीता एकूण १०५०० पेक्षा जास्त विद्युत दिवे लावण्यात आले आहे. सदर दिव्यात ४०० वॉ., २५० वॉ. व ४० वॉ. दिव्यांच्या समावेश आहे तसेच शहरात विविध चौकात ८ हायमास्ट बसविणेत आलेले आहेत. यासाठी महानगरपालिकेच्या विद्युत विभाग च्या अस्थापना वर एक कार्यकारी अभियंता, दोन उप अभियंता, ७ कनिष्ठ अभियंता, ८ विजतंत्री, ४० तारतंत्री, ५६ मदतनिस हे पद मंजूर आहेत आणि निगा व दुरुस्ती साठी ७ सेवा वाहन, वाहनचालका सह विद्युत विभागाखाली कार्यरत आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका फक्त एक महानगरपालिका आहे जेथे दिवाबत्तीची निगा व दुरुस्ती विभागीय कर्मचा-या मार्फत करण्यात येत आहे. सदर व्यवस्था सुरळीत पार पाडण्यासाठी विद्युत विभागातील स्वतंत्र भांडार व्यवस्थापन करण्यात आलेली आहे. रस्त्यावरील दिव्या शिवाया महानगरपालिकेच्या विविध विभागीय कार्यालय, प्रभाग क्षेत्र, कार्यालय, हेलथ पोस्ट, महापालिकेचे क्रिडा संकुल अग्निशामक स्थानक, हाजेरी शेड, भाजी बाजार, इत्यादी जागी लाईटचे दिवे, पंखे, वाटर कुलर, इत्यादी लावण्यात आलेले आहेत शिवाय महापालिकेच्या मुख्यालयात व प्रभाग क्षेत्र कार्यलय येथे ६३ वातानुकुलीत यंत्र बसवलेले आहेत. हे सर्व बसविण्याचे व त्यांची निगा व दुरुस्तीचे कार्य विभागीय कर्मचा-या मार्फत करण्यात येतात तसेच म.रा.वि. मंडळाचे देयक तयार करुन भरण्याचे कार्य पण विद्युत विभागा मार्फत करावे लागते.

सदर विद्युत कार्या शिवाय विद्युत विभागाला मुख्यालयात बसवलेले ई.पी. ए. बी. एक्स (EPABX) ज्याची क्षमता १६/९६ एवढी आहे व बी.एस. एन. एल (BSNL) मर्फत ६७ थेट दुरध्वनी मुख्यालयात व विविध महापालिका कार्यालयात बसवलेले आहे, त्यांची देखभाल दुरुस्ती व देयक पारित करण्याचे कार्य पण विद्युत विभागात असलेल्या कर्मचा-या मार्फत करावे लागतात.

सध्या विद्युत विभागाला रस्त्यात येणारे म.रा.वि.मंडळाचे पोल व रोहित्रे हलविण्याचे कार्य सोपविले आहे, जे म.रा.वि. मंडळाने करावयाचे आहे. हाती घेतलेल्या कार्यास १०० पेक्षा जास्त पोल व १० पेक्षा जास्त रोहित्रे हलविण्याचे कार्य जोराने सुरु आहे व आनखीण काही पोल व रोहित्रे हालविण्याचे कार्य करण्यासाठी कागज पत्राचे कार्य सुरु आहे.

शासनाने २७ फ्रेबुवारी २००३ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेचे संगणीकरण करण्याचे निर्णय घेतलेले आहे. त्या निर्णयाच्या अमलबंजावणी करिता महानगरपालिकेने ठराव क्रमाक ४ दिनांक २५/४/२००३ रोजी संगणीकरण करण्याचे धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत हे कार्य पण विद्युत विभागाला सोपवण्यात आलेले आहे.

वरील सर्व कार्य वर योग्य रित्या देख रेख करण्याकरिता अधिक्षक अभियंता (विद्युत) चे अधिकार असणारा पद निर्माण करणे अति आवश्यक आहे.

शासनाने नगर विकास विभाग निर्णय क्र.पी.सी.सी. ३०९६/८२५/ प्र.क्रं. १२६/ नवि -२२ दिनांक २०/६/१९९७ अन्वये पिंपरी चिंचवळ महानगरपालिकेसाठी विकास अभियंता या पदाला मान्यता दिलेली आहे. त्याच धरतीवर उल्हासनगर महानगरपालिकेचे कामाच्या व्यापा-नुसार विकास अभियंता (विद्युत)/ अधिक्षक अभियंता ;विद्युतद्ध या पदाच्या निर्माण वेतन श्रेणी रु. १२०००- ३७५-१६५०० मध्ये करणे योग्य राहील.

त्यासाठी शेक्षणीक अर्हता पुढील प्रमाणे आसावी.

**अ) सरळ सेवा प्रवेशाने**

१. महापालिका सेवेत काम करित असलेल्या कर्मचा-यांव्यतिरिक्त अन्य उमेदवारांचे वय ४० वर्षा पेक्षा जास्त असू नये.

२. मान्यता प्राप्त विद्यापिठांची बी.ई.इलेक्ट्रिकल पदवी व कार्यकारी अभियंता अथवा तत्सम पदावरील काम काजाचा प्रत्यक्ष ५ वर्ष अनुभव आवश्यक, अथवा डी.ई.ई. पदविका, परिक्षा उत्तीर्ण, पदविका धारकांच्या बाबतीत कार्यकारी अभियंता अथवा तत्सम पदावरील ७ वर्षे अनुभव आवश्यक.

**ब). पदोन्नतीने**

1. कार्यकारी अभियंता, विद्युत पदावरील अधिका-यांमधून, ज्यांनी मान्यता प्राप्त विद्यापीठाची बी.ई. इलेकिट्रीकल पदवी अथवा डी. ई. ई. पदविका धारण केलेली आहे. बी.ई. इलेक्ट्रिकल पदवीधारकांच्या बाबतीत कार्यकारी अभियंता पदावरील कामकाजाचा किमान 4 वर्ष अनुभव आवध्यक व पदविकाधारकांच्या बाबतीत कार्यकारी अभियंता पदावरील किमान 6 वर्षे अनुभव आवध्यक.

क) प्रतिनियुक्ती

1. म.रा.वि. मंडळ किंवा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या विद्युत भाग येथे अधिक्षक (विद्युत) या पदावर कार्यरत अधिकारी.

**तरी सदर प्रस्ताव स्थायी समिति पुढे महासभेस योग्य त्या शिफारशी साठी सादर.**

स्थायी समिती ठराव क्र. ४४ दिनांक:-९.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रू. १२०००-३७५-१६५०० या वेतनश्रेणीवर जलअभियंता व विकास अभियंता (विद्युत) ही दोन पदे निर्माण करणेस महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे ५.४० वाजता सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. २० वाचून दाखवितात.

विषय क्र. २०:- घनकच-याची विल्हेवाट लावणेकामी कचरा वाहतुक अभिकर्ता नेमणे बाबत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-निविदाकाराने निविदेमध्ये प्रथम जे दर भरले होते ते अतिशय जास्त होते. ते स्विकृती योग्य नव्हते. म्हणुन याबाबत अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडे या प्रकरणीचे निविदेतील दराबाबत विचारणा केली. आणि त्यानंतर वाटाघाटीअंती ठरलेल्या दराप्रमाणे आपल्या समोर प्रस्ताव ठेवला आहे.

मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वे / श्रीमती. माने किरण :-हा विषय अतिशय मोठा आहे. आम्हाला या विषयावर सविस्तर अभ्यास करता यावा. म्हणुन हा विषय पूढच्या सभेत ठेवण्यांत यावा.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-या विषयासाठी विशेष सभा बोलवा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-विषय मोठा असला तरी त्याबाबत निविदा मागविल्या. आलेल्या निविदेतील सर्वात लघुत्तम दरातील निविदा निविदेत समाविष्ट असलेल्या अनेक तांत्रिक व वित्तिय बाबींची छाननी करण्यासाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेमधील solid waste management cell कडे सादर करण्यांत आली. त्यांनतर त्यांच्याकडुन आलेला अहवाल इत्त्यादी सविस्तर माहिती आपल्या समोर ठेवली आहे.

मा. सदस्या श्रीमती. किरण मानेः-नंतर पुढच्या सभेत हा विषय ठेवावा अशी विनंती आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-जो गोषवारा निघाला आहे तो आम्हाला समजलाच नाही.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-एक वर्षासाठी आहे ना?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः- ६ कोटी ९३ लाख, ६० हजार एवढा खर्च एक वर्षाचा?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-६ कोटी ९३ लाख, ६० हजार इतका निविदेमध्ये दर्शविला होता परंतु त्यांच्याशी वाटाघाटी करून ४ कोटी ३८ लाख ऐवढे केले आहेत.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-भाव आणखी कमी करा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-दरवर्षी ३ टक्के त्यांना वाढवुन देणार आहोत.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-दरवर्षी ? जकात निविदेमध्ये दरवर्षी आम्ही दहा टक्के वाढ करून प्रस्ताव आणतो. यामध्ये फक्त ३ टक्के ?

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-एक वर्षासाठी त्यांना हे काम दिले जावे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-हे दर एक वर्षाचे आहेत परंतु काम पुर्ण १० वर्षासाठी आहे. प्रत्येक वर्षा एवढा खर्च येईल पेट्रोल डिझेलच्या किंमती वाढतील कचरा वाहतुकी कामी निविदेत भरलेले दर प्रती टन रू. ७००/- पेक्षा जास्त होते ते कमी करून प्रती टन रू. ५००/- पर्यंत आणले. या संस्थेचे काम मुंबई येथे चालु आहे. नवी मुंबई मरोळ-मोहपे येथे त्यांचे गॅरेज आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-आवश्यक ती सर्व मशिनरी वगैरे त्यांचेकडे आहे का ?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-महापालिकेची त्यांच्या कार्यवाहीवर काय देखरेख किंवा नियंत्रण राहील ?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-सर्व आहे. क्रायटेरिया बरोबर दिला आहे. ६ कोटी ९३ लाखाचे कमी करून ४ कोटी ३८ केले आहे, वाटाघाटी करून अ.भा.स्था. स्व. संस्थेमध्ये या विषयाचे जे विशेषज्ञ आहेत त्यांचे मत घेण्यात आले आहे, solid waste management cell च्या सूचना आहेत त्या मी आपणासमोर ठेवल्या आहेत.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-प्रशासनाने जे भाडे प्रस्तावित केले आहे ते वाजवी आहे ना ?

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-या प्रकल्पासाठी जागा उपलब्ध आहे का ?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-ते मी नाही केले. solid waste mangement cell चे प्रमुख आहेत त्यांनी केले आहे. महाराष्ट्रामध्ये ती एकमेव संस्था आहे. तीचे जे प्रमुख आहेत ते श्री. अजितकुमार जैन ते मुंबई महानगरपालिकेमध्ये ते अतिरिक्त आयुक्त होते. आता ते अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये आहेत. त्यांना याबाबतीत विशेष ज्ञान आहे याविषयाचे गोषवा-या सोबत त्यांचे पत्र व वाटाघाटी अंती ठरलेले दर योग्य आहेत अशी त्यांनी आपल्या पत्रात शिफारस केली आहे त्यानंतर प्रशासनास दराबाबत खात्री पटल्यावर हा विषय स्थायी समितीपुढे आणला आहे.

या प्रकल्पासाठी स्वत:ची जागा पाहिजे . आपल्याकडे जागा नसेल तर कल्याण डोंबिवली महापालिकेला विनंती करून जागा मागीतली जाईल.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-काही चुकीचे होवू नये.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-संबंधित अधिका-यास स्पष्टीकरण करण्यास सांगा.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-जमीनसुध्दा यु.एम.सी. ची देणार?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मी गोषवा-या सह सविस्तर माहिती दिली आहे. वाचण्यासाठी वेळ पाहिजे तर घ्या. तीन चार दिवसापुर्वी गोषवारा दिला आहे. तो वाचुन यावयास पाहिजे होते.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-आपण एवढी मेहनत करून विषय आणलात डंम्पींग ग्राऊंड सारखे विषय आणले तर ते ठिक असतात. परंतु एवढया मोठ्या प्रस्तावावर अभ्यास करण्यासाठी आम्हाला २-३ दिवसांची वेळ दया. आयुक्त साहेब शहरासाठी जबाबदारी घेत आहेत तर........

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-प्रत्येक प्रकरणात ते जबाबदारी घेतील का?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-आपण म्हणता मी ८ दिवस अगोदर गोषवारा दिला आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-६ जुन चे श्री. जैन साहेबांचे जे पत्र आहे ते सुध्दा मी आपणास दिले आहे.

मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वेः-पुढच्या महिन्यात ही सभा ठेवा.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-आमचा विरोध नाही. अभ्यासासाठी वेळ दया. दोन तीन दिवस लागतील पुढच्या सभेत हा विषय घ्या.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-बहूमताने ठराव पारीत केला जावा.

मा. सदस्या श्रीमती. किरण माने / श्रीमती. जयश्री सुर्वेः-महिन्यातुन एकदा स्थायी समितीची सभा होते व सभा सूचनेवर २०-२० विषय आणले जातात.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-आयुक्त साहेब दराबाबत आपण समाधानी आहात का?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-सभा सूचनेवर किती विषय असावेत त्याची संख्या थोडीच निर्धारित करण्यांत आलेली आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-राज्य सरकारकडे या कामी सल्ला घेण्यासाठी जे सर्वात उच्च प्राधिकारी आहेत त्याच्याशी याबाबत विचार विमर्श केला आहे.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-कमीत कमी २ दिवसांच्या वेळेची सवलत दिली जावी.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-या अगोदर ही सभा तहकुब झाली होती. त्यानंतर ही सभा होत आहे आपण आयुक्त साहेबांवर भरोसा ठेवून हा प्रस्ताव पारीत करू या.

मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वेः-दोन दिवसांची वेळ दिली जावी.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-शासनाचे पत्र आहे.

*<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>आमचा विरोध नाही. आता महापालिकेचा फायदा होवू शकतो का? दोन दिवसासाठी वेळ दया.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. बामणकर नंदिनीः-</u>दोन दिवसांची वेळ दिली तर काय होणार आहे. मागच्या वेळेस सभा स्थगित केलीत.*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>जेवढा काही फायदा होवू शकत होता. तो वाटाघाटी करून घेतला आहे यापुढे आणखी फायदा होवू शकणार नाही तसेच २-३ दिवसांसाठी मी बाहेर सुध्दा चालले आहे.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-:-</u>या प्रकल्पाने शहराचे कल्याण होईल.*

*<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी :-</u> उल्हासनगर स्वच्छ व हरीत होईल?*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> हा प्रकल्प किती दिवसात होईल?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u> ३ महिने तरी लागतील. घरोघरी जावुन कचरा गोळा करतील.*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> ३ महिन्यानंतर ते लोक येतील व त्यांना पाहुन हैराण व्हाल, सफाई करण्यासाठी ते लोक असा पोशाख घालून येतील की, ते पाहून आपण हैराण व्हाल (माहितीपत्रकातील फोटो दाखवितात.)*

*<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :-</u> हा विषय आमच्या सर्वांच्या बुध्दीच्या पलीकडचा आहे. आम्हाला माहित नाही कुणाला हे काम दिले पाहिजे कुणाला नाही दिले पाहिजे. आम्ही या विषयाबाबत पूर्ण अज्ञानी आहोत. यासाठी आयुक्त साहेबांनी खुलासा केला पाहिजे. काहीही चुकीचे होवू नये, आम्हाला तांत्रिक ज्ञान नाही.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u> जो पण कुठला प्रस्ताव आणला जातो तो आम्हांला जेव्हा योग्य वाटतो तेव्हाच तो आम्ही आपल्या समोर ठेवतो, आम्ही जबाबदारी घेतो. नाहीतर हा प्रस्ताव आम्ही ३ महिन्या अगोदर सुध्दा आणु शकलो असतो परंतु त्यावर वाटाघाटी केल्यानंतरच व दराची योग्यता विचारात घेवून आपल्या समोर प्रस्ताव प्रस्तुत केला आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> हा विषय प्रत्येक वर्षी मान्यतेसाठी आमच्यासमोर आणला जाईल का?*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>आपण एकाच वेळी दहा वर्षासाठी ठेका देत आहात तर त्यामुळे हा ठेका दहा वर्षासाठी कायम होइल. तर त्यांनी त्यांचे कामात काही कसुर केली तर त्यांच्या करारनाम्यामध्ये दंडाबाबत काही अट आहे का? त्यांच्या कामावर देखरेख कशाप्रकारची राहील?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u> नाही कारण की, वाहनाचे आयुष्य १० वषापर्यंत असते तो एका वर्षासाठी ऐवढी मोठी गुंतवणुक करणार नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> १ वर्षासाठी त्यांना काम दिले तर? ही नंतर वाढवू.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u> जसे टाऊन हॉल १० वर्षासाठी दिला त्याचा प्रस्ताव प्रत्येक वर्षी आपल्या समोर येणार नाही.*

मा. सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे :- माझी अशी सूचना होती की, लोक कचरा कुंडीवर कचरा टाकण्यास जात नाहीत तेथपर्यंत जाण्याचा त्यांचा रस्ताच बंद केलेला असतो. त्यामुळे लोक कचरा रस्ता किंवा सार्व. शौचालयाच्या बाजुला फेकतात तेथुन तो उचलला जात नाही कारण पनवेलकरांबरोबर केलेल्या करारामध्ये कचरा खात्त्यावरील कचरा गोळा करावयाचे त्यांच्यावर बंधन आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-जो जो कचरा असेल तो ते लोक घेवून जातील. अगदी प्लास्टिक वगैरे सुध्दा.

मा. सदस्य श्री. लिंगे सुर्यकांतः-कचरा उचलणारा ट्रक तेथे जात नाही अशा छोटया छोटया गल्यामधील कचरा, सार्वजनिक शौचालयाशेंजारील कचरा उचलला गेला पाहिजे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-अशा ठिकाणचा कचरा आमच्याकडील जे १२०० कामगार आहेत. ते गोळा करतील. घराघरामधील कचरा गोळा करण्याचे काम घंटागाडी करेल.

मा. सदस्य श्री. लिंगे सुर्यकांतः-खत्त्यापर्यंत कचरा पोहचत नाही. लोक सार्वजनिक शौचालयाच्या बाजुलाच कचरा फेकतात तो उचलला जात नाही जसे पनवेलकरांचे म्हणणे आहे की कचरा खत्त्यावर आला पाहिजे. आला नाही तर तो उचलला जाणार नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-निविदेमध्ये ६० गाडयाचा उल्लेख होता तेथे आम्ही १२० गाडया प्रस्तावित केल्या आहेत त्यांना ५-६ कोटी रू. यावर खर्च करावा लागेल. कालावधी कमी केला तर किंमत वाढेल. हा प्रस्ताव प्रत्त्येकास समजला पाहिजे त्यानंतरच पारीत केला जावा. पाहिजे तर सभेचे कामकाज आणखी अर्धा तास पुढे चालविले जावे.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-सभेचे कामकाज अर्ध्या तासासाठी तहकुब करावे आम्ही अभ्यास करून येतो.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मा. सभापतींच्या मान्यतेने सभेचे कामकाज अर्धा तासासाठी पुढे ढकलण्यांत येत आहे.

सायंकाळी ६.१० वाजता सभेचे कामकाज स्थगित करण्यात आले.

सायंकाळी ६.४५ वाजता सभेचे कामकाज पुन्हा सुरू करण्यात आले.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-सभापती महोदया, आम्हाला वाटते की या विषयावर फेर निविदा मागवाव्या किंवा आयुक्तांनी पुन्हा वाटाघाटी कराव्या. व पुढच्या सभेत हा विषय आणावा नाहीतर आमचा त्यास विरोध आहे.

मा. सदस्य श्री. लिंगे सुर्यकांतः-घनकच-याची विल्हेवाट लावणे कामी आपल्या महापालिकेत उपाययोजना नाही. आपण कल्याण महापालिकेतील उपाययोजनांतुन घनकचरा विल्हेवाट कामी व्यवहार केला आहे का? नविन ठेकेदाराच्या ज्या गाडया असतील त्या आधुनिक असतील की, पनवेलकरांसारख्या जुन्या गाडया असतील कारण जुन्या गाडयांमधुन अर्धा कचरा रस्त्त्यावर पडत जात असतो.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-कचरा वाहतुक करणारे ट्रक बंद असतील ना? कचरा झाकुन नेला जाईल ना?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-अजुन वाटाघाटी होवू शकतात का?

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-पनवेलकरांपेक्षा दुप्पट भाव आहेत तुम्ही सर्व पक्षांच्या सदस्यांची बैठक घ्या. व नंतर सभा बोलवा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-कल्याण महानगरपालिकेकडुन अदयाप उत्त्तर आलेले नाही. प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर कचरा वाहतुकीचे सर्व ट्रक आम्ही बंद करू. कचरा खत्ते सुध्दा बंद राहतील. नविन ठेकेदार त्याठिकाणी नविन कुंडया त्याजागी ठेवील.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-जेथे जेथे कचरा कुंडया आहेत....

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-जे मुख्य कचरा खत्ते आहेत जसे पनवेलकरांना नेमुन दिलेले आहे. ते सर्व बदली होतील. आमचे जे १२०० सफाई कामगार आहेत ते कचरा उचलण्याचे काम करतील.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-त्यांना वजनाच्या हिशोबाने काम करायचे आहे. पनवेलकरांनी कचरा उचलला नाही तरीही त्यांना पैसे दिले जात आहेत. परंतु त्यांनी उचलेला कचरा २०० मेट्रीक टनापेक्षा कमी झाला तर त्यांना दयावयाचे पैसे कमी होतील.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-ही संस्था कोणत्त्या दराने काम करते. त्यांच्या कामाचा जो अहवाल आहे सभागृहास दिला जावा कचरा उचलण्यासाठी.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-कचरा वाढून ३०० टनापर्यंत झाला तरी याच दराने हे काम होईल.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-एक वर्षासाठी कोणी मशिनरी घेणार नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-एक वर्षासाठी ऐवढी मोठी मशिनरी घेण्यास कुणी वेडा नाही.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-दोन-तीन दिवसात चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जावा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मेसर्स पनवेलकरांना कचरा उचलण्यासाठी दररोजच्या हिशोबाने ६४ हजार रू. दिले जातात. त्यामध्ये त्यांनी किती टन कचरा उचलायचे हे निश्चित नाही. सद्या आपण जो नविन ठेकेदार नेमणार तो नविन हायड्रोलिक गाडया खरीदणार त्या गाडयांचे आयुष्य दहा वर्षाचे असेल. तसेच तो ठेकेदार आपल्या स्वतःच्या गाडयांशी सुसंगत असलेल्या कचरा कुंडया प्रत्त्येक खत्त्यावर उपलब्ध करणार त्यासाठी महापालिकेला कचरा कुंडया खरेदी करण्याचा खर्च वाचेल. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट हॅडलींग रूल्स अनुसरून ते कचरा उचलणे कामी अनुपालन करतील. कारण त्यांना ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करायचा आहे. त्याव्यतिरिक्त आता आमचे जे कर्मचारी आहेत कचरा उचलताना त्यांचा थेट कच-याशी संपर्क येत असतो त्यामुळे त्यांना आजार निर्माण होतात या व्यवस्थेमुळे त्यांचा कच-याशी थेट संपर्क निर्माण होणार नाही. या हिशोबाने आपला कचरा कुंडयावरील खर्च वाचेल आधुनिक व्यवस्था उपलब्ध होईल आणि घरोघरीचा कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडी सुध्दा ठेकेदाराकडुन उपलब्ध करण्यात येईल. त्यामुळे जितका जास्त पैसा या व्यवस्थेवर खर्च होईल. त्या पोटी अतिरिक्त सवलत ठेकेदाराकडुन उपलब्ध

करण्यात येईल. कचरा कुंड्या व वाहनांच्या जवळपास जंतुनाशकांची फवारणी करणे व कचरा वाहतुक व्यवस्था सुरळीतपण पार पाडण्यासाठी वायरलेस सिस्टिम पुरविणे कर्मचारी वर्गास आवश्यक साहित्त्य सामुग्री पुरविणे उदा. पोशाख, गमबुट, मास्क, हॅण्डग्लोज इत्त्यादी.

रस्त्त्यावरील माल म्हणजे माती, दगड, विटा इत्त्यादी उचलणेसाठी स्किप लोडर वाहन पुरविणे इत्त्यादी.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>हे २ कोटी २० लाख पेक्षा जास्त रक्कम आम्ही श्री पनवेलकरांना देतो आणखी २ कोटी अधिक खर्चाने शहराचे पर्यावरण शुध्दीकरणासाठी ठेकेदाराकडुन सवलत होत आहे तर त्यास हरकत असता कामा नये.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रस्ताव पास?

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>बृहमुंबई महानगरपालिकेतील या ठेकेदाराच्या कामाचा अहवाल मागवा त्यानंतर सभा बोलवा. आमचा विरोध आहे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>मी हा प्रस्ताव मतास टाकते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

१. श्री. रामदास उमाप
२. श्रीमती. माने किरण
३. श्रीमती. सुर्वे जयश्री
४. श्रीमती. बामणकर नंदीनी

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे सदस्य सदरच्या प्रस्तावाच्या बाजुने आहेत. त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

१. श्रीमती. नीता आहुजा
२. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
३. श्री. तलरेजा विनोद
४. श्रीमती. छाब्रिया भारती
५. श्री. जेसवानी सतरामदास
६. श्री. पंजाबी नारायण
७. श्री. मोहन बेहरानी
८. श्री. लिंगे सुर्यकांत
९. श्री. ईश्वर पमनानी
१०. श्री. पृथ्वी वलेचा
११. श्रीमती. ज्योती कालानी

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरच्या प्रस्तावाबाबत बहुमताने पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यात येत आहे.

## विषय क्र. २०:- घनकच-याची विल्हेवाट लावणेकामी कचरा वाहतुक अभिकर्ता नेमणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

पार्श्वभुमी :-

घनकचरा व्यवस्थापन नियम 2000 पारित झाल्यानंतर शहरात निर्माण होणा-या घनकच-याची विल्हेवाट नियमातील विहित पध्दतीनुसार करणे स्थानिक स्वराज्य संस्थाना बंधनकारक आहे . उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्रमांक: 93 दिनांक 28/1/2003 अन्वये महापालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन साठी घनकचरा कृती आराखडयास मंजुरी दिली असून सदर आराखडयात घनकच-याची वाहतुक करणेसाठी 10 वर्षाच्या दिर्घ मुदती करिता अभिकर्त्याची नियुक्ती करणेसंबधी प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय घेवून प्रशासकीय व वित्तीय मंजुरी दिलेली आहे .तसेच महासभा ठराव क्रमांक : 86 दिनांक 28/1/2003 अन्वये उल्हासनगर शहरातील मालमत्ता धारकांनी सुका कचरा व ओला कचरा ठेवणेसाठी दोन कचरा कुंडया ठेवणे बंधनकारक करणेसंबधीच्या प्रस्तावासही मान्यता दिलेली आहे .

*सध्या उल्हासनगर शहराच्या हद्दीतील निर्माण होणारा कचरा महापालिकेने विविध ठिकाणी बसविण्यात आलेल्या झाकण नसलेल्या कचरा कुंडयात गोळा करण्यात येतो. सदर कचरा बंद नसलेल्या वाहनाव्दारे खाजगी ठेकेदारामार्फत उचलून शहरामधील डंपिंग ग्राउंडवर टाकण्यात येतो. हे सर्व करीत असतांना कचरा उचलणा-या कर्मचा-याकडे कोणतेही सुरक्षेचे साधन नसल्याने कच-याशी त्याचा प्रत्यक्ष संपर्क येतो. त्यामूळे ही पध्दत आरोग्यास अहितकारक असून घनकचरा व्यवस्थापन नियम २००० या नियमाशी पुर्णपणे विसंगत आहे. घन कचरा व्यवस्थापन नियम २००० मधील तरतुदीची पुर्तता करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेने कचरा वाहतुकीसाठी अभिकर्त्याची नेमणूक करणेकरिता निविदा सुचना प्रसिध्द केली आहे . सदर निविदेत वरील नियमास अधिन राहून अटी व शर्ती विहित करण्यात आल्या असून त्यात समाविष्ट असलेल्या बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे .*

***निविदा तपशिल:-***

1) घरघरचा कचरा गोळा करणेसाठी दोन भाग असलेल्या म्हणजे सुका कचरा व ओला कचरा अशा घंटा गाडया कर्मचा-यांसह पुरविणे.
2) 660, 770, 1100, 2000, 4000 व 7000 लिटर्स क्षमता असलेल्या कचरा कुंडया पुरविणे .
3) कचरा उचलणेसाठी मध्यम आकाराच्या विशेष कम्पॅक्टर गाडया पुरविणे.
4) शहराच्या आतील भागातून कचरा वाहून नेणेसाठी वरुन बंद असलेली छोटी वाहने पुरविणे .
5) रस्त्यावरील माल म्हणजे माती, दगड व विटा इत्यांदी उचलणेसाठी स्कीप लोडर (Skip Lodder) वाहन पुरविणे .
6) दैनंदिन कामावर देखरेख करणेसाठी कर्मचा-यांसह वाहन पुरविणे .
7) देण्यात आलेल्या वाहनांसोबत आवश्यक मजूर, वाहन चालक, मदतनीस पुरविणे.

8) कचरा कुंडीवर देखरेख करणेसाठी आवश्यक कर्मचारी पुरविणे .
9) कचरा कुंडया ठराविक काळानंतर पाण्याने धुवून काढणे
10) कर्मचारी वर्गास आवश्यक साहित्य सामुग्री पुरविणे उदा. पोशाख , गमबुट, मास्क, हॅन्ड ग्लोव्हज (hand gloves), इत्यादी.
11) दैनंदिन कामावर देखरेख करणेसाठी सुपर वायझर , व्यवस्थापक इत्यादी
पुरविणे.
12) वाहने खराब झाल्यास तात्काळ दुरुस्तीसाठी दुरुस्ती वाहन पुरविणे .
13) कचरा कुंडया व वाहनाच्या जवळपास जंतुनाशक फवारणी करणे.
14) कचरा वाहतुक सुरळीत पार पाडणेसाठी वायरलेस सिस्टम (Wireless System)पुरविणे.
15) कच-याची योग्य त-हेने विल्हेवाट लावणेसाठी जनतेस जागृत (public awarness) करणे .
16) वाहनासाठी आवश्यक इंधन सामुग्री स्वखर्चाने पुरविणे .
17) डंपिंग ग्राउंडवर व्यवस्था पहाणेसाठी आवश्यक कर्मचारी वर्ग पुरविणे.
18) कचरा कुंडया ठेवणेसाठी उंचवटे बनविणे.
19) कचरा कुंडयांचा व इतर सर्व साहित्याचा स्वखर्चाने विमा उतरविणे
20) जनतेकडून प्राप्त झालेल्या कच-यासंबधी तक्रारी ऐकून त्याचे निवारण करणे.

वरील अटी व शर्तीस अधिन राहून अभिकर्ता नेमणूक करणे बाबतची निविदा नोटीस खालील वर्तमान पत्रात प्रसिध्दीसाठी देण्यात आली होती.

1) दैनिक लोकमत, मुंबई
2) दैनिक सकाळ, मुंबई
3) दैनिक नव भारत टाईम्स , मुंबई
4) दैनिक फ्री प्रेस , मुंबई

**प्राप्त निविदा:-**

निविदा सुचनेस अनुसरुन एकूण 4 एजन्सीने निविदा भरल्या होत्या त्याचा तपशिल पुढील प्रमाणे

| अ .क्र | एजन्सीचे नाव | प्रति वर्षी दर |
|---|---|---|
| 1 | मेसर्स अन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग सेल प्रा.लिमिटेड. | 6,93,60,867 /- |

| | | |
|---|---|---|
| 2 | मेसर्स कोनार्क इन्फ्रास्ट्क्चर प्रा. लिमिटेड | 8,00,00,000/- |
| 3 | मेसर्स व्ही.आर. पनवेलकर | 7,80,00,000/- |
| 4 | मेसर्स अर्जुन कन्स्ट्क्शन | 8,10,00,000/- |

वित्तीय व तांत्रिक अभिप्राय :-

महाराष्ट् शासनाने राज्यात घनकचरा व्यवस्थापन नियमातील तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी व मार्गदर्शनासाठी आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, अंधेरी, येथे Solid waste management cell ची स्थापना केलेली आहे . सदर सेलवर सल्लागार म्हणून श्री. अजितकुमार जैन (पौ) हे काम पहात आहेत.

निविदेत समाविष्ट असलेल्या अनेक तांत्रिक व वित्तीय बाबींची सखोल छाननी करणेसाठी सर्वात कमी असलेली मेसर्स अन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग सेल प्रा. लिमिटेड यांची निवीदा सदर सेलसमोर इकडील पत्र क्रमांक :उमपा/आरोग्य/129 दिनांक 30/5/2003 अन्वये सादर करण्यात आली.

दिनांक 31/5/2003 रोजी सदर सेलच्या सदस्यांबरोबर अंधेरी येथे बैठक आयोजित करुन सदर सेलमधील सदस्यांना उल्हासनगर शहरात सध्या सुरु असलेल्या कचरा वाहतुकीची पध्दत तसेच नविन निविदेत अंतर्भूत असलेल्या बाबींवर presentation तयार करुन संगणकाव्दारे माहिती अवगत करुन देण्यात आली. समितीच्या सदस्यांनी सर्व बाबींची शहानिशा करुन निविदेतील काही बाबींबर त्यांचे दिनांक 6/6/2003 च्या पत्राच्या अनुषंगाने अभिप्राय दिलेले असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

1) शहराचे क्षेत्रफळ , लोकसंख्या व मिळकतीची संख्या लक्षात घेवून , घरघरचा कचरा उचलणा-या घंटा गाडयांच्या संख्येत कर्मचा-यांसह वाढ करणे .

2) कल्याण डोंबीवली महानगरपालिकेने कचरा विल्हेवाट करणेसाठी एजन्सीची नियुक्ती केली असून उल्हासनगर महानगरपालिकेची सदर एजन्सी बरोबर चर्चा सुरु आहे. सबब निविदेतील उल्लेखिलेली डंपिग ग्राउंडची व्यवस्था करणेची आवश्यकता नसून ते रद्द करणे .

3) सुका कचरा म्हणजे माती, विटा, रेती इ. डंपिंग ग्राउंडवर न टाकता शहरातील ठराविक ठिकाणी नेवून टाकणे व त्याची रॅग पिकर मार्फत

विल्हेवाट लावणे अथवा त्याचा वापर टाईल्स बनविणे किंवा लॅन्ड स्कॅपिंग साठी करणे .

4) इंधन , मनुष्यबळ व इतर आवश्यक साधन सामुग्री संबधी रक्कमेत वाढ करणेसाठी प्रतिवर्ष देय असलेली दरवाढ शासन वेळोवेळी जाहीर करीत असलेल्या ग्राहक निर्देशंकाच्या तुलनेत (consumer Index)देणे.

5) केलेल्या कामाचे मुल्यांकन करतांना उचललेल्या कच-याच्या प्रमाणास महत्व देणे.

6) कच-याचे वजन करणेसाठी वजन काटा बसविणे.

7) कचरा गोळा करणेसाठी व वाहतुकीसाठी तपशिलवार आराखडा (Micro level planing) तयार करणे

8) एजन्सीने निविदेत भरलेले रुपये 792/- प्रतिटन कचरा वाहतुकीचे दर वाटाघाटी करुन प्रतिटन रुपये 500/- या वाजवी दरापर्यंत कमी करणे .

<u>वाटाघाटीचा तपशिल:-</u>

सेलने दिलेल्या वरील सुचनांचा विचार करुन, मेसर्स एन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग सेल प्रा लिमिटेड ,मुंबई यांना पुन्हा दिनांक 18/6/2003 रोजी वाटाघाटी व इतर बाबींवर चर्चा करणेसाटी बोलविण्यात आले होते. सदर बैठकीत खालील निर्णय घेण्यात आले . त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

1) एजन्सी 60 घंटा गाडयाऐवजी 120 घंटा गाडया व अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करुन देईल.

2) निविदेतील बाब कमांक 2 (इ) प्रकरण-1 मधील डंपिंग ग्राउंडची व्यवस्था वगळण्यात आली .

3) सुका कचरा डंपिंग ग्राउंडवर न टाकता शहरातील ठराविक ठिकाणावर नेवून टाकणे व त्याची रॅग पिकर मार्फत विल्हेवाट लावणेस एजन्सीने मान्य केले .

4) इंधन मनुष्यबळ व इतर खर्चात वाढ करणेसाठी प्रतिवर्ष देय असलेली दरवाढ ग्राहक निर्दशांच्या (consumer Index) तुलने ऐवजी 5 टक्के वाढ कमी करुन 3 टक्के करण्याचे एजन्सीने मान्य केले .

5) एजन्सी संपूर्ण कचरा उचलण्यास दिरंगाई करीत असल्यास कचरा कुंडयात राहिलेल्या कच-याचे प्रमाण लक्षात घेवून केलेल्या कामाचे मुल्यांकन करुन Performance Evalution chart प्रमाणे मिळालेले गुण विचारात घेवून बीलातील रक्कम वजा करण्यात येईल .

6) कच–याचे वजन करणेसाठी वजन काटा बसविणेची अट मूळ निविदेत नसल्याने महापालिका स्वखर्चाने बसविल. किंवा खाजगी संस्थे मार्फत व्यवस्था करेल असे ठरले.

7) कचरा गोळा करणेसाठी व वाहतुकीसाठी तपशिलवार आराखडा (Micro level planing) तयार करणेस एजन्सीने सम्मती दिली.

८) सध्या उल्हासनगर शहरातून अंदाजे २४० टन कचरा दररोज निर्माण होतो. व कालांतराने ३५० टन होण्याची शक्यता आहे त्यानुषंगाने एजन्सीने १,१९,९७९/- रुपये प्रति दिवस दराने कचरा वाहतुक करणेचे मान्य केले.

९) निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे कराराचा कालावधी कार्यालयीन आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिने पुर्ण झाल्यानंतर किंवा काम सुरु

झाल्यानंतर या दोन्ही पैकी जो कालावधी कमी असेल त्या दिनांकापासून
१० वर्षापर्यंत राहील.

निविदेत समाविष्ट असलेल्या वाहन / यंत्र सामृग्री व मनुष्यबळाचा तपशिल

| अ.क्र | तपशिल | सध्या सुरु असलेल्या निविदेतील तरतूद | प्रस्तावित निविदेतील तरतूद | संख्या |
|---|---|---|---|---|
| कचरा कुंडया:- | | | | |
| 1 | घंटागाडी साठी 90 लिटर्स क्षमतेची कचरा कुंडी | नाही | आहे | 240 |
| 2 | 660 /770 लिटस क्षमतेच्या कचरा कुंडया | नाही | आहे | 165 |
| 3 | 1100 / 1250 लिटर्स क्षमतेच्या कचरा कुंडया | नाही | आहे | 165 |
| 4 | 5000 लिटर्स क्षमतेची कचरा कुंडी | नाही | आहे | 36 |
| 5 | घंटा गाडी | नाही | आहे | 120 |
| 6 | ब्राश, शॉवेल, लिफटर, झाडू व इतर साहित्य (प्रत्येक दोन महिन्यात) | नाही | आहे | 120 |
| 7 | कचरा कुंडया ठेवण्यासाठी उंचवटे बनविणे | नाही | आहे | 150 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | 660 / 1100 लिटर्स क्षमतेच्या कचरा कुंडयांचा विमा उतरणे | नाही | आहे | |
| 9 | कचरा कुंडया जवळपास जंतुनाशाक फवारा करणे | नाही | आहे | .. |
| वाहने:- | | | | |
| 10 | 10 ते 12 Cubic meter चे मध्यम प्रकारचे Twine Axle असलेले 16 GVW वाहन | फक्त 40 झाकण नसलेले वाहने | आहे | 7 |
| 11 | 6 ते 8 Cubic meter झाकण असलेले 7-9 GVW छोटी वाहने | | आहे | 3 |
| 12 | 16 GVW चे Skip Loader वाहने | | आहे | 2 |
| 13 | वाकीटॉकी व ॲनाऊन्समेंट सिस्टम असलेल्या स्टेशन वॅगेन वाहन | | आहे | 1 |
| 14 | 25 MTGVW दुरुस्ती वाहन | | आहे | 1 |
| मनुष्य बळ:- | | | | |
| 15 | घंटागाडीसाठी कर्मचारी | नाही | आहे | 120 |
| 16 | वाहन चालक | आहे | आहे | 13 |
| 17 | सहा.वाहनचालक | आहे | आहे | 11 |
| 18 | कचरा उचलण्यासाठी वाहना सोबत कर्मचारी | आहे | आहे | 22 |
| 19 | कचरा कुंडयावर देखरेख करणेसाठी कामगार | नाही | आहे | 15 |
| 20 | प्रत्येक प्रभागाची व्यवस्था पाहण्यासाठी परिक्षक | नाही | आहे | 4 |
| 21 | वाहतुक व्यवस्थेसाठी परिक्षक | नाही | आहे | 1 |
| 22 | संपुर्ण कामावर नियंत्रण ठेवणेसाठी व्यवस्थापक | नाही | आहे | 1 |
| संकीर्ण:- | | | | |
| 23 | घनकचरा व्यवस्थापनासाठी साधन साम्रुगी | नाही | आहे | 10 संच |
| 24 | हजेरी पत्रक व दुरुस्ती व्यवस्था | नाही | आहे | 4 जागा |
| 25 | पोशाख व सुरक्षा सामुग्री | नाही | आहे | 187 संच |
| 26 | वॉकीटॉकी यंत्रणा | नाही | आहे | 3+24 यंत्रणा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 27 | कचरा वाहतुक वाहनावर जंतू नाशक फवारणी | नाही | आहे | |
| 28 | घनकचरा व्यवस्थासाठी जनतेस जागृत करणे | नाही | आहे | |

**करार रद्द करण्याचे परिणाम:-**

9) अभिकर्त्याने काम सुरु केल्यानंतर महानगरपालिकेने स्वत:च्या असमर्थपणामूळे करार रद्द केल्यास निविदेतील अट क्रमांक 9.4 प्रमाणे अभिकर्त्याच्या सम्मतीने अभिकर्त्याने पुरविलेली सर्व वाहने , उपकरणे, व इतर साधन सामुग्री 10 : प्रतिवर्ष रक्कम घसारा म्हणून वजा करुन स्वत:च्या ताब्यात घेईल. अशाप्रकारे ठरलेली रक्कम उर्वरित कालावधीत हप्त्याहप्त्याने देईल. तसेच अभिकर्त्याच्या असक्षमपणामूळे करार रद्द करावा लागला तर महापालिकेने पुरविलेली सर्व साधनसामुग्री (उदा. शेड, केबिन इत्यादी)अभिकर्ता महानगरपालिकेस विनामुल्य परत करेल व महापालिका आपल्या ताब्यात घेवून अभिकर्ताही आपली यंत्रसामुग्री आपल्या ताब्यात घेईल व त्यासाठी कोणत्याही प्रकारचा नुकसान भरपाईचा दावा दाखल करु शकणार नाही.

**निविदा स्विकृत केल्यानंतरचे परिणाम :-**

सदरच्या निविदेत आधुनिक वाहने व यंत्रसामुग्री चा समावेश केलेला असून वरील निविदा स्वीकारल्यास घन कचरा व्यवस्थापन नियम 2000 मधील तरतुदीचे पुर्णपणे पालन करणे शक्य होईल व शहरातील कच-याची वाहतुक योग्य रितीने व वेळेत करण्यात येईल

**अंदाजपत्रकातील तरतुद:-**

महानगरपालिकेने कचरा वाहतुकीसाठी वर्ष 2003-04 च्या अंदाजपत्रकात 2.50 कोटी रुपयांची तरतुद असून उर्वरित रक्कमेसाठी सुधारित अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतुद करावी लागणार आहे व पुढील वर्षात सुद्धा बांधील खर्च म्हणून करावी लागेल .

मेसर्स एन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग सेल प्रा.लिमिटेड यांना सदर कामाचा अनुभव असून त्यांचे काम मुंबई महानगरपालिकेच्या आर सेंट्ल वार्डमध्ये व नोएडा (दिल्ली) येथे सुरु आहे.

वरील सर्व गोष्टींचा विचार करता, मेसर्स अन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग सेल प्रा.लिमिटेड यांनी वाटाघाटीनंतर मान्य केलेले रुपये 1,19,979/- प्रति दिवस (रुपये 500 प्रतिटन कचरा)

दर मान्य करण्यास स्थायी समितीपुढे प्रस्तावित .

**स्थायी समिती ठराव क्र.** 45 **दिनांक:-9.7.2003.**

सुचकाचे नाव :-श्री. पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावात नमुद केलेल्या परिस्थितीनुसार घनकच-याची विल्हेवाट करीता कचरा वाहतुक अभिकर्ता नेमणे कामी प्रशासनास मेसर्स ॲन्टोनी वेस्ट हॅन्डलिंग सेल प्रा. लिमिटेड या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**बहुमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. २१ वाचून दाखवितात.*

*विषय क्र. २१:- उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याकरिता पाईप पुरविणेकामी मे. तन्वी कार्पोरेशन व मे. दिशा इन्टरप्रायझेस या न्यूनत्तम दराच्या निविदाकाराशी प्रशासनास संविदेस मान्यता देणे बाबत.*

*मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-किती खर्च आहे.*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-श्री. अली साहेब, कोणकोणत्त्या दर्जाचे व कोणते पाईप मागविले होते ते सांगा.*

*श्री. अलि (शाखा अभियंता) यांनी स्थायी समिती सदस्यांना प्रस्तुत केलेल्या गोषवा-यातील माहितीशी सुसंगत तपशिल वाचुन दाखविला. मागविलेल्या पाईपांचा तपशिल वाचुन दाखविला.*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-दर किती टक्यांनी जास्त आहेत?*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-डी.एस.आर. कोणत्त्या वर्षाचा आहे.*

*श्री. अलि (शाखा अभियंता):-सन २०००-२००१ या वर्षाचा......*

*मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-वाटाघाटी केल्यानंतर?*

*श्री. अलि (शाखा अभियंता):-एम.एस. पाईप बिडाचे पाईप रोड बॉक्स यांच्यासाठी प्राप्त झालेले दर हे दरसूचीपेक्षा ५७ टक्के ते ११५ टक्के जास्त आहेत. १०० मी. मी., ८० मी.मी. व ६५ मी. मी. व्यासाचे जी.आय. पाईप विविध व्यासाचे स्लुईस व्हॉल्व, विविध व्यासाचे फिटींग व एअरव्हॉल्व यासाठी प्राप्त झालेले न्युनतम दर हे डी.एस.आर. पेक्षा १९ ते २० टक्के जास्त आहेत. ६५ मी.मी. व्यासाच्या जी. आय. पाईपचा दर ५४ टक्के जास्त आहे म्हणुन स्विकारता येत नाही. वाटाघाटी अंती १०० मी. मी. व ८० मी. मी. व्यासाच्या जी.आय.पाईपचा दर ५ टक्के तर स्लुईस*

व्हॉल्व पाईप फिटींग व एअर व्हॉल्वचे दर ४ टक्के कमी करण्याचे त्यांनी मान्य केले आहे. सदरचे दर मंजुर दरसुचीपेक्षा १२ . ७३ टक्के जास्त होत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>प्रशासन याबाबतीत दर वाजवी असल्याची खात्री देत आहे का? जसे आपण प्रस्ताव क्र. ७ व ८ बाबत आश्वस्थ केले तसे याबाबत सुध्दा आश्वस्थ करणार का?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>सन २०००-२००१च्या डी.एस.आर. रेट व चालु भाव या हिशोबाने दिलेले आहे. आत निर्णय आपणास घ्यायचा आहे. जो प्रस्ताव दिला आहे तो वाजवी वाटतो तो आपणांस वाजवी वाटत नसेल तर आपण प्रस्ताव नाकारू शकता, प्रत्त्येक प्रस्तावाबाबत काय आश्वस्थ करायचे?

<u>मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वेः-</u>माझ्या प्रभागामध्ये जलवाहिनी टाकण्याचे काम मंजुर झाले आहे. ते काम सुरू का केले जात नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>डी.एस.आर. पेक्षा बाजारभाव जास्त आहेत. म्हणुन याकामी कुणी ठेकेदार मिळत नाही.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>काय प्रशासन या दराने मंजुर करत आहे?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>प्रशासनाने आपल्या पुढे प्रस्तावित केले आहे. दर कमी करून घेण्यासाठी त्यांच्याशी वाटाघाटी केल्या आहेत. बाजारभाव लक्षात घेवून केले आहेत. प्राकलनिय किंमतीपेक्षा २४ टक्के जास्त आहेत आपल्यासमोर प्रस्ताव आणण्याअगोदर आयुक्तांची याबाबत जी जबादारी असते ती पार पाडून हा प्रस्ताव आपल्या समोर आणला आहे. प्रत्त्येक निर्णय घेण्यासाठी आयुक्तांवर सोपविणे हे बरोबर नाही.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. रामनाथ सोनवणे):-</u>आमची काही हरकत नाही, पुढे ढकला, काहीही करा, मागच्यावेळी प्रशासनाने चुक केली होती. उपोषण होवू नये म्हणुन काम चालु केले होते. यापुढे काम चालु केले जाणार नाही. या प्रस्तावावर काय निर्णय घेत आहात?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>पुन्हा निविदा मागविल्या जाव्यात असा त्यांचा निर्णय आहे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदर प्रस्तावाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय क्र. २१:- उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याकरिता पाईप पुरविणेकामी मे. तन्वी कार्पोरेशन व मे. दिशा इन्टरप्रायझेस या न्यूनत्तम दराच्या निविदाकाराशी प्रशासनास संविदेस मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर <u>पाणीपुरवठा देखभाल व दुरूस्ती</u> योजने अंर्तगत उल्हासनगर कॅम्प १) ते ५) मध्ये विविध ठिकाणी जलवाहिन्या टाकण्या करिता पाईप व इतर साहित्त्य पुरवठा करण्या बाबत रू <u>९९९१३००</u>/- चे प्राकलन तयार करण्यात आले.

सदर कामासाठी दि २५/४/०३ च्या राज्य स्तरिय दैनिक नवशक्ती (मराठी )व फ्री प्रेस (इग्रजी) या वर्तमान पत्रात रितसर जाहिरात देउन निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार एकुण दोन पुरवठा दारांनी दि ५/५/२००३ रोजी सिलबंद निविदा महानगरपालिकेस सादर केल्या. कार्यकारी अभियंता (पा पु) सहायक मुख्य लेखा परिक्षक लेखा अधिकारी व दोन्ही पुरवठा दारांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थित दि ५/५/२००३ रोजी निविदा उघडण्यात आल्या .दोन्ही ठेकेदारानी सादर केलेल्या दराचा तुलनात्तमक तक्ता सोबत प्रपत्र “अ”मध्ये जोडला आहे :

वरिल दोनही पुरवठादारंनी सादर केलेले दर प्रकलनाच्या दरा पेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विषयक कामासाठी लागणाया साहित्याचा निविदेत खालील प्रमाणे समावेश आहे

१ विविध व्यासाचे मृदु लोखडी पाइप
२ विविध व्यासाचे बिडाचे पाइप
३ १०० मीमी ,८० मीमी व ६५ मीमी व्यासाचे जी आय पाइप
४ विविध व्यासाचे स्लुइस व्हाल्व
५ विविध व्यासाचे फिटींगस
६ एअर व्हाल्व
७ रोड बॉक्स

वरिल साहित्त्या पैकी अ क १)२)व ७) साठी प्राप्त न्युनितम दर हे दरसुची पेक्षा ५७टक्के ते११५टक्के जास्त आहेत . सदर दर अत्त्यत अवाजवी असल्याने अमान्य करण्याचे प्रस्तावित आहे.

उर्वरित अ.क ३ ,४ , ५ व ६ साठी प्राप्त न्यूनतम दर सुची पेक्षा १९ टक्के ते ३० टक्के जास्त आहेत ( ६५ मी मी व्यासाच्या जी आय पाइपचा दर ५४ टक्के जास्त आहे सबब स्विकारणे योग्य होणार नाही )दरांचा विचार केला असाता १९ टक्के व ३० टक्के जास्त दर र्स्पधात्मक वाटतात. तरी सुध्दा प्राप्त न्युनितम दर जद्यास तसे न स्विकारता दर कमी करून घ्यावे या उददेशाने मा. आयुक्तांच्या दालनात संबधीत ठेकेदारांना दि १७/०५/२००३ रोजी वाटाघटी साठी बोलवले होते .वाटाघटी अंती ठेकेदारानी १०० मी मी व ८० मी मी व्यासाच्या जी आय पाइपचा दर ५ टक्के व स्लुइस व्हाल्व ,पाइप फिटिंग व एअर व्हाल्वचे दर ४ टक्के कमी करण्याचे मान्य केले सविस्तर तपशिल सोबतच्या प्रपत्र “ब” मध्ये दिला आहे .सदर चा दर मजुर दरसूची पेक्षा १९.७३ टक्के जादा होत असून दर कमी केल्यानंतर प्रस्तावित निविदेची रक्कम रू. ९५५९०४९/- इतकी होईल .

प्राप्त दरांची तूलना सन २०००-२००१ च्या दरसूची नुसार केलेली आहे. तद्नंतर ची नैसर्गिक भाववाढ ( प्रति वर्षी १० टक्के )विचारात घेता वाटाघाटी नंतर ठेकेदांनी कमी केलेले दरा वाजवी वाटतात .तरी फक्त १०० मी मी व ८० मी मी व्यासाच्या जी आय पाइप ,स्लुइस व्हाल्व पाइप फिटिंग व एअर व्हाल्वचे दर मान्य करण बाबत शिफारस करण्यात येते .

निविदेतील प्राप्त युनितम दराप्रमाणे साहित्त्य खरेदी करणे बाबत खालील दोन पुरवठादार
१) मे. तन्वी कार्पोरेशन व २) मे. दिशा इंटरप्राइजेस यांना कार्यदेश देण्याचे प्रस्तावित आहे.

१) मे .तन्वी कार्पोरेशन मुबई :

| Sr.No | Particulars of Item | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| **1** | **100 mm dia G I Pipe medium class** | 9650 Rmt | 565.25 | 54,54,662.00 |

**54,54,662.00**

२) मे. दिशा इंटरप्राइजेस :

| Sr.No | Particulars of Item | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| **1** | **80 mm dia G I pipe medium class** | 9500 Rmt | 330.60 | 3141700.00 |
| **2** | **Providing & Supplying Sluice Valve Etc** | | | |
| i | 400 mm dia | 5 No | 39648.00 | 198240.00 |
| ii | 350 mm dia | 3 No | 32160.00 | 96480.00 |
| iii | 300 mm dia | 2 No | 18144.00 | 36288.00 |
| iv | 250 mm dia | 2No | 15648.00 | 31296.00 |
| v | 200mm dia | 7 No | 10560.00 | 73920.00 |
| vi | 150 mm dia | 11 No | 5952.00 | 65472.00 |
| vii | 100mm dia | 50No | 3936.00 | 196800.00 |
| viii | 80mm dia | 50No | 2976.00 | 148800.00 |
| **3** | **Providing & Supplying D/B Air Valves** | | | |
| i | 100 mm dia | 2 No | 8832.00 | 17664.00 |
| ii | 50 mm dia | 3 No | 5337.60 | 16012.80 |
| **4** | **Providing & Supplying Mechanical Joints** | | | |
| i | 250 mm dia | 4 No | 4176.00 | 16704.00 |
| i | 200 mm dia | 8No | 2985.60 | 23884.80 |
| ii | 150 mm dia | 10 No | 2380.80 | 23808.00 |
| iii | 100 mm dia | 12 No | 1526.40 | 18316.80 |
| | | | | **41,04,386.40** |

सन २००३-०४च्या अंदाजपत्रकांत या कामी E-1/I,E-2/I, E-3/I,E/4/I या लेखाशीर्षाखाली रू ७६ लाख एवढी तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

सबब प्रस्तावास मा स्थायी समितीची मान्यता मिळण्यासाठी सादर करण्यात येत आहे .

स्थायी समिती ठराव क्र. ४६ दिनांकः-९.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्ती योजनेअंतर्गत उल्हासनगर १ ते ५ मध्ये विविध ठिकाणी जलवाहीन्या टाकणेकरिता पाईप व इतर साहित्य पुरविणेकामी मागविलेल्या निविदा न स्विकारता प्रशासनास फेरनिविदा काढणेस निर्देश करीत आहे.

सुचकाची सही-

*अनुमोदकाची* *सही-*

***एकमताने***

*सभापती / पिठासीन अधिकारी*
*स्थायी समिती सभा*
*उल्हासनगर महानगरपालिका*

***मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-***
*प्रशासनाच्या वतीने आयुक्त साहेब आयत्यावेळच्या विषयान्वये एक प्रस्ताव चर्चेस आणु इच्छितात. आपणामधील बहुसंख्य सदस्यांची संमती असेल तर तो आजच्या सभेच्या कामकाजात सामावुन घेता येईल.*

आयत्यावेळचा विषय क्र. २२:- उल्हासनगर शहरातील विविध कामांना मिळालेल्या मंजुरीची माहिती स्थायी समितीस देणे करीता वित्तीय वर्ष २००२-२००३ च्या निधीतून काम करणेसाठी.

***मा. प्रभारी आयुक्त (श्री. रमनाथ सोनवणे):-***
*शहरातील विविध कामांना मंजुरी दिलेली आहे. मजुर कामगार संस्थेशी केलेल्या संविदेची माहिती दयायची आहे.*

***मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-***
*प्रभारी आयुक्तांनी आयत्त्या वेळच्या विषयान्वये आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यासाठी आणलेला प्रस्ताव सर्वानुमते समाविष्ट करून तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

आयत्यावेळचा विषय क्र. २२:- उल्हासनगर शहरातील विविध कामांना मिळालेल्या मंजुरीची माहिती स्थायी समितीस देणे करीता वित्तीय वर्ष २००२-२००३ च्या निधीतून काम करणेसाठी.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ८ मधील वडोल गांव येथे गजानन म्हात्रे यांचे घर व दत्तू म्हात्रे यांचे घर, राजेश जाधव यांचे घर, गायकवाड,विश्राम भुवन यांचे घराजवळ सी सी पायवाटा,नाल्या बांधणे(महापौर निधी २३२) | १९९९९०/- | १४.५.०३ | मे कपलेश्वर म. का. सोसा. |
| २ | प्रभाग क्र. १ राधा क्रिष्ण अपार्टमेंट आणि धनवंती अपार्टमेंट बाजूला सी सी | १९९९००/- | १४.५.०३ | मे कपलेश्वर म. का. सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वायवाटा आणि नाली बांधणे ( महापालिका निधि २५०) | | | |
| ३ | उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र. १७ मधील पाताली मंदि ते नानीक सोप फॅक्टरी पर्यतचा नाला बांधणे व दुरूस्ती करणे ( महापालिका निधि २५७) | १९९८६५/- | १४.५.०३ | मे कपलेश्वर म. का. सोसा |
| ४ | रिक्षा स्टँड कॅम्प २ बँक ऑफबडोदा समोर बी एस एन एल ने रस्त्यात खोदलेले पटटी भरणे( महापालिका निधि २६८) | ७७६२५/- | १४.५.०३ | मे शिव म. का. सोसा. |
| अ.क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
| ५ | उल्हासनगर-१ येथील मधूबन रेस्टॉरंट टेलिफोन एक्सचेंज समोर ते एस ठ एस स्कूल पर्यत बी एस एन एल खात्याने रस्त्यात खोदलेली पटटी भरणे( महापालिका निधि २६९) | २१८०६०/- | १४.५.०३ | मे जय शंकर म. का. सोसा. |
| ६ | उल्हासनगर-३ येंथील शिवाजी चौक ते संतोष बिल्डींग पर्यत गिगा सोलीशन प्रा. लि.ने खोदलेली पटटी भरणे ( महापालिका निधि २९४) | २२९८००/- | १४.५.०३ | मे गुरदेव म. का.सोसा. |
| ७ | उल्हासनगर-४ येथील शिवमार्ग कॉलनी मागे नालादुरूस्ती करणेबाबत. ( महापालिका निधि ३०३) | ९९०००/- | १४.५.०३ | मे कपलेश्वर म. का. सोसा |
| ८ | उल्हासनगर-४ येथील प्र क्र.१७ मधील गिता कॉलनी ते आनंद विद्यालयापर्यत नाला बांधणेबाबत.(महापालिका निधि ३१०) | १९९८६५/- | १४.५.०३ | मे कपलेश्वर म. का. सोसा |
| ९ | उल्हासनगर-४ येथील हनुमान नगर मागे नाला दुरूस्ती करणेबाबत ( महापालिका निधि ३१४) | ९९०००/- | १४.५.०३ | मे कपलेश्वर म. का. सोसा |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | उल्हासनगर-५ येथील सोप फॅक्टरी समोर, बॅ नं १७२८ जवळ साकव बांधणे. (उप महापौर निधी ३३०) | १०००००/- | १४.५.०३ | मे श्रीग गंगा म. का. सोसा. |
| ११ | उल्हासनगर-५ येथील कैलास कॉलनी जवळ शिवमंदिर चौकाची व रस्त्याची दुरूस्ती शिवरात्री पुवध्द करणेबाबत. ( महापालिका निधि ३३७) | २०००००/- | १४.५.०३ | मे हरेरामा म. का. सोसा. |
| १२ | उल्हासनगर-५ येथील प्र क्र. ११ मध्ये बॅ नं २०४६ ते २१०८ पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे आणि दुरूस्ती करणे. ( महापालिका निधि ३५०) | २०००००/- | १४.५.०३ | मे गुरूदेव म. का. सोसा. |
| अ.क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
| १३ | उल्हासनगर-५ येथील प्र क्र. ११ मध्ये बॅ नं २०३८ ते तुकाराम चाळ व बॅ नं २०५८ पर्यतचा रस्ता बी एम आणि एसी बनविणे आणि दुरूस्ती करणे. ( महापालिका निधि ३५२) | २०००००/- | १४.५.०३ | मे धन लक्ष्मी म.का. सोसा. |
| १४ | उल्हासनगर-४ येथील मानेरा जंक्शन ते हिरापूरी चौक लिंक रोड बनविणेसाठी. ( महापालिका निधि ३५९) | ४९९९५०/- | १४.५.०३ | मे भोलेनाथ म. का. सोसा. |
| १५ | उल्हासनगर-२ येथील बॅ नं ४३४, ४३२, ४३६ जवळ सी सी पायवाटा आणि नाली बांधणेबाबत. ( महापौर निधी ३६८) | १९९९००/- | १४.५.०३ | मे श्रीजयशंकर म. का. सोसा. |
| १६ | उल्हासनगर-५ येथील प्रक्र.११ मध्ये कैलास कॉलनी जवळील चौकात हायमास्टच्या आजूबाजूला सुशोभीकरण करणे व बॅ नं १९३३ जवळ सी सी एम-२५० ने रस्ता बांधणे. ( स्थायी समिती निधी ३६९) | १८८०००/- | १४.५.०३ | मे धनलक्ष्मी म. का.सोसा. |
| १७ | उल्हासनगर- येथील प्र क्र. १ मधील गवळीपाडा शाळा क्र. १७ जवळ सी सी एम-२५० ने रस्ता बांधणे आणि किशोर | १९९८२५/- | १४.५.०३ | मे. श्री मॉ क. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पवार तबेल्याजवळ शौचालयाची देरूस्ती करणे. ( नगरसेवक निधी ३७३) | | | |
| १८ | उल्हासनगर-४ येथील प्र क्र. १५ मध्ये आदेर्श नगर, धोबीघाट समोर चेकडे टाईल्स लावणे आणि नाली बनविणे. (नगरसेवक निधी४२३) | १९९७६०/- | १४.५.०३ | मे अल्का म. का. सोसा. |
| १९ | उल्हासनगर-४ येथील प्र क्र. १५ मध्ये समता कॉलनी आणि आर के कंपाऊंड,शिवाजी नगर,मद्रासीपाडा येथे चेकर टाईलेस लावणे आणि नाली बांधणे.( नगरसेवक निधी ४२४) | १९९७५८/- | १४.५.०३ | मे अल्का म.का. सोसा. |
| २० | उल्हासनगर-४ येथील प्र क्र. १८ मध्ये बंजारा पाडा,लायन्स क्लब च्या मागे रस्ता एम-२५० आणि नाली बांधणे. (नगरसेवक निधी ४३०) | १९९९७४/- | १४.५.०३ | मे भोलेनाथ म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिति स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४७ दिनांक:-९.७.२००३.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. सतरामदास जेसवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक विभागाअंतर्गत वरील २० विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिति नोंद करीत आहे

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ७. १३ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक : २८ ऑगस्ट, २००३

इतिवृत्त :

### दिनांक २८/०८/२००३ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक २८ ऑगस्ट २००३ रोजी सायंकाळी ४-३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

१) श्रीमती आहुजा नीता प्रकाश
२) श्री उमाप रामदास
३) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम
४) श्री तलरेजा विनोद चंदीराम
५) श्रीमती छाब्रिया भारती
६) श्रीमती माने किरण बाळकृष्ण
७) श्रीमती मोकल सिमा
८) श्री पंजाबी नारायण
९) श्रीमती बामणकर नंदिनी
१०) श्री पमनानी ईश्वर
११) श्री वलेचा पृथ्वी
१२) श्रीमती सुर्वे जयश्री
१३) श्री जेसवानी सतरामदास

तर

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी, मा. सदस्य श्री बेहरानी मोहन व श्री लिंगे सुर्यकांत (बबन) हे अनुपस्थितीत होते.

सायंकाळी ४-५५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले .

आयुक्तांच्या अनुपस्थितीत श्री उत्तम लोणारे हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन त्यांच्या जागी आसनस्थ होते.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> आजच्या या सभेत मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी या उपस्थित नसल्याने सभेचे कामकाज चालवण्यिासाठी आपणामधील एका सदस्याची सर्वानुमते किंवा बहुमताने पिठासीन अधिकारी म्हणुन निवड करावी लागेल.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप:-</u> श्री विनोद तलरेजा यांची पिठासीन अधिकारी म्हणुन निवड करण्यात यावी.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी या अनुपस्थितीत असल्याने श्री विनोद तलरेजा यांची सर्वानुमते पिठासीन अधिकारी म्हणुन निवड करण्यात आल्यानंतर ते पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ झाले.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक २४-७-२००३ रोजीचे इतिवृत्त कायम करणेबाबत .

<u>मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):-</u> सदरचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क. २ वाचुन दाखवितात .

विषय क्र. २:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बावत.

<u>मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-३ येथील दशरा मैदान आणि वाघरी पाडा परिसरात सी सी पॅसेज व गटार बनविणे. (३७० नगरसेवक निधी) | १९९९००/- | १४.७.२००३ | मे जय हिंद म. का. सोसा. |
| २ | उल्हासनगर-१ प्रभाग क्र. २ बॅ नं १७,१८ फॉलवर लाईन मध्ये सी सी एम-२५० ने रसता, नाली बांधणे. (३७६ नगरसेवक निधी) | १९९१७५/- | १४.७.२००३ | मे अल्का म. का. सोसा. |
| ३ | उल्हासगर- येथील प्रभाग क्र. २५ अ मध्येय कवराम कॉलनी बॅ. नं. ११०१ च्या मागे व विविध ठिकाणी सी सी एम-२५० ने रस्ता आणि नाली बांधणे. (४१६ नगरसेवक निधी) | १९९९००/- | १४.७.२००३ | मे जय हिंद म. का. सोसा. |
| ४ | उल्हासनगर-२ येथील मोरे नगर येथे | ९९०००/- | १४.७.२००३ | मे. जकनुश |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बगीच्याची सुधारणा करणे (विकास करणे) (४६० प्रभाग समिती निधी) | | | म. का. सोसा. |
| ५ | उल्हासनगर-१ येथील टिळकनगर येथील बगीच्याचे गेट आणि कंपाऊंड बांधणे.(४६१ प्रभाग समिती निधी) | १०००५०/- | १४.७.२००३ | मे सुर्य ज्योत म. का. सोसा. |
| ६ | उल्हासनगर-२ येथील बॅ. नं. ५८८ जवळ डंपिंग ग्राऊंड जवळ साकव बांधणे (४८० महापालिका निधी) | १९९९५०/- | १४.७.२००३ | मे. श्री. गंगा म. का. सोसा. |
| ७ | प्लॉट नं. ६१९ राखीव भुखंड क्र. ७४ (प्राथमिक शाळा) साठी असलेला भुखंडास तारेचे कंपाऊंड कयन विकास करणे (४८१ महापालिका निधी) | ३३१८००/- | १४.७.२००३ | मे प्रभात म. का. सोसा. |
| ८ | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. ६ मधील बौध्दनगर येथील भारत मार्बल गोडाऊन ते आर्डनस कंम्पाऊंड पर्यंतचा मुख्य नाला बांधणे. (४२५ नगरसेवक निधी) | १९९१२०/- | १४.७.२००३ | मे गुरूदेव म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ५९</u> <u>दिनांकः-२८.८.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्रीमती नीता आहुजा

अनुमोदकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गतच्या वरील ८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहीती नोंद करीत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ३ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ३:- उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक संचालक, नगररचना हे पद निर्माण करणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- हा विषय काय आहे हे समजावुन सांगा.

श्री. उत्तम लोणारे,(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):- उल्हासनगर महापालिका आस्थापना सुचीमध्ये सहाय्यक संचालक, नगररचना हे पद ८०००-१२५-१३५०० या वेतनश्रेणीमध्ये मंजुर आहे परंतु शासनाकडील अधिका-याची या पदावरील वेतनश्रेणी १००००-३७५-१५२०० अशी असल्याने सदरच्या वाढीव वेतनश्रेणीस स्थायी समितीची मंजुरी मिळणेसाठी स्थायी समितीसमोर प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवलेला आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- याची आवश्यकता काय आहे?सहाय्यक संचालक, नगररचना हे पद निर्माण केल्याने शहरातील अतिक्रमणांमध्ये काही फरक पडेल काय?

श्री. उत्तम लोणारे,(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):- हा पद निर्मीतीचा प्रस्ताव नसुन वेतनश्रेणी वाढीचा प्रस्ताव आहे. .

मा. सचिव श्री प्रकाश कुकरेजा :- इतर सर्व महापालिकांमध्ये नगररचना या पदा समवेतच सहाय्यक संचालक, नगररचना हे पद अस्तित्त्वात आहे. शहराचे नियोजन व्यवस्थितरित्त्या करणेसाठी या पदाची आवश्यकता भासते. नगररचना या पदाच्यावर सहाय्यक संचालक, नगररचना हे पद असते.

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. उमपा २२९८/२०३०/प्र. क्र. २५९/९८/नवि-२३, दिनांक १३.६.२००३ अन्वये सहाय्यक संचालक, नगररचना हे एक पद रू. ८०००-१२५-१३५०० या वेतनश्रेणीत निर्माण केले आहे. सदर रिक्त पदावर नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळवुन सक्षम अधिका-याची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करणेबाबत विनंती केली होती. नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कळविले आहे की, सहा संचालक, नगररचना या पदाची वेतनश्रेणी रू. १००००-३७५-१५२०० अशी आहे.

या महानरपालिकेने सहा, संचालक, नगररचना हे पद रू. ८०००-१३५०० या वेतनश्रेणीत निर्माण केलेले आहे. त्यास शासनाने दि. १३.६.२००२ च्या आदेशान्वये मंजुरी दिलेली आहे. सबब, सदर पदाची या महापालिकेला आवश्यकता असल्याने सदर पदाची वेतनश्रेणी रू. ८०००-२७५-१३५०० वरून रू. १००००-३२५-१५२०० या वेतनश्रेणीत आणणेकामी मंजुरी मिळणेस स्थायी समिती पुढे सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६० दिनांक:-२८.८.२००३

सुचकाचे नाव :- श्री सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्री ठाकुर नरेंद्रकुमार

वरील प्रस्ताव विचारात घेता ही स्थायी समिती महापालिका आस्थापनेवर सहाय्यक संचालक नगररचना पदाची वेतनश्रेणी रू. ८०००-२७५-१३५०० वरून रू. १० ,०००-३२५-१५२०० या वेतनश्रेणीत आणणे कामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ४ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ४:- सन २००३-२००४ करिता महानगरपालिकेच्या पात्र कर्मचा-यांना गणवेषां साहित्त्य पुरविणेकामी प्रशासनाने हरीओम ट्रेडींग यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

मा. सदस्या श्रीमती किरण माने:- कर्मचा-यांना गणवेश पुरवुनही ते गणवेश वापरत नसल्याचे दिसुन येते. त्यांना गणवेश देणे आवश्यक आहे परंतु गणवेश पुरवुनही ते वापरत नसतील तर एवढा खर्च करण्याची आवश्यकता काय आहे?

मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:- आम्हाला गणवेशाच्या कापडाचे नमुने दाखविणार होते, ते दाखविलेले नाहीत.

मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर:- गणवेशावर एवढा खर्च करायचा, परंतु कर्मचारी गणवेश घालत नसतील तर त्याचा फायदा काय?

श्री. उत्तम लोणारे,(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):- गणवेश वापरणे सर्व कर्मचा-यांना बंधनकारक करणार असुन आम्ही त्यांना शिस्त लावु.

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या भांडार विभागाव्दारे सन २००३-२००४ करिता महापालिकेतील पात्र कर्मचा-यांना गणवेश साहित्त्य वाटप करण्याकरिता जाहिर निविदा दि. १३.१२.२००२ रोजी मागविण्यात आल्या होत्त्या. त्या अनुषंगाने खालील पुरवठादारांनी निविदा सादर केल्या होत्त्या.

१. नॉव्हेल्टी फुटवेअर
२. नॅशनल क्लॉथ स्टोअर

३.    शैलेश कन्स्ट्रक्शन

उपरोक्त निविदाधारकांपैकी अनुक्रमांक व  ३ यांच्या निविदा निविदा सुचनेतील अटी व शर्तीप्रमाणे परिपुर्ण नसल्याने त्यांच्या निविदा उघडण्यात आल्या नाहीत. उर्वरित अनुक्रमांक १ येथील नॉव्हेल्टी फुटवेअर यांची निविदा उघडण्यात येवून त्यांनी दिलेल्या दराच्या अनुषंगाने दि. १४.२.२००३ रोजी दरामध्ये वाटाघाटी करून प्राप्त झालेले दर देखिल अवाजवी असल्याने तसेच एकच परिपुर्ण निविदा प्राप्त असल्या कारणास्तव मा. आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार दि. ३१.३.२००३ रोजी सदरहु कामासाठी फेरनिविदा मागविण्यात आल्या.  त्यानुसार खालील पुरवठादारांनी निविदा सादर केल्या.

१.    ज्योती एंटरप्रायजेस
२.    हरिओम एंटरप्रायजेस
३.    हरिओम ट्रेडिंग एजन्सी

उक्त पुरवठादारांच्या निविदा विहित कालावधीत प्राप्त झाल्या.  त्यापैकी न्युनतम दर सादर केलेल्या हरीओम एंटरप्रायजेस या पुरवठादारास वाटाघाटी करण्याकरिता दि. ९.४.२००३, १९.४.२००३ आणि ३१.५.२००३ रोजी एकुण ३ वेळा वाटाघाटीसाठी पत्र देण्यात आले होते. त्याप्रमाणे वाटाघाटी करून मे. हरीओम ट्रेडिंग एजन्सी, यांनी सुधारित अंतिम दर सादर केले. सुधारित दरानुसार एकूण कामाची रक्कम रू. ७,३२,०५८/- (रू. सात लक्ष बत्तीस हजार अठ्ठावन्न फक्त) इतकी होती.

सदर बाबीच्या खर्चाची तरतुद महापालिका अंदाजपत्रकात लेखाशिर्ष A2 (viii) मध्ये रू. ६२.५० लक्ष एवढी असुन त्यातुन सदरहु खर्च करावयाचा आहे. सदर  प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक तसेच मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.  त्यानुसार मे. हरिओम ट्रेडिंग एजन्सी यांना कार्यादेश क्र. उमपा/भांडार/८२/०२ दि. ४.६.२००३ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.

सदर बाब स्थायी समितीपुढे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (डी) अन्वये माहितीसाठी सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६१                    दिनांकः-२८.८.२००३

सुचकाचे नाव :-  श्री ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिकेतील पात्र कर्मचा-यांना गणवेश साहित्य पुरविणे कामी प्रशासनाने मे. हरीओम ट्रेडींग ऐजन्सी यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. ५ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ५:- स्थायी समिती सभापती कार्यालय व सभागृह नेता कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना विशेष भत्ता देणे.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी:- सचिव कार्यालयातील कर्मचारी देखिल जादा वेळ काम करतात त्यांना देखिल विशेष भत्ता मंजुर करण्यात यावा. सचिव कार्यालयातील कर्मचारी सदस्यांना सुचना, इतिवृत्त वेळेवर देतात म्हणुन सभा होते.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- माझा या प्रस्तावाला विरोध नाही परंतु इतर कार्यालयातील कर्मचारी पण जादा वेळ काम करतात त्यांना पण विशेष भत्ता मंजुर करण्यात यावा .
श्री. उत्तम लोणारे,(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):- इतर कार्यालयातील कर्मचा-यांबाबतचा प्रस्ताव स्वतंत्रपणे आणण्यात येईल.

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा) :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

मा. स्थायी समिती सभापती व सभागृहनेता उल्हासनगर महानगरपालिका यांना आपल्या कार्यालयामध्ये काही वेळी महत्त्वाचे कार्यालयीन कामानिमित्त / बैठकानिमित्त, कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतरही कार्यालयात थांबावे लागते. अशा वेळी स्थायी समिती व सभागृहनेता कार्यालयातील कर्मचा-यांनाही कार्यालयीन वेळेनंतर जादा वेळ थांबावे लागते. सद्यस्थितीत शासन निर्णयानुसार जादा वेळ काम केल्यास चतुर्थश्रेणी कर्मचारी व सुरक्षा रक्षक यांना जास्तीत जास्त रुपये १० /- प्रतिदिन मिळतात. सदरची रक्कम ही अत्यंत कमी असल्याने स्थायी समिती कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री. अशोक जाधव (शिपाई), श्री. निंबा वना पाटिल (शिपाई) व श्री. संपत पाटिल, सुरक्षा रक्षक व सभागृहनेता कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री. ईश्वर लोखंडे यांना विशेष बाब म्हणून रुपये ५००/- प्रति महिना दररोज किमान ३ तास जादा काम केल्यास देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी सदरच्या प्रस्तावास स्थायी समितीची मंजूरी मिळणेसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६२ दिनांक:-२८.८.२००३

सुचकाचे नाव :- श्रीमती निता आहुजा

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती सिमा मोकल

हा स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार स्थायी समिती कार्यालयातील कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतर जादा कामापोटी चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री. अशोक जाधव (शिपाई), श्री. निंबा वना पाटिल (शिपाई) व श्री. संपत पाटिल, सुरक्षा रक्षक व सभागृह नेता कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री. ईश्वर लोखंडे यांना विशेष बाब म्हणुन रू. ५००/- प्रती महिना अतिकालीन / विशेष भत्ता देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. ६ वाचुन दाखवितात .

**विषय क्र. ६:-** सभागृहनेता यांच्या कार्यालयात मे. किस्को इंडीया लिमिटेड उल्हासनगर-४ यांनी पुरविलेल्या थेट पडदयांचे देयक अदा करणे.

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

श्री. किशोर वनवारी, विद्यमान सभागृह नेता यांच्या दालनातील भिंतीसाठी संपुर्ण पडदे लावण्यासाठी, विद्यमान उप-महापौर यांच्या ऍन्टी चेंबर मध्ये, तत्त्कालिन भा.ज.पा. गट नेता यांच्या दालनात आणि तत्त्कालीन पाणी पुरवठा सभापती यांच्या दालनात पडदे लावण्याबाबत पुरवठादार मे. कोस्को इंडिया लिमिटेड, उल्हासनगर-४ यांना तत्त्कालिन खरेदी अधिकारी यांनी तोंडी सुचना दिलेल्या होत्या. परंतु त्यांनी वेळेवर लेखी स्वरूपात याबाबत सादरीकरण करून समक्ष प्राधिका-यांची प्रशासकीय व वित्तिय मंजुरी घेण्याची कार्यवाही केली नाही. त्यामुळे मे. कोस्को इंडिया लिमिटेड यांना सदर कामासाठीचे रूपये १६,९६६/- (रू. सोळा हजार नऊशे सहासष्ट फक्त) ऐवढे देयक अदा करण्यात आलेले नाही. तत्त्कालिन खरेदी अधिकारी यांनी विहित कार्य पध्दतीचा अवलंब न करता विद्यमान तसेच तत्त्कालीन पदाधिका-यांच्या विनंतीस अनुलक्षुन ही कामे पुरवठादारांकडून करून घेतली आहे. मात्र विहित कार्यपध्दतीचा अवलंब न झाल्यामुळे पुरवठादारांकडुन करून घेतली आहे. मात्र विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न झाल्यामुळे पुरवठादाराने समाधानकारक काम करूनही पुरवठादारास कामाचे देयक अदा होवू शकले नाही. सदर प्रलंबित देयक त्वरीत अदा करण्याची कार्यवाही सत्त्वर करणेबाबत. पुरवठादार तसेच लोकप्रतिनिधी यांचेकडुन भांडार विभागाकडे पाठपुरावा होत आहे.

सबब प्रकरणाची सत्त्यता अनुलक्षून तत्त्कालीन खरेदी अधिकारी यांचेकडुन या प्रकरणी झालेली अनियमितता क्षमर्पित करून पुरवठादाराचे देयक अदा करण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या कार्योत्तर मंजुरीसाठी सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ६३** दिनांक:-२८.८.२००३

सुचकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती नंदिन बामणकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सभागृह नेता व इतर पदाधिकारी यांच्या दालनात पडदे पुरविण्याकामी मेसर्स किस्को इंडीया लिमिटेड उल्हासनगर-४ यांच्याशी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस कायम करून त्यापोटी खर्च रू. १६ ,९६६/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ७ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ७:- वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेखा विवरणपत्र नमुना विहित करणे.

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा) :- वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेखा विवरणपत्र नमुने विहित करणेसाठी आम्ही महापालिका सचिवांकडे आम्ही नमुने दिलेले आहेत त्यांनी सदरचे नमुने सादर करावेत.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- येथे प्रस्तावात लिहिले आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अन्वये आयुक्तांनी दरवर्षी १ एप्रिल नंतर लवकरात लवकर वार्षिक प्रशासकीय अहवाल व लेखे स्थायी समितीला सादर करणे आवश्यक असते. तर हा प्रस्ताव सादर करण्यास एवढा विलंब का झाला?

मुख्य लेखा अधिकारी श्री डी. ए. पाटील:- स्थायी समितीने नमुने विहित करून देणे आवश्यक असल्याने व नमुने विहित केलेले नसल्याने विलंब झालेला आहे.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- मागील वर्षी महासभेत याबददल प्रश्न आला होता व त्यावेळी प्रशासनातर्फे सांगण्यात आले होते की, स्थायी समितीने विवरणपत्र सादर करणेसाठी नमुने विहित करून दिलेले नसल्याने विलंब झालेले आहे. यासाठी सदरचे नमुने आता विहित करण्यात येत आहेत.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- जर असे करणे आवश्यक होते तर स्थायी समितीला याबददल यापूर्वीच माहिती का देण्यात आली नाही? विलंब का झाला? आधी याचे उत्तर द्या.

मा. सदस्या श्रीमती किरण माने:- एवढा सरळ विषय येण्यास उशिर का झाला? आधी याचे उत्तर द्या.

मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:- हा गंभीर विषय आहे. आता लक्षात आले का?

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- पास करा.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- मुख्य लेखा अधिका-यांचे म्हणणे आहे की, त्यांनी जे नमुने तयार केलेले आहेत ते मंजुर केले जावेत .

मुख्य लेखा अधिकारी श्री डी. ए. पाटील:- स्थायी समिती दरवर्षी अर्थसंकल्प तयार करते, त्यामध्ये आम्ही लेखा विवरणपत्र असते तेच नमुने म्हणुन स्विकार केले जावे.

श्री दत्ता भडकवाड, उप आयुक्त (आरोग्य) :- मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अन्वये वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेखा विवरणपत्र सादर करणेसाठी स्थायी समिती जे नमुने देईल त्याच नमुन्यात प्रशासन अहवाल सादर करेल. स्थायी समितीने अद्याप यास मंजुरी दिलेली नसल्याने अहवाल सादर करता आलेली नाही, तरी आता स्थायी समितीने यास मंजुरी द्यावी यासाठी हा प्रस्ताव आणण्यात आलेला आहे.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा) :- दोन्ही नमुन्यांपैकी स्थायी समितीला जो नमुना योग्य वाटेल तो मंजुर करण्यात यावा.

मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:- नमुने आयुक्तांना दाखवा.

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- मा. सचिवांकडे आम्ही जे नमुने दिलेले आहेत ते स्थायी समितीला मंजुर असुन त्याप्रमाणे प्रशासनाने अंमलबजावणी करावी व. सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अन्वये आयुक्तांनी दरवर्षी १ एप्रिल नंतर लवकरात लवकर वार्षिक प्रशासकीय अहवाल व लेखे स्थायी समितीला सादर करणे आवश्यक असते. तथापि अधिनियमाचे कलम ९४ (२) अन्वये सदर अहवालांचा नमुना स्थायी समितीने निर्धारीत करून देणे आवश्यक आहे. परंतु स्थायी समितीने सदर अहवालाचा नमुना निर्धारीत न केल्याने सदरची माहिती स्थायी समितीला सादर करणे शक्य झालेले नाही. कृपया स्थायी समितीने सदर नमुना लवकरात लवकर विहित करणेबाबत स्थायी समितीला विंनती करण्यात यावी.

स्थायी समिती ठराव क्र. ६४ दिनांक:-२८.८.२००३

सुचकाचे नाव :- श्री सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अन्वये प्रशासनास असे निर्देशित करित आहे की, पुढील माहिती समाविष्ट असलेला विहित नमुन्यातील अहवाल दरवर्षी ३० जुन पूर्वी मागील सरकारी वर्षातील प्रशासना संबंधी तपशिलवार वार्षिक प्रशासन अहवाल व लेख विवरणपत्र प्रशासन स्थायी समितीपुढे ठेवील.

प्रकरण क्र. १:-मागील सरकारी वर्षातील उत्पन्न व खर्च यांचे विवरण.

प्रकरण क्र. २:- लेखा परीक्षा ताळेबंद

प्रकरण क्र. ३:- लेखा परीक्षा अहवाल.
त्यात अ. लेखा आक्षेप परीषदे
ब. लेखा परीक्षण टीप्पणी

<u>प्रकरण क्र. ४:-</u> महसुल तपशिल

त्यात अ. जमा शिल्लक

ब. अधिदान शेष

क. मिळणारे अनुदान शिल्लक

ड. मिळालेले अनुदान शेष

च. कर्ज

छ. मिळणारे कर्ज शेष

ज. कर्ज परतफेड शेष

झ. महसुल विभागातील शिर्ष न्याय वसुली

ट. महसुल विभागातील शिर्ष न्याय वसुली शिल्लक

ठ. विविध विभागातील शिर्ष न्याय वसुलीची प्रगती

ड. चालु अर्थसंकल्पिय अनुदाना व्यतिरिक्त कलेल्या खर्चाची माहिती व अशा खर्चाचे दायित्त्व पत्त्करण्यापुर्वी महापालिकेची मंजुरी घेतली होती किंवा कसे?

ढ. मागील वर्षात व प्रश्नांकित वर्षात शिर्षन्याय वाढलेली महसुल रक्कम.

<u>प्रकरण क्र. :-५</u> महापालिका आस्थापनाबाबत.

त्यात अ. नवीन निर्माण केलेले पद

ब. सेवानिवृत्त झालेले कर्मचारी किंवा अधिकारी यांची माहिती

क. नियुक्तीव्दारे किंवा पदोन्नतीने पदनिहाय भरलेली पद.

ड. कसुरदास कर्मचारी किंवा अधिका-याविरूध्द बसविलेली खातेनिहाय चौकशी

च. खातेनिहाय चौकशीत दोषी आढळलेल्या कर्मचारी किंवा अधिका-यांची माहिती.

छ. खातेनिहाय चौकशीत दोष मुक्तता केलेल्या कर्मचारी किंवा अधिका-यांची माहिती.

ज. रिक्त पदे.

झ. अनुशेष (मागासवर्गीय अनुशेष)

ट. मागासवर्गीय अनुशेषा अंतर्गत भरती शेष व पदे

ठ. खुल्या वर्गात भरती शेष व रिक्त पदे.

<u>प्रकरण क्र. ६:-</u> शहरातील सार्वजनिक आरोग्यासंबधी स्थिती आणि उचललेली पाऊले.

त्यात अ. दुर्धर रेगाचा प्रादुर्भाव व खास उपाययोजना.

<u>प्रकरण क्र. ७:-</u> अर्थसंकल्पिय अंदाज अनुसरून हाती घेतलेले प्रकल्प व त्यांचे विवरण आणि हाती न घेतलेले प्रकल्प व त्यांचे विवरण.

<u>प्रकरण क्र. ८:-</u>शहरातील बांधकाम परवानगी दिलेल्यांची संख्या आणि

अ. बांधकाम परवानगी विरूध्द केलेल्या बांधकामाची संख्या

<u>प्रकरण क्र. ९:-</u>शहरातील अनाधिकृत बांधकामांची संख्या त्यांचे विवरण खालील प्रकारे.

अ. झोपडयांची संख्या

ब. तळमजल्या, पत्राची किंवा विटांच्या बांधकामाची संख्या.

क. आर.सी.सी. किंवा बहुमजली अनाधिकृत इमारती

ड. बजावलेल्या नोटीसांची संख्या (प्रकारनिहाय माहिती)

च. निष्काशन केलेल्या बांधकामांची संख्या (प्रकार निहाय माहिती)

छ. पोलिस सहाय्यावर केलेला खर्च

ज. अनाधिकृत बांधकामकर्त्यांकडून वसुली केलेल्या खर्चाची रक्कम

झ. महापालिकेच्या जमिनीवर केलेल्या अतिक्रमणाची संख्या

ट. शासकीय जमिनीवर केलेल्या अतिक्रमणाची संख्या

ठ. राहिलेले शिल्लक अनाधिकृत बांधकामा विरूध्द न केलेल्या कारवाईचे कारण व जबाबदार कोण? त्यासाठी उल्लेख.

<u>प्रकरण क्र. १० :-</u>महापालिकेने संपादन केलेल्या मालमत्ताबाबत माहिती. आणि महापालिकेने विनियोग केलेल्या मालमत्तेची माहिती

<u>प्रकरण क्र. ११:-</u>१. कर वसुली वाढविण्याकरिता उपाययोजना.
त्यात अ. महापालिका उत्त्पन्न वाढविण्यासाठी उपाययोजना
ब. महापालिका खर्चात कपात करण्यासाठी उपाययोजना

<u>प्रकरण क्र. १२:-</u>१. विषय निहाय परवाना दिलेल्या संख्या. आणि हातगाडी व इतर अतिक्रमण नियंत्रणा विरूध्द केलेली कारवाई

<u>प्रकरण क्र. १३:-</u>उल्हासनगर शहरातील साफसफाई परिस्थितीवर केलेल्या उपाययोजना आणि घनकचरा व्यवस्थापन कामी प्रगती अहवाल.
त्यात डुकरे, कुत्रे भटक्या जनावरांबाबत केलेली कारवाई व उपाययोजना.

<u>प्रकरण क्र. १४:-</u>उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा परीस्थितीवर केलेल्या उपाययोजना आणि शहरातील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रगती.

<u>प्रकरण क्र. १५:-</u> महापालिका आणि स्थायी समिती यांनी पारीत केलेल्या ठरावांची अंमलबजावणी बाबत अहवाल व अंमलबजावणी न केलेल्या ठरावांची संख्या, प्रकार व कारण.

<u>प्रकरण क्र. १६:-</u> अ. झाडे तोडण्याचे प्राप्त झालेले अर्ज आणि परवानगीसाठी निकालात काढण्यात आलेले अर्जाची संख्या आणि बिना परवानगी झाड तोडणा-या व्यक्तीं विरूध्द भरलेल्या खटल्या संबंधीची माहिती.
ब. शहरात लावण्यात आलेल्या झाडांची संख्या व प्रकार.

<u>प्रकरण क्र१७:-</u>केंन्द्र शासन व राज्यशासना अनुदानित विविध प्रकल्प व योजना अनुसार विषयनिहाय प्रगती व उपाय योजना अहवाल.

<u>प्रकरण क्र१८:-</u>महापालिकेविरूध्द दाखल केलेले दावे, याचिका आणि खटले बाबी अहवाल.

<u>प्रकरण क्र१९:-</u>शहरातील सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था अहवाल.

<u>प्रकरण क्र२०:-</u> प्रशासनाकडुन उपलब्धी व विशेष सूचना.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची सही-

एकमताने

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. ८ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ८:- उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागातील श्री. कृष्णा पावशे व श्री. बन्सीलाल जैस्वार यांचे तारतंत्री पदाचे पदनाम बदलुन वाहनचालक पदनाम मंजुर करणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- हा पोस्ट चेंज करण्याचा प्रस्ताव आहे की, प्रमोशन देण्याचा प्रस्ताव आहे, यानंतर सदरचे पद कोणते राहील.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- सदरचे पद वायरमन कम् ड्रायव्हर असे राहिल.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- सदरच्या कर्मचा-याकडे ड्रायव्हिंग लायसन आहे काय? अन्यथा काही झाल्यास ती महापालिकेची जबाबदार ठरेल तसेच यामुळे महापालिकेला काय फायदा होईल?

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- एखाद्या वेळेस तातडीचा कॉल आल्यास वायरमन स्वतः गाडी नेवुन काम करु शकेल.

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- सदरचा प्रस्ताव हा विद्युत विभागाचा असुन, विद्युत विभागातील कार्यकारी अभियंता हे एक सक्षम अधिकारी आहेत आता लवकरच गणपती उत्त्सवास प्रारंभ होत असुन ते सदरच्या कर्मचा-यांकडुन व्यवस्थितरित्त्या काम करून घेतील. तरी सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका शहरात दिवाबत्ती दुरूस्तीने कार्य विभागीय कर्मचा-यांमार्फत करतात यासाठी विद्युत विभागाकडे ७ सेवावाहन आहेत आणि त्यासाठी ७ वाहनचालकांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

परंतु वाहनचालक अनुपस्थित राहिला तर वाहने बंद राहतात. त्याच्या परिणामस्वरूपात शहराच्या दिवाबत्ती दुरूस्तीचे कार्य होत नाही आणि दुस-या दिवशी तक्रारीची संख्या वाढते.

याकारणे विद्युत विभागाने अशी विनंती केलेली आहे की, त्यांच्या विभागात दोन तारतंत्री १. श्री. कृष्णा पावशे २. श्री. बन्सीलाल जैस्वार यांच्याकडे वाहनचालकाचा परवाना आहे. त्यांना अनुपस्थितीत सेवावाहन चालविण्याची परवानगी मिळावी.

वरील संदर्भात प्रशासन अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

१. तारतंत्री व वाहनचालक या दोन्हीही पदांची वेतनश्रेणी एकच आहे. व ती वेतन श्रेणी रू. ३०५०-७५-३९५० -८०-४५९० आहे. त्यामुळे कोणत्त्याही आर्थिक लाभ या कर्मचा-यांना मिळणार नाही.
२. दोन्ही ही वर्ग ३ चे कर्मचारी आहेत. परंतु त्यांच्या कार्यात फरक आहेत.
३. विद्युत विभागाने केलेली मागणी तक्रारीचे शिघ्रगतीने निराकरण होणाचे दृष्टीने योग्य आहे.
४. विद्युत विभागाची गरज लक्षात घेता जर हया दोन तारतंत्रीचे पदनाम बदलून तारतंत्री /वाहनचालक पदनाम करण्यात आले तर त्यांना वाहनचालविण्याची परवानगी देण्यास हरकत राहणार नाही.

वरील बाबी लक्षात घेता श्री. कृष्णा पावशे व श्री. बन्सीलाल जैस्वार यांचे तारतंत्री पदाचे पदनाम बदलुन त्यांची सध्याची वेतन श्रेणी रू. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० यात तारतंत्री / वाहनचालक पदनाम देण्याच्या मंजुरीसाठी हा प्रस्ताव स्थायी समिती पुढे सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ६५ <u>दिनांकः-२८.८.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

वरील प्रस्ताव विचारात घेता ही स्थायी समिती महानगरपालिका विद्युत विभागातील श्री. कृष्णा पावशे व श्री. बन्सीलाल जैस्वार यांचे तारतंत्री पदाचे पदनाम बदलुन त्यांची सध्याची वेतनश्रेणी रूपये ३०५०-७५-३९५०-८०-४५९० यात तारतंत्री / वाहनचालक पदनाम देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ९:- उल्हासनगर महानगरपालिकेचे मुख्यालय येथील नागरिक सुविधा केंद्रात वातानुकूलित यंत्र बसविणेकामी प्रशासनाने

केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- . सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

महानगरपालिकेने खालील दर्शविलेल्या कार्याची डी.डी.आर, ठाणे यांनी सुचविलेल्या मजुर कामगार सह सं. लि. यांच्या दराला मंजुरी दिली होती. त्यांच्याशी मागील पंधरवडयात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड)अन्वये करार केलेले आहे.

| अ. क्र. | कार्याचे नांव | अंदाज पत्रकीय रक्कम | सर्वात कमी दराचे निविदा धारकांच्या /सोसायटीच्या नांव | दर | मंजुरीच्या दिनांक | कराराच्या दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | नागरिक सुविधा केंद्रात वातानुकुलित यंत्र बसविणे. | रू. ५,००,०००/- | स्वराज मजूर कामगार सह. सं. लि. | ।ज चमत | १४.७.०३ | ८.८.०३ |

सदर माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६६ दिनांकः-२८.८.२००३

सुचकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेचे मुख्यालय येथिल नागरीक सुविधा केंद्रात वातानुकूलित यंत्र बसविणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. १० प्रशासनाच्या वतीने मागे घेण्यात आलेला आहे. त्यामुळे तो घेता येणार नाही.

विषय क्र. १०:- उल्हासनगर ३ येथे प्रभाग क्र. २४ क मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते डॉ. गावडे यांच्या क्लीनीक पर्यंत एम. ३५० ने रस्ता बांधणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ११:- उल्हासनगर १ येथील प्रभाग क्र. २० मध्ये बॅरेक नं. ७७ मधील शौचालय निष्कासित / विनियोग करणे.

मा. सदस्या श्रीमती किरण माने:- यापूर्वी देखिल सदरचा विषय आला असता त्यावेळी सर्वांनी त्यास विरोध केला होता. जुने शौचालय तोडुन त्या ठिकाणी नवीन शौचालय बांधावे असे ठरले होते, तरी हा विषय पुनश्चः कसा आला.

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- . जुने शौचालय तोडुन त्या जागी नवीन शौचालय बनविण्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद नाही सदरचे शौचालय ब्रिटीशांच्या काळातील आहे. सदरचे शौचालय तोडुन त्या ठिकाणी अतिक्रमण होवु नये यासाठी सीसी पॅसेज, उद्यान बनविता येईल. प्रभागातील नगरसेवकाला प्रभागातील माहिती असल्याने त्यांनीच हा प्रस्ताव आणलेला आहे. सदरचे शौचालय वापरात नाही व मोडकळीस आलेले असल्याने ते निष्कासीत करण्यात यावे.

मा. सदस्या श्रीमती किरण माने:- शौचालय तोडुन टाकल्यास लोक कुठे जातील?

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- . सदर ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता नाही, त्यामुळेच सदर प्रभागातील नगरसेवकाने देखिल प्रस्ताव दिलेला आहे.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबी:- माझ्या प्रभागात बॅ क्र ४२२ येथील शौचालय देखिल मोडकळीस आलेले आहे, ते देखिल तोडण्यात यावे. संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाच्या वेळी संबधित प्रभागातील स्वच्छता निरीक्षका मार्फत मोडकळीस आलेल्या शौचालयांची यादी बनविण्यात आलेली होती, परंतु त्यावर देखिल काही एक कार्यवाही झालेली नाही. ते प्रस्ताव देखिल स्थायी समितीत ठेवण्यात यावा.

श्री दत्ता भडकवाड (उप आयुक्त आरोग्य):- हा जो प्रस्ताव आहे, तेथील शौचालयांची मी स्वतः जागेवर जावुन पाहणी केलेली आहे. सदरच्या शौचालयांचा आजुबाजूचे नागरिक वापर करीत नसुन त्यांनी देखिल ते तोडण्याची मागणी केलेली आहे. सध्या सदरचे शौचालय फक्त परिसरातील दुकानदार वापर करित असुन सदरचे शौचालय तोडल्यानंतर सदर ठिकाणी छोटी मुत्री बांधण्यात येईल.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- यापुढे जेव्हांही शौचालय निष्कासीत करण्याचा प्रस्ताव आणण्यात येईल त्यावेळेस त्या ठिकाणी जुने शौचालय तोडुन नवीन शौचालय बांधण्याचा प्रस्ताव देखिल आणण्यात यावा किंवा पर्यायी उपाययोजना देखिल करावी अन्यथा सदर ठिकाणी दादागिरीने अतिक्रमण होते.

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- . नवीन शौचालय बांधण्या ऐवजी तेथे सीसी पॅसेज करण्यात यावा.

*__श्री दत्ता भडकवाड, उप आयुक्त (आरोग्य) :-__ याबददल आम्ही गोषवा-यात स्पष्ट लिहिलेले आहे.*

*__मा. सदस्य श्री रामदास उमाप:-__ सीसी पॅसेज केल्यास सदर ठिकाणी अतिक्रमण होईल.*

*__श्री दत्ता भडकवाड, उप आयुक्त (आरोग्य) :-__ सदर ठिकाणी आम्ही छोटी मुत्री बांधु असे गोषवा-यात नमुद केलेले आहे.*

*__मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):-__ . शौचालय तोडुन तेथे छोटी मुत्री बांधण्यात येईल. सदरचे शौचालय जुने असुन ३०-४० वर्षांपासुन आहेत. परिसरात सर्वांचे स्वतःचे शौचालय असल्याने सार्वजनिक शौचालयांचा दुरुपयोग होतो. सदरच्या शौचालयात समाजकंटक लपतात त्यामुळे गुन्हेगारीत वाढ होते. जर परिसरातील लोकांनी शौचालय तोडुन तेथे उद्यान बनविण्याची मागणी केली तर उद्यान केले जाईल. सदर ठिकाणी अतिक्रमण होवु नये याची जबाबदारी प्रशासनाची आहे.*

*__मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल:-__ जुने शौचालय असेल तर ते तोडुन तेथे लवकरात लवकर नवीन शौचालय बनविण्यात यावे. यासाठी नगरसेवक निधीतुन काम केले जावे. काम लवकर होत नाही. आमच्या विभागात हे काम लवकरात लवकर करण्याची आवश्यकता आहे .*

*__मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):-__ . नगरसेवक निधीतुन काम करण्यास कोणाचीही आडकाठी नाही, नगरसेवक निधी हा स्वेच्छा निधी असल्याने तो नाकारता येणार नाही. नगरसेवक निधीतुन काम करण्यासाठी तुम्ही आयुक्तांना पत्र द्या तुमचे काम होईल. सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

*__प्रस्तावना__*

*श्री. मनोज एल. साधवानी, नगरसेवक, प्रभाग क्र. २० बॅ. नं. अ-७७ मधील शौचालयाबाबत, शौचालय तोडणेबाबतची मागणी प्रशासनाकडे प्राप्त झाल्याने कॅम्प नं. १ मधील संबधीत स्वच्छता निरिक्षक व प्रमुख स्वच्छता निरिक्षक यांनी प्रत्यक्ष पहाणी करून सदर ठिकाणची ६ सीटचे शौचालय उपयोगत नसल्याने व नादुरूस्त असल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे. सदर शौचालयाची नोंद आरोग्य विभागाने केलेल्या सर्वेक्षण नोंद वहीमध्ये आहे.*

*मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय / मुतारी निष्कासित करून सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.*

*__स्थायी समिती ठराव क्र. ६७__ __दिनांक:-२८.८.२००३__*

*सुचकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा*

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती भारती छाबिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर -१ येथील प्रभाग क्र. २० मध्ये बॅरेक नं. अ- ७७ मधील शौचालय निष्कासित / विनियोग करणेकामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. १२ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १२:- उल्हासनगर ३ येथे प्रभाग क्र. २५ येथील बॅरेक नं. १०३९/ १०४० समोरील शौचालय निष्कासित / विनियोग करणे.

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- . वरील विषयावरील चर्चेस अधिन राहुन सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

श्रीमती. मिनु राज दासानी व अन्य रहिवाशी यांचेकडुन बॅरेक नंबर १०३९/१०४० येथील शौचालय तोडणेबाबतची मागणी प्रशासनाकडे प्राप्त झाल्याने कॅम्प नं.३ मधील संबंधीत स्वच्छता निरिक्षक व प्रमुख स्वच्छता निरिक्षक यांनी प्रत्यक्ष जागा पहाणी करून सदर ठिकाणची १० सिट व ६ सिट दोन शौचालय उपयोगात नसल्याने व ना दुरूस्त असल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे. सदर शौचालयाची नोंद आरोग्य विभागाने केलेल्या सर्वेक्षण नोंद वहीमध्ये आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय / मुतारी निष्कासित करून सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६८ दिनांकः-२८ ८ २००३

सुचकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर -३ येथील प्रभाग क्र. २५ मध्ये बॅरेक क्र. १०३९/ १०४० येथील शौचालय निष्कासित / विनियोग करणेकामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. १३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १३:- उल्हासनगर-१ येथील सोनेसर अपार्टमेंट ते सी ब्लॉक पर्यंतचा रस्ता बांधणे कामी जयहिंद इन्फास्ट्रक्चर या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- या रस्त्यावर एकुण खर्च किती आहे. ?

कार्यकारी अभियंता श्री सुखरामानी:- रु ५९ लक्ष.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- यासाठी जी आवश्यक मंजुरी आहे ती केव्हा घेतली?

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- . संपुर्ण तपशिल गोषवा-यात दिलेला आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- तांत्रिक मंजुरी २००१ मध्ये घेतल्याचे दिसते. तर सदरचा प्रस्ताव सादर करण्यास एवढा विलंब का झाला, मागील अर्थसंकल्पातील तरतुद आता वापरता येईल काय? आता हे काम करण्यासाठी निधी उपलब्ध आहे काय? अर्थसंकल्पामध्ये यापूर्वीच रु १८ कोटीची तुट दाखविलेली आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत खराब आहे तरी एवढा मोठा प्रकल्प मंजुरीसाठी का सादर केला जातो? हे चुकीचे आहे. या वर्षाची वित्तीय परिस्थिती पाहुन प्रस्ताव आणला जावा.

मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:- प्रस्ताव कायदेशिर आहे काय ?

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):-आजच्या सभेत आयुक्त उपस्थित नाहीत, त्यामुळे जोपर्यंत आयुक्तांशी चर्चा होत नाही तोपर्यंत हा विषय वगळण्यात येत आहे.

विषय क्र. १३:- उल्हासनगर-१ येथील सोनेसर अपार्टमेंट ते सी ब्लॉक पर्यंतचा रस्ता बांधणे कामी जयहिंद इन्फास्ट्रक्चर या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. १४ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १४:- महानगरपालिका जे.सी.बी मशीन करिता मोठे टायर पुरविणे कामी प्रशासनास मे. चंदर टायर्स उल्हासनगर-३ यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

मा. पिठसीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- . सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन क्रमांक एमएच-०५ ए-९४६२ या जेसीबी मशीन ऑपरेटर यांनी दिलेल्या अहवालानुसार सदरहू मशिनचे मागील मोठे टायर टयुब व प्लॉप पूर्णतः खराब झालेले असुन नव्याने बदलणे बाबत आवश्यक आहे. सदरहू जेसीबी मशीन फेब्रुवारी १९९८ साली खरेदी केले असून अद्याप पावेतो मागील मोठे टायर्स बदलण्यात आलेले नाहीत. सदरहु टायर खराब झाल्या असल्याकारणाने जेसीबी मशीन नादुरूस्त आहे व काम करण्यास सक्षम नाही.

जेसीबी मशीनचा वापर आरोग्य विभाग, अतिक्रमण विभाग तसेच पाणी पुरवठा विभागामध्ये अत्यंत आवश्यक आहे. तसेच सद्या पावसाळा सुरू असून गणेश उत्त्सव येत आहे. अशा वेळेस सदरहु जेसीबी मशीन सतत कार्यरत ठेवणे आवश्यक व महत्त्वाचे आहे.

उपरोक्त जेसीबी मशीनचा पाठीमागील दोन मोठे टायर्स टयुब व प्लॉप नव्याने खरेदी करून खरेदी करण्यासाठी मागविण्यात आलेल्या दरपत्रकांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पार्टीचे संपूर्ण नांव व पत्ता | एकूण रक्कम |
|---|---|---|
| १ | मे. चंदर टॉयर्स, उल्हासनगर-३ | ६० ,०००/- |
| २ | मे. साई टॉयर्स, उल्हासनगर-३ | ६१ ,०००/- |
| ३ | मे. पी. आर. टॉयर्स उल्हासनगर-३ | ६२ ,३१०/- |

उपरोक्त दरपत्रकानुसार मे. चंदर टॉयर्स, उल्हासनगर-३ या पार्टीने नमुद केलेला रू. ६० ,०००/- हा दर सर्वात कमी नमुद केला असून वाजवी असल्याबाबतचा वाहन विभाग प्रमुख यांनी अहवाल दिलेला आहे. तसेच मा. मुख्य लेखा परिक्षक, मा. मुख्य लेखा अधिकारी यांनी यास मान्यता दिलेली आहे. त्याचप्रमाणे सदरचा खर्चासाठी वित्तिय वर्ष २००३-२००४ चा अंदाजपत्रकांमध्ये आवश्यक ती अर्थ संकल्पीय तरतुद केलेली आहे.

मे. चंदर टॉयर्स, उल्हासनगर-३ यांचेकडुन वाहनास क्रमांक एमएच-०५-ए-४६२ या जेसीबी मशिनसाठी नवीन दोन मोठे टॉयर्स टयुब व प्लॉप खरेदी करणेसाठी रू. ६० ,०००/ या खर्चास मंजुरी मिळणेस मा. स्थायी समिती समोर प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ६९ दिनांकः-२८.८.२००३

सुचकाचे नाव :- श्रीमती भारती छाब्रिया

अनुमोदकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वाहन क्र.एमएच-०५ / ए-९४६२ या जेसीबी वाहनाचे मागील मोठे टायर पुरविणे कामी प्रशासनास मे. चंदर टायर्स उल्हासनगर-३ या कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. १५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १५:- महानगरपालिका सेवेतील लाभार्थी कर्मचा-यांना रेनकोट वापरणे कामी अंदाजित रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- हा विषय कोणत्त्या विभागाचा आहे? याची आता काय आवश्यकता आहे?

मा. सदस्य श्रीमती किरण माने:- सदरचे रेनकोट पुढील वर्षी देणार आहेत काय?

श्री रविंद्र गुरव, खरेदी अधिकारी:- याबददल मी सांगु इच्छितो की, प्रभाग अधिकारी म्हणुन मी कार्यभार हाती घेतला तेव्हा पाहिले की, बरेचसे कर्मचारी पावसात रेनकोट शिवाय काम करीत आहेत. तेव्हा श्री गोपाल जेसवानी हे भांडार अधिकारी होते. तेव्हा मी त्यांना याबददल विचारले असता त्यांनी सांगितले की, रेनकोट खरेदी करण्यासाठी अद्याप काही एक कार्यवाही झालेली नाही. तेव्हा आम्ही सर्व विभागात परिपत्रक देवुन लाभार्थी कर्मचा-यांची माहिती मागविली, त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाकडुन पुनश्चः लाभार्थी कर्मचा-यांची माहिती मागविली, यामध्ये बराच कालापव्यय झाला. शासनाने केलेल्या दर करारा प्रमाणे रेनकोट मागविण्यात येणार आहेत.

मा सदस्य श्रीमती किरण माने:- तुम्हा आता रेनकोट कधी मागविणार.

मा. सदस्य श्री पृथ्वी वलेचा:- आता पावसाळा संपलेला आहे, रेनकोट हॅटकोट म्हणुन हिवाळयात घालणार काय ?

श्री रविंद्र गुरव, खरेदी अधिकारी:- मी आधीच तुम्हाला सांगितले की थोडा उशिर झालेला आहे, तरी अजुन पावसाळयाचा सप्टेंबर महिना जायचा आहे. स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतर १५ दिवसात खरेदीची कार्यवाही पुर्ण करता येईल.

__मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):-__आजच्या सभेत आयुक्त उपस्थित नाहीत, त्यामुळे जोपर्यंत आयुक्तांशी चर्चा होत नाही तोपर्यंत हा विषय वगळण्यात येत आहे.

__मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-__ विषय क. १६ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १६:- सन २००३-२००४ करिता मार्ग प्रकाशासाठी व उद्यानात बसविलेल्या दिवाबत्ती देखभाल दुरूस्तीसाठी विद्युत साहित्य पुरविणेकामी प्रशासनास लघुत्तम दराच्या निविदाकारांशी संविदेस मान्यता देणे बाबत.

__मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- .__ सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

__प्रस्तावना__

सालाबादा प्रमाणे वर्षे २००३-२००४ करीता रस्त्यावरील दिवाबत्ती, उद्यानात बसविलेल्या दिवाबत्ती दुरूस्तीसाठी लागणारे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता मागच्या अनुभवाच्या आधारावर लागणारे विद्युत साहित्याची यादी बनवून त्यांचे दर १ वर्षा करिता ठरविण्यासाठी ॲटम रेट टेंडर फि प्रेस जरनल इंग्रेजी, नवशक्ती मराठी, नवभारत हिंन्दी हया ३ वर्तमान पत्रात निविदा सुचना देउन मागविण्यात आलेले आहे. सदर निविदा १. मे. दक्षमेक्ष केबल २. मे. शारदा इंडस्टीज ३ मे. फिलिप्स इंडिया लि. ४. मे. दामाणी विद्युत केन्द्र, ५. मे. मेघदूत इलेक्टीक ६. मे. विशाल केबल यांनी खरेदी केले आणि ५ निविदा धारकांनी वेळेवर निविदा भरल्या आणी त्या दिनांक १६/८/०३ रोजी १६.०० वाजता उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्त्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे

| A. H «$ §. | LkfgR;kps fooj.k | ,dk o"kkZ dfjrk A§Xm oOV bmJU ma{ gmoh Ë; | A§XmoO V Xa é | **es- n’kes’k** nj #- | **es- 'kjnk baMLV~zh** nj #- | **es fQfyll bafM;k fy-** nj #- | **es- nkek.kh fo|qr dsUnz** **nj #-** | **es- es?knwr bysDV~hd** nj #- |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 250 dm°. EM.[r.Eg.ìhr. b°[ (Am{dm`S>) | 1850 ux | 660 | **710-00** | **&&** | 645-00 | छवज नवजमक | **681-00** |
| 2. | 40 dm°. Q>`w] bmB©Q> | 2000 ux | 47 | **46-00** | **&&** | **45-00** | छवज नवजमक | 40-80 |
| 3. | 40 dm°. Q>`w] bmB©Q> Mm{H$ | 500 ux | 120 | **130-00** | **&&** | 105-00 | **117-00** | **122-85** |
| 4. A | 250 dm°. EM.[r.Eg.ìhr. Mm{H$ ([m{ëgQ>a H$å[m°S> ) | 400 ux | 925 | **805-00** | **&&** | 650-00 | **693** | 655 |
| 4. ] | 250 dm°. EM.[r.Eg.ìhr. Mm{H$ (Iwbr g§aMZm) | 230 ux | 925 | **980-00** | **&&** | 750-00 | **792-00** | **975-00** |

| A. H «$ §. | LkfgR;kps fooj.k | ,dk o"kkZ dfjrk A§XmoOV bmJU ma{ gmoh Ë; | A§XmoOV Xa é | **es- n'kes'k** nj #- | **es- 'kjnk baMLV~zh** nj #- | **es fQfyll bafM;k fy-** nj #- | **es- nkek.kh fo|qr dsUnz** **nj #-** | **es- es?knwr bysDV~hd** nj #- |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5. A | BJZmB©Q>a 250 dm°Q> (ogob§Z²oS-> H²$b AmH$ma ) | 2000 ux | 390 | **170-00** | **&&** | **166-00** | **141** | 132-00 |
| 5. ] | BJZmB©Q>a 250 dm°Q> (Am`VmH¥$Vr AmH$ma) | 160 ux | 390 | **425-00** | **&&** | 355-00 | छवज्ुनवजमक | **414-00** |
| 6. | 250 W ,p ih ,l Ogh lpa | 100 ux | 3464 | **2810-00** | **&&** | **2650-00** | **2777-00** | 2606-00 |
| 7. | 40 dm°. ñQ>mQ>©a | 2300 ux | 7 | **11-00** | **&&** | **10-00** | **8-10** | 7-00 |
| 8. | 250 dm. o\$oQ>J gmR>r AH$ob©H$ H$ìha | 2000 ux | 405.80 | **240-00** | 149-50 | **366-00** | छवज्ुनवजमक | **210-00** |
| 9. | 100 Eå[. oH$Q> H{$Q> | 600 ux | 260.10 | 350-00 | **&&** | **&&** | छवज्ुनवजमक | 309-00 |
| 10. | h±bm{OrZ Q>`w] 1000 d° | 50 ux | 140 | 125-00 | **&&** | 108-00 | छवज्ुनवजमक | **119-85** |
| 11. | h±bm{OrZ Q>`w] 500 d° | 25 ux | 120 | 105-00 | **&&** | **127-00** | छवज्ुनवजमक | 98-15 |
| 12. | gH«$sQ> ]«{H$Q> S>r. [r 6 A°. V{ 32 A±. | 25 ux | 299.25 | **320-00** | **&&** | **&&** | छवज्ुनवजमक | 298-00 |
| 13. | gH«$sQ> ]«{H$Q> Eg. [r 6 A°. V{ 32 A±. | 10 ux | 116.85 | **140-00** | **&&** | **&&** | छवज्ुनवजमक | 116-00 |
| 14. | Q>`y]yba ]ë] 400 dm° | 25 ux | 910 | 833-00 | **&&** | 675-00 | **831-00** | **788-00** |
| 15. | lk;ju | 1 ux | 27250 | Regret | **&&** | **&&** | छवज्ुनवजमक | त्महतमज |
| 16. | th-vkbZ ikbZi 6 eh- | 60 ux | 1700 | **1910-00** | **&&** | **&&** | छवज्ुनवजमक | 1700-00 |
| 17. | **,DlgksLV Qsu 300 ,e- ,e** | 5 ux | 2245 | **2410-00** | **&&** | **&&** | छवज्ुनवजमक | 2200-00 |
| 18. | **32 vW- Mh ih** | 50 ux | 91.2 | **88-00** | **&&** | **&&** | छवज्ुनवजमक | 78-00 |

| A. H«$§. | LkfgR;kps fooj.k | ,dk o"kkZ dfjrk A§XmoOV bmJU ma{ gmohË; | A§XmoOV Xa é | es- n'kes'k nj #- | es- 'kjnk baMLV~zh nj #- | es fQfyll bafM;k fy- nj #- | es- nkek.kh fo|qr dsUnz nj #- | es- es?knwr bysDV~hd nj #- |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 19. | **70okW- ,l Ogh- ,y cYc** | 25 ux | 450 | **488-00** | && | **486-00** | **423-00** | 400-00 |
| 20. | **70 okW- ,l-Ogh- ,y- pkSd** | 25 ux | 435 | **510-00** | && | **536-00** | **399-00** | 346 |
| 21. | 2.5Amë`w. dm`a ìhr.AmB©. Ama. | 200 caMy | 286 | 212-00 | && | && | छवज् नवजमक | **227-00** |
| 22. | god©g dm`a Qy> H$m{a og·g ñ·dm`a E_.E_ | 125 caMy | 1512 | 1095-00 | && | && | छवज् नवजमक | 1200-00 |
| 23. | 16 E_.E_ 4 H$m{a H{$]b | 1000 ehVj | 93 | 83-00 | && | && | छवज् नवजमक | **91-00** |
| 24. | 2-5 okW;j 2 dksj | 50 caMy | 810 | 570-00 | && | && | छवज् नवजमक | 574-00 |
| 25. | H$m°Q>Z Q>{[ | 500 jksy | 72 | **97-00** | && | && | छवज् नवजमक | 72-00 |
| 26. | [r. ìhr. gr. Q>{[ | 300 jksy | 12.75 | **12-00** | && | && | छवज् नवजमक | 10-75 |
| 27. | 250 dm°. E_.dr.Eb hm{ëS>a | 1000 ux | 165 | **92-00** | && | && | छवज् नवजमक | 82-00 |
| 28. | 40 dm°. gmBS> hm{ëS>a | 1000 ux | 13.40 | **12-00** | && | && | छवज् नवजमक | 11-50 |

darb VwbZmË_H$ V·Ë`mZwgma _{. Xím_{e H{$]bg CëhmgZJa-2 A¡Q>_ H«$_m§H$ 21 ] 22 ]23 ] 24 _Ü`{ gdm©V H$_r Xa oXb{b{ Amh{, _{. 'kjnk baMLV~zh] `m§Zr vWVe H«$_m§H$ 8 _Ü`{ gdm©V H$_r Xa oXb{b{ Amh{, _{. fQfyll] `m§Zr vWVe H«$_m§H$ 1]3] 4v] 4c] 5c] 10 o 14 _Ü`{ gdm©V H$_r Xa oXb{b{ Amh{, _{. X_mUr odÚwV H{$ÝÐ _w§]B© `m§Zr dqBY;kgh vWVe _Ü`{ H$_r Xa oXb{b{ ukgh AmoU _{. es?knwr bysDV~hd `m§Zr vWVe H«$_m§H$ 2] 5v] 6] 7] 9] 11] 12] 13] 16] 17] 18] 19] 20] 25] 26] 27 o 28 _Ü`{ gdm©V H$_r Xa oXb{b{ Amh{. rlsp vk;Ve dza- 15 lkBh dqBY;kgh daiuhus nj fnysys ukgh-

moZfjr Á`m A°Q>_ _Ü`{ T;k daiuhps H$_r Xa oXb{b{ Amh{ V{ Xa dmOdr Amh{V darb oXb{b{ A§XmO{ [na_mU la{Xr H$aU{ H$arVm AXmOrV é[`{ 34,34,138.75 BVH$m IM© `{Uma Amh{ d V{ izkdyu a·H$_ é[`{ 49,09,544.75 is{kk 30-05 % H$_r Amh{.

darb gd© ]m]r bjmV K{CZ Á`m A°Q>_ _Ü`{ T;k daiuhps nj lokZr deh fnysys vkgs- Ë`m§À`m Xambm _§Owar X{CZ ,dk o"kkZP;k dkyko/kh _Ü`{ bmJUma{ odÚwV gohË` Ë`m§À`m H$Sy>Z la{Xr H$aÊ`mH$arVm _§Oyar X{CZ bmJUm-`m IMm©g _mÝ`V{ gmR>r LFkk;h lferh iq<s gmXa.

स्थायी समिती ठराव क्र. ७०                                                    दिनांकः-२८.८.२००३.

सुचकाचे नाव :- श्रीमती निता आहुजा

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २००३-२००४ करिता शहरातील व महानगरपालिकेच्या निहित जागी बसविलेल्या दिवाबत्ती, देखभाल दुरूस्तीसाठी लागणारे विद्युत साहित्य पुरविणेकामी प्रशासनास वर नमुद केल्याप्रमाणे आयटम निहाय बाबीसाठी उपरोक्त न्यूनतम दराच्या पुरवठादाराशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. १७ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १७:- मुख्य लेखा परिक्षकाकडुन आलेला माहे मार्च २००३ पर्यंतचा जमाखर्चाचा अहवाल विचारात घेणे.

मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:- दि ३१मार्च २००३ अखेर किती देणे बाकी आहे? एमआयडीसीचे पाणी बिल व ठेकेदारांची थकबाकी किती आहे ?

मा . पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- तुम्हाला कशावर बोलायचे आहे?
मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- हा अहवाल स्विकृत आहे का? सदरच्या अहवालात तीन कर्मचा-यां विरुध्द कारवाई करणेबददल शिफारस केलेले आहे. या कर्मचा-यां विरुध्द खातेनिहाय चौकशी करावी लागेल.

मा सदस्य श्री रामदास उमापः- चुकीचे काम करणा-या कर्मचा-यां विरुध्द कारवाई करावीच लागेल .

मा. पिठासीन अधिकारी (श्री विनोद तलरेजा):- . संबधित दोषी कर्मचा-यां विरुध्द अहवालात उल्लेख केल्याप्रमाणे प्रशासनाने कारवाई करावी . व सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ व १०६ (१) (अ) नुसार माहे मार्च, २००३ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल

उत्पन्न :-

वित्तीय वर्ष २००२-२००३ 'अ ' व 'क ' सुधारीत अर्थसंकल्प सर्वसाधारण महासभा ठराव कमांक १०१ दिनांक :-२०/२/२००३ अन्वये मंजूर करण्यात आले या अर्थसंकल्पामध्ये अपेक्षित धरलेले उत्पन्न व प्रत्यक्ष प्राप्त झालेले उत्पन्न खाली दर्शाविलेले आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षित उत्पन्न | प्रत्यक्ष उत्पन्न | कमी (-) उत्पन्न |
|---|---|---|---|
| 'अ ' | ९४ ,६७ ,४४ ,००० | ७९ ,९० ,९२ ,७८० | १४ ,७६ ,५१ ,२२० |
| 'क ' | २० ,३९ ,४८ ,००० | १६ ,२६ ,२८ ,०१० | ४ ,१३ ,१९ ,९९० |
| एकूण | १ ,१५ ,०६ ,९२ ,००० | ९६ ,१७ ,२० ,७९० | १८ ,८९ ,७१ ,२१० |
| प्रारंभीची शिल्लक रु. | ४ ,०९ ,३४ ,००० | | १६ ४२: |
| एकूण रु. | १ ,१९ ,१६ ,२६ ,००० | | |

पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अघावत ठेवता येत नाही वित्तीय वर्ष सन २००२-२००३ मध्ये रु .९५ ,३९ ,७० ,७१३/-(**रुपये पंच्याण्णव कोटी एकोणचाळीस लाख सत्तर हजार सातशे तेरा फक्त**) खर्च लेखांकित झालेला आहे. खर्चाचे पुर्व लेखापरिक्षण होत असते. आक्षेपाचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान होत असते झालेला खर्च हा सक्षम प्राधिका-याच्या मंजूरीने झालेला असून उपलब्ध तरतुदीच्या मर्यादित आहे.

जमा खर्चाचे लेखाशिर्षनिहाय परिस्थिती दर्शविणारे पत्रक सोबत जोडले आहे.

**लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (१) (अ) च्या तरतुदीप्रमाणे)**

### मालमत्ता कर विभाग

**आक्षेप कमांक :-१ श्री जे .के इसरानी (रोखपाल) मालमत्ता कर विभाग यांनी केलेल्या रक्कम रु ४ ,९९ ,७९०/-च्या अपहाराबाबत**

मालमत्ता कर विभागातील कर वसुली लिपिकांनी मालमत्ता करापोटी न वटलेल्या धनादेशांच्या बदल्यात रोख रक्कम स्विकारुन सदर रक्कम युनिट कमांक ६ , ७ व ८ चे रोखपाल श्री. जे. के. इसरानी यांच्याकडे जमा केलेली आहे. श्री. जे .के इसरानी यांनी न वटलेल्या धनादेशाच्या बदल्यात संबंधीत कर वसुली लिपीकांकडून स्विकारलेली एकूण रक्कम रु. ४ ,९९ ,७९०/- (अक्षरी रुपये चार लाख नव्याण्णव हजार सातशे नव्वद मात्र) चा भरणा महापालिका कोषागारात केलेला नाही. याचाच अर्थ
सदर रक्कम रु. ४ ,९९ ,७९०/- चा त्यांनी कायम स्वरुपी अपहार केल्याचे दिसून आल्याने, सदरची रक्कम तात्काळ वसुल करुन संबधितांवर योग्य ती कारवाई करणे करिता कर

निर्धारक आणि संकलक व उप आयुक्त (शहर) यांना या विभागाचे अर्धसमास ज्ञापन पत्र कमांक उमपा/लेपवि/कर विभाग /८२ दिनांक २१/२/२००३ व पत्र कमांक उमपा / लेपवि / ८३ दिनांक ३/३/०३ अन्वये कळविले असून याबाबतचा सविस्तर अहवाल मा. आयुक्त यांना पत्र क. उमपा/लेपवि/१६ दिनांक १०/३/०३ अन्वये सादर केला आहे. श्री. जे. के. इसरानी यांना आदेश कमांक उमपा/साप्रवि/आस्थाटे. ४/९३ दिनांक :- २५/३/२००३ अन्वये निलंबित केले आहे.

**आक्षेप कमांक :- २ श्री. भगवान उदासी ,वसुली लिपीक ,कर विभाग यांनी अपहारीत केलेल्या रक्कम रु . २७५३८/- च्या अपहाराबाबत.**

मालमत्ता कर विभागातील वसुली लिपीक श्री. भगवान उदासी, यांनी मालमत्ता करोपाटी वसुल केलेली रक्कम रु.२७५३८/-( रु .सत्तावीस हजार पाचशे अडतीस मात्र) चा भरणा महापालिका कोषागारात केलेला नाही त्यामुळे सदर रकमेचा त्यांनी कायम स्वरुपी अपहार केल्याचे दिसून आल्याने सदरची अपहारीत रक्कम संबंधीताकडून तात्काळ वसुल करुन महापालिकेच्या कोषागारात भरणा करण्याबाबत व सदरच्या रकमेच्या अपहाराबाबत संबंधीतावर योग्य ती कारवाई करण्याबाबत उपआयुक्त (शहर) यांना या विभागाचे अर्धसमास ज्ञापन पत्र.क. २० दिनांक :- १९/३/०३ अन्वये कळविले आहे. वरिल अपहारित रक्कम श्री. भगवान उदासी यांचेकडून वसूल करुन महापालिका कोषागारात भरणा केल्याच उप-आयुक्त (शहर) यांनी त्यांचे प.क. उमपा/कर/४०३ दिनांक १८/८/०३ अन्वये कळविले आहे. श्री.भगवान उदासी यांना प्रशासनाने निलंबित केले आहे.

**आक्षेप कमांक :- ३ श्रीमती. मिना सितलानी रोखपाल यांनी केलेल्या रक्कम रु. ३०१०/- च्या अपहारा बाबत**

मालमत्ता विभागातील श्री. ओमप्रकाश गुरनानी यांनी दिनांक ३१/३/२००२ रोजी पावती पुस्तक कमांक ९८० मधिल पावती कमाक ९७९०७ अन्वये रु. ३०१०/- (रुपये तीन हजार दहा फक्त) वसूल केलेली रक्कम त्यांनी त्याच दिवशी कर विभागातील रोखपाल श्रीम मिना

सितलानी यांचेकडे जमा केली पंरतु श्रीम मिना सितलानी यांनी सदरची रक्कम रुपये ३०१० (रुपये तीन हजार दहा) मात्र ही महापालिका कोषागारात भरणा केलेली नसल्याने सदर रक्कमेचा सुकृत दर्शनी अपहार झाल्याचे दिसुन आल्याने याबाबत योग्य तो खुलासा त्वरीत करण्याकरिता व सदरची रक्कम संबंधीतांकडून तात्काळ वसूल करुन महानगरपालिकेच्या कोषागारात जमा करुन तसा अहवाल देण्याकरिता या विभागाचे अर्धसमास ज्ञापन प. क. जा. क उमपा/लेपवि/ करविभाग /असज्ञा/ ८१ दिनांक :-२३/१/०३ अन्वये मालमत्ता कर विभागास कळविले आहे परतु त्यांनी आक्षेपाचे निराकरण केलेले नाही.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ७१
<u>दिनांक:-२८ /८ /२००३</u>

सुचकाचे नाव :- श्रीमती भारती छाब्रिया

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती मुख्य लेखा परिक्षकाने माहे मार्च, २००३ पर्यंत जमा खर्चाचा सादर केलेला अहवाल पाहुन छाननी अंती प्रशासनास लेख्यांच्या बाबतीत वरील विर्निदीष्ट केलेले अयोग्य व विधी अग्राहय प्रकारामुळे संबंधित कर्माचा-याविरुध्द खातेनिहाय चौकशी बसविणे किंवा गुन्हा दाखल करणेस आदेश करीत आहे आणि हा अहवाल महासभेपुढे प्रस्तुत करणेस निर्देशित करीत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५-३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पिठासीन अधिकारी श्री विनोद तलरेजा यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक : २५ सप्टेंबर, २००३

<u>इतिवृत्त :</u>

<u>दिनांक २५/०९/२००३ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार, दिनांक २५ सप्टेंबर २००३ रोजी सायंकाळी ४-३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या

पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्या/सदस्या उपस्थित होते/होत्त्या.

01) श्रीमती ज्योती कलानी, मा. सभापती
२) श्रीमती आहुजा नीता प्रकाश
३) श्री उमाप रामदास
४) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम
५) श्री तलरेजा विनोद चंदीराम
६) श्रीमती छाब्रिया भारती
७) श्रीमती माने किरण बाळकृष्ण
८) श्रीमती मोकल सिमा
९) श्री पंजाबी नारायण
१०) श्रीमती बामणकर नंदिनी
११) श्री पमनानी ईश्वर
१२) श्री वलेचा पृथ्वी
१३) श्री लिंगे सुर्यकांत (बबन)
१४) श्री जेसवानी सतरामदास
१५) श्री मोहन वेहरानी

तर

मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे या अनुपस्थितीत होत्त्या.

सायंकाळी ४-५५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले .

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क. १ वाचुन दाखविताात.

मागील सभेचे दिनांक २८-८-२००३ रोजीचे इतिवृत्त कायम करणेबाबत .

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:-</u> सदरचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क. २ वाचुन दाखविताात .

विषय क्र. 2:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत 4 विविध कामी प्रशासनाने <u>केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.</u>

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना :</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2003-2004 च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | सत गाडगे महाराज सफाई अभियान अंतर्गत | 199500/- | 16/8/2003 | मे श्री मॉ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | तपासणी फेरी-2 निधीमधून श्री विनोद तलरेजा, श्री नरेंद्र कुमार ठाकूर व श्रीमती निना नाथानी यांनी सुचविलेल्या उल्हासनगर-3 मध्ये प्रभाग क्र. 23 मध्ये बुध्द विहारच्या मागील बाजूस शिवसेना ऑफिस बॅ नं 679 जवळ ते विशाल पॅलेस अपार्ट. आणि जीरा दरबार साईधामच्या मागील बाजू पर्यतच्या पायवाटा आणि नाली बांधणे.(493 संत गाडगे महाराज सफाई अभियान निधी) | | | म. का. सोसा. |
| 2 | महानगरपालिका इमारतीच्या भिंतीची, ग्रिल व गेटची दुरूस्ती करणेबाबत. (496 महापालिका निधी) | 195990/- | 16/8/2003 | मे ज्योती म. का. सोसा. |
| 3 | उल्हासनगर- 1 ते 5 मध्ये रस्त्यावर इशारा फलक लावणेबाबत. (536 महापालिका निधी) | 187050/- | 16/8/2003 | मे ज्योती म. का. सोसा. |
| 4 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र 1 मध्ये बॅ नं 1952 जवळील शौचालय जवळील पाडलेल्या शौचालयाच्या जागेवर संरक्षण भिंत बांधणे (546 महापालिका निधी) | 100000/- | 22/8/2003 | मे गुरूदेव म. का. सोसा. |

*उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक ,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.*

स्थायी समिती ठराव क्र. 72 दिनांक:- 25.9.2003

सुचकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील 4 विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-* *विषय क्र. ३ वाचुन दाखवितात .*

**विषय क्र. 3:**-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत 4 विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

*मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-* *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना :

*उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.*

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-3 येथील स्टेट बँक पासून सिल्वर अपार्टमेंट पर्यत सी सी एम-250 रोड बनविणे. (593 महापालिका निधी) | 398931/- | 14/8/2003 | मे. वनीदेवी म. का. सोसा. |
| 2 | उल्हासनगर-3 येथील बॅ. नं. 946, 895, 897, 896, 899 मागे नाली बांधणे चेकर्ड टाईल्स लावणे. (591 महापालिका निधी) | 199758/- | 14/8/2003 | मे श्री जयशंकर म. का. सोसा. |
| 3 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 24 मध्ये बॅ नं 850 जवळ रस्ता एम-250 ने बांधणे. (573 महापालिका निधी) | 199540/- | 14/8/2003 | मे. साई लक्ष्मी म. का. सोसा. |
| 4 | उल्हासनगर-3 येथील सेक्शन 21 आणि 944, 951 जवळ सी सी पायवाटा बांधणे. (574 महापालिका निधी) | 199507/- | 14/8/2003 | मे वनीदेवी म. का. सोसा. |

*उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक ,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.*

स्थायी समिती ठराव क्र. 73 दिनांक:- 25.9.2003

सुचकाचे नाव :- श्री सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती नंदिनी बामणकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील 4 विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-* *विषय क्र. ४ वाचुन दाखवितात .*

**विषय क्र.** 4:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत 17 विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :-* *मला या विषयावर बोलायचे आहे. जो क्रमांक १७ चा आयटम आहे, तो कोणत्त्या निधीतुन आहे, महापालिका निधीतुन आहे किंवा इतर निधीतून ते लिहीलेले नाही.*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-* *सदरचा विषय माहितीसाठी असुन काम महापालिका निधीतुन आहे.*

*मा. सदस्य श्री रामदास उमाप :-* *माहितीसाठी आहे ते ठिक आहे. ज्या लेखा शिर्षातुन काम करण्यात येत आहे, त्याचा उल्लेख नाही, लेखाशिर्षात शिल्लक किती आहे? त्याचा देखिल उल्लेख नाही. आम्ही जेव्हा काम करण्यासाठी पत्र देतो तेव्हा आम्हाला तरतुद उपलब्ध नाही, पैसे उपलब्ध नाहीत अशा प्रकारची उत्तरे दिली जातात. त्यामुळे गोषवा-यामध्ये वरील बाबींचा देखिल समावेश केला जावा.*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-* *लेखाशिर्षात तरतुद उपलब्ध असली म्हणजे प्रत्यक्षात निधी आहे असा त्याचा अर्थ होत नाही. समजा तुमच्याकडे १०० रु आहेत व ३० रु खर्च झाले आहेत व ७० रु शिल्लक आहेत असे दाखविले तरी प्रत्यक्षात तेवढा निधी उपलब्ध आहे असे नाही.*

*मा. सदस्या श्रीमती किरण माने:-* *माझ्या प्रभागात देखिल नालीचे काम करायचे आहे, सदरचे काम तातडीचे आहे. झोपडपट्टी विभागात कामे केली जात नाहीत.*

*मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर* *:- झोपडपट्टी विभागाकडे दुर्लक्ष केले जात आहे.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u>* *झोपडपट्टी विभागातल्या कामांबाबत मी दि. १९/९/०३ रोजी झालेल्या महासभेत उत्तर दिले आहे. यापुढे स्थायी समितीत प्रस्ताव आणताना ज्या लेखाशिर्षातुन काम करावयाचे आहे, त्याबद्दलचा एक कॉलम समाविष्ट केला जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी:-</u>* *लेखाशिर्षात शिल्लक किती आहे? हे देखिल दाखवा.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप:-</u>* *शिल्लक किती आहे हे कळल्यास आम्ही देखिल कामे सुचवू शकतो.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u>* *लेखाशिर्षात शिल्लक किती आहे ते कामाशी संबधित नाही, ज्या लेखाशिर्षातुन काम करण्यात येईल त्याचा उल्लेख केला जाईल.*

*<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने:-</u>* *माझ्या प्रभागातील नालीचे काम तातडीचे होते, ते आयुक्त साहेबांना दाखविले देखिल होते, लोकांच्या घरांमध्ये पाणी जाते, तरी देखिल काम केले जात नाही.*

*<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी:-</u>* *आता पावसाळा संपत आला, आधी सांगायला पाहिजे होते.*

*<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने:-</u>* *अजुन पावसाळा संपलेला नाही, अशी कामे आधी करायला हवीत.*

*<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-</u>* *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् 2003-2004 च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-4 येथील सदगुरू नगर मध्ये बेलारा कॉलनी मध्ये सी सी रस्ता एम-250 ने बांधणे (130 नगरसेवक निधी) | 199830/- | 11.8.03 | मे. स्टॅन्डर्ड म.का. सोसा. |
| 2 | प्रभाग क्र. 8 मध्ये वडोलगांव येथे जाधव यांच्या घरा मागे, जोसेफ शाळा, येथ्ले रस्ता एम-250 ने बनविणे (185 नगरसेवक निधी) | 199960/- | 11.8.03 | मे. स्टॅन्डर्ड म.का. सोसा. |
| 3 | शोभराज गार्डन मध्ये स्टेज बनविणेबाबत (312 महापालिका निधी) | 99900/- | 11.8.03 | मे. स्टॅन्डर्ड म.का. सोसा. |
| 4 | उल्हासनगर-1 प्र. क्र. 1 मधील प्रबुध्दनगर, गौतमनगर येथे सी सी एम-250 ने रस्ता, नाली बांधणे.(374 नगरसेवक निधी) | 199985/- | 11.8.03 | मे कपलेश्वर म. का. सोसा. |
| 5 | सम्राट अशोकनगर येथील जानराव यांचे घरामागे नाली नदीकडील परसिरात गटार | 199900/- | 11.8.03 | मे कपलेश्वर म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बनविणे. (387 नगरसेवक निधी) | | | |
| 6 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. मध्ये ब्राम्हणपाडा येथे दिनकर चाळमध्ये सी सी एम-250 ने रस्ता व नाली बांधणे. (402 नगरसेवक निधी) | 200000/- | 11.8.03 | मे कपलेश्वर म. का. सोसा. |
| 7 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 14 मध्ये पांचपांडव कॉलनी आणि हनुमान टेकडीजवळ पर्यत सीसी एम- 250 ने रस्ता व नाली बांधणे.(403 नगरसेवक निधी) | 200000/- | 11.8.03 | मे कपलेश्वर म. का. सोसा. |
| 8 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 19 मध्ये दत्तपाडा काशिनाथ पाटील यांच्या घरामागे 4 बैठकिचे शौचालय बांधणे. (406 नगरसेवक निधी) | 199758/- | 11.8.03 | मे कपलेश्वर म. का. सोसा. |
| 9 | उल्हासनगर-3 मधील प्र. क्र. 20 येथील बॅ क्र. 761-62 जवळ नालीवरती स्लॅब टाकणे नाला दुरूस्त करणेबाबत.(407 नगरसेवक निधी) | 99820/- | 11.8.03 | |
| 10 | उल्हासनगर-3 प्र क्र. 20 मध्ये हिंमाशु अपार्टमेंट समोर जयहिंद शाळेजवळ, मेंडा यांचे घर, डेंबाई अपार्टमेंट मागे बॅ क्र. 776 सी सी सी एम-250 ने रस्ता बांधणे. (409 नगरसेवक निधी) | 157975/- | 11.8.03 | मे श्री मॉ म. का. सोसा. |
| 11 | उल्हासनगर-1 प्र क्र. 20 मध्ये ब्लॉक क्र. अे-70,77 सरला पॅलेस सत्यनारायण अपार्टमेंट महेश्वरी निवास जवळ सी सी एम-250 ने रस्ता, नाली बांधणे. (410 नगरसेवक) | 199955/- | 11.8.03 | मे श्री विनायक म. का. सोसा. |
| 12 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 17 मध्ये श्रीराम नगर येथ्ने आणि सेक्शन 25 आणि 29 येथे रस्ता एम-250 आणि नाली बाधंणे(428 नगरसेवक निधी) | 199974/- | 11.8.03 | मे कपलेश्वर म. का. सोसा. |
| 13 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 17 मध्ये गणेशनगर आणि आर पी सी सेंटर जवळ आणि विविध ठिकाणी रस्ता एम-250 ने बांधणे आणि नाली बांधणे. (429 नगारसेवक निधी) | 199975/- | 11.8.03 | मे कपलेश्वर म. का. सोसा. |
| 14 | उल्हासनगर-4 येथील प्रभाग क्र. 19 मध्ये इंदिरा आशिर्वादनगर येथे आणि गुरूपाडा जवळ, शांतीनगर येथे रस्ता एम-250 आणि | 199970/- | 11.8.03 | मे कपलेश्वर म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नाली बांधणे. (434 नगरसेवक) | | | |
| 15 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 24 मध्ये सेक्शन-17,18 बॅ नं 831, 832, 824, 841, 879, 876 जवळ नाली बांधणे.(437 नगरसेवक निधी) | 199546/- | 11.8.03 | मे श्री मॉ म. का. सोसा |
| 16 | इंदिरा गांधी भाजी कार्मेटमध्ये तातडीने दुरूस्त्या करणेबाबत. (479 महापालिका निधी) | 52050/- | 11.8.03 | मे सुर्य ज्योत म. का. सोसा. |
| 17 | उल्हासनगर-1, बेवस चौक, कन्हया कॉर्नर ते बाबा ढोलूराम दरबार पर्यत रोड व नाली बनविणे बाबत या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत (548 महापालिका निधी) | 470950/- | 11.8.03 | मे वनी देवी म. का. सोसा. |

*उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक ,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.*

**स्थायी समिती ठराव क्र.74** **दिनांकः- 25.9.2003**

सुचकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील 17 विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-*** *विषय क्र. ५ वाचुन दाखवितात .*

*विषय क्र. ५:- महापालिका सचिव कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना अतिकालीन भत्ता देणे.*

***मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

***प्रस्तावना :***

मा. सचिव, उल्हासनगर महानगरपालिका यांना आपल्या कार्यालयामध्ये काही वेळी महत्त्वाचे कार्यालयीन कामानिमित्त / बैठकानिमित्त, कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतरही कार्यालयात थांबावे लागते. अशा वेळी सचिव कार्यालयातील कर्मचा-यांनाही कार्यालयीन वेळेनंतर जादा वेळ थांबावे लागते. अशा वेळी सचिव कार्यालयीतील कर्मचा-यांनाही कार्यालयीन वेळेनंतर जादा वेळ थांबावे लागते. सद्यस्थितीत शासन निर्णयानुसार जादा वेळ काम केल्यास चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना जास्तीत जास्त रूपये १०/- प्रतिदिन मिळतात. सदरची रक्कम ही अत्त्यंत कमी असल्याने सचिव कार्यालयीतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री. वसंत निकम (शिपाई) श्री. दिनकर पवार (शिपाई) व श्री. गोपाल दिवाने (शिपाई)यांना विशेष बाब म्हणुन रूपये ५००/- प्रति महिना दररोज किमान ३ तास जादा काम केल्यास देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी सदरच्या प्रस्तावास स्थायी समितीची मंजुरी मिळणेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७५</u>　　　　　　<u>दिनांक:- २५.९.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती किरण माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सचिव कार्यालयातील कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतर जादा कामापोटी चतुर्थश्रेणी कर्मचारी श्री. वसंत निकम (शिपाई) श्री. दिनकर पवार (शिपाई) व श्री. गोपाळ दिवाने (शिपाई) यांना विशेष बाब म्हणुन रू. ५००/- प्रती महिना अतिकालीन / विशेष भत्ता देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात .

**विषय क्र. 6:**-सन 2003-2004 श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता आयोजन व पारीतोषिक वितरण व इतर साहित्य पुरविणे कामी मेसर्स हरीओम इंटरप्रायजेस व इतर कंत्राटदारांशी प्रशासनाने केलेल्या निविदा शिवाय थेट संविदेस कायम करणे.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना :</u>

उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र 67, दिनांक 20/8/2003 अन्वये श्री गणेश दर्शन प्रतियोगिता वर्ष 2003-04 करीता समिती स्थापन करुन दिनांक 31/8/2003 ते 9/9/2003 या कालावधीत उल्हासनगर शहरातील सार्वजनिक गणेश मंडळाद्वारे सादर करण्यात आलेल्या उत्कृष्ट मुर्ती, उत्कृष्ट देखावा, विषय, राष्ट्रीय एकात्मता देखावा, धार्मिक वातावरण, स्वच्छता, शिष्टाचार, चलचित्र देखावा आणि अशा 9 बाबींसाठी एकुण 9 पारितोषिके 1 ते 4 क्रमांकाच्या आणि त्याच प्रमाणे 200 पारितोषिके उत्तेजनार्थ देण्याचे प्रस्तावित आहे.

सदर प्रतियोगितेसाठी पारितोषिके व इतर कामी पुढील साहित्याची आवश्यकता आहे.

| अ क्र | पारितोषिक (प्रमाणित नमुन्याप्रमाणे) | एकुण नग (चषक) | प्रती नग | मागील निविदा दर |
|---|---|---|---|---|
| 1 | 15"x 15" | 9 | 5,260 | 47,340 |
| 2 | 12" x 12" | 9 | 4,301 | 38,709 |
| 3 | 10" x 10" | 9 | 3875 | 34,875 |
| 4 | 8" x 8" | 9 | 3301 | 29,709 |
| 5 | 6" x 4" | 200 | 175 | 35,000 |
| | | | **एकुण** | 1,85,633 |

उपरोक्त नमुद चषक हे 2 महिन्यांपूर्वी मे हरीओम एन्टरप्रायजेस यांनी पुरविले होते, व त्यावेळी त्यांचे दर न्युनतम असल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र 32, दिनांक 9/7/03 अन्वये मंजुरी देण्यात आली होती. सदर मान्यताप्राप्त दर सहा महिन्यापर्यंत वैध आहेत व त्याच दरात मे हरिओम एन्टरप्रायजेस यांनी चषक पुरविण्यास मान्य केलेले आहे. गणेशोत्सव स्पर्धा सुरु झालेली असल्याने पुनश्च: निविदा प्रक्रिया केल्यास कालापव्यय होवु शकतो. त्यामुळे मे. हरिओम एन्टरप्रायजेस यांना पूर्वीच्याच दराने चषक खरेदी करणे प्रस्तावित आहे. श्री गणेश दर्शन प्रतियोगितेसाठीचा इतर खर्च खालीलप्रमाणे आहे.

2) व्हिडीओ कॅमेरा 10 दिवस, 2 नग — रु 43,101/-
(संकलन व ध्वनीक्षेपणासह व बक्षीस समारंभसह)

3) **फोटोग्राफर खर्च :**
फोटोग्राफी 80 फोटो प्रत्येक दिवशी 6 बाय 4 साईज
10 दिवस 22/- रु कॉपी प्रमाणे (बक्षीस समारंभासह) — रु 17,600
यासाठी दरपत्रके मागविली असता रिगल कलर फोटो स्टुडिओ, उल्हासनगर-3 यांनी दरपत्रकात नमुद केलेल दर न्युनतम असल्याने ते मंजुरीची शिफारस आहे.

सदर खर्चासाठी वित्तीय वर्ष 2003-2004 च्या अंदाजपत्रकात अे बजेट लेखा शिर्ष क्र 5 शिक्षण संस्था (पअ) इतर सांस्कृतीक कार्यक्रमाखाली रु 10,00,0000 (रु दहा लाख) तरतुद करण्यात आली असुन पुरेसा निधी उपलब्ध आहे. सदर कामासाठी एकुण खर्च 2,46,334/- एवढा येणार आहे.

तरी सदर प्रस्ताव स्थायी समितीपुढे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5 (2) (2) अन्वये मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. 76 दिनांक:- 25.9.2003

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती भारती छाब्रिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावात नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता सन 2003-2004 श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता आयोजन पारीतोषिक वितरण व इतर संबंधित साहित्य पुरविणे कामी प्रशासनाने मे. हरीओम इंटरप्रायजेस व इतर कंत्राटदाराशी केलेल्या निविदाशिवाय थेट संविदेस कायम करीत आहे व अंर्तभुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. ७ वाचुन दाखवितात .*

विषय क्र. 7:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत 9 विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

*मा. सदस्य श्री रामदास उमाप:- या विषयामधील क ९ च्या आयटमबददल मला बोलायचे आहे. सदरचे काम रु ४४१ ,८००/- चे आहे व दुर्बल घटक निधी मधुन प्रस्तावित केलेले आहे. दुर्बल घटक निधीमधुन काम करण्यासाठी मी प्रस्ताव दिला असता त्यावेळी मला उत्तर दिले की, तरतुद उपलब्ध नाही. दुर्बल घटक निधीमधुन आवश्यक तेवढी कामे होत नाहीत, म्हणुन या लेखाशिर्षात किती तरतुद शिल्लक आहे याची माहिती द्यायला हवी.*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):- दुर्बल घटक निधीतुन किती कामे प्रस्तावित केलेली आहेत हे गोषवारा पाहिल्यास आपल्या लक्षात येईल.*

*मा. सदस्य श्री रामदास उमाप:- मी प्रस्तावित केलेले काम झाले नाही. माझ्या कामाची एक फाईल आयुक्तांकडे आलेली आहे, सदरचे काम दिड लाख रुपयांचे आहे ते देखिल मंजुर करा.*

*मा. सदस्य श्री विनोद तलरेजा:- आपल्याकडे असेल तर बघा*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):- माझ्याकडे फाईल आली आणि काम झाले नाही असे होणार नाही, माझ्याकडे फाईल असल्यास मी पाहतो.*

यावेळी मा. सदस्या श्रीमती भारती छाब्रिया यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सभापती:-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना :</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | उल्हासनगर-1 प्रभाग क्र. 2 येथील महालक्ष्मी टॉवर कदम कॉटेज जवळ रस्त्यालगतची नाली बांधणे (378 नगरसेवक निधी) | 99,915/- | 6.9.03 | मे श्री विनायक म. का. सोसा. |
| 2 | उल्हासनगर-1 प्रभाग क्र. 4 मध्ये बॅ. नं. 127, 128 च्या बाजूला, बॅ. क्र. 150 जवळ सी. सी. एम-250 ने रसता बांधणे. (381 नगरसेवक निधी) | 1,99,700/- | 6.9.03 | मे रचना म. का. सोसा. |
| 3 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 7 मध्ये बॅ नं 703 व 732 येथे एम-250 ने रस्ता व नाली बांधणे (386 नगरसेवक निधी) | 1,99,900/- | 6.9.03 | मे अल्का म. का. सोसा. |
| 4 | उल्हासनगर-5 येथील प्रभाग क्र. 12 मध्ये बॅ नं 1790, 1791 येथे सी.सी. एम-250 रोड व पायवाटा बांधणे (399 नगरसेवक निधी) | 1,99,900/- | 6.9.03 | मे रचना म. का. सोसा. |
| 5 | उल्हासनगर-4 ेयथील प्रभाग क्र. 18 मध्ये बॅ नं 1294 ते 1301 नाली आणि रस्ता एम-250 ने बांधणे आणि बॅ नं 1300 येथे रिटेनिंग वॉल बांधणे, बॅ नं 1300 मागे कचरा कुंडी बांधणे आणि इंदिरानगर व भिमनगर येथे शौचालयाला टाईल्स लावणे (431 नगरसेवक निधी) | 1,99,624/- | 6.9.03 | मे. श्री गंगा म. का. सोसा. |
| 6 | उल्हासनगर-2 येथील प्रभाग क्र. 6 मधील<br>1. रणजीत यादव यांचे घरापासून मनोज किराणा स्टोअर्स नाली व गल्ली सी सी<br>2. शौचालय ते मुनीलाल पाल यांचे घरापासून नाली व गल्ली सी सी एम-250<br>3. मनोज किराणा स्टोअर समोरील सार्वजनिक विहीर रिपेरिंग व परिसर नाली एम-250 सी सी करणे<br>4. प्रेम सुधांशु ते रफिक सान्याचे घरापर्यत नाली व एम-250 सी सी<br>5. दशरथ पौराणिक यांच्या घरापासून रामयादव यांचे घरापर्यत नाली व एम-250 सी सी करणे | 1,99,500/- | 6.9.03 | मे अल्का म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 6. मनोज किराणा समोरील शौचालय टाईल्स, भांडे व दरवाजा बदली करणे<br>7. वडार कॉलनीमध्ये एम-250 सी सी (448 नगरसेवक निधी) | | | |
| 7 | उल्हासनगर-3 मध्ये गुरू तेजबहादूर नगर मध्ये साकव व नाली बांधणे (524 दुर्बल घटक निधी) | 1,19,350/- | 6.9.03 | मे मुंब्रादेवी म. का. सोसा. |
| 8 | उल्हासनगर-3 येथील प्रभाग क्र. 23 मध्ये बॅ नं 661,662 येथे चेंबर पाईप लाईन बॅ नं 555, 631, 677, 741, 748 येथे नाली बनविणे (526 नगरसेवक निधी) | 1,99,900/- | 6.9.03 | मे श्री गंगा म. का. सोसा. |
| 9 | उल्हासनगर-3 मध्ये गुरू तेजबहादूर नगर विशाल पॅलेसच्या मागील बाजूस 10 बैठकिचे शौचालय बांधणे (527 दुर्बल घटक निधी) | 4,41,800/- | 15.9.03 | मे मुंब्रादेवी म. का. सोसा. |

*उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.*

स्थायी समिती ठराव क्र. 77 दिनांकः- 25.9.2003

सुचकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती भारती छाब्रिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील 9 विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ८ वाचुन दाखवितात .*

विषय क्र. 8:-गेस्टेनर कंपनीचे मास्टर रोल व छपाई शाई थेट खरेदीपोटी मेसर्स हरीओम इंटरप्रायजेस यांचे देयकास मान्यता देणे.

*मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-* सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

तत्कालीन खरेदी अधिकारी श्री.बालकिशन यांनी लेखा विभागाकडून प्राप्त झालेल्या मागणीनुसार गेस्टेटनर कंपनीकडून दोन बॉक्स् मास्टर रोल आणि दोन बॉक्स् प्रिंटर इंक हे साहित्य खरेदी केले. मात्र यासाठी कोणतेही कार्यादेश दिलेले नव्हते. वा सक्षम प्राधिका-याची मान्यताही घेतली नव्हती. सदर साहित्य खरेदीची किंमत रु.37,700(रु.सदोतीस हजार सातशे फक्त) एवढी होती.

*तदनंतरच्या कालावधीत याच साहित्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता. प्राप्त निविदा दर हे उक्त दरापेक्षा कमी किंमतीचे प्राप्त झाले. निविदा दर व उक्त खरेदी दर यात रु.१० ,९६०/-ची तफावत आढळून आली. त्यामूळे रु. १० ,९६०/- एवढया अतिरिक्त खर्चाचा बोजा महानगरपालिका तिजोरीवर पडला. ही बाब अनुलक्षून श्री.बालकिशन यांना उमपा/भांडार/१३६ दिनांक.१४.२.२००३ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली. त्याद्वारे महानगरपालिकेस झालेल्या रु.१० ,९६०/- एवढया नुकसानीची भरपाई त्यांच्या निवृती वेतनातून का करण्यात येऊ नये याची विचारणा करण्यात आली. सदर नोटिसीस अनुलक्षून श्री. बालकिशन याचा खुलासा प्रशासनास प्राप्त झाला आहे.*

प्राप्त खुलासा व उपलब्ध अभिलेख यावरुन असे स्पष्ट होते की, भांडार विभागाच्या दिनांक.14.5.2001 रोजीच्या टिप्पणीन्वये सादर केलेल्या गेस्टेटनर मशीनसाठी लागणा-या पेपर रोल व ५ााई खरेदीच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो.यांनी मान्यता दिलेली आहे. तीत ज्या खरेदी किंमतीस मान्यता देण्यात आली त्याच दराने श्री.बालकिशन यांनी खरेदी केली. हे दर सन-2001 चे प्रचलित भावानुसार होते.

तद्नंतर निविदा प्रक्रिया करण्यात आली. मात्र बाजारभावातील चढउतारानुसार निविदा दर हे कमी दराने प्राप्त झाले. त्याद्वारे निविदा दर व प्रत्यक्ष खरेदी दर यात तफावत आढळून आली.

श्री.बालकिशन यांनी केलेली प्रस्तुत खरेदी ही विहित प्रक्रियेचा अवलंब न करता तसेच सक्षम प्राधिका-याची मान्यता न घेता केली आहे. त्यांची ही कृती वित्तीय अनियमितता या प्रकारात मोडत असल्याने सदर अनियमितता क्षमर्पित करुन पुरवठादाराचे प्रलंबित देयक रु. 37,700/-अदा करण्याची अनुमती प्रदान करणेसाठीचा सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. 78** **दिनांक:- 25.9.2003**

सुचकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती निता आहुजा

वरील प्रस्तावात नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता हि स्थायी समिती महापालिकेतील गेस्टनर कंपनीचे वापरासाठी मास्टर रोल व छपाई शाई पुरविणेकामी प्रशासनाने मे. हरीओम इन्टरपाइजेस यांच्याशी केलेल्या निविदाशिवाय थेट संविदेस कायम करीत आहे व अंतर्भुत खर्चास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ९ वाचुन दाखवितात .*

**विषय क्र. 9:**-आनंद नगर पंपींग स्टेशन येथील मोटार रिवायडींग व दुरूस्ती करणे कामी मेसर्स सुनिल इलेक्ट्रीकल ॲन्ड इंजिनिअरींग यांच्याशी प्रशासनाने केलेल्या निविदा शिवाय थेट संविदेस कायम करणे.

*मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

प्रस्तावना:-

आनंद नगर पंप हाऊस येथील 200 अश्‍व शक्तीची मोटर सुरू असतांना स्लिपरींगला तडा जाऊन फेज शॉट होऊन वाईडींग जळाली. म्हणून मोटरची रिवाईडिंग व दुरूस्ती त्वरीत करणे आवश्यक असल्यामुळे पाणी पुरवठा विभागा तर्फे दरपत्रके मागवून सदर काम करून घेणे बाबतचा रू 60000/- अंदाजित खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यांत आला. त्यास मु.ले.अ व मु.ले.प. यांनी शिफारस करून मा.आयुक्त यांनी दिनांक 31.5.2002 रोजी मंजूरी दिली.

मोटर रिवाईडिंग व स्लीपरिंग युनिट बदलण्याच्या कामासाठी रितसर दरपत्रके मागविण्यात आली व त्यानुसार मे.सुनिल इलेक्ट्रीक ॲण्ड इंजिनिअरींग, गोरेगाव ,मुंबई यांनी रू 58500/- न्युनतम दराचे दरपत्रक सादर केले.त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक 10.7.2002 रोजी मंजूरी दिली.त्यानूसार मे. सुनिल इलेक्ट्रीक ॲण्ड इंजिनिअरींग, मुंबई,यांना पाणी पुरवठा विभागाचे पत्र क्र उमपा/डब्लू.एस.एस.डी./1499 दिनांक 12.7.2002 नुसार कार्यादेश देण्यात आले.

मे. सुनिल इलेक्ट्रीक ॲण्ड इंजिनिअरींग, मुंबई यांनी वेळेत काम पूर्ण केले असून मोटर सुस्थितीत सुरू आहे. तरी सदर कामासाठी झालेल्या रू 58000/- मात्र रकमेच्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे.त्यास मंजूरी मिळावी हि विनंती.

**स्थायी समिती ठराव क्र. 79** **दिनांक:- 25.9.2003**

सुचकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती निता आहुजा

ही स्थायी समिती वरील प्रस्ताव विचारात घेता नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता हि स्थायी समिती आनंदनगर पंपीग स्टेशन 200 अश्वशक्तीची मोटर रिवायडिंग व दुरूस्ती करणे कामी प्रशासनाने मे. सुनील इलेक्ट्रीकल ॲण्ड इंजिनिअरींग यांच्याशी केलेल्या निविदाशिवाय थेट संविदा कायम करीत आहे आणि अंर्तभुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

***मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-*** *विषय क्र. १० वाचुन दाखवितात .*

**विषय क्र.** 10:-उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा विभागातील 4 विविध कामी प्रशासनाने संबंधित ठेकेदाराशी केलेल्या निविदा शिवाय थेट संविदेस कायम करणे .

***मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-*** *सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भिय विटायानुसार उल्हासनगर शहरात विविध ठिकाणी अपूरा व दूषीत पाणी पुरवठा होत असल्याने अत्यंत तातडीने जून्या जलवाहिन्या बदलणे गरजेचे होते.त्या अनुषंगाने सदर पाईप लाईनची कामे पूर्ण करून घेण्यात आलेली आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | किंमत | ठेकेदाराचे नाव करारनामा |
|---|---|---|---|
| 1 | टेलीफोन कंपाऊड ते दृवारका धाम अपा. येथे 80 मि मी व्यासाची जी आय पाईप टाकणे,उन्हासनगर 3 | 29000/- | मे.बजरंबली म.का.स. संस्था,उल्हासनगर दि.27.9.02 |
| 2 | मेनरोड लालचक्की येथे 50 मि मी व्यासाची जी आय पाईप टाकणे,उल्हासनगर 4 | 38691/- | मे. श्री सिध्दनाथ म.का.स. संस्था,दि 29.8.2000 |
| 3 | सिंध प्राथमिक शाळे जवळ लोखंड कव्हरसह चेंबर बांधणे | 6706/- | मे.सुरेश प्लंबींग वर्क्स दि.5.11.01 |
| 4 | वार्ड नं 7 ते भैयासाहेब आंबेडकर बुस्टर येथे 50 मि मी व्यासाची जी आय पाईप टाकणे ,उल्हासनगर 2 | 6258/- | मे.जय माता दी प्लंबर, श्री नंददलाल पंजाबी, दि.5.12.01 |

वरील 4 कामांपैकी क्रमांक 1 व 2 कामांना मा.आयुक्त यांची मंजूरी आहे. परंतू सदर कामे उपनिबंधक ,ठाणे यांची शिफारस न घेता तातडीने पूर्ण करावयाची असल्याने कार्यकारी अभियांता, पाणी पुरवठा विभाग, यांनी थेट ठेकेदारास काम देऊन पुर्ण करून घेण्यात आले.

क्रमांक 3 व 4 या कामांना मा. आयुक्त यांची मंजूरी घेतलेली नाही,परंतू सदर कामे ही कार्यकारी अभियंता यांना स्थायी समिती ठराव क 1 दि.20.10.96 रोजी मा.आयुक्त यांनी प्रदान केलेल्या अधिकारात मंजूरी घेतली आहे. तसेच ही कामे सुध्दा तातडीने करावयाची असल्याने कार्यकारी अभियंता यांनी थेट ठेकेदाराची नेमणूक करून काम पूर्ण करून घेण्यात आले.

वरील कामे करून घेते वेळी अनियमितता झालेली आहे. सदर अनियमितता दूर करणेसाठी मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. तरी मा.स्थायी समितीची मंजूरी मिळावी, हि विनंती.

स्थायी समिती ठराव क्र. 80 दिनांक:- 25.9.2003

सुचकाचे नाव :- श्रीमती निता आहुजा

अनुमोदकाचे नाव :- श्री सुर्यकांत लिंगे

वरील प्रस्तावात नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता हि स्थायी समिती उपरोक्त कामी प्रशासनाने उल्लेखिलेल्या कंत्राटदाराशी केलेल्या निविदेशिवाय थेट संविदास कायम करीत आहे व अंर्तभुत खर्चास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. ११ वाचुन दाखवितात .*

*विषय क्र. ११:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.*

*मा. सभापती:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

*प्रस्तावना :*

*उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपाती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.*

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. ७ मध्ये राजेश यांच्या घरापासून मोहन यांच्या घरापर्यंत शिव ओम पॅलेस रायल हॉल जवळ सी सी एम-३५० ने रस्ता बनविणे. (४५७ नगरसेवक निधी) | १९९९५०/- | १.९.०३ | मे मुंबादेवी म. का. सोसा. |
| २ | उल्हासनगर-१ येथील वाल्मिकी नगर येथे चार सिटचे शौचालय बांधणे (४६७ नगरसेवक निधी) | १९९७२५/- | १.९.०३ | मे सुर्यज्योत म. का. सोसा. |
| ३ | उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र. १२ मध्ये स्वामी शांती प्रकाश उद्यानात कारंजे बांधणे. (४७८ निविदा) | ३२४५००/- ०.१०: Below | ५.९.०३ | मे शैलेस कन्स्ट्रक्शन कंपनी |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ८१</u> <u>दिनांक:- २५.९.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्रीमती भारती छाब्रिया

अनुमोदकाचे नाव :- श्री सुर्यकांत लिंगे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात .

विषय क्र. 12:–उल्हासनगर 3 येथील शिवाजी चौक ते संतु

बिल्डींग येथील व जोड रस्ता नारायणदास जग्यासी मार्ग हा रस्ता बांधणे कामी प्रशासनास मेसर्स शंकर महादेव ॲन्ड कंपनी या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

*मा. सदस्य श्री रामदास उमापः-* याबददल मी बोलु इच्छितो, मा. आयुक्तांनी ठेकेदाराशी वाटाघाटी करुन दर १४ टक्कयापेंक्षा खाली आणले त्याबददल मी आयुक्तांना धन्यवाद देतो.

*मा. प्रभारी आयुक्त (श्री आर के सोनवणे):-* ते तर माझे कामच आहे.

*मा. सदस्य श्री मोहन वेहरानीः-* याबददल मी सांगु इच्छितो की, या रस्त्याच्या कडेला जे रस्ते आहेत उदा० संतु बिल्डींग येथील, त्यांचे काम देखिल करावे अन्यथा नुकसान होत आहे.

*मा. प्रभारी आयुक्त (श्री आर के सोनवणे):-* याबददल प्रत्यक्षात साईटवर पाहणी करुन निर्णय घेण्यात येईल.

*मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-* सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष 2003-2004 च्या अर्थ संकल्पाच्या मंजुरीच्या वेळेस महासभेने रस्ते, पुल सुधारणा या लेखा शिर्षा अंतर्गत एकंदर 20 कामांना मंजुरी दिली होती. या 20 कामांमध्ये अनुक्रमांक 16 वर उल्हासनगर-3 येथील शिवाजी चौक ते संतु बिल्डींग जोड रस्ता नारायणदास जग्यासी या जोड रस्त्यासह असलेल्या रस्त्याचे काम अर्थ संकल्पामध्ये अंतर्भूत करून त्यास मंजुरी प्राप्त आहे.
(महासभा ठराव 101 दिनांक 20/2/2003) सदर कामाचे प्राकलन मे. उत्तम इंजिनिअरिंग कन्स्ल्टन्सी यांनी तयार केले होते. या कामाची निविदा कार्यवाही करण्यात आली असून सदर कामाबाबत अहवाल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | कामाची प्राकलनीय किंमत | |
| अ) | स्थापत्य काम | |
| i) | रस्त्याचे काम | रूपये 1,04,26,700/- |
| ii) | नाल्या व सि.डी. काम | रूपये 58,02,540/- |
| ब) | दिवाबत्ती कामासाठी तरतूद | रूपये 8,40,000/- |
| क) | खांब व ट्रान्सफार्मरचे सीलांतराचे कामासाठी तरतूद | रूपये 9,97,500/- |
| | एकंदर प्राकलनीय किंमत:- | रूपये 1,80,66,740/- |
| 2) | स्थापत्य कामाकरिता मागविण्यात आलेलया निविदेची किंमत | रूपये 1,42,91,631/- |
| 3) | निविदा मागविल्याचे तारीख | दिनांक 10/07/2003 |
| 4 | निविदा उघडल्याची तरीख | दिनांक |

| | | |
|---|---|---|
| 5) | एकंदर प्राप्त झालेल्या निविदा | 7 |
| 6 | प्राप्त झालेल्या निविदांची माहिती | |

| अ.क्र | निविदाकाराचे नांव | दिलेले दर | स्थिती |
|---|---|---|---|
| 1) | मे. ए एम रामचंदानी | 14.14% कमी | प्रथम निविदा दर |
| 2) | मे. माधव कन्स्ट्रक्शन | 13.00% कमी | द्वितीय निविदा दर |
| 3) | मे. इगल कन्स्ट्रक्शन कं. | 10.01% कमी | तृतिय निविद दर |
| 4) | मे. शंकर महादेव आणि कं. | 9.90% कमी | चतुर्थ निविदा दर |
| 5) | मे. आर. के माधानी | 7.60% कमी | पाचवे निविदा दर |
| 6) | मे एम सी चंदनानी | -- | उघडण्यात आली नाही |
| 7) | मे वतनसिंग आणि कं | -- | उघडण्यात आली नाही |

| | | |
|---|---|---|
| 7) 1 | सर्वात कमी दराचे निविदाकार यांना वाटाघाटी करिता बोलाविल्याचा दिनांक | दिनांक 14/8/2003<br>दिनांक 22/8/2003 |
| 8) | या वाटाघाटी सफल झाल्या का | नाही |
| 9) | **त्यानंतर केलेली कार्यवाही** | दिनांक 26/8/2003 रोजी सर्व निविदाकारांना मा. आयुक्त सो. यांचे दालनात वाटाघाटी करिता बोलावून त्यांचेकडून सिलबंद सुधारित दर मागविण्यात आले. |

| | |
|---|---|
| 10) | खालील निविदाकारांनी वाटाघाटीमध्ये त्यांच्या सुधारित दराचे सिलबंद लखोटे दिले होते. ते त्याच वेळी उघडयात आले होते. त्यावेळी मा. आयुक्त सो. यांचे समवेत शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(सा.बां.) मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक उपस्थित होते. सुधारित दरांबाबत अहवाल खालील प्रमाणे आहे. |

| अ. क्र. | निविदाकाराचे नांव | मुळ दर | वाटाघाटीअंती सुधारित दर | वाटाघाटी अंती स्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1) | मे. ए एम रामचंदानी | 14.14% कमी | -- | -- | वाटाघाटीस उपस्थित राहिले नाहीत सुधारित दर पाठविले नाहीत. |
| 2) | मे. माधव कन्स्ट्रक्शन | 13.00% कमी | -- | -- | --‘‘-- |
| 3) | मे. इगल कन्स्ट्रक्शन कं. | 10.01% कमी | -- | -- | --‘‘-- |
| 4) | मे. शंकर महादेव आणि कं. | 9.90% कमी | 16.20% कमी | सर्वात कमी दर | |
| 5) | मे. आर. के माधानी | 7.60% कमी | -- | -- | वाटाघाटीस उपस्थित राहिले नाहीत सुधारित |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | दर पाठविले नाहीत |
| 11) | प्रस्तावित कार्यवाही | | | | |
| | उपरोक्त अनुक्रमांक 10 वर नमुद केल्याप्रमाणे वाटाघाटी अंती मे शंकर महादेव आणि कं. यांनी 16.20% कमी दराने काम करण्यास अनुकुलता दर्शविली आहे. सदर दर प्रथम निविदाकार मे. ए.एम. रामचंदानी यांच्या 14.14% कमी दरापेक्षा कमी आहेत व वाजवी आहेत. त्यामुळे वाटाघाटी अंती मे शंकर महादेव आणि कं. यांनी दिलेल्या 16.20% कमी दराच्या निविदेस स्थायी समितीकडून मान्यता मिळून निविदाकाराशी संविदा करण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मंजुरी मिळणेकरिता प्रस्तावित. | | | | |

**स्थायी समिती ठराव क्र. 82** **दिनांकः- 25.9.2003**

सुचकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-3 येथील शिवाजी चौक ते संतु बिल्डींग येथील व जोड रस्ता नारायणदास जग्यासी मार्ग हा रस्ता बांधणे कामी प्रशासनास मेसर्स शंकर महादेव ॲन्ड कंपनी या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-* *विषय क्र. १३ वाचुन दाखवितात .*

*विषय क्र. १३:-मलप्रक्रिया पंपिंग स्टेशन क्र. २ व ३ चालविणे, देखभाल व दुरूस्तीकरणे कामी प्रशासनाच्या कार्यादेशान्वये दिनांक १.१२.२००१ ते ७.४.२००२ या कालावधीत मेसर्स ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग सर्विसेस यांनी केलेल्या कामी निविदाशिवाय थेट संविदा कायम करणे.*

*मा. सदस्या श्रीमती किरण माने:-* *विषय आणण्यास एवढा उशीर का झाला?*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री आर के सोनवणे):-* *हा प्रश्न मला विचारु नका, ज्यांनी उशीर केला त्यांना हा प्रश्न विचारायला हवा. मी देखिल उशिर करण्याच्या विरोधात होतो परंतु भविष्यात अशा प्रकारची अनियमीतता राहु नये म्हणुन हा विषय मान्यतेसाठी आलेला आहे.*

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:-

सिवेज पंपिग स्टेशन क्र.२ शांती नगर व क्र. ३ नेहरू नगर चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे हे काम वार्षिक कंत्राटी पध्दतीने मे. ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली यांनी कार्यादेश क्र. यु.एम.सी. / डब्लु एस एस डी/ मेकॅ /३६२० दिनांक २. ११.२००० नुसार देण्यात आले. सदर कामाची मुदत दिनांक ३१.११.२००१ रोजी संपली मात्र तोपर्यंत नविन ठेकेदार नियुक्तीची प्रक्रिया सुरू होती. नविन ठेकेदार नियुक्त होई पर्यंत पुर्विच्याच ठेकेदाराने काम सुरू ठेवावे या निविदेतील अटीनुसार मे. ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग सर्व्हिसेसे, डोंबिवली यांनी निविदा दराने काम पुढे सुरू ठेवले.

आता नविन ठेकेदार नियुक्तीची प्रक्रिया पुर्ण करण्यात आली असून पाणी पुरवठा विभागाचे पत्र क्र. यु.एम.सी. / डब्लु एस एस डी/ मेकॅ /७४० दिनांक ८. ४.२००० नुसार नविन ठेकेदारास कार्यादेश देण्यात आलेले आहे व दिनांक ८.४. २००२ पासून नविन ठेकेदाराने काम सुरू केले.

मे. ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग सर्व्हिसेसे, डोंबिवली यांनी निविदेतील अटी व शर्ती नुसार दि. १.१२.२००१ ते ७.४.२००२ या कालावधीत उपरोक्त काम सुरू ठेवलेले असल्यामुळे त्यांना वरील कालावधी साठी व त्यांच्या मंजुर निविदा दराने झालेला खर्च रू.१९७४०२/- मात्र च्या रक्कमेस कार्योत्तर मंजुरी मिळण्यासाठीचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. त्यास मंजुरी मिळावी हि विनंती.

स्थायी समिती ठराव क्र. ८३ दिनांक:- २५.९.२००३

सुचकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

वरील प्रस्तावात नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता हि स्थायी समिती सिवेज पंपिंग स्टेशन क्र. २ शांतीनगर व क्र. ३ नेहरू नगर चालविणे देखभाल व दुरूस्तीसाठी प्रशासनाच्या कार्यादेशान्व्ये दि. १.१.२००१ ते ७.४.२००२ या कलावधीत मे. ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग सर्विसेस यांनी केलेल्या कामी निविदाशिवाय थेट संविदा कायम करीत आहे व अंतर्भुत खर्चास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. १४ वाचुन दाखवितात .

विषय क्र. १४:-सिरू चौक ते गुरूव्दारा या टिलुमल सोसायटी मार्गेच्या रस्त्त्याच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे.

यावेळी मा. सदस्य श्री मोहन बेहरानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम खात्त्यांत १९९८ मध्ये सिरू चौक ते गुरूद्वारा या टिलूमल सोसायटी मार्गेच्या रस्त्त्याचे रूंदीकरण व सिमेंट कॉक्रिटीकरण करणे करिता प्रस्ताव मे. उत्तम इंजिनिअरींग कन्स्ल्टन्सी कल्याण यांचे कडून तयार करून घेतला होता. त्यावेळी तयार करण्यात आलेल्या सदर कामाचे प्राकलन १९९८-९९ च्या दर सुचिवर आधारित होते. या प्राकलनामध्ये दुतर्फा नाल्या व रूंदीकरणाच्या भागामध्ये फक्त सिमेंट कॉक्रिटीकरण प्रस्तावित होते जेणेकरून कामाची किंमत मर्यादित राहिल. परंतू त्यावेळी निधी उपलब्ध न झाल्याने सदर कामाची कार्यवाही झाली नाही. आता वर्ष २००२-२००३ च्या अर्थसंकल्पामध्ये ज्या २० कामांना मंजुरी मिळालेली आहे. त्यामध्ये अनुक्रमांक १६ वर उक्त काम आहे. त्यानुसार मूळ प्राकलन चालू दरसुचीप्रमाणे तयार होते. त्याची एकंदर प्राकलनीय किंमत रू. ५५,७६,८७०/- इतकी झाली. या प्राकलनास स्थायी समिती ठराव क्रमांक ११४ दिनांक २८.२.२००३ नुसार प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्राप्त झालेली आहे. निविदा कार्यवाही नंतर सदर कामाची कार्यवाही नगररचनाकार यांनी जागेवर दिलेल्या मार्किंग नुसार सुरू करण्यात आली. त्यानुसार तयार करण्यात आलेल्या एल सेक्शन व क्रॉस सेक्शन प्रमाणे मूळ कॉक्रिटचा रस्ता व प्रस्तावित रस्ता यांच्या लेव्हलमध्ये साम्यता येत नव्हती. याचे कारण वर्ष १९९८ मध्ये तयार करण्यात आलेल्या मूळ प्राकलनानंतर आता ५ वर्षानंतर या जागेवर आजूबाजूच्या नाल्या कल्व्हर्ट इत्त्यादिच्या तुलनेमध्ये व नगररचनाकार यांनी दिलेल्या मार्किंग प्रमाणे रस्त्त्याचे काम होणे आवश्यक आहे. या करिता मे उत्तम इंजिनिअरींग यांनी प्रस्तावि केल्याप्रमाणे मूळ सिमेंट कॉक्रिटचा रस्ता तोडून संपूर्ण रूंदीमध्ये सिमेंट कॉक्रिटीकरण करणे करिता प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यामुळे सदर कामामध्ये नाल्यांच्या कामामध्ये फरक होणार नाही. फक्त सिमेंट कॉक्रिट पेव्हमेंटचे काम वाढणार आहे. याकरिता सदर कामाचे सुधारित प्राकलन तयार करण्यात आले असून त्याची किंमत रू. ७७,९६,१९९/- इतकी हात आहे. सदर खर्चास अर्थसंकल्पामध्ये तरतूद उपलब्ध आहे. या कामास शहर अभियंता यांनी क्र. १०४८ दिनांक ४/९/२००३ नुसार तांत्रिक मंजुरी दिलेली आहे व उक्त सुधारित प्राकलनास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस आहे. तरी सदर सिरू चौक ते गूरूद्वारा या टिलूमल सोसायटी मार्गेच्या रू. ७७,९६,१९९/- खर्चाच्या सुधारित प्राकलनास स्थायी समिती कडून प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेकरिता प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ८४ दिनांक:- २५.९.२००३

सुचकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सिरू चौक ते गुरूव्दारा या टिलुमल सोसायटी मार्गेच्या रस्त्याच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. १५ वाचुन दाखवितात .

विषय क्र. १५:- मालमत्ता कराची संगणीकृत देयके व इतर साहित्य पुरविणेकामी सध्या कार्यरत असलेली कंत्राटदार मेसर्स कॉम्प्युटर ॲडस यांना एक वर्षाची मुदतवाढ देणे व प्रशासनास त्यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत अंदाजे १,४०,००० मालमत्ता असून सदर मालमत्ता संबंधी कराची देयके, मागणी नोटीस, नोंदवही इत्यादींची कामे गेल्या काही वर्षापासुन खाजगी संस्थेमार्फत संगणकावर करण्यात येतात. सदर कामासाठी आवश्यक ते प्रोग्रामिंग सदर संस्थेनेच केलेली असून सदर प्राग्रामिंग व देयके तयार करणेचे काम आजतागायत सुरळीतपणे सुरू आहे. शिवाय सदर कामासाठी ज्या एजन्सीची नेमणुक करण्यात आली होती. त्याची मुदत संपत आली आहे.

सध्या महानगरपालिकेने सर्व विभागातील कामकाजाचे संगणकीकरण करण्याचे ठरविले असुन सदर संगणकीकरणाची कार्यवाही चालु आहे. व ती पुर्ण होणेस काही कालावधी लागेल असे दिसते.

दरम्यान महानगरपालिकेस वर्ष २००३-२००४ करिता नवीन कराची बीले, मागणी नोटी, नोंदवही तसेच ज्या मिळकतीमध्ये जादा बांधकाम अथवा फेरफार झाला आहे. किंवा वापरात बदल झाला आहे. अशा मिळकतीची कर आकारणी, इत्यादी संबधीची कार्यवाही संगणकावर पुर्वीच्या पध्दतीने करणे आवश्यक आहे.

मेसर्स कॉम्पुटर अेडस यांनी मागील वर्षाच्या मंजुर दराप्रमाणे वरील करासंबंधीची कामे संगणकावर तयार करणेस संमती दर्शविली असून त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ) आकारणी | मे. कॉम्पुटर अॅडस |
|---|---|
| १. अ)मालमत्ते संबधीची माहिती आकारणी पुस्तकातुन संगणकास पुरविणे<br>ब) ६० जीएसएम लेखन सामुग्री आकारणी नोटीस छपाई करणे (दोन प्रतीत)<br>क)६० जी एक एम १३२ कॉलम लेखनसामुग्रीवर आकारणी नोंदवही छपाई करणे | रू. ७. ६५ पै |
| २. मालमत्ताकर नोंदणी पुस्तकात त्रुटीच्या सुधारणा करणे व | रू. २. २५ पै. |
| २. मालमत्ताकर नोंदणी पुस्तकात त्रुटीच्या सुधारणा करणे व सुधारणा केलेली छापील प्रत ६० जीएसएम १३२ कॉलम लेखन सामुग्री पुरविणे. | रू. २. २५ पै. |
| ३. सुधारणा नंतर कायम मालमत्ता पुस्तीका ८० जीएसएम १३२ कॉलम लेखन सामुग्रीवर छापणे | रू. २. ०५ पै. |
| ब. कर व्यवस्था<br>१. अ. मागणी, थकबाकी व इत्यादी तपशिल दर्शविणारी मागणी नोंदवही ८० जीएसएम १३२ कॉलम लेखनसामुग्रीवर छापणे.<br>ब. दोन प्रतीत मालमत्ता कराची बिले ६० जीएसएम लेखन सामुग्रीवर छापणे (१०'' x ८'' आकराची)<br>२. दोन प्रतीत मागणी नोटीस ६० जीएएसएम लेखन सामुग्रीवर छापणे (१०'' x ८'' आकराची)<br>३. जमा रक्कमांचे तपशिल संगणकास पुरविणे. | |
| क. अहवाल<br>४. ८० कॉलमच्या लेखनसामुग्रीवर सामान्य अहवाल छापणे<br>३. संपुर्ण यादी<br>४. विगतवारी यादी<br><br>५)८० कॉलमच्या लेखनसामुग्रीवर संक्षिप्त अहवाल छापणे<br>३. संपुर्ण यादी<br>४. विगतवारी यादी<br><br>६)१३२ कॉलम लेखनसामुग्रीवर सामान्य अहवाल छापणे<br>१. संपुर्ण यादी<br>२. विगतवारी यादी<br><br>७)१३२ कॉलम लेखनसामुग्रीवर सामान्य अहवाल छापणे<br>१. संपुर्ण यादी<br>२. विगतवारी यादी | <br><br>रू.०. १३ पै<br>रू. ०. २५ पै.<br><br>रू.०. २२ पै<br>रू. ०. ४५ पै.<br><br><br>रू.०. १५ पै<br>रू. ०. २९ पै.<br><br><br>रू.०. १७ पै<br>रू. ०. ३६ पै. |

सन २००३-२००४ च्या अंदाजपत्रकातील A-3 (XI) या लेखा शीर्षातर्गत पुरेश तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी त्यांना वर्ष २००३-२००४ या वित्तिय वर्षासाठी कराची देयके, मागणी, नोटीस, नोंदवही इत्यादी तयार करणेस कॉम्युटर अेडस यांना एक वर्षाची मुदतवाढ देणेस प्रस्तावित करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र८५ दिनांक:- २५.९.२००३

सुचकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे वर्ष २००३-२००४ करिता करांची संगणीकृत देयके, मागणी, नोटीस, नोंदवही इत्त्यादी तयार करणेकामी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे. कॉम्प्युटर ॲडस, यांना पुर्वीच्या संविदेतील अटी व शर्तीवर एक वर्षाची मुदतवाढ देऊन प्रशासनास त्यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्चास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. १६ वाचुन दाखवितात .

विषय क्र. १६:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | कारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २१ मध्ये बॅरेक नं. ६८ ते ७३ जवळ सी सी पेव्हमेंट आणि नाली बांधणे. (४७३ प्रभाग समिती निधी) | ५००३५/- | २१/८/२००३ | मे श्री सिध्दनाथ म. का. सोसा. |
| २ | उल्हासनगर-५ येथील ओटी सेक्शन बॅ नं १९५२ जवळील बगीच्यात लहान मुलांचे खिलोने बसविणे.(४८६ खिलोना खरेदी निधी) | २०००००/- | २१/८/२००३ | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून

दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे.तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ८६** **दिनांक:- २५.९.२००३**

सुचकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-** विषय क्र. १७ वाचुन दाखवितात .

विषय क्र. १७:- उल्हासनगर शहरात वृक्षदिंडीचे आयोजनकामी खर्चास मान्यता देणे.

**मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

**प्रस्तावना:-**

दिनांक ४ जुलै, ००३ ते ११ जुलै, ००३ या कालावधीत महानगरपालिकेच्या पुढाकाराने व शासकीय / निमशासकीय संस्था, संघटना शाळा व महाविद्यालये यांच्या सहभागाव्दारे वनोत्त्सव-२००३ कार्यक्रम हाती घेण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत एकूण ५००० झाडे लावण्याचे उददीष्ट ठरविण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्यात दि. ४ जुलै, २००३ रोजी पालिका मुख्यालयापासुन वृक्षदिंडीचे, आयोजन करण्यात आले. त्याव्दारे वृक्षरोपण व वृक्ष संवर्धन याचा संदेश शहरवासीयांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

त्यानंतर शाळा, शासकीय संस्था, कार्यालये यांच्या मागणीनुसार वृक्षांचे वाटप करण्यात येवून पहिल्या टप्प्यात एकुण २३५० झाडे लावण्यात आली.

उपरोक्त वनोत्त्सव-२००३ या कार्यक्रमासाठी विविध बाबींवर खालीलप्रमाणे खर्च करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| १ | रोपे | रूपये ३१,५००/- |
| २ | विद्यार्थ्यासाठी मिठाई | रूपये ०१,९४४/- |
| ३ | विद्यार्थ्यासाठी फळे | रूपये ०१,७००/- |

| | | |
|---|---|---|
| ४ | १००० विटा | रूपये ०१ ,६५०/- |
| ५ | कापडी बॅनर्स | रूपये ०२ ,२५०/- |
| ६ | वाहन भाडे | रूपये ०० ,४००/- |
| एकुण | | रूपये ३९ ,४४४/- |

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त बाबींवर झालेला खर्च रूपये ३९ ,४४४/- (एकोणचाळीस हजार चारशे चव्वेचाळीस रूपये) एवढा यांचे सन २००३-२००४ च्या वित्तिय वर्षासाठी अंदाजपत्रकातील क्र. ३ (ii) या शिर्षकाखाली करण्यात आलेल्या वित्तिय तरतुदीतुन करण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र८७</u> <u>दिनांकः- २५.९.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

वरील प्रस्तावनेत नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता हि स्थायी समिती वर्ष २००३-२००४ करीता वृक्षोत्त्सव आयोजनासंबधी लागणारी रोपे, विद्यार्थ्यासाठी मिठाई, विद्यार्थ्यासाठी फळे, विटा, कापडी बॅनर व वाहन उपलब्ध करणे कामी प्रशासनाने योग्य कंत्राटदारांशी केलेल्या निविदाशिवाय थेट संविदेस कायम करीत आहे व अंतर्भुत खर्चास मंजुरी देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. १८ वाचुन दाखवितात .

विषय क्र. १८:-उल्हासनगर-१ येथील सोनेसर अपार्टमेंट ते सी ब्लॉक पर्यंतचा रस्ता बांधणे कामी जयहिंद इन्फास्ट्रक्चर या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी <u>संविदेस मान्यता देणे.</u>

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना:-</u>

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | उल्हासनगर-१ येथील सोनेसर अपार्टमेंट ते सी ब्लॉक पर्यंतचा रस्ता बांधणे आणि रूंदीकरण करणे. |

| | | |
|---|---|---|
| २ | प्राकलनाची किंमत | ६९ ,५७ ,००६/- |
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | शहर अभियंता |
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. २९११ दिनांक १७/४/२००१ |
| ५ | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | क्र. ४४ दिनांक १३/८/२००१ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. १०३ दिनांक २३/७/२००३ |
| ७ | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केली त्याचे नांव | १. फ्री प्रेस   २. नगरवासी |
| ८ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | ५ |
| ९ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ५ |
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक ३१/०७/२००३ |
| ११ | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| १ | मे जय हिंद इंफ्रास्ट्रक्चर | ०.५४ टक्के जास्त |
| २ | मे. इगल कन्स्ट्रक्शन कं. | २.९७ टक्के जास्त |
| ३ | मे अमूल जे. चंदनानी | ३.३६ टक्के जास्त |
| ४ | मे. ज्योती कन्स्ट्रक्शन | निविदा उघडण्यात आली नाही |
| ५ | मे. साईबाबा कन्स्ट्रक्शन कं. | निविदा उघडण्यात आली नाही |
| १२ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. ४/८/०३ रोजी सकाळी १२.०० वाजता मा. आयुक्त यांचेकडे मे. जय हिंद इन्फ्रास्ट्रक्चर यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे जय हिंद इंफ्रास्ट्रक्चर यांनी त्यांचे पुर्वी भरलेले दर ०.५४ टक्के कमी दरापेक्षा ५.४६ टक्के कमी दर दिलेला असून वाटाघाटीनंतर अंतिम दर ६.०० टक्के प्राकलनापेक्षा कमी दर दिलेले आहे. |
| १३ | वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर | ६.०० टक्के कमी दर निविदेपेक्षा |
| १४ | लेखा शिर्षाचे नांव | सी-४(पप) पी-२ रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |
| १५ | लेखा शिर्षाखालील तरतुद | रू. १०.५० कोटी |

उक्त दर वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मेसर्स जय हिंद इंफ्रास्ट्रक्चर यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७५(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ८८</u>   <u>दिनांक:- २५.९.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर १ येथील सोनेसर अपार्टमेंट ते सी ब्लॉक पर्यंतचा रस्ता बांधणे कामी प्रशासनाने मे. जयहिंद इन्फास्ट्रक्चर या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सभापती:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- याशिवाय मा. आयुक्त साहेब प्रशासनाच्या वतीने आयत्त्या वेळचे ३ विषय आपली संमती असल्यास सभेच्या कामकाजात समाविष्ट करु इच्छितात.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी आयुक्तांच्या वतीने आणलेले ३ आयत्त्या वेळचे विषय आजच्या सभेत सर्वानुमते समाविष्ट करण्यात येत आहेत.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय कमांक १९ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १९:-महापालिका स्थायी समिती सभागृह साफ सफाई कामी प्रशासनाने मे. मॉ शेरावाली या कंत्राटदाराशी केलेल्या निविदाशिवाय थेट संविदेस कायम करणे.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:-

महापालिका व स्थायी समिती सभागृहात वेळोवेळी सभा बोलविण्यापूर्वी साफसफाई करणे आवश्यक आहे. त्याअर्थी महापालिकेतील सफाई कामगारांकडुन सदरचे सभागृहाचे साफसफाई नीट होत नसल्याने खाजगी ठेकेदाराकडून साफसफाई किंवा हाऊस किलिंग करुन घेणे योग्य राहिल. त्यामुळे उल्हासनगर स्थानिक एम.एस.ई.बी. कार्यालयातील खाजगी ठेकेदारामार्फत करण्यात आलेली साफसफाई पाहून महापालिका सचिवांकडून सदर कामासाठी दरपत्रक मागविण्यात आले.

खालील ३ ठेकेदारांनी दरपत्रके प्रस्तुत केली त्यांचे दर पुढीलप्रमाणे.............

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | दरपत्रक |
|---|---|---|
| ============ | ============================ | ============ |

| | | |
|---|---|---|
| १) | मॉ. शेरावाली कन्स्ट्रक्शन | ५ ,४८०/- |
| २) | मे. सतगुरु कन्स्ट्रक्शसन कंपनी | ५ ,५६०/- |
| ३) | मे. अनिल राज कन्स्ट्रक्शन | ५ ,८९०/- |

वरील दर पहाता तुलनात्मक दरपत्रक मॉ. शेरावाली कन्स्ट्रक्शन यांनी सर्वात कमी दर असून त्यांच्याकडून ट्रायल बेसवर वरील सभागृहाची साफसफाई करुन घेण्यात आली.

तरी सदर ठेकेदाराचे काम चांगल्या प्रकारचे असून सदर मॉ. शेरावाली कंन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराचे दर कमी असून महिना ५ ,४८०/- धरुन एकूण १/९/२००३ ते ३१/४/२००४ पर्यंत या कालावधीसाठी एकूण ३८ ,३६०/- खर्च अपेक्षित आहे.

त्यामुळे सदर बाब मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखा परिक्षक मार्फत व मा. आयुक्तांची मंजुरी घेऊन त्यांना दिनांक १/९/२००३ पासून सदर कामी कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले आहे. म्हणून प्रशासनाने त्यांच्याशी केलेल्या निविदा शिवाय थेट संविदा कायम करणेसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ८९</u> <u>दिनांकः- २५.९.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

वरील प्रस्तावात नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता हि स्थायी समिती महापालिका व स्थायी समिती सभागृह साफ सफाई कामी प्रशासनाच्या कार्यादेशान्वये दि. १.९.२००३ ते दि. ३१.४.२००४ या कालावधीसाठी मे. मॉ. शेरावाली कन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराशी केलेल्या कामी निविदाशिवाय थेट संविदा कायम करीत आहे व अंतर्भुत खर्चास मंजुरी देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क २० वाचुन दाखवितात.

**विषय क्र. २०:-संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानातंर्गत बक्षीस <u>रक्कमा खर्च करणेबाबत.</u>**

<u>मा. सदस्य श्री रामदास उमापः-</u> याबददल मी बोलु इच्छितो, आमच्या प्रभागात एकही पारितोषिक मिळालेले नाही. झोपडपटटी विभागात देखिल चांगले काम केले त्यांना देखिल पारितोषिक दिलेले नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर के सोनवणे):-</u> पुढच्या वर्षी संपूर्ण शहरालाच पारितोषिक मिळवुन देवु.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण मानेः-</u> जेथे खरोखरच साफसफाई केली त्या ठिकाणी पारितोषिक द्यायला हवे होते.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:-

सन २००२-२००३ या वर्षामध्ये संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत महापालिकेतील ज्या प्रशासकीय वार्डाना बक्षीस प्राप्त झालेले आहे. ही रक्कम खर्च करणेविषयी शासनाने शासन निर्णय क्रमांक नास्वअ-२००३/ प्र. क्र-५/ पापु-२१ दिनांक २ जुलै, २००३ अन्वये निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार स्वच्छता अभियान बक्षीस रक्कम खर्च करणेसाठी स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. सबब सदर विषय शासन निर्णयात नमुद मार्गदर्शक तत्त्वानुसार खर्च करण्यास मंजुरी मिळणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यात यावा.

स्थायी समिती ठराव क्र. ९०                    दिनांक:- २५.९.२००३

सुचकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानातंर्गत बक्षीस रक्कमा खर्च करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क २१ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. २१:-बॅरेक नंबर ३०० एस.ई.एस. शाळेजवळ सार्वजनिक शौचालयाचे विनियोग करणेकामी मान्यता देणे बाबत.**

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:-

सन्मानानिय नगरसेविका श्रीमती. कमला गंगाधर शर्मा व अन्य रहिवाशी यांचेकडुन बॅरेक नंबर ३००एस.ई.एस शाळेजवळ, उल्हासनगर-२ येथील शौचालय तोडणेबाबतची मागणी प्रशासनाकडे प्राप्त झाली होती, त्यानुसार संबंधीत स्वच्छता निरिक्षक व मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी प्रत्यक्ष जागा पहाणी करून अहवाल सादर केला आहे. सदर ठिकाणी एकूण ४ शीट असून पैकी २ स्त्री व २ पुरूष शीट आहेत. सदर शौचालय उपयोगात नसल्याचे व ना दुरूस्त असल्याबाबत

अहवाल प्राप्त झाला आहे. सदर शौचालयाची नोंद आरोग्य विभागाने केलेल्या सर्वेक्षण नोंद वहीमध्ये आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय / मुतारी निष्कासित करून सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ९१</u> <u>दिनांकः- २५.९.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार बॅरेक नंबर ३०० एस.ई.एस. शाळेजवळ सार्वजनिक शौचालय निष्कासित / विनियोग करणेकामी मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५-३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक : ३१ ऑक्टोबर, २००३

<u>इतिवृत्त :</u>

<u>दिनांक ३१/१०/२००३ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार, दिनांक ३१ऑक्टोबर २००३ रोजी सायंकाळी ४-३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्त्या.

01) श्रीमती ज्योती कलानी, मा. सभापती
२) श्रीमती आहुजा नीता प्रकाश
३) श्री उमाप रामदास
४) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम
५) श्री तलरेजा विनोद चंदीराम
६) श्रीमती छाब्रिया भारती
७ श्रीमती मोकल सिमा
८ श्री पंजाबी नारायण
९) श्रीमती वामणकर नंदिनी
१० श्री पमनानी ईश्वर
११) श्री वलेचा पृथ्वी
१२) श्री लिंगे सुर्यकांत (बबन)
१३) श्री जेसवानी सतरामदास
१४) श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल

तर

मा. सदस्य श्री मोहन बेहरानी व मा. सदस्या श्रीमती किरण माने या अनुपस्थितीत होत्त्या.

सायंकाळी ४-५० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले .

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक २५-९-२००३ रोजीचे इतिवृत्त कायम करणेबाबत .

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:-</u> सदरचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क. २ वाचुन दाखवितात .

**विषय क्र. २**:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने <u>केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.</u>

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप:-</u> मी या विषयावर बोलु इच्छितो की, प्रभाग समिती २ मध्ये उद्यान विकासासाठी जो निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे त्याचा आमच्या पॅनलला म्हणजेच श्री लालबिहारी यादव, श्रीमती नंदिनी वामणकर व माझ्या

प्रभागाला काही एक फायदा होत नाही कारण आमच्या प्रभागात एकही उद्यान अथवा खेळाचे मैदान नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u> याबददल मागेच मी तुम्हाला सांगितले होते, तसे असेल तर तुम्ही इतर कामे सुचवा उदा० नाली बनविण्याची अथवा इतर कोणतीही.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप:-</u> कामे सुचवून देखिल होत नाहीत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u> तुम्ही प्रभाग समितीच्या बैठकीत तसा ठराव संमत करुन पाठवा त्यानंतर तुमची कामे केली जातील.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. २:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-१ येथे कमला नेहरू नगर शिवाजी उद्यान येथे स्टेज बांधणे. (३२४ महापालिका निधी) | ९९०००/- | २२.९.०३ | मे सुर्यज्योत म. का. सोसा. |
| २ | प्रभाग क्र. २० मध्ये विलायतराय अपार्टमेंटजवळ आणि बॅ नं ७८४ जवळ बगीचा विकसित करणे (४६४ प्रभाग समिती निधी) | ९९९९०/- | २२.२.०३ | मे गुरूदेव म. का. सोसा. |
| ३ | उल्हासनगर-२ येथील प्रभाग क्र. २० मध्ये बगीचा नं १४४ चा विकास करणे (४८५ प्रभाग समिती निधी) | ९९९९०/- | २२.९.०३ | मे गुरूदेव म. का. सोसा. |
| ४ | उल्हासनगर-५ येथे ब्लॉक नं सी-५ आशियाना महल अपार्टमेंट जवळील उद्यानास किरकोळ दुरूस्ती रंगकाम करणे. (५१७ उप-महापौर निधी) | ५६२००/- | २२.९.०३ | मे स्वामी समर्थ म. का. सोसा. |
| ५ | उल्हासनगर-५ येथे एम एस ई बी ऑफिस जवळील भाटीया चौक येथील उद्यानास किरकोळ दुरूस्ती रंगकाम करणे. (५१८ उप-महापौर निधी) | ६६२००/- | २२.९.०३ | मेश्री गंगा म. का. सोसा. |
| ६ | उल्हासनगर-५ येथे ब्लॉक नं बी-१८, बी २६ शिवपुजा अपार्टमेंट जवळ सी सी पॅसेज व ड्रेनेज बनविणे.(५१९ | २०००००/- | २२.९.०३ | मे. श्री गंगा म. का. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | उप-महापौर निधी) | | | सोसा. |
| ७ | उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र. ११ मधील बॅ नं २०८६ समोर एम-२५० ने रस्ता बांधणे (५३२ उप-महापौर निधी) | १०००००/- | २२.९.०३ | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| ८ | उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र. ११ मध्ये जय अंबिका माता मंदिर ते वाधवाणी यांच्या घरापर्यंत सतनाम साक्षी अपार्ट. समोर जयश्री मुझिक सेंटर ते कुमार सुखेजा यांच्या घरापर्यंत सी सी एम-२५० ने बांधणे (५३७ नगरसेवक निधी) | १९९८००/- | २२.९.०३ | मे गुरूदेव म. का. सोसा. |
| ९ | उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र. ११ मध्ये क्रांतीनगर मध्ये बसंत बहार समोर जाकीर हुसेन दुकानाजवळचा रस्ता सी सी एम-२५० ने बांधणे (५३८ नगरसेवक निधी) | १९९७५०/- | २२.९.०३ | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |
| १० | उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र. ११ मध्ये कौशल अपार्टमेंट पासून बालाराम यांच्या घरापर्यंत बॅ नं १९५७ ते बॅ नं १९५९ पर्यतचा रस्ता सी सी एम-२५० ने बांधणे (५३९ नगरसेवक निधी) | २०००००/- | २२.९.०३ | मे जय शंकर म. का. सोसा. |
| ११ | उल्हासनगर-५ येथील इंदिरानगर, कैलास कॉलनी, क्रांतीनगर आणि नेहरू नगर येथे शौचालय दुरूस्ती करणे (५४७ महापालिका निधी) | १९९९००/- | २२.९.०३ | मे धनलक्ष्मी म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ९२</u>      <u>दिनांक:-३१.१०.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती सिमा मोकलन

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. ३ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ३:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ३:-उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-३ येथील प्र क्र. २५ मध्ये फॉलवर लाईन येथील समाज हॉल चे कंपाऊंड ची भिंत आणि सी सी पॅसेज व इतर दुरूस्ती करणे. (४८२ महापौर निधी) | ३ ,५० ,०००/- | १५ ३ .०३ | मे जयहिंद म. का. सोसा. |
| २ | उल्हासनगर-५ येथील महात्मा फुलेनगरमध्ये राहूल जनरल किराणा स्टोअर्स ते हजेरी शेड पर्यंत नाला व साकव बांधणे ( ५३४ दुर्बल घटक निधी) | २ ,०० ,०००/- | १५ ३ .०३ | मे. श्री गंगा म. का. सोसा. |
| ३ | उल्हासनगर-५ प्रभाग क्र. १३ येथील बॅ नं २११९ , २१२५ , २१२६ , जय श्री कृष्ण अपार्टमेंट येथे नाल्याचे बांधकाम करणे. ( ५५८ उप-महापौर निधी) | १ ,०० ,०००/- | १५ ३ .०३ | मे स्वामी समर्थ म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | उल्हासनगर-१ येथील वॅ नं ५२, ३५, ते ३७, ७३, ६४ सी सी एम-२५० व नाली बांधणे (५८६ नगरसेवक निधी) | १,९९,९७५/- | १५.९.०३ | मे साई लक्ष्मी म. का. सोसा. |
| ५ | उल्हासनगर-१ येथील विदर्भवाडी, रमाबाई हाऊस ते फुटपाथ, संजीवराम जेसवाल ते जयसिंग हाऊस, मिलींद अर्जून शाळा समोर, बाळकृष्ण नगर, किशन कन्हैया कॉटेज सी सी पायवाटा व नाली बांधणे प्रभाग क्र. १ (५९० नगरसेवक निधी) | १,९९,९००/- | १५.९.०३ | मे भोलेनाथ म. का. सोसा. |
| ६ | उल्हासनगर-३ येथील जसलोक स्कूल मागे ते राजाई सोसायटीच्या गेट पर्यत सी सी रस्ता बांधणे. (५९४ महापालिका निधी) | ४,९९,१२५/- | १५.९.०३ | मे वनीदेवी म. का. सोसा. |
| ७ | उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र. १८ जवळील उद्यान विकसित करणे (३४४ प्रभाग समिती निधी) | ९९,७६५/- | १८.९.०३ | मे जवाहर म. का. सोसा. |
| ८ | उल्हासनगर-४ येथे प्रभाग क्र. १२३७ जवळील उद्यानचा विकास करणे (३४३ प्रभाग समिती निधी) | १,९९,९४१/- | १८.९.०३ | मे श्री गंगा म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ९३</u> <u>दिनांकः-३१.१०.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री रामदास उमाप

अनुमोदकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील ८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- </u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ४:-मा. उप-महापौर कार्यालयातील चतुर्थ श्रेणी
<u>कर्मचा-यांना अतिकालीन भत्ता देणे.</u>

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- </u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. ४:-मा. उप-महापौर कार्यालयातील चतुर्थ श्रेणी
<u>कर्मचा-यांना अतिकालीन भत्ता देणे.</u>

मा. उप-महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांना आपल्या कार्यालयामध्ये काही वेळी महत्त्वाचे कार्यालयीन कामानिमित्त , बैठकानिमित्त, कार्यालयामध्ये कामकाजाच्या वेळेनंतरही कार्यालयात थांबावे लागते. कार्यालयीन वेळेनंतर जादा वेळ थांबावे लागते. सद्यस्थितीत शासन निर्णयानुसार जादा वेळ काम केल्यास चतुर्थश्रेणी कर्मचारी व सुरक्षा रक्षक यांना जास्तीत जास्त रूपये <u>१०/-</u> प्रतिदिन मिळतात. सदरची रक्कम ही अत्यंत कमी असल्याने स्थायी समिती कार्यालयीतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री. लक्ष्मण ग्यानचंदानी (शिपाई), श्री. जव्हार तुलसियानी, श्री. रावसाहेब खैर, श्रीमती कमल मधुकर बाविस्कर, (शिपाई) श्री. पंच्चु यादव, सुरक्षारक्षक यांना विशेष बाब म्हणुन प्रति महिना रूपये ५००/- दररोज किमान ३ तास जादा काम केल्यास देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी सदरच्या प्रस्तावास स्थायी समितीची मंजुरी मिळणेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ९४</u>                    <u>दिनांकः-३१.१०.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मा. उप-महापौर कार्यालयातील कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतर जादा कामापोटी चतुर्थश्रेणी कर्मचारी लक्ष्मण ग्यानचंदानी (शिपाई), श्री. जव्हार तुलसियानी, श्री. रावसाहेब खैर, श्रीमती कमल मधुकर बाविस्कर, (शिपाई) श्री. पंच्चु यादव, सुरक्षारक्षक यांना विशेष बाब म्हणुन रू. <u>५००/-</u> प्रती महिना अतिकालीन / विशेष भत्ता देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- </u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ५:-उल्हासनगर -२ बॅरेक क्र. ५१९ , ५४३ व ५२९ व
६७४ येथिल सार्वजनिक शौचालय विनियोग /
<u>निष्कासित करणे.</u>

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- </u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. ५:-उल्हासनगर -२ बॅरेक क्र. ५१९ , ५४३ व ५२९ व
६७४ येथिल सार्वजनिक शौचालय विनियोग /
<u>निष्कासित करणे.</u>

सन्माननीय नगरसेवक श्री विनोद तलरेजा व अन्य रहिवाशी यांचेकडून बॅरेक नंबर ५१९ कमल ट्रेडींगच्या जवळ,उल्हासनगर २, बॅरेक नंबर ५४३ उल्हासनगर २, बॅरेक नंबर ५२९ उल्हासनगर २, बॅरेक नंबर ६७४,मीलन पॅलेसच्या मागे,उल्हासनगर २ येथील शौचालय तोडणेबाबतची मागणी प्रशासनाकडे प्राप्त झाली होती,त्यानुसार संबंधीत स्वच्छता निरिक्षक व मुख्य स्वच्छता निरीक्षक यांनी प्रत्यक्ष जागा पहाणी करून अहवाल सादर केली आहे. सदर ठिकाणी एकूण अनुक्रमे ७ शीट, शीट ४ व ४शीट आहेत. सदर शौचालय उपयोगात नसल्याचे व ना दुरूस्त असल्याबाबत अहवाल प्राप्त झाला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्ताविन शौचालय/मुतारी निष्कासित करून सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करणेसाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र:-९५</u> <u>दिनांक:- ३१.१०.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव : श्री सुर्यकात लिंगे

हि स्थायी समिती वरील प्रस्तावना विचारात घेता उल्हासनगर -२ बॅ.क्र. ५१९ , ५४३ , ५२९ व ६७४ येथिल सार्वजनिक शौचालय निष्कासित / विनियोग करणेकामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. ६ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ६:-उल्हासनगर एरिया अंबरनाथ नाका, जय झुलेलाल गेट येथिल म.रा.वि. मंडळाचे पोल हलविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- ही जी फिगर दिलेली आहे ती चुकीची वाटते. नेमकी फिगर किती आहे ते सांगावे.

कार्यकारी अभियंता (विद्युत):- ही जी फिगर आहे ती ३,१२,८३४. ६६ एवढी आहे. मध्ये पुर्णांक दिलेला आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- पुर्णांक व्यवस्थित दिसत नव्हता म्हणुन विचारले. ठिक आहे.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ६:-उल्हासनगर एरिया अंबरनाथ नाका, जय झुलेलाल गेट येथिल म.रा.वि. मंडळाचे पोल हलविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

महानगरपालिकेने खालील दर्शविलेल्या कार्याची निविदा मांगवून कमी दराची निविदेला मंजुरी दिली होती. त्यांच्याशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये करार केलेले आहे.

| अ.क्र. | कार्याचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | सर्वात कमी दराचे निविदाधारकांच्या/ सोसायटींच्या नांव | दर | मंजुरीच्या दिनांक | कराराच्या दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | उल्हासनगर एरिया अंबरनाथ नाका जय झुलेलाल गेट येथे म.रा.वि. मंडळाचे पोल हलविणे बाबत. | ३,१२,८३४.६६ | मे. दास आणि बंधु | रू. ३,१२,८३४.६६ पेक्षा २.७ टक्के कमी | २४/९/०३ | २२/१०/०३ |

सदर माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र:-९६</u> <u>दिनांक:- ३१.१०.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर एरिया अंबरनाथ नाका, जय झुलेलाल गेट येथिल म.रा.वि. मंडळाचे पोल हलविणेकामी प्रशासनाने मे. दास आणि बंधु यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ७:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत शिवशक्ती कॉलनी, इंदिरानगर उल्हासनगर-४ येथे जलवाहिनी टाकणेकामी मे. कल्पतरु इंजिनियर या

लघुत्तम दराच्या निविदाकाराची निविदा स्विकृती
योग्य असून संविदेस मान्यता देणे .

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ७:-राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत
शिवशक्ती कॉलनी, इंदिरानगर उल्हासनगर-४ येथे
जलवाहिनी टाकणेकामी मे. कल्पतरु इंजिनियर या
लघुत्तम दराच्या निविदाकाराची निविदा स्विकृती
योग्य असून संविदेस मान्यता देणे .

उपरोक्त विषयांकित ठिकाणी राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यकमांतर्गत वितरण वाहिनी टाकणे करिता रू १२३३९००/-चे प्राकलन तयार करण्यात आले होते. सदर कामासाठी दि ११.७.०३ च्या राज्य स्तरीय दैनिक महाराष्ट्र टाईम्स व यशोभूमी,तसेच जिल्हा स्तरीय दैनिक धनुषधारी या वृतपत्रात रितसर जाहिरात देऊन निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्त्या. त्यानुसार दि २५.७.०३ रोजी पाच ठेकेदारांनी निविदा सादर केल्या. कार्यकारी अभियाता (पा.पु),सहायक मुख्य लेखा परिक्षक ,लेखा अधिकारी यांचे उपस्थितीत दि २८.७.०३ रोजी निविदा उघडण्यात आल्या.

१)मेसर्स.ओ.एस.आर.कंस्ट्रक्शन व मेसर्स.एम.एस.के बिल्डर्स या ठेकेदारांनी सादर केलेल्या निविदेच्या लखोटा क १) मध्ये विक्रीकर नोदणी प्रमाण पत्र, अनुभवाचा दाखला उपलब्ध नसल्याने त्यांची निविदा उघडण्यात आली नाही.

२) मेसर्स. रवी सचदेव,यांनी सादर केलेली निविदा ,निविदेतील अटी व शर्ती नुसार पात्र ठरत असल्याने त्यांची निविदा उघडण्यात आली. त्यात अंदाजित किमतीपेक्षा २५.२ टक्के जास्त (i.e.: १५४४८४३/-) दर नमुद केलेले होते.

३)मेसर्स सुदेश इंटप्राईजेस यांनी सादर केलेली निविदेतील अटी व शर्ती नुसार पात्र ठरत असल्याने त्यांची निविदा उघडण्यात आली. त्यात अंदाजित किमतीपेक्षा २६ टक्के जास्त (i.e.:१५५४७१४/-) दर नमुद केलेले होते.

४) मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स यांनी सादर केलेली निविदेतील अटी व शर्ती नुसार पात्र ठरत असल्याने त्यांची निविदा उघडण्यात आली. त्यात अंदाजित प्रकलनाच्या किंमती प्रमाणे (At par) (i.e.: १२३३९००/-) दर नमुद केलेले होते.

वरील तुलनात्मक तक्त्या नुसार मेसर्स कल्पतरू इंजिनिअर्स यांनी दिलेले दर सर्वात न्युन्तम आहे व ते रास्त वाटतात. त्यास मान्य करण्या बाबत शिफारस करण्यात येत आहे.

तरि सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र:-९७ दिनांक:- ३१.१०.२००३

सुचकाचे नाव :- श्री रामदास उमाप

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत शिवशक्ती कॉलनी, इंदिरानगर उल्हासनगर-४ येथे ३०० मिमि. / ८० मिमि. पोलादी / लोखंडी जलवाहिनी टाकणेकामी प्रशासनास मे. कल्पतरु इंजिनियरींग या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. ८ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ८:-संत गाडगे महाराज नागरी स्वच्छता अभियनांतर्गत मा. महापौर गठन समितीतर्फे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत भेट देणेकरीता प्रशासनाच्या थेट कार्यादेशान्वये मे. मोहिनी राज ट्रव्हलर्स ॲण्ड ट्रान्सपोर्टतर्फे पुरविण्यात आलेल्या वाहने कामी निविदाशिवाय थेट संविदेस कायम करुन अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ८:-संत गाडगे महाराज नागरी स्वच्छता अभियनांतर्गत मा. महापौर गठन समितीतर्फे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत भेट देणेकरीता प्रशासनाच्या थेट कार्यादेशान्वये मे. मोहिनी राज ट्रव्हलर्स ॲण्ड ट्रान्सपोर्टतर्फे पुरविण्यात आलेल्या वाहने कामी निविदाशिवाय थेट संविदेस कायम करुन अंतर्भुत खर्चास मान्यता देणे.

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान, सन २००२ अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकातील सर्वात स्वच्छ प्रशासकीय वार्डाची निवड करणेकामी मा. महापौर गठन समिती उल्हासनगर महानगरपालिकेची निवड करण्यात आली होती.

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान कालावधीत मा. महापौर गठन समिती, उल्हासनगर महानगरपालिकेने दिनांक १५.३.२००३ व दिनांक २९.३.२००३ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस भेट दिलेली होती. गठन समितीचे सदस्यांना जाणे येणेसाठी मिनी बसची व्यवस्था करण्यास वाहन विभागास सुचना देण्यात आलेल्या होत्या. मिनी बस व्यवस्था दरपत्रके मागवून करणे आवश्यक होते, परंतु वेळे अभावी ते शक्य न झाल्याने वाहन विभागाने खालील ट्रान्सपोर्ट कंपनीकडून भाड्याने मिनी बस व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आलेली होती.

| अ.क्र. | दिनांक | ट्रान्सपोर्टचे नांव | मिनी बस क्रमांक | एकुण देयक |
|---|---|---|---|---|
| १. | १५.३.२००३ | मे. मोहिनी राज ट्रॅव्हल्स आणि ट्रान्सपोर्ट | एमएच-०५-२०३१ | ४,३००/- रु. |
| २. | २९.३.२००३ | मे. मोहिनी राज ट्रॅव्हल्स आणि ट्रान्सपोर्ट | एमएच-०५-१८५५ | ३,८८०/- रु. |
| | | | एकूण---- | ८,१८०/- रु. |

तरी मे. मोहिनी राज ट्रॅव्हल्स आणि ट्रान्सपोर्ट, यांचे वरील भाड्याचे वाहनावर केलेल्या खर्चास मा. स्थायी समितीचे मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र:- ९८ दिनांक:- ३१.१०.२००३

सुचकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती निता आहुजा

वरील प्रस्तावात नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता ही स्थायी समिती संत गाडगेमहाराज नागरी स्वच्छता अभियानांतर्गत गठन समितीतर्फे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत भेट देणेकामी प्रशासनाच्या थेट कार्यादेशान्वये मे. मोहिनी राज ट्रॅव्हलर्स ॲण्ड ट्रॅन्सपोर्टतर्फे पुरविण्यात आलेल्या वाहनेकामी निविदाशिवाय थेट संविदेस कायम करून अंतर्भुत खर्च रुपये ८,१८०/- च्या रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

## एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. ९ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ९:-उल्हासनगर-१ येथिल साधुवासवानी गार्डन मध्ये समाजमंदिराचे सुशोभिकरण करणे व टाकी बांधणे कामी प्रशासनास मे. डी. एस. कन्स्ट्रक्शन यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- आयुक्त साहेब माझ्या प्रभागात एक समाज मंदिर आहे. माझ्या प्रभागात इतर ठिकाणी जागा उपलब्ध नसल्याने सदरच्या समाज मंदिराचा वापर विविध कारणांसाठी मोठ्या प्रमाणावर उदा० सामाजिक व राजकीय कामासाठी होत असतो. त्यामुळे माझी विनंती आहे की, माझ्या प्रभागामधील या समाजमंदिराचे देखिल सुशोभिकरण करण्यात यावे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):- हा विषय साधु वासवानी गार्डन येथील समाजमंदिराच्या सुशोभिकरणाचा असुन सदरचा प्रस्ताव हा आमदारांच्या विकास निधीमधुन करावयाच्या कामाचा आहे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- ठिक आहे, माझी विनंती आहे. तसेच मा. आमदार श्री सुरेश (पप्पु) कलानी यांनी हा जो सुशोभिकरणाचा प्रस्ताव आणलेला आहे याबददल मी त्यांचे अभिनंदन करतो.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ९:-उल्हासनगर-१ येथिल साधुवासवानी गार्डन मध्ये समाजमंदिराचे सुशोभिकरण करणे व टाकी बांधणे कामी प्रशासनास मे. डी. एस. कन्स्ट्रक्शन यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

उल्हासनगर-१ येथील साधुवासवानी गार्डनमध्ये समाज मंदिराचे काम पुर्ण झालेले असून त्यांचे सुशोभिकरण करणे व पाण्याची टाकी बांधणे आवश्यक आहे. त्याकरिता मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांचे पत्र जा.क्र. नियो/आस्थाविका/सुप्रमा/टे-१/६८ , दिनांक ८/१०/२००३ नुसार रू. ७.९३ लक्ष इतक्या रक्कमेस मा. आमदार निधीमधून खर्च करण्यास प्रशासकीय मंजुरी प्रदान केलेली आहे. सदर समाज मंदिराचे काम मे डी एस कन्स्ट्रक्शन यांच्याकडून चालू आहे व हे अतिरिक्त काम म्हणजे सुशोभिकरणे व पाण्याची टाकी बसविणे हे काम देखील मे. डि एस कन्स्ट्रक्शन यांचे कडून डि. एस. आर. सार्वजनिक

बांधकाम विभाग, ठाणे यांचे सन् २०००-२००१ च्या दरानुसार करून घेण्यासाठी मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५(२) (२) अंतर्गत मंजुरी मिळणेकरिता स्थायी समिती सभेपढे ठेवण्यासाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र:- ९९</u> <u>दिनांक:- ३१.१०.२००३</u>

सुचकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-१ येथिल साधुवासवानी गार्डन मध्ये समाजमंदिराचे सुशोभिकरण करणे व टाकी बांधणे कामी प्रशासनास मे. डी. एस. कन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्चास मंजुरी देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात .

विषय क्र. १०:-उल्हासनगर महानगरपालिका इमारतीत तळमजल्यावरील नागरीक सुविधा केंद्र उभारणे कामी सुधारीत प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय <u>मान्यता देणे.</u>

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. १०:-उल्हासनगर महानगरपालिका इमारतीत तळमजल्यावरील नागरीक सुविधा केंद्र उभारणे कामी सुधारीत प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय

मान्यता देणे.

उपरोक्त काम मे. व्ही एम हरजानी यांना निविदेच्या प्रमाणे महानगरपालिका कार्यारंभ आदेश क्र.उमपा/सावां/काआं/४९२ , दिनांक २१/६/२००३ नुसार दिले आहेत. सदर काम प्रगतीपथावर असतांना काही फेरबदल करणे आवश्यक होते. त्यामुळे प्रमुख्याने पार्टीशन, फर्निचर, छताच्या, व फ्लोरींग या कामाच्या मापात थोडीशी वाढ झाली आहे. या वाढीव कामाची किंमत रू. १३४१८४/- इतकी होत आहे. तसेच मा. आयुक्त यांनी सुचना केल्याप्रमाणे अतिरिक्त काम जसे की, एम एस ग्रील, अल्युमिनियम खिडक्या, मार्बल सिल, प्रवेश द्वाराजवळ ग्रेनाईट स्लॅब टाकणे इत्यादी वाढीव कामांची किंमत रू. २७१४१३/- इतकी होत आहे. मुळ प्राकलनीय किंमत रू. २० ,०० ,०००/- इतकी असून मे व्ही. एम. हरजानी यांच्या दराने कामाची निविदेच्या किंमत रू. १८ ,९९ ,८४९.९० इतकी होत आहे.

उपरोक्त रू. १३४१८४ + २७१४१३ = ४०५५९७/- या वाढीव व अतातिरिक्त कामाच्या किंमतीसह निविदा दराने मुळ कामाची रू. १८ ,९९ ,८४९.९० खर्चासह सुधारीत प्राकलनाची किंमत रू. २३ ,०५ ,४४७/- इतकी होत आहे. तरी रू. २३ ,०५ ,४४७/- एवढया किंमत सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र:-१००** **दिनांक:- ३१.१०.२००३**

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती भारती छाबरिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार संगणकीकरण योजनेअंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका इमारतीत तळमजल्यावरील नागरीक सुविधा केंद्र उभारणे कामी रुपये २३ ,०४ ,४४७/- या रक्कमेच्या सुधारीत प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५-०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक : २४ डिसेंबर, २००३

## दिनांक २४/१२/२००३ रोजी घेण्यात आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २००३ रोजी सायंकाळी ४-३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्त्या.

01) श्रीमती ज्योती कलानी, मा् सभापती
०२) श्रीमती आहुजा नीता प्रकाश
०३) श्री उमाप रामदास
०४) श्री ठाकुर नरेंद्र केवलराम
०५) श्री तलरेजा विनोद चंदीराम
०६) श्रीमती छाब्रिया भारती
०७) श्रीमती मोकल सिमा
०८) श्री पंजाबी नारायण
०९) श्रीमती बामणकर नंदिनी
१० श्री पमनानी ईश्वर
११) श्री वलेचा पृथ्वी
१२) श्री लिंगे सुर्यकांत (बबन)
१३) श्री जेसवानी सतरामदास
१४) श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल
१५) श्री मोहन बेहरानी
१६) श्रीमती किरण माने

सायंकाळी ४-५५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यात आले .

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक ३१-१०-२००३ रोजीचे इतिवृत्त कायम करणेबाबत.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने:-</u> एक मिनीट मला यावर बोलायचे आहे. यापूर्वी स्थायी समितीची सभा दर आठवडयाला होत होती, आता एकदम दोन महिन्यांनी होत आहे. हे चुकीचे आहे, सभा दर आठवडयाला घेत जा.

<u>मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर:-</u> विषयपत्रिकेवर एकदम ३२ विषय घेतलेले आहेत, त्यामुळे काही लक्षात येत नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:-</u> विषय एवढे जास्त असल्याने काहीच कळत नाही, आणि सचिव साहेब तुम्ही विषय जरा हळु हळु वाचत जा.

<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी:-</u> विषय तर पुष्कळ होते, तरी पण अर्धेच ठेवलेले आहेत.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:-</u> बैठक ठेवण्यासाठी प्रशासनाकडुन विषय तर यायला हवेत ना, त्याशिवाय बैठक कशी ठेवणार.

मा. सदस्य श्री रामदास उमापः- हे काय एकदम ३२ विषय आलेले आहेत.

मा. सदस्य श्री नारायण पंजाबीः- स्थायी समितीकडे फक्त रु १० लाखांच्या वरील विषय मान्यतेसाठी येतात इतर विषय फक्त माहितीसाठी येत असतात.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानीः- इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. १ वाचुन दाखवितात .

विषय क्र. १:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :- पास, पास

मा. सभापती श्रीमती ज्योतील कलानीः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. १:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | शौचालय दुरूस्तीबाबत १) बॅ नं १०६४ जवळ २) घनश्याम चाळजवळ ३) कमल रेस्टाईल समोर सम्राट अशोकनगर बालवाडी समोर (५३१ दुर्बल घटक निधी) | १५६६५०/- | ८.१०.०३ | मे गांवदेवी म. का. सोसा. |
| २ | उल्हासनगर-४ बॅ नं १६२६, १६१८, १५७३, १५७५ पॅनल नं १६ सी येथे एम-२५० रोड व नाले (गटारी) बांधणे.(६१९ नगरसेवक निधी) | १९९६९२/- | १०.१०.०३ | मे ओम साईबाबा म. का. सोसा. |
| ३ | उल्हासनगर-३ येथील प्र.क्र. ८ मध्ये गार्डन इसलॅड येथील बॅ नं १०७२ व १०७३ मध्ये, लासी पाडा येथे रोड बनविणे (६३० नगरसेवक निधी) | १९९४००/- | १०.१०.०३ | मे अल्का म. का. सोसा. |
| ४ | उल्हासनगर-४ बॅ नं १४९५, ९६ सी सी पायवाटा, बॅ नं १४८५, ८६ गटारी, बॅ नं १४९० सी सी गटार बॅ नं १५३१ गटार, बॅ नं १५३५ ते १५३७ सी सी गटार बांधणे.(६३४ नगरसेवक निधी) | १९९५४०/- | १०.१०.०३ | मे ओम साईबाबा म का सोसा. |
| ५ | उल्हासनगर-३ बीर सरांचे घरापासून ते भगवानदास कंम्पाऊड पर्यंत एम-२५० ने रस्ता बांधणे (६४२ | १९९५४०/- | १०.१०.०३ | मे मुंब्रा देवी म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नगरसेवक निधी) | | | |
| ६ | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. २२ बॅ नं ४४६, २२४, २२५, २२७, २४१ व २४५ मध्ये पवनादिप अपार्टमेंट, सन्नी अपार्टमेंट आणि शिव मंदिर येथे रोड बनविणे (६४५ नगरसेवक निधी) | १९९२००/- | १०.१०.०३ | मे अल्का म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समिती कडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १०१ दिनांक:-२४/१२/२००३.

सुचकाचे नाव :- श्री सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्री तलरेजा विनोद

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील ६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क. ३ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ३:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १४ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- मा. आयुक्त साहेब यामध्ये प्रभाग समिती निधीतुन कामे प्रस्तावित केलेली आहेत. तर आमच्या प्रभाग समिती २ मधुन कामे का प्रस्तावित केली जात नाहीत? आमच्या प्रभाग समितीचे एकही काम नाही. आमच्या प्रभाग समितीच्या कामांना उशिर का होतो?

मा. सदस्य श्री विनोद तलरेजा:- मा. आयुक्त साहेब, उमाप साहेब बरोबर बोलतायत, आमच्या प्रभाग समितीचे एकही काम नाही.

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u> आपल्या प्रभाग समितीतील काम मंजुर झाले परंतु माहितीसाठी आपल्या समोर आले नाही असे झाले असेल.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप:-</u> प्रभाग समिती २ चे प्रस्ताव उशिरा येत आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा:-</u> आपण प्रभाग अधिकारी श्री शिर्के यांना यासाठी योग्य ते आदेश द्यावेत.*

*<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने:-</u> मा. आयुक्त साहेब, माझ्या प्रभाग क १४ मध्ये नाला बनविणे अत्यावश्यक आहे, आपण भेट देवुन पाहणीसुध्दा केली होती, सदरचे काम केव्हा करणार.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u> प्रोसिजर पुर्ण होवु द्या, त्यानंतर करु.*

*<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:-</u> माझ्या प्रभाग क. १५ मध्ये सुध्दा नाला बनविणे आवश्यक आहे. तो लवकर करावा.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u> ठिक आहे आम्ही करु.*

*<u>मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर:-</u> :- यामध्ये अनुक्रमांक ७ वर जे काम दाखविले आहे गार्डनचे, तर प्रभाग क ६ मध्ये गार्डन कुठे आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u> हे चुकीचे दाखविलेले आहे.*

*<u>मा. सदस्य श्री नारायण पंजाबी:-</u> हे चुकीचे दाखविलेले आहे कारण ४४४ माझ्या प्रभागात आहे.*

*<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा:-</u> अनुक्रमांक ७ मध्ये चुकीची दुरुस्ती करावी लागेल.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u> श्री सुखरामानी या विषयाची संचिका दाखवा.*

*<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा:-</u> यामध्ये बॅरेक नंबरची चुक आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u> यामध्ये गडबड आहे.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u> हे फक्त माहितीसाठी आहे. तुम्हाला माहिती हवी असल्यास आम्ही देऊ.*

*<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप:-</u> प्रभाग क्रमांक ६ मध्ये उद्यान व खेळाचे मैदान नाही. यासाठी मी मागच्या बैठकीत बोललो होतो*

*<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा:-</u> प्रभागात उद्यान व खेळाचे मैदान नसल्यास सदरच्या निधीतुन तुम्ही इतर कामे करु शकता.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u> तुम्ही प्रभाग समितीत तसा ठराव करुन आणा, जसे नाली दुरुस्ती, शौचालय दुरुस्ती करणेबाबतचा त्यानंतर उद्यान निधीतुन इतर कामे करण्यात येतील. आम्ही कोणतीही चुकीची कामे करत नाही, या विषयाबद्दल तुम्ही जे बोलत आहात तर या निधीतुन दुसरे काम करण्यात आलेले असेल.*

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानीः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे. श्री सुखरामानी यांनी याबाबत संचिका मागवुन स्पष्टीकरण द्यावे.

प्रस्तावना

विषय क्र. ३:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १४ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-४ येथील शिवाजी मैदान येथे जॉगींग ट्रॅक आणि कमलिंग वॉल कपाऊड पर्यंत सी सी एम-२५० चा विकास करणे (३४० प्रभाग समिती निधी) | ११९९४६/- | १६.१०.०३ | मे. श्री गंगा म. का. सोसा. |
| २ | उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र. १५ येथे शिवाजी मैदानचा विकास करणे (३४१ प्रभाग समिती निधी) | ११९९५०/- | १६.१०.०३ | मे श्री गंगा म. का. सोसा. |
| ३. | उल्हासनगर-३ येथिल कालअंबे रोड आणि रोटरी गार्डनचा विकास करणे (३४५ प्रभाग समिती) | १०००००/- | १६.१०.०३ | मे. श्री. गंगा म.का.सोसा. |
| ४. | उल्हासनगर-४ येथिल शिवाजी मांदिर येथे लॉन चा विकास करणेसाठी लाल माती पुरवठा करणे आणि कोटा स्टोन बसविण्यासाठी फिटींग करणे (३४७ प्रभाग समिती) | ९९९८३/- | १६.१०.०३ | मे. रुचिका म.का.सोसा. |
| ५. | उल्हासनगर-४ येथिल प्रभाग क्र. १७ मध्ये बॅ.नं. १४९२ सेक्शन ३० बगीच्याचा नुतनीकरणे करणे (३४८ प्रभाग समिती) | ९९९५०/- | १६.१०.०३ | मे. श्री. साई साधना म.का. सोसा. |
| ६. | उल्हासनगर-४ येथिल प्रभाग क्र. १५ मध्ये शिवाजी मैदान येथिल फाउंटनचा विकास करणे (४४३ प्रभाग समिती | ९९४९९/- | १६.१०.०३ | मे. रुचिका म.का.सोसा. |

निधी)

| | | | |
|---|---|---|---|
| ७. प्रभाग क्र. ६ मध्ये बॅ.नं. १६६५-६६ जवळ गार्डनचा विकास करणे (४४४ प्रभाग समिती निधी) | ९९२३२ | १६.१०.०३ | मे. श्री. साई साधना म.का. सोसा. |
| ८. उल्हासनगर-२ येथिल प्रभाग क्र. ६ मध्ये आझादनगर येथे कुंजविहारी तबेल्यासमोरील शौलचालये दुरुस्ती करणे. (५५१ दुर्बल घटक) | १३२९५०/- | १६.१०.०३ | मे. श्री. जय शंकर म.का. सोसा. |
| ९. उल्हासनगर मधील रस्त्यावर विविध ठिकाणी फलक लावणेबाबत (५५५ एमएम आर डी ए) | ९५९५०/- | १६.१०.०३ | मे. ज्योती म.का. सोसा. |
| १०. उल्हासनगर-२ येथिल प्रभाग क्र. ६ मध्ये चेतनलाल शर्मा यांचे घर ते हरी किराणा स्टोअर्स बुध्दविहार मंदिर ते आरास फलवटे यांचे घर बालचंद तबेला ते चांदिका गौड गणेश मंदिर ते १० बैठकिचे शौचालय संतोषी माता मंदिर ते शर्मा यांचे घर या रस्त्यामधील खोदलेले खड्डे सिमेंट कॉक्रिटने भरणे (५६२ महापालिका निधी) | ५३०००/- | १६.१०.०३ | मे. श्री. जय शंकर म.का. सोसा. |
| ११. उल्हासनगर-४ येथिल प्र.क्र. १० मध्ये सरदारपाडा, वीर तानाजी नगर साईनाथ कॉलनी या ठिकाणी असलेले शौचालय दुरुस्ती करणे. (६०२ महापालिका निधी) | १०००००/- | १०.१०.०३ | मे. श्री. मॉ म.का.सोसा. |
| १२. उल्हासनगर-१ येथिल फौजदार पथ पलेदर शौचालय दुरुस्ती व दोन सीट नविन बांधणे व सी.सी. नाली कमला नेहरु नगर येथे प्रभाग क्र३ बांधणे. (६२४ नगरसेवक निधी) | १९९९००/- | १६.१०.०३ | मे. भोलेनाथ म.का. सोसा. |



| | | | |
|---|---|---|---|
| १३. उल्हासनगर -३ बॅ.क्र. ९३७ मध्ये प्रभाग क्र. २५ येथे रोड बनविणे. (६४८ नगरसेवक निधी) | ९९५६०/- | १६.१०.०३ | मे. भोलेनाथ म.का. सोसा. |

| | | | |
|---|---|---|---|
| १४.उल्हासनगर-५ येथिल प्रभाग क्र. १२ मध्ये अनंतपूर दरबार व बॅ.नं. १७४१-१७४३ जवळ नाला बांधणे (६५६ महापौर निधी) | १०००००/- | १६.१०.०३ | मे. श्री. मॉ. म.का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १०२ दिनांकः-२४/१२/२००३.

सुचकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील १४ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. ४ वाचुन दाखवितात .

विषय क्र. ४:- सिरु चौक ते गुरुद्वारा, उल्हासनगर-२ या रस्त्यावरील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडाचे पोल व रोहित्र हलविणेकामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे व प्रशासनास सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मेसर्स दास ॲण्ड बंधु, पुणे यांच्याशी पूर्वीच्या निविदेतील दराने निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

मा. सदस्य श्री रामदास उमापः- या विषयाची माहिती द्या.

कार्यकारी अभियंता (विद्युत):- सिरु चौक ते गुरुद्वारा, उल्हासनगर-२ हा जो नवीन रस्ता करण्यात येत आहे, या रस्त्यावरील पोल व रोहित्र हलविण्यासाठी सदरचे काम प्रस्तावित केलेले आहे.

__मा. सदस्य श्री रामदास उमाप:-__ या कामासाठी खर्च किती आहे.

__कार्यकारी अभियंता (विद्युत):-__ रु १२. ७७ लक्ष एवढा आहे. यामध्ये रस्त्यावरील ३ रोहित्र हलविण्याचे प्रस्तावित आहे.

__मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल:-__ माझ्या प्रभागात किर्ती पथ या नाल्यामध्येच पोल आहे, त्यामुळे नाल्यात कचरा अडकतो, मी यापूर्वीच हा पोल हलविण्यासाठी विनंती केलेली आहे.

__मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-__ उल्हासनगर स्टेशन येथील जुना स्टेशन रोड येथेही रस्त्यामध्ये बरेच पोल आहेत, ते देखील हलवावेत.

__मा. सदस्य श्री सुर्यकांत लिंगे:-__ माझ्या प्रभागात जनता मित्र मंडळ येथेही रस्त्यात पोल आहेत ते देखील हलवावेत.

__मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-__ याबाबत तुम्ही कार्यकारी अभियंता (विद्युत) श्री आयलानी यांना सांगावे ते योग्य ती कारवाई करतील.

__मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:-__ सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

## __प्रस्तावना__

विषय क्र. ४:- सिरु चौक ते गुरुद्वारा, उल्हासनगर-२ या रस्त्यावरील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडाचे पोल व रोहित्र हलविणेकामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे व प्रशासनास सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मेसर्स दास ॲण्ड बंधु, पुणे यांच्याशी पूर्वीच्या निविदेतील दराने निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव | शिरु चौक ते गुरुद्वारा उल्हासनगर-२ येथे म.रा.वि. मंडळाचे पोल ट्रान्सफॉमर महानगरपालिकेनी १०० टक्के स्वत:च्या खर्चावर हलविणेबाबत. |
| २. | निविदा रक्कम | १२,५०,९२९ ६४ |
| ३. | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | मुख्य अभियंता म.रा.वि. मंडळ |
| ४. | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक | CE/KLNZ/TECH/Estimate/KC/१४ Dated 10th Oct. २००३. |
| ५. | प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक | स्थायी समिती ठराव क्र. ८४, दिनांक २५/९/२००३. |
| ६. | निविदि सुचना क्रमांक व दिनांक | उमपा/विद्युत/२/१२५, दिनांक ५/११/२००३ |
| ७. | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केली त्याचे नांव | नवभारत (मराठी), नवशक्ती (हिंदी), फ्रि प्रेस (इंग्रजी) |
| ८. | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | २ |

| | | |
|---|---|---|
| ९. | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | १ |
| १०. | निविदा उघडल्याचा दिनांक | ५/११/२००३ रोजी सांयकाळी ४ वाजता. |
| ११. | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | |
| १. | मे. दास आणि बंधु, पुणे | निविदा रक्कम रु. १२,५०,९१९.६४ पेक्षा २.७ टक्के कमी |
| १२. | लेखा शिर्षाचे नांव | क-४ (II) रस्ते, प्रवास व पुल इत्त्यादी सुधारणे व नविन बनवणे. |
| १३. | लेखा शिर्षाखालील तरतुद | रुपये १०,५०,००,००० |

स्थायी समिति ठराव क्र. ८४, दिनांक २५/९/२००३ अन्वये म.रा.वि.मंडळाचे पोल हलविण्यासाठी तरतुद फक्त रुपये ६,१५,३०० आहे. परंतु कार्याचे खर्च रुपये १२,१७,१५५/- व म.रा.वि. मंडळाचे सुपरविजन चार्जेस रुपये १,४१,६००/- आहे म्हणजे एकूण खर्च रुपये १३,५८,७५५/- इतका अपेक्षित आहे त्यामुळे वाढीव खर्च रुपये ७,४३,४५५/- याचा प्रवधान करुन मान्यता मिळण्याची व उक्त निविदा दर वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशीर असल्याने

मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मेसर्स दास आणि बंधु, पुणे यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

**स्थायी समिति ठराव क्र. १०३** **दिनांक:-२४/१२/२००३.**

सुचकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

ही स्थायी समिति वरील प्रस्तावने अनुसार पुर्वीचा स्थायी समिति ठराव क्र. ८४, दिनांक २५/९/२००३ मध्ये अंशत: बदल करुन सिरु चौक ते गुरुद्वारा, उल्हासनगर-२ येथे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे पोल व ट्रान्सफॉर्मर हलविणेकामी रक्कम रुपये १३,५८७५५/- च्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी तसेच प्रशासनास मेसर्स दास ॲण्ड बंधु, पुणे या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिति सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय कमांक ५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ५:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- मा. आयुक्त साहेब माझी आपणांस विनंती आहे की, माझ्या प्रभागात चंद्रशेखर आझाद स्कुल ते आनंद शिंदे हा रस्ता आहे. सदरच्या रस्त्याचे काम निधी अभावी अर्धवट झालेले आहे. नगरसेवक निधी ४ लाखांचा आहे परंतु फक्त २ लाखांचीच कामे केल्याने सदरचा रस्ता अर्धवट अवस्थेत आहे, त्यामुळे रस्त्याचे उर्वरित काम महापालिका निधीतुन करण्यात यावे, ही विनंती.

मा. सदस्य श्री विनोद तलरेजा :- सदरच्या रस्त्याची आवश्यकता आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):- ठिक आहे मी बघतो.

मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल:- आयुक्त साहेब अमर डाय येथील रोड कधी करणार.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):- कृपया विषयावरच बोला, विषय पूर्ण झाल्यानंतर आपण यावर बोलु.

काही सदस्य :- पास, पास

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ५:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभापती निधी महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-४ येथील स्वामी बोधराज गार्डनचे सुशोभिकरण करणे (४३९ प्रभाग समिती निधी) | २०००००/- | २५.११.०३ | मे आदर्श म. का. सोसा |
| २ | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. २३ मध्ये एम-२५० नाली व साईड पटटी करणे. (५२५ दुर्बल घटक निधी) | १९९९७० /- | २५.११.०३ | मे वनी देवी म. का. सोसा. |
| ३ | उल्हासनगर-५ येथील नेहरू नगर, पटेलनगर, आणि महात्मा फुलेनगर, ज्योतीबा फुले नगर श्रीरामनगर, हिल लाईन पोलीस स्टेशन जवळ बॅं नं | १,००,०००/ | २५.११.०३ | मे हरे क्रिष्णा म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १६९४ शौचालये दुरूस्ती करणेबाबत. (५९६ महापालिका निधी) | | | |
| ४ | उल्हासनगर-२ ब्लॅ नं ४३४, ४३८, ४४६, ४४८ नाला बनविणे व ब्लॅ नं ४६४ च्या मागे नाली बनविणेबाबत. (६११ नगरसेवक निधी) | १९९८००/- | २५.११.०३ | मे अल्का म का. सोसा. |
| ५ | उल्हासनगर-१ येथील ब्लॅ नं ५७६ ते ५७१, ५८६, ६१९ ते ६२१ व ६२५ जवळ सी सी पायवाटा व नाली व शौचालय दुरूस्ती करणे (६२६ नगरसेवक निधी) | १९९९२५/- | २५.११.०३ | मे शेरावाली म. का. सोसा. |
| ६ | उल्हासनगर-३ येथील ब्लॅ न ७०३, ७०५ च्या बाजूला य, गुरूनाक दरबार, प्रभाग क्र ७ येथे रोड बनविणे. (६२८ नगरसेवक निधी) | १९९२८०/- | २५.११.०३ | मे अल्का म का. सोसा |
| ७ | उल्हासनगर-३ ब्लॅ नं १०८५ व १०८६ मध्ये सिमेंट पायवाटा व एम-२५० सी सी बनविणे. (६२९ नगरसेवक निधी) | १९९८००/- | २५.११.०३ | मे शिव कृपा म का सोसा |
| ८ | उल्हासनगर-३ प्रभाग क्र. ८ ब्लॅ नं १०७९, लास्सी पाडा येथे २५० सी सी रोड व कल्व्हर्ट बनविणे बाबत(६३१ उप-महापौर निधी) | १९९८००/- | २५.११.०३ | मे अल्का म. का. सोसा. |
| ९ | उल्हासनगर-३ येथील ब्लॅ नं ११७० समोरील एम-२५० ने रस्ता आणि नाली ब्लॅ नं ११९० , ११९१ पवई चौक येथे नाली बांधणे. (६३८ नगरसेवक निधी) | १९९९९१/- | २५.११.०३ | मे शिव क्रिपा म. का. सोसा |
| १० | उल्हासनगर-३ सती अपार्ट. समोरील प्रस्तावित रुंदीकरण व केवलकुंज अपार्टमेंट जवळील उद्यान परिस आणि दिशा कॉम्पलेक्स जवळ किरकोळ काम करणे व सी सी एम-२५० रोड बनविणे. (६४७ नगरसेवक निधी) | १९९४००/- | २५.११.०३ | मे अल्का म का. सोसा |
| ११ | उल्हासनगर-४ मध्ये लहुजी सेनेच्या ऑफिसपासून ते पांडवनगर मधील मोठया नाल्यापर्यत असलेल्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणे (६६१ महापालिका निधी) | २९००००/- | २५.११.०३ | मे श्रीसाईसाधना म. का. सोसा. |
| १२ | उल्हासनगर-५ मध्ये वीर तानाजी नगर येथील जुने मिलट्रीचे शौचालयापासून ते दुनिचंद शाळापर्यत असलेल्या मोठया नाल्यास संरक्षण भिंत बांधणे (६६२ महापालिका निधी) | २९९०००/- | २५.११.०३ | मे साईसाधना क. का सोसा. |
| १३ | उल्हासनगर-१ येथील सदाशिव अपार्ट. ते विठ्ठमल मिठाईवाला पर्यत रोड बनविणे. (६७१ महापालिका निधी) | ४९९९८०/- | २५.११/०३ | मे शिव क्रिपा म. का. सोसा |
| १४ | उल्हासनगर-५ येथील गोल्डन गेट अपार्ट. समोर राजू गंगवानी यांचे घर ब्लॅ नं १७८६, १७९० जवळ मिनर्वा अपार्ट. समोर येथे नाली बांधणे. (६७५ उप-महापौर निधी) | १०००००/- | २५.११.०३ | मे श्री मॉ म. का. सोसा |
| १५ | उल्हासनगर-३ येथील स्मशान भुमी मध्ये | ९२३९१/- | २५.११.०३ | मे श्री मॉ म. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कंपाऊंड वॉल दुरूस्ती करण्याबाबत. (६७९ महापालिका निधी) | | | का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १०४ दिनांकः-२४/१२/२००३

सुचकाचे नाव :- श्री सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील १५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय कमांक ६ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ६:- बॅ. क १४१ च्या मागे, १४४ व १४५ जवळील सार्वजनिक शौचालय विनियोग / निष्कासित करणेस मान्यता देणेबाबत.

मा. सदस्य श्री रामदास उमाप:- या विषयाबाबत मी स्थायी समिती सभापतींना विनंती करतो की, शहराची लोकसंख्या वाढत आहे, अशा वेळी शौचालयांची/ मुत्र्यांची व्यवस्था करणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. परंतु असे असताना आज विषय पत्रिकेवर ११८ शीट शौचालय व २२ मुत्री यांचे निष्कासन करण्याचा प्रस्ताव आणलेला आहे. हे असे करणे शहराच्या हिताचे नाही. एखादा नागरिक अथवा प्रवासी शहरात आल्यास मुत्री नसल्याने अडचण निर्माण होवु शकते. यासाठी आपण शहरात जास्तीत जास्त शौचालये/मुत्री बनवायला हवीत. परंतु असे न करता आपण निष्कासनाचा प्रस्ताव आणत आहात. मला तर वाटते हा एक फार मोठा घोटाळा आहे, हा एक मोठा खेळ आहे. हे चुकीचे आहे. यापूर्वी शहरात जेवढे शौचालय तुटले त्यांची जागा हडप करण्यात आलेली आहे. येथे विषय मान्यतेसाठी आणतात व त्यानंतर तेथे जागा हडप करुन बांधकाम करून ते विकतात. अशाप्रकारे एका सदनिकेची किंमत जर कमीत कमी २ लाख जरी पकडली तरी हा एक करोडचा घोटाळा आहे. मी याबददल आयुक्तांनाही पत्र दिले होते. जे

शौचालय निष्कासीत करणे आवश्यक असेल ते निष्कासीत करून तेथे नवीन शौचालय बांधण्यात यावेत. आमचा शौचालय निष्कासीत करण्यास पुर्णपणे विरोध आहे.

<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा:-</u> श्री रामदास उमाप यांनी येथे जसे सांगितले की, हा घोटाळा आहे तर मी त्यांच्या या वक्तव्याचे खंडण करतो. याबददल मी सांगु इच्छितो की, प्रत्त्येक नगरसेवकाला त्याच्या प्रभागाची माहिती असते. प्रभागात वापरात नसलेले, मोडकळीस आलेले शौचालय असतात त्याचा तेथील नागरिकांना काही एक उपयोग नसतो त्यामुळे प्रभागातील नागरिकच शौचालय तोडण्याची मागणी नगरसेवकांकडे करीत असतात. शौचालय तोडुन त्या ठिकाणी सी.सी पॅसेज करण्यात यावा. मी आयुक्तांना निवेदन करतो की, तेथे कुंपण करावे अथवा उद्यान तयार करावे. त्यामुळे यामध्ये काही एक घोटाळा होणार नाही.

<u>श्री एस. बी. सुखरामानी, प्रभारी कार्यकारी अभियंता (स्थापत्त्य):</u>- विषय कमांक ३ चा मुददा जो आपण उपस्थित केला होता, त्याबददल मी खुलासा करु इच्छितो की, अनुकमांक ७ वर प्रभाग क. ६ ऐवजी प्र. क. १६ असे वाचावे.

<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :-</u> प्रस्ताव आणताना व्यवस्थितरित्त्या तपासुन पाहत नाही का ?

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप:-</u> जो नगरसेवक शौचालय तोडण्याचा प्रस्ताव देतो तो त्याच्या नगरसेवक निधीतुन सदर ठिकाणी सीसी पॅसेज करण्याचा प्रस्तावही देवु शकतो, परंतु असे होत नाही. यामागे त्यांचा हेतु फक्त एकच आहे की, जागा हडप करायची. आपण म्हणत असाल तर मी आपणासं उदाहरण देवु शकतो.

<u>मा. सदस्य श्री पृथ्वी वलेचा:-</u> शौचालय तोडणे आवश्यक आहे अन्यथा सदर ठिकाणी रोगराई पसरण्याचा धोका असतो.

<u>मा. सदस्य श्री विनोद तलरेजा:-</u> झोपडपटटी विभागामध्ये शौचालयांची आवश्यकता असते, आमच्या प्रभागातील बहुसंख्य लोक इमारतींमध्ये राहतात त्यामुळे त्यांना सार्वजनिक शौचालयांची आवश्यकता भासत नाही. त्यामुळे प्रभागातीलच नागरिक आम्हाला शौचालय निष्कासीत करण्याची विनंती करीत असतात. आम्ही निवेदन करतो की, शौचालय लवकरात लवकर तोडुन तेथे सीसी पॅसेज बनविण्यात यावेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u> माझी सदस्यांनी विनंती आहे की, त्यांनी गोषवारे बघावेत, आवश्यकता असल्यास आम्ही शौचालय दुरुस्तीही करतो, परंतु जेथे आवश्यकता नाही अशा ठिकाणीच निष्कासनाचा प्रस्ताव आणतो.

<u>मा. सदस्य श्री मोहन बेहरानी:-</u> पंचनामा करुन त्यानंतरच शौचालय तोडण्यात येते.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):-</u> आपण एवढेच करु शकतो जागेवर आवश्यकता असल्यास शौचालय तोडुन तेथे नवीन बनवु अन्यथा सदर ठिकाणी कुंपण टाकले जाईल. मी आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, वाम्बी योजने अंतर्गत शहरामध्ये २८६ टॉयलेट ब्लॉक्स तयार करण्यात येणार आहेत. सध्या ७०० शौचालय व ७००० शीटचे काम चालु आहे. म्हाडा व वाम्बी योजने अंतर्गत आम्ही नवीन शौचालय बनविणार आहोत. परंतु जेथे आवश्यकता नाही तेथील शौचालय तोडण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे.

| २१ | उल्हासनगर-२ येथील बॅ नं ५२१ व ५२५ अशाराम अपार्ट. येथे नाली बनविणे व कला निवासच्या बाजूला गोविंद पॅलेस येथे पायवाट बनविणेबाबत. (६५५ नगरसेवक निधी) | १९९८००/- | १.११.०३ | मे सुर्य ज्योत म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ११६</u> <u>दिनांक:-२४/१२/२००३ .</u>

सुचकाचे नाव :- श्री सुर्यकात लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती जयश्री सुर्वे

हीं स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील २१ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय कमांक १८ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १८:- बॅ. क. ३८२ ,३८३ ,३८४ , पॅनेल क. २-अ , उल्हासनगर-१ जवळील सार्वजनिक शौचालय विनियोग / निष्कासित करणेस मान्यता देणे. केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

काही सदस्य :- पास, पास.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. १८:- बॅ. क. ३८२ ,३८३ ,३८४ , पॅनेल क. २-अ , उल्हासनगर-१ जवळील सार्वजनिक शौचालय विनियोग / निष्कासित करणेस मान्यता देणे.

श्रीमती भावना रामचंदानी मा. नगरसेविका यांची बॅरेक नं. ३८२ , ३८३ , व ३८४ उल्हासनगर-१ येथिल शौचालय तोडणेबाबतची मागणी प्रशासनाकडे प्राप्त झाल्याने कॅम्प नं. १ मधील संबंधित स्वच्छता निरिक्षक यांनी प्रत्यक्ष जागा पाहणी करून सदर ठिकाणी अनुक्रमे ४ सिटसचे, ८ सिटसचे व ४ सिटसचे शौचालय उपयोगात नसल्याचे व ना-दुरुस्त असल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय / मुतारी निष्कासित करून सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र.११७ दिनांक:-२४/१२/२००३.

सुचकाचे नाव :- श्रीमती निता आहुजा

अनुमोदकाचे नाव :- श्री सुर्यकात लिंगे

हि स्थायी समिती वरील प्रस्तावना विचारात घेता बॅ. क्र. ३८२ ,३८३ ,३८४ , पॅनेल क्र. २-अ, उल्हासनगर-१ येथिल सार्वजनिक शौचालय निष्कासित / विनियोग करणेकामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय कमांक १९ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १९:- बॅ. क्र. १८६९ , उल्हासनगर-५ जवळील सार्वजनिक शौचालय विनियोग / निष्कासित करणेस मान्यता देणे.

काही सदस्य :- पास, पास.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानीः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. १९:- बॅ. क्र. १८६९ , उल्हासनगर-५ जवळील सार्वजनिक शौचालय विनियोग / निष्कासित करणेस मान्यता देणे.

-
श्रीमती एम.जी. मसंद, सभापती, प्रभाग समिती क्र. ४ यांची बॅरेक नं. १८६९ , उल्हासनगर-५ येथिल शौचालय तोडणेबाबतची मागणी प्रशासनाकडे प्राप्त झाल्याने कॅम्प नं. ५ मधील संबंधित स्वच्छता निरिक्षक यांनी प्रत्यक्ष जागा पाहणी करुन सदर ठिकाणी ४ सिटसचे शौचालय उपयोगात नसल्याचे व ना-दुरुस्त असल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय / मुतारी निष्कासित करुन सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११८ दिनांकः-२४/१२/२००३.

सुचकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री सुर्यकात लिंगे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावना विचारात घेता बॅ. क्र. १८६९, उल्हासनगर-५ येथिल सार्वजनिक शौचालय निष्कासित / विनियोग करणेकामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय कमांक २० वाचुन दाखवितात.

विषय क्र. २०:-उल्हासनगर महापालिकेतील नागरिक सुविधा केंद्रा संबधी केलेल्या कामी संविदेची माहिती नोंद करणे

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- कसला प्रस्ताव आहे?

मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे :- आयलानी साहेब तुम्ही सांगा.

कार्यकारी अभियंता (विद्युत):- गोषवारा वाचुन दाखवितात.

मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे :- सदरचे काम सीएफसी मधील असल्याने व तेथे संगणक असल्याने विशेष काळजी घ्यावी लागते, म्हणुन हा प्रस्ताव आणलेला आहे.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. २०:-उल्हासनगर महापालिकेतील नागरिक सुविधा केंद्रा संबधी केलेल्या कामी संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील नागरीक सुविधा केंद्रात खाली नमुद केलेले काम करणेसाठी मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मंजुरी दिली आहे.

| अ. क्र. | कामांचे नाव | कामाचा कालावधी | मंजुर निविदा रक्कम | मंजुरी दिनांक | एजंन्सीचे नाव | कराराचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | उल्हासनगर | करार | रुपये | निविदा | मॉ. शेरावाली | १७/१२/२००३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महानगरपालिका येथे विकसित करण्यात आलेल्या नागरी सुविधा केंद्रात रोजच्या रोज स्वच्छता ठेवणे तसेच झाडू मारणे, लादी, फिनेल व सर्फने पुसणे, कॅबिनची व काऊंटरची साफसफाई करणे, फर्निचर, खुर्च्या, व इत्यादी सामानाची व्याक्युम क्लिनरने सफाई करणे. नागरी सुविधा केंद्रातील भिंतींची, छताची, पार्टीशन्सची तसेच स्लायडिंग / ॲल्युमिनियम खिडक्या तसेच त्यांच्या काचा व ग्रील १५ दिवसातून एकदा स्टेन रिमुव्हरने साफ करणे, सर्व ट्यूब लाईटस व ट्यूब लाईटस कव्हर, पंखे महिन्यातून एकदा साफ करणे, स्वच्छता गृहातील स्वच्छता करणे. नागरी सुविधा केंद्रामध्ये गणवेशधारी २ माणसे देणे इत्यादी. | दिनांक पासून ३६ महिने | ३,३१,३२८/- | मंजूरीची तारीख १/१२/२००३ | कंन्स्ट्रक्शन ६०४, मनवानि मेन्शन गोल मैदान, उल्हासनगर-१ | |

तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ११९ <u>दिनांकः-२४/१२/२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती किरण माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेतील नागरीक सुविधा केंद्रात रोजच्या रोज स्वच्छता ठेवणे कामी प्रशासनाने मे. मॉ. शेरावाली कंस्ट्रक्शन यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय कमांक २१ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २१:-संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत
पंडीत जवाहरलाल नेहरु स्वच्छता पारितोषिकाच्या
रक्कमेच्या विनीयोगास मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री रामदास उमाप :-</u> या योजनेचा जास्तीत जास्त फायदा झोपडपट्टी विभागाला द्यायला हवा. जे विभाग अगोदरच स्वच्छ आहेत त्यांनाच पारितोषिक दिले जाते, हे चुकीचे आहे. हा झोपडपट्टी विभागावर अन्याय आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे :-</u> यामध्ये पारितोषिकाच्या रक्कमेचा विनीयोग कसा करावयाचा ते दिलेले आहे. तुम्ही म्हणता ते बरोबर आहे पण मी हे देखील सांगु इच्छितो की, नवी मुंबई शहर ज्याचे व्यवस्थितरित्त्या नियोजन केलेले आहे त्या शहराला या योजनेंतर्गत पारितोषिक दिलेले आहे. त्यामुळे आपण असे म्हणु शकत नाही की, फक्त झोपडपट्टी विभागामध्ये पारितोषिक द्यावे.

<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने :-</u> जे प्रभाग गलिच्छ आहेत, त्यांना याचा फायदा द्या.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. २१:-संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत
पंडीत जवाहरलाल नेहरु स्वच्छता पारितोषिकाच्या
रक्कमेच्या विनीयोगास मान्यता देणे.

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत पंडीत जवाहरलाल नेहरु स्वच्छता पारितोषिकाच्या रक्कमेचा विनियोगाबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक नास्वअ-२००३ /प्र.क्र७/पापु-२१, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २ जुलै, २००३ नुसार संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानात सहभागी होणा-या महानगरपालिकांना भारतरत्न पंडीत जवाहरलाल नेहरुंच्या नावाने पारितोषिके देण्यात येणार आहेत व त्या बक्षिसाच्या रक्कमेचा विनियोग करण्यासाठी सोबतचा शासन निर्णय स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १२०</u>          <u>दिनांकः-२४/१२/२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती सिमा मोकल

ही स्थायी समिती महाराष्ट्र शासन निर्णय क्र. नास्वअ-२००३/प्र.क्र. ७/पापु-२१, मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक २ जुलै, २००३ नुसार संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियनात सहभागी होणा-या महानगरपालिकांना भारतरत्न पंडीत जवाहरलाल नेहरुंचे नावाने पारितोषिके देणे व त्या बक्षिसाच्या रक्कमेच्या विनियोग करण्यासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय कमांक २२ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २२:- उल्हासनगर-१ येथील एमआयडीसी गेट ते अंबिका कन्ट्री बार बिर्ला मंदिरमार्गे रस्ता, रस्त्यालगत नाली, संरक्षण भिंत बांधणे कामी प्रशासनास मे. जयभारत कन्सट्रक्शन या लघुत्तम दराच्या निविदाकारा समवेत संविदेस मान्यता देणेबाबत.

मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल :- आयुक्त साहेब अमर डाय येथील रोडचे काम कधी होणार? आम्ही गेली २ वर्षे झालीत त्या रोडसाठी ओरडत आहोत.

मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे :- त्या रोडवर मा. मुख्यमंत्री महोदयांचा स्थगन आदेश आहे, तो उठल्यावर कारवाई करु.

मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल :- स्थगन आदेश कधी उठणार ?

मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे :- ते मला माहित नाही.

मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल :- स्थगन आदेश का आलेला आहे ?

मा. प्रभारी आयुक्त श्री आर. के. सोनवणे :- तेथील झोपडपट्टीवासीयांनी निष्कासना विरुध्द आणलेला आहे.

काही सदस्य :- पास, पास.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. २२:- उल्हासनगर-१ येथील एमआयडीसी गेट ते अंबिका कन्ट्री बार बिर्ला मंदिरमार्गे रस्ता, रस्त्यालगत नाली, संरक्षण भिंत बांधणे कामी प्रशासनास मे. जयभारत कन्सट्रक्शन या लघुत्तम दराच्या निविदाकारा समवेत संविदेस मान्यता देणेबाबत.

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | उल्हासनगर-१ येथील एम आय डी सी गेट ते अंबिका कन्ट्रीबार बिर्ला मंदिरमार्गे रस्ता, रस्त्यालगत नाली, संरक्षण भिंत बांधणे या |

| | | |
|---|---|---|
| | | कामासच्या निविदेस मान्यता मिळणेबाबत |
| २ | प्राकलनाची किंमत | २२ ,८० ,०००/- |
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | शहर अभियंता |
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. ८३१ दि. ३०.०५.२००३ |
| ५ | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | स्थायी समिती ठराव क्र. ५४ दिनांक २४/०७/२००३ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. १० दिनांक १६/०८/२००३ |
| ७ | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केली त्याचे नांव | १. अेशचन एज २. नगरन्युज ३. धनुष्य धारी |
| ८ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | १७ |
| ९ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक ०२/०९/२००३ |
| ११ | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| १ | मे. जय भारत कन्स्ट्रक्शन | ०.२५ टक्के कमी दराचे |
| २ | मे. शंकर महादेव आणि कं | ४.०० टक्के जास्त दराचे |
| ३ | मे. प्रकाश एन रायसिंघानी | निविदा उघडलेली नाही |
| १२ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | सर्वात कमी दर असलेले निविदाकार मे. जय भारत कन्स्ट्रक्शन यांना त्यांचे दर कमी करण्याकरिता वाटाघाटी करिता दि ११/०९/२००३ रोजी बोलविले होते. या बैठकित कार्यकारी अभियंता (साबां) मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक व निविदाकार मे. जय भारत कन्स्ट्रक्शन हे उपस्थित होते. सदर वाटाघाटीच्या वेळी मे. जय भारत कन्स्ट्रक्शन यांनी सद्यास्थितीत साहित्यांचे दर वाढलेले असल्याने त्यांनी दिलेले ०.२५: जास्त दिलेला दर कमी करण्यास नकार दिला होता. |

| | | |
|---|---|---|
| | | मे. जय भारत कन्स्ट्रक्शन यांनी दर कमी करण्यास असमर्थता दर्शाविल्यानंतर प्राप्त परिस्थितीत सर्व निविदाकारांस वाटाघाटीस बोलावून त्यांचेकडून मोहोर बंद देकार देणेकरिता कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे दिनांक ६/१०/२००३ रोजी सर्व निविदाकार यांनी मा आयुक्त सो यांचे दालनात उपस्थित रहाणे आवश्यक होते. त्यानुसार उपरोक्त मे. जय भारत कन्स्ट्रक्शन व मे. शंकर महादेव हे ठेकेदार सदर बैठकिस उपस्थित होते त्यांनी सदर बैठकिमध्ये त्यांच्या सुधारित देकार मोहोरबंद लिफाफ्यामध्ये दिले होते. सदर मोहोरबंद देकाराचे लिफाफे त्याचवेळी उघडण्यात आले होते. त्यामध्ये खालील प्रमाणे देकार दिल्याचे आढळले आहेत. जय भारत कन्स्ट्रक्शन व मे शंकर महादेव आणि कं हे उपस्थित होते आणि मे प्रकाश एन रायसिंघानी हे उपस्थित राहील नाही. सदर बैठकिस उपस्थित मे जय भारत कन्स्ट्रक्शन यांनी सुधारित दरानुसार ५. ५० टक्के कमी दराने भरलेले आहे. व मे शंकर महादेव यांनी सुधारित दराने ४.०० टक्के जास्त द्वितीय कमी दराने कमी दराने भरलेले आहे. मे जय भारत कन्स्ट्रक्शन यांनी वाटाघाटी नंर ५.५० टक्के कमी दरावर काम करण्यास मान्य केले असल्याने त्यांची निविदा |

| | | |
|---|---|---|
| | | ग्राहय धरून मा. आयुक्त यांनी स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यासाठी मंजुरी प्रदान केली आहे. |
| १३ | वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर | ५.५० टक्के कमी दरावर |
| १४ | लेखा शिर्षाचे नांव | सी-४(ii) पी-२ रस्ते पवास व पुल इत्त्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |
| १५ | लेखा शिर्षाखालील तरतुद | रू. ५.०० कोटी |

उक्त दर वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मेसर्स जय भारत कन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.१२१** दिनांक:-२४/१२/२००३.

सुचकाचे नाव :- श्री विनोद ठाकुर
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती नंदिनी बामणकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-१ येथील एम. आय. डी.सी. गेट ते अंबिका कन्ट्री बार बिर्लामंदिर मार्गे रस्ता, रस्त्यालगत नाली, संरक्षण भिंत बांधणे कामी प्रशासनास वाटाघाटी अंती मे. जयभारत कन्सट्रक्शन या लघुत्त्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-** विषय कमांक २३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २३:- उल्हासनगर-३ येथील कल्याण अंबरनाथ रस्त्यात राधास्वामी सतसंग हॉलजवळ साकव बांधणेकामी प्रशासनास मे. जयभारत कन्सट्रक्शन या लघुत्त्तम दराच्या निविदाकारासमवेत संविदेस मान्यता देणेबाबत.

**मा, सदस्य श्री मोहन बेहरानी :-** साकवाच्या कामासाठी रु 22 लाख जास्त वाटतात,

**मा, प्रभारी आयुक्त श्री आर, के, सोनवणे :-** काम पण जास्त आहे व तेथे कामाची आवश्यकता आहे, या कामाची निविदा 16 टक्के जादा दराने आली होती ती वाटाघाटी करुन *ॲट पार* आणलेली आहे,

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानीः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. २३:- उल्हासनगर-३ येथील कल्याण अंबरनाथ रस्त्यात राधास्वामी सतसंग हॉलजवळ साकव बांधणेकामी प्रशासनास मे. जयभारत कन्सट्रक्शन या लघुत्तम दराच्या निविदाकारासमवेत संविदेस मान्यता देणेबाबत.

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | उल्हासनगर-३ येथील कल्याण अंबरनाथ रस्त्यात राधास्वामी सतसंग हॉलजवळ साकव बांधणेबाबत |
| २ | प्राकलनाची किंमत | २१ ,७८ ,६५०/- |
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा-या अधिका-याचे पदनाम | शहर अभियंता |
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. ३२१३ दि. ३१ ५ २००१ |
| ५ | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | स्थायी समिती ठराव क्र. ४२ दिनांक ०९/०७/२००३ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. १० दिनांक १६/०८/२००३ |
| ७ | निविदा सूचना ज्या दैनिकात प्रसिध्द केली त्याचे नांव | १. अेशचन एज २. नगरन्युज ३. धनुष्य धारी |
| ८ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | १५ |
| ९ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक ०२/०९/२००३ |
| ११ | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| १ | मे. जय भारत कन्स्ट्रक्शन | १६.०० टक्के जास्त |
| २ | मे. शंकर महादेव आणि कं | २२ ५० टक्के जास्ता |
| ३ | मे. शैलेश कन्स्ट्रक्शन कं. | निविदा उघडलेली नाही |
| १२ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | सर्वात कमी दर असलेले निविदाकार मे. जय भारत कन्स्ट्रक्शन यांना त्यांचे दर कमी करण्याकरिता वाटाघाटी करिता दि ११/०९/२००३ रोजी बोलविले होते. या बैठकित कार्यकारी अभियंता (सावां) मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक व निविदाकार मे. जय भारत कन्स्ट्रक्शन हे उपस्थित होते. सदर वाटाघाटीच्या वेळी मे. जय भारत कन्स्ट्रक्शन यांनी सद्यास्थितीत साहित्यांचे दर वाढलेले असल्याने त्यांनी दिलेले १६.००: जास्त दिलेला दर कमी करण्यास नकार दिला होता. मे जय भारत कन्स्ट्रक्शन यांनी दर कमी |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यास असमर्थता दर्शविल्यानंतर प्राप्त परिस्थितीत सर्व निविदाकारांस वाटाघाटीस बोलावून त्यांचेकडून मोहोर बंद देकार देणेकरिता कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे दिनांक ६/१०/२००३ रोजी सर्व निविदाकार यांनी मा आयुक्त सो यांचे दालनात उपस्थित रहाणे आवश्यक होते. परंतू प्रत्यक्षात मे जय भारत कन्स्ट्रक्शन हेच बैठकिस उपस्थित होते त्यांनी सदर बैठकिमध्ये त्यांच्या सुधारित देकार मोहोरबंद लिफाफ्यामध्ये दिले होते. सदर मोहोरबंद देकाराचे लिफाफे त्याचवेळी उघडण्यात आले होते. त्यामध्ये खालील प्रमाणे देकार दिल्याचे आढळले आहेत. त्यामध्ये मे. जय भारत कन्स्ट्रक्शन यांनी निविदा दरावर मे. शंकर महादेव यांनी सुधारित दराचे देकार दिलेले नाही त्यामुळे मे शंकर ॲण्ड कंप यांचे मुळ निविदेतील दर ११.५०: इतकेच आहेत. त्यामुळे जय भारत कन्स्टक्शन यांनी वाटाघाटीनंतर निविदा दरावर काम करण्यास मान्य केल्यामुळे मे जय भारत कन्स्ट्रक्शन यांचे निविदा दरावर ग्राहय धरून मा. आयुक्त यांनी स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यासाठी मंजुरी प्रदान केली आहे. |
| १३ | वाटाघाटी अंती प्राप्त झालेले दर | निविदा दरावर (At Par) |
| १४ | लेखा शिर्षाचे नांव | सी-४(ii) पी-२ रस्तें प्रवास व पुल इत्त्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |
| १५ | लेखा शिर्षाखालील तरतुद | रू. ५.०० कोटी |

उक्त दर वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मेसर्स जय भारत कन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१२२</u> <u>दिनांक:-२४/१२/२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-३ येथील कल्याण अंबरनाथ रस्त्त्यात राधास्वामी सतसंग हॉलजवळ साकव बांधणेकामी कामी प्रशासनास वाटाघाटी अंती मे. जयभारत कन्सट्रक्शन या लघुत्त्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय कमांक २४ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २४:-उल्हासनगर शहरातील विद्युत विभागांतर्गत २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे

काही सदस्य :- पास, पास.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. २४:-उल्हासनगर शहरातील विद्युत विभागांतर्गत २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे

महानगरपालिकेने खालील दर्शविलेल्या कार्याची निविदा मागवून किंवा डी.डी. आर, ठाणे यांनी सुचविलेल्या मजूर कामगार सह सं.लि. यांच्या दराला मंजुरी दिली होती. त्यांच्याशी मागील पंधरा वाडयात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये करार केलेले आहे.

| अ. कं. | कार्याचे नांव | आंदाज पत्रकीय रक्कम रु. | सर्वात कमी दराचे निविदा धारकांच्या/ सोसायटीच्या नांव | दर | मंजुरीच्या दिनांक | कराराच्या दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | डंपिंग ग्राउंन्ड, खडी मशीन, उल्हासनगर -५, येथे जाणा-या रस्त्यांवर दिवा बत्ती बसविणे | १,७५,०००/- | मे. विजयालक्ष्मी मजुर कामगार सहकारी संस्था, उल्हासनगर | ।ज च्त | १८/१०/०३ | १७/११/०३ |
| २. | उल्हासनगर -२ शिरु चौक ते गुरुद्वारा वाया टिलुमल सो. येथील रस्ता | २,३५,७६९/- | मे. एम. डी. इलेक्ट्रिक, ठाणे | रु. २,३५,७६९ पेक्षा ९.५ टक्के | १९/११/०३ | २४/११/०३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रुंदीकरण करुन येथे दिवाबत्ती बसवण्यासाठी मागवलेली निविदेस मंजुरी मिळण्या बाबत. | | | कमी | | |

सदर माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र १२३</u> <u>दिनांकः-२४/१२/२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती जयश्री सुर्वे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील विद्युत विभागांतर्गत २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय कमांक २५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २५:- विरोधी पक्षनेता कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना अतिकालीन भत्ता मंजुर करणेस मान्यता देणेबाबत.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानीः-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. २५:- विरोधी पक्षनेता कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना अतिकालीन भत्ता मंजुर करणेस मान्यता देणेबाबत.

विरोधी पक्षनेता, उल्हासनगर महानगरपालिका यांना आपल्या कार्यालयामध्ये काही वेळी महत्त्वाच्या कार्यालयीन कामानिमित्त, बैठकीनिमित्त,

कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतरही जादा वेळ थांबावे लागते. त्यामुळे, सदर कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचारी यांनाही कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतर थांबावे लागते. यास्तव, त्यांना जादा तास काम केल्याबाबत मोबदला मिळणेसाठी प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. महापालिकेतील चतुर्थश्रेणीतील कर्मचारी यांना जादा काम केल्याबददल प्रतिमहा रुपये ५००/- अदा करण्यात येतात. त्याच धर्तीवर विरोधी पक्षनेता कार्यालयातील एका कर्मचा-यास जादा तास काम केल्याबद्दल प्रतिमहा रुपये ५००/- देण्यात यावे. सदर प्रस्ताव स्थायी समितीपूढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२४ दिनांक:-२४/१२/२००३.

सुचकाचे नाव :- श्री वलेचा पुथ्वी

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार विरोधी पक्षनेता कार्यालयातील कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतर जादा कामापोटी चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना विशेष बाब म्हणुन रू. ५००/- प्रती महिना अतिकालीन /विशेष भत्ता देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय कमांक २६ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २६:- बॅ. क. ७६१, पॅनेल क. २०, उल्हासनगर-३ जवळील सार्वजनिक शौचालय विनियोग / निष्कासित करणेस मान्यता देणे.

काही सदस्य :- पास, पास.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. २६:- बॅ. क. ७६१, पॅनेल क. २०, उल्हासनगर-३ जवळील सार्वजनिक शौचालय विनियोग / निष्कासित करणेस मान्यता देणे.

श्री. नारायण पंजाबी मा. सभापती यांची बॅरेक नं. ७६१ उल्हासनगर-३ येथिल शौचालय तोडणेबाबतची मागणी प्रशासनाकडे प्राप्त झाल्याने कॅम्प नं. ३ मधील

संबंधित स्वच्छता निरिक्षक यांनी प्रत्यक्ष जागा पाहणी करुन सदर ठिकाणी अनुक्रमे ३ सिटसचे शौचालय उपयोगात नसल्याचे व ना-दुरुस्त असल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय / मुतारी निष्कासित करुन सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १२५</u> <u>दिनांक:-२४/१२/२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती भारती छाब्रिया

हि स्थायी समिती वरील प्रस्तावना विचारात घेता बॅ. क्र. ७६१, पॅनेल क्र. २०, उल्हासनगर-३ येथिल सार्वजनिक शौचालय निष्कासित / विनियोग करणेकामी मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय कमांक २७ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. २७:-** बॅ. क्र. २८६, पॅनेल क्र. ५-अ, उल्हासनगर-१ जवळील सार्वजनिक शौचालय विनियोग / निष्कासित करणेस मान्यता देणे.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

**विषय क्र. २७:-** बॅ. क्र. २८६, पॅनेल क्र. ५-अ, उल्हासनगर-१ जवळील सार्वजनिक शौचालय विनियोग / निष्कासित करणेस मान्यता देणे.

यांची बॅ. क्र. २८६, पॅनेल क्र. ५-अ, उल्हासनगर-१ येथिल शौचालय तोडणेबाबतची मागणी प्रशासनाकडे प्राप्त झाल्याने कॅम्प नं. २ मधील संबंधित स्वच्छता निरिक्षक यांनी प्रत्यक्ष जागा पाहणी करून सदर ठिकाणी अनुक्रमे सिटसचे शौचालय उपयोगात नसल्याचे व ना-दुरुस्त असल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महापालिकेच्या मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तावित शौचालय / मुतारी निष्कासित करून सदर मालमत्तेचा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार अन्य प्रकारे विनियोग केला जाईल. तरी सदर मालमत्ता निष्कासित करणेसाठी व अन्य प्रकारे विनियोग करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १२६</u> <u>दिनांक:-२४/१२/२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री सुर्यकात लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावना विचारात घेता बॅ. क्र. २८६, पॅनेल क्र. ५-अ, उल्हासनगर-१ येथिल सार्वजनिक शौचालय निष्कासित / विनियोग करणेकामी मान्यता देत आहे

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय कमांक २८ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. २८:-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. २८:- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००३-२००४ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. स्थायी समिती सभपापती निधी /महापालिका निधी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामांचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र. ४ मध्ये बॅ नं ८६६, ८८७ आणि जवळ नाली आणि रस्ता एम-२५० ने बांधणे. (४३६ नगरसेवक निधी) | १९९९७५/- | ६.१०.०३ | मे श्री माँ म. का. सोसा. |
| २ | उल्हासनगर-४ येथील प्र.क्र. १८ मध्ये बॅ नं १२५२ येथे १० बैठकिचे शौचालय बांधणे. (२३५ महापौर निधी) | ३०००००/- | १४.११.०३ | मे जयश्री म. का. सोसा. |
| ३ | प्रभाग क्र. ५ मध्ये भैयासाहेब आंबेडकर नगर मधील रोडचे डांबरीकरण व खडीकरण करणे. (३८२ नगरसेवक निधी) | १९८०००/- | १४.७.०३ | मे ओम म. का. सोसा. |
| ४ | उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र. १९ मध्ये भाऊजी नगर येथे रस्ता एम-२५० आणि नाली बांधणे (४३३ नगरसेवक निधी) | १४९९८०/- | १४.११.०३ | मे सुर्यज्योत म. का. सोसा. |
| ५ | उल्हासनगर-१ येथील बॅ नं ७५ समोर व भाजी मार्केट जवळ सी सी एम-२५० व नाली बांधणे (४३८ नगरसेवक ) | १९९९००/- | १४.११.०३ | मे ओम म. का. सोसा. |
| ६ | उल्हासनगर-५ येथील पॅनल नं १२ मध्ये बॅ नं १७८६ च्या मागे ओपन प्लॉटला संरक्षक भिंत बांधणेबाबत. (४५१ महापालिका निधी) | १७५०००/- | १४.११.०३ | मे हरेरामा म. का. सोसा. |
| ७ | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. २५ मधील खिलवानी दवाखाना ते फॉलवर लाईन रस्त्यावर नामकरण शिळा बसविणेबाबत. (६०० महापौर निधी) | ७६१००/- | १४.११.०३ | मे जकनुश म. का. सोसा. |
| ८ | उल्हासनगर-३ येथिल निलम सोसायटी ते बॅ नं १०५२ आणि नगरसेवक निधीमधून अशोक टाकीज ते सत्यम अपार्टमेंट पर्यत रस्ता एम-२५० ने रस्ता बांधणे. (६२० महापौर निधी आणि नगरसेवक निधी) | ३९९०००/- | १४.११.०३ | मे स्वराज म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१२७</u> <u>दिनांक:-२४/१२/२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील ८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय कमांक २९ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २९:-उल्हासनगर-३ येथे बाल्कनजी बारी येथील बुस्टर पंप ते शास्त्रीनगर पर्यंत जलवाहिनी टाकणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे .

<u>काही सदस्य :-</u> पास, पास.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. २९:-उल्हासनगर-३ येथे बाल्कनजी बारी येथील बुस्टर पंप ते शास्त्रीनगर पर्यंत जलवाहिनी टाकणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे .

उल्हासनगर-३ येथे बाल्कनजीबारी येथिल बुस्टर पंप ते शास्त्रीनगर पर्यंत पाण्याची टंचाई असून, तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा मार्फत

येणा-या पाण्याच्या दाबात नेहमी तफावत असते, या कारणामुळे पाणी पुरवठयात विपरीत परिणाम होतो. बाल्कनजी बारी येथिल बुस्टर पंप ते शास्त्रीनगर पर्यंत जलवाहिनी टाकल्यास तेथिल पाण्याचा प्रश्न सुटू शकतो. त्या दृष्टीने रुपये ३ ,४० ,२००/- इतक्या किंमतीचे प्राकलन तयार करण्यात आले आहे.

सदर रुपये ३ ,४० ,२००/- इतक्या किंमतीच्या प्राकलनास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांची हरकत नसून मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्याकरीता रुपये ३ ,४० ,२००/- मात्र एवढया किंमतीस प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे. कृपया मंजूरी मिळण्यासाठी सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे ठेवण्यात यावा ही विंनती.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१२८</u> <u>दिनांकः-२४/१२/२००३ .</u>

सुचकाचे नाव :- श्री सुर्यकात लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-३ येथे बाल्कनजी बारी येथील बुस्टर पंप ते शास्त्रीनगर पर्यंत जलवाहिनी टाकणे कामी रुपये ३ ,४० ,२००/- या रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय कमांक ३० वाचुन दाखवितात.

विषय क्र. ३०:- सुभाषनगर येथील जेकब कंपाऊंडच्या मागील बाजुस ऑर्डनन्स फॅक्टरी कंपाऊंड मार्गे नाला बांधणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानीः-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना</u>

विषय क्र. ३०:- सुभाषनगर येथील जेकब कंपाऊंडच्या मागील बाजुस ऑर्डनन्स फॅक्टरी कंपाऊंड मार्गे नाला बांधणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

उल्हासनगर-३ सुभाषनगर या घोषित झोपडपट्टी मधून जेकब कंपाउंडरव ऑडनन्स फॅक्टरी कंपाउंड या मार्गात शौचालयापर्यंत नाला वहात आहे. सदर नाल्याचे काम तत्कालीन नगरपालिकेने केले असून एकंदर ३९० मीटर लांबीचा सदर नाला असून २५० मीटर भाग दगडी बांधकामाने बांधलेला आहे. सदया अस्तित्त्वात असलेल्या भागामध्ये नाल्याची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे. जुना २५० मीटरी लांबीची नाली दगडी बांधकामाचा असून १४० मीटर नाला नव्याने बांधणे आवश्यक आहे.

सदर नाल्याची सद्या असलेली खोली जर सदर नाला नित्त्यनियमाने महिन्यातून एकदा संपूर्ण गाळ काढुन साफ केल्यास पाणी वाहण्यास योग्य आहे. परंतू या भागामध्ये नाल्याला उतार कमी असल्याने गाळ साचण्याची प्रक्रिया जास्त असते. या नाल्याचे काम त्यावेळी तुकडया तुकडयामध्ये विभिन्न कामामध्ये झालेले असल्याने पाहिजे तितकी खोली व उतार मिळालेला नाही. सदया नाल्यामध्ये गाळ साचलेला असल्यामुळे पावसाळयामध्ये पाणी आजूबाजूच्या परिसरामध्ये साचून राहते. याकरीता सदर नाला खोल करुन त्यास उतार देणे आवश्यक आहे. सदर नाला खोल करतांना ज्या ठिकाणी दगडी बांधकाम केलेले आहे. ते कमकुवत असल्याने पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे फक्त नाला खोल करुन व त्यास उतार देउन भविष्यात त्याचा उपयोग होणार नाही. किंबहूना नाला खोल केल्यानंतर कमकुवत झालेले बांधकाम केव्हाही कोसळून नाल्याच्या प्रवाहामध्ये अडचण येण्याची संभावना आहे. या नाल्यामध्ये असलेला गाळ आरोग्य विभागाकडुन फक्त पावसाळयापूर्वी नाले सफाई कामाचे वेळी काढला जातो. परंतू पावसाळयामध्ये नाल्यास पाहिजे तितका उतार नसल्याने व काही ठिकाणी कच्चा असल्याने पुन्हा गाळ साचून राहतो.

त्या अनुषंगाने सदर नाला ज्या जागी बांधलेला आहे त्या जागी नाला खोल करुन व एकसारखा जास्तीत जास्त उतार देणे, खोल केलेल्या भागात नाल्याच्या बांधकामास लागून आर.सी.सी. भिंत बांधणे, ज्या भागात नाला कच्चा आहे तेथे नव्याने नाला बांधणे इत्यादी कामे आवश्यक आहे.

या कामावर अंदाजित रुपये १२ ,९२ ,१४०/- इतका खर्च संभावित आहे. महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामधील लेखा शिर्ष गलिच्छ वस्ती सुधारणा अ अंदाजपत्रक भाग-२ क (XVi)मधील तरतूदीमधून करणेकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

त्यानुसार तरतूद उपलब्ध असल्याने व नाल्याचे बांधकाम करणे आवश्यक असल्याने उपरोक्तपणे प्रस्तावित केलेल्या उल्हासनगर-३ येथिल प्रभाग क्र. ७ मधील सुभाषनगर येथे जॅकेब कंपाउंड ते शौचालयाजवळील कल्व्हर्ट पर्यंत नाल्याचे पूर्नबांधकाम करणे या रुपये १२ ,९२ ,१४०/- प्राकलनास स्थायी समितीकडे प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणे करीता सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १२९</u>                <u>दिनांकः-२४/१२/२००३ .</u>

सुचकाचे नाव :- श्री सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार सुभाषनगर येथील जेकब कंपाऊंडच्या मागील बाजुस ऑर्डनन्स फॅक्टरी कंपाऊंड मार्गे नाला बांधणेकामी रुपये १२ ,९२ ,१४०/- या रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय कमांक ३१ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ३१:-उल्हासनगर शहरातील दिवाबत्ती निगा व दुरुस्तीसाठी हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म खरेदी करुन बसविणेकामी प्रशासनाने केलेल्या सांविदेची माहिती नोंद करणे.

मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :- आधीची एक हायड्रॉलिक गाडी पडलेली आहे, तिच्यावर काम करणे शक्य नाही का?

कार्यकारी अभियंता (विद्युत) :- नाही, तिच्यावर काम करणे शक्य नाही.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ३१:-उल्हासनगर शहरातील दिवाबत्ती निगा व दुरुस्तीसाठी हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म खरेदी करुन बसविणेकामी प्रशासनाने केलेल्या सांविदेची माहिती नोंद करणे.

उल्हासनगर शहरातील दिवाबत्ती निगा व दुरुस्ती साठी हॅड्रोलिक प्लॅटफॉर्म खरेदी करुन बसविण्यासाठी निविदा मागविलेल्या होत्या. त्यातून सर्वात कमी दराची निविदेला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्याच्या तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामांचे नाव | निविदा मजुरीची रक्कम | निविदा मंजुरीचा दिनांक | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | उल्हासनगर शहरातील दिवाबत्ती निगा व दुरुस्तीसाठी स्थायी समितीचा ठराव क्र. ५७ दिनांक २४/७/२००३ अन्वये दोन वाहन खरेदीची दिलेल्या मंजुरी नुसार त्या दोन गाडयावर बॉडी बांधुन हॅड्रोलिक प्लॅटफॉर्म बसविण्याचे कार्य. | रुपये ६,९७,४०० + जकात + आर. टी. ओ. खर्च + विमा | १८/१२/२००३ | मे. आकाश इन्टरप्रायझेस अहमदनगर |

स्थायी समिती ठराव क्र. १३०　　　　　　　　　　दिनांक:-२४/१२/२००३.

सुचकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील दिवाबत्ती निगा व दुरुस्तीसाठी हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म खरेदी करणे व बसविणे कामी प्रशासनाने मे. आकाश एन्टरप्रायझेस अहमदनगर यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय कमांक ३२ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ३२:-सभापती, विशेष महसूल समिती यांना वाहन भत्ता, दुरध्वनी भत्ता, चहापान भत्ता मंजुर करणेस मान्यता देणे.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. ३२:-सभापती, विशेष महसूल समिती यांना वाहन भत्ता, दुरध्वनी भत्ता, चहापान भत्ता मंजुर करणेस मान्यता देणे.

महासभा ठराव क्र. ६६, दिनांक २०.८.२००३ अन्वये विशेष महसूल समितीची नेमणूक करण्यात आली आहे. सदर समितीचा ठराव क्र. १, दिनांक १९.८.२००३ अन्वये श्री. नरेंद्र कुमार ठाकुर (कुमारी) यांनी सभापती पदावर नेमणूक केली आहे. श्री. नरेंद्र कुमार ठाकुर (कुमारी) यांनी दिनांक ३.१२.२००३ रोजी अर्ज करुन दिनांक २९.८.२००३ पासून वाहन भत्ता दुरध्वनी भत्ता, चहापान भत्ता मिळणे बाबत मागणी केली आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६, दिनांक ३०.४.९७ अन्वये महापौर, उप-महापौर, सभापती स्थायी समिती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता संवेदानीक आठ समित्यांचे सभापती यांना वरील भत्ते मंजूर करण्यात आलेले आहेत.

श्री. नरेंद्र कुमार ठाकूर (कुमारी) यांनी दिनांक २९.८.२००३ पासून विशेष महसूल समितीचे सभापती म्हणून नेमणूक झाली असल्यामुळे त्यांना इतर सभापतीना देण्यात येणा-या भत्त्याप्रमाणे वाहन भत्ता, दुरध्वनी भत्ता खालीलप्रमाणे....

वाहनभत्ता रुपये १५०००/- प्रति माह
दुरध्वनी भत्ता रुपये १५००/- प्रति माह
चहापान भत्ता रुपये ४५०/- प्रति माह

सदर प्रस्ताव मंजुर करण्यासाठी समितीच्या मान्यतेसाठी सविनय सादर.

स्थायी समिति ठराव क्र. १३१ दिनांकः-२४/१२/२००३.

सुचकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :- श्री. उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार विशेष महसूल समिती, सभापती करीता प्रस्तावित वाहन भत्ता, दुरध्वनी भत्ता, चहापान भत्ता मान्य करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):- आज प्रशासनाच्या वतीने आयत्त्या वेळचे विषय म्हणुन २ प्रस्ताव आणलेले आहेत, आपल्यापैकी बहुसंख्य सदस्यांची मान्यता असल्यास सदरचे विषय आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यात येतील.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचे विषय आयत्त्या वेळचे विषय म्हणुन आजच्या सभेच्या कामकाजात सर्वानुमते समाविष्ट करण्यात येत आहेत.

मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):- विषय कमांक ३३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ३३:-मे. मास्टर ॲण्ड एसोसिएशन यांची उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागासंबंधी स्थापत्त्य अभियंता यांचे तज्ञ म्हणून नेमणूकीस मान्याता देणे.

श्री एस. बी. सुखरामानी, प्रभारी कार्यकारी अभियंता (स्थापत्य) :- स्थापत्य अभियंता यांचे तज्ञ म्हणुन नेमणुकीसाठी आम्ही निविदा मागविल्या होत्त्या. त्याला प्रतिसाद मिळुन तीन जणांनी निविदा भरल्या होत्त्या. त्यामध्ये मास्टर ॲण्ड असोसिएटस् यांनी लघुत्त्तम दर म्हणजेच १. ७० टक्के एवढे दर दिले होते. त्यानंतर आम्ही तिन्ही निविदाकारांना वाटाघाटीसाठी बोलाविले असता उत्त्तम इंजिनीअरींग यांनी दर कमी करण्यास नकार दिला असुन मे. बुलचंद सोनेसर यांनी त्यांचे दर कमी करुन २ टक्के एवढे दर दिलेले आहेत. परंतु त्यांनी आता पुन्हा लेखी पत्र देवुन मास्टर ॲण्ड असोसिएटस् यांनी दिलेल्या दराएवढेच म्हणजेच १. ७० टक्के एवढया दराने काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे. आपणांस इष्ट वाटत असेल तर दोघांचे पॅनेल तयार करुन त्यांना काम देवु शकतो.

मा. सदस्य श्री मोहन बेहरानी :- दोघांचे दर सारखेच असल्याने पॅनेल तयार करावे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री आर. के. सोनवणे):- दोघांचे दर सारखे असल्याने दोघांची नियुक्ती करणे योग्य राहील.

मा. सदस्य श्री रामदास उमाप :- आयुक्तांनी निविदाकारांशी वाटाघाटी करुन दर कमी केल्याबददल आम्ही त्यांना धन्यवाद व्यक्त करतो.

मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :- सदरचा प्रस्ताव वरील सुचवलेल्या सुचनांप्रमाणे पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहेत.

प्रस्तावना

विषय क्र. ३३:-मे. मास्टर ॲण्ड एसोसिएशन यांची उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागासंबंधी स्थापत्त्य अभियंता यांचे तज्ञ म्हणून नेमणूकीस मान्याता देणे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम खात्त्याकडुन विविध सार्वजनिक प्रकल्प राबविली जातात. सदर प्रकल्पाकरीता तयार करावयाच्या प्रस्तावाकरीता विस्तृत प्रमाणामध्ये सर्वेक्षण करुन आराखडे तयार करुन प्राकलने तयार करावी लागतात. अशा कामांकरीता सार्वजनिक बांधकाम खात्त्यामध्ये सद्या कार्यरत असलेले स्थापत्त्य तज्ञ यांची मूदत संपलेली असल्याने नव्याने स्थापत्त्य तज्ञ यांची नेमणूक करण्याकरीता निविदा कार्यवाही करण्यात आली होती. एकंदर तीन निविदा प्राप्त झाल्या असून त्यांनी भरलेल्या दराचा तुलनात्त्मक मसूदा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | दिलेले दर | अटी व शर्ती | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे. मास्टर आणि असोशिएटस् | १.७० | | प्रथम निम्न दर |
| २. | मे. उत्त्तम इंजिनिअर्स कन्स्ल्टन्सी प्रा. लि. | ३.७० | | द्वितीय निम्न दर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | मे. बुलचंद सोनेसर | ३.२४ टक्के पत्रामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे निविदा दर ४.७४ टक्के होत आहे. | + 0.5 % for Performance sensitive project +0.5% for effective implementation of performance sensitive project +0.5% for Timely Completion of the Project | These point are already covered in the scope of work of the tender documents | तृतीय निम्न दर |

उपरोक्त पणे मे. मास्टर आणि असोशिएशन यांनी दिलेले दर सर्वात कमी आहेत. उपरोक्त तीन पैकी दुस-या व तिस-या निम्न दरांच्या पहिल्या निम्न दराशी वाटाघाटी करीता बोलविण्यात आली असता यांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | दिलेले दर | नवीन दर (वाटाघाटी अंती) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे. मास्टर आणि असोशिएटस् | १.७० | -- | प्रथम निम्न दर |
| २. | मे. बुलचंद सोनेसर | ३.२४ | २.०० | द्वितीय निम्न दर |
| ३. | मे. उत्तम इंजिनिअर्स कन्स्ल्टन्सी प्रा. लि. | ३.७० | ३.७० | तृतीय निम्न दर |

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे वाटाघाटी अंती सुध्दा द्वितीय व तृतीय निविदा दराच्या दिलेले सुधारीत दर सर्वात निम्न दराच्या मे. मास्टर आणि अससोशिएटस् यांच्या १.७० दरापेक्षा जास्त आहेत. या करीता सर्वात कमी दराचे निविदाचा मे. मास्टर आणि असोशिएसटस् यांची उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम खात्याने स्थापत्त्य अभियंता यांचे तज्ज्ञ म्हणून नेमणूक करणे करीता स्थायी समिती पुढे मान्यता मिळणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

सभेत चर्चेअंती प्रशासनातर्फे ही माहिती देण्यात आली की बुलचंद सोनेसर यांनी मेसर्स मास्टर आणि असोशिएटस् यांनी १.७० % या देकार दराने काम करण्यास लेखी संमती दर्शविली आहे. ही बाब विचार करणे योग्य आहे म्हणून स्थायी समितीपूढे प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १३२</u> <u>दिनांक:-२४/१२/२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री रामदास उमाप

हो स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार मे. मास्टर ॲण्ड एसोसिएशन व मेसर्स बुलचंद सोनेसर यांना १.७० या दराने उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागासंबंधी स्थापत्त्य अभियंता यांचे तज्ञ म्हणून नेमणूकी करीता प्रशासनास त्यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री प्रकाश कुकरेजा):-</u> विषय कमांक ३४ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ३४:-** पल्स पोलिओ लसीकरण मोहिम २००३-०४ साठी मार्कर पेन खरेदीचा खर्च रुपये १०,०००/- मंजुर करणे.

<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कलानी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहेत.

<u>प्रस्तावना</u>

पल्स पोलिओ लसीकरण मोहिम २००३-०४ दिनांक ४ जानेवारी, २००४ व दिनांक २२ फेब्रुवारी, २००४ रोजी असून सदर मोहिमेत एकही बालक पल्स पोलिओ मोहिमेपासुन वंचित राहता कामा नये याकरिता लाभार्थीचे करंगळीवर मार्क करणेचे प्रस्तावित करणेत येत आहे. तसेच सदर मार्कर पेन खरेदीचा खर्च रुपये १०,०००/- अपेक्षित आहे. सदरचा खर्च महापालिका कोषागरातून करणेत यावा. तरी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १३३</u>　　　　<u>दिनांक:-२४/१२/२००३.</u>

सुचकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्री सुर्यकांत लिंगे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पल्स पोलिओ लसीकरण मोहिम २००३-०४ च्या साठी लाभार्थींचे करंगळीवर मार्क करण्यासाठी मार्कर पेन खरेदी करणे कामी प्रशासनास संबंधीत कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे आणि अंतर्भुत खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५-५५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका